

**जी ए कुलकर्णी यांच्या १२ कथांवरील चर्चा- भाग -१**




1 अंजन ( काजळमाया )
2 अंधाराची पावले(निळासावळा)
3 अखेरचा दिवस ( हिरवेरावे )
4 अनंत ( सांजशकुन )
5 अनामिक ( सांजशकुन )
6 अवशेष ( निळासावळा )
7 अस्तिस्तोत्र ( सांजशकुन )
8 अहम् ( सांजशकुन )
9 आसरा ( सांजशकुन )
10 इस्किलार ( रमलखुणा )
11 एका देवाचा मृत्यू (सांजशकुन)
12 ऑर्फियस ( पिंगळावेळ )

# जीए कथास्वाद

# भाग १

# जीए कथास्वाद १

## जी ए कुलकर्णी यांच्या कथांवरील चर्चांचे संकलन

## संकलन व संपादन- सुनीळ सामंत


## ई प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

9987737237



या पुस्तकातील सर्व लेखनाचे व चित्रांचे अधिकार त्या त्या लेखकांकडे व चित्रकारांकडे आहेत. पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# जीए कथास्वाद -- १

अंजन (काजळमाया)
अंधाराची पावले (निळासावळा)
अखेरचा दिवस (हिरवेरावे)
अनंत (सांजशकुन)
अनामिक (सांजशकुन)
अवशेष (निळासावळा)
अस्तिस्तोत्र (सांजशकुन)
अहम् (सांजशकुन)
आसरा (सांजशकुन)
इस्किलार (रमलखुणा)
एका देवाच्या मृत्यू (सांजशकुन)
ऑर्फ़ियस (पिंगळावेळ)

# चर्चेतील सहभागी व्यक्ती

आशा भागवत
अतुल ठाकूर
अभयकुमार कुलकर्णी
अलका तडकलकर
अशोक पाटील
उमेश तुपे
कस्तुरी महेश
जयश्री जंगले
माधव पुराणिक
दिलिप बडे
नागेश कुलकर्णी
नितीन वैद्य
निशा क्षिरे
परमजीत सिंग
प्रदिप कुलकर्णी
प्रमोद कुलकर्णी
प्राची बापट
मंजिरी देशमुख
मनमोहन आंबेकर
महेश आफळे
मिलिंद सकपाळ
मिहीर ठकार
यतीन गुळवणी
राजेश उनवणे
राम कुलकर्णी
लक्ष्मीकांत देशपांडे
लखन दगडे
वंदना बोकील
वर्षा हळबे
विलास वाघोलीकर
विशाखा आपटे
विशाखादत्त
विश्वेश्वर नांदेडकर
वैभव कुलकर्णी
शिवाजी कुऱ्हाडे
श्रीकांत देशमुख
संजीव कुलकर्णी
साधना डोंगरे
सुनीळ सामंत
सुमन महामुनी
स्नेहल बोकील
हेमंत खडके
पुरुषोत्तम मोने
मेघा महाजन

मराठीतील सर्वोच्च कथालेखकांमध्ये ज्यांचे नांव अग्रक्रमाने घ्यावे अशा श्री जी ए कुलकर्णी यांच्या शताब्दीचे वर्ष २०२२-२०२३. या वर्षाचे सार्थक व्हावे या हेतूने जीएंच्या कथांचे प्रेमी एकत्र येऊन त्यांनी एकावेळी फक्त एक कथा घेऊन त्यावर जमेल तितकी सखोल चर्चा करून, त्या कथेतून काय मिळाले ते सांगण्याचा प्रयत्न केला. जीए यांची कथा लोलकासारखी प्रत्येकाला वेगळा प्रकाश, वेगळा रंग दाखवते. हिऱ्यासारखे जीएंच्या कथेला अनेक पैलू असतात आणि वेगवेगळ्या वाचकांना त्यातले वेगवेगळे पैलू दिसतात.

चौघांनी आपल्याकडचा एक एक रुपया दिला आणि त्यातून एक एक रुपया घेतला, तर प्रत्येकाकडे एकच रुपया रहातो. पण प्रत्येकाने एक एक विचार दिला तर चौघांकडे चार चार विचार जमा होतात. विचारांच्या या शिस्तबद्ध पण मुक्त देवाणघेवाणी मुळे ही चर्चा अत्यंत आनंदमय झाली. होते आहे. या चर्चेत इतरांनाही आनंद घेता यावा यासाठी हा संकलित पुस्तकप्रपंच.

संकलक- सुनीळ सामंत(9869674820)

नमस्कार. काजळमाया कथा संग्रहातील अंजन या कथेच्या चर्चेला सुरुवात करुया.

# अंजन- जी ए कुलकर्णी- संग्रह- काजळमाया

जीएंच्या कथेला विशेषणं काय देणार? जीए हेच एक विशेषण बनलं आहे.

अंजन ही कथा सामान्य माणसांची अद्भूत कथा आहे की एका सामान्य माणसाच्या सामान्य आयुष्याला जीएंचा परीसस्पर्श होऊन ती अद्भूत बनली आहे?

भैरू हा एक सामान्य दुकानदार. दुकान कसले, बूड टेकायला एक कोनाडा आहे झालं. घराबाहेर राहण्यासाठी एक ठिकाण. आणि घर तरी कसलं? उनाड बायको पार्वती आणि लग्नानंतर वर्षातच परत आलेली जानकी ही लेक. दरवाज्यात उभी राहून कपडे बदलणारी, समोरच्या पानपट्टीटपरीवरचा फ़ाजील टवाळक्यांचा विषय. भैरूच्या दुकानात जाण्याच्या अवेळात घरी येणारा बाबुराव. एकीकडे महिना आठ रुपये कमाईवर घर कसे चालते हा भैरूच्या आश्चर्याचा विषय तर तिकडे अंगठीतल्या चमकदार खड्यालाच सुवास यावा असा जानकीचा सुगंधी साजश्रृंगार घरात. रेशमी वस्त्रांतल्या इनामदारांच्या घरी दळण कांडण करायला अवेळी जाणारी पार्वती. झुलपं वाढवून तंबाखू खाऊन रात्री अपरात्री गाव भटकणारा पोरगा जोती. असा सगळा मामला. सगळंच बुरशी आलेलं.

पण याच भैरूच्या जगण्यात चंदनक्षणही असतात, जे नेमके जीएच टिपू शकतात. एकेकाळी नगारा बडवताना येणारी धुंदी, नाडगौडाची सून बाळंतपणात मेल्याची बातमी ऐकताच झालेला आनंद, मल्हारी ची भेट, मेलेल्या लोकांशी गप्पा गोष्टी,

आणि मग या गप्पांतून उलगडत जाणारं सत्य. त्याच्या मुलीची भैरूला माहीत नसलेली खरी कथा. बायकोचं खरं स्वरूप. कथेचा शेवट, उत्तरार्ध हा केवळ जीएच लिहू शकतील असा.

कथेतल्या उपकथा- लंगड्या वकीलाचा दत्तक गेलेला मुलगा, त्याचा खून, सख्ख्या भावाने लुबाडून हाकलून लावलेला गिधाडभट दादूभट, स्मशानातल्या लोकांच्या मृताशी असंबंधित भाऊभटाबद्दलच्या गप्पा, धनगराच्या बायकोने स्विकारलेली गडकऱ्याच्या विहिरीतले पाणी मध्यरात्री आणण्याची पैज. रायण्णाची अघोरी साधना, आणि या सर्वांच्या कथांचा शेवट मुख्य कथेच्या शेवटाशी सांधणारे जीए. सलाम.

-सुनीळ सामंत

१जी ए व्यक्ती, नाती, सामाजिक जीवन यांच्या परिस्थितीशी झगडत जाणाऱ्या अटळ वस्तुस्थितीचा शोध घेतात.

२ न मागता मिळालेल्या जन्मात (उत्पत्ती) सुखोपभोगाचा स्वर्ग (स्थिती) देणारा शेवटाकडे (विलय) नेणाऱ्या चौकटीत जगण्याच्या ओढाळ रसायनाचा शोध घेतात.

३ हे माणूस, आदिम भावना व त्यांचे नियंत्रण करण्याऱ्या गूढरम्य शक्तींच्या परस्पर संबंधांचे प्रत्ययकारी चित्रण आहे.पण त्यातून अर्थपूर्ण सुटके करता प्रयत्न तर दिसतात पण ते अपुरे धूसर अस्पष्ट शब्दात न मांडता येणारे वाटतात.

४ अनेक वर्तुळांतून पसरत जाणाऱ्या शोकात्म, कटु, अनुभवनिष्ठ, व्यवहारी, मर्यादित कोत्या, स्वार्थी, अपुऱ्या दृष्टीत 'अंजन' घालणारी ही कथा आहे.

५ मुख्य वर्तुळ एक- व्यक्तीरेखा- (भैरू+ पार्वती + जानकी) यांच्यातली नाती विसंवादी व तुटक आहेत. शारीरिक स्तरावर, अतृप्त वासनांना फुटलेली परस्पर

सहमतीची(शरीर देऊन पैसे व संरक्षण घेण्याची)आदिम वाट यात दिसते.बीभत्स रसाचा आविष्कार भासतो.

६ मुख्य वर्तुळ दोन - भैरु -व्यक्तीचे एकटे/एकाकी/एकांतप्रिय जीवन .त्यात १) वादन करताना नाद रूप झाल्यावर अनुभवलेले दिव्य क्षण दिसतात २)आपल्यावर अन्याय केलेल्या नाडगौडाला नियतीने दिलेला न्याय पाहिल्यावर वाटलेल्या समाधानाचा क्षण दिसतो.

७ गूढ अनुभवातून जगण्यातले दुःख समजून घेताना भैरू दिसतो. तसेच अपयशी, सामान्य, साध्या, प्रामाणिक माणसांचे अटळ दुःख कथेत ठिबकताना दिसते.

८ कथेतील दुय्यम वर्तुळे- व्यक्तिरेखा- लंगडा वकील, दत्तक मुलगा, दादूभट इत्यादी. सर्व पात्रांना परिस्थितीने व वस्तुस्थितीने एक अटळ, अपरिहार्य भूमिका, नियती व त्यांच्या जगण्याचे वास्तव दिलेले आहे. पण त्यातही ही सर्व पात्रे आपापल्या परीने शोध घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न करताना दिसतात

९ या कथेत कामवासनेचा अटळ, पाशवी शेवट दिसतो. स्वार्थाचा, ऐहिक विकारांच

अंजन' या कथेचा आलेला अनुभव

मागील टिपण पुढे चालू

९ या कथेत कामवासनेचा अटळ, पाशवी शेवट दिसतो. स्वार्थाचा, ऐहिक विकारांचा (काम, मोह, लोभ इ.) अपरिहार्य शेवट दिसतो. लग्न संस्था व स्वतःच्या संपत्ती वर स्वतःचा हक्क (मानवी संस्कृतीची मुख्य वैशिष्ट्ये) यांचे बरेचसेअपयश दिसते.

१० आपण दोन दंद्वांचा सतत सामना करत असतो. १) एकटेपणा /एकाकीपणा/ एकांतप्रियता व त्याद्वारे इतर सृष्टीशी आपला असलेला संबंध समजून घेण्याचा

प्रयत्न.२) इतर व्यक्तींबरोबर नाते संबंध -पत्नी, मुलगा, मुलगी, इतर स्त्रिया /पुरूष, समाज, संस्था, निसर्ग, प्राणी इत्यादी.

११ या दोन दंद्वांचे हृद्य, समरसून पण तटस्थपणे रेखाटलेले नादचित्र, लिहिलेले दृश्यकाव्य, रसमय झालेले भावगंध या कथेतून सहृदयाच्या अबोध जाणिवेत झिरपतात, तरंगतात -

'देह झाला नंदन | गाभ्यात चंदन | जाणताना | ' करतात.

१२ शब्द, विचार कमी जास्त झाल्यास क्षमा असावी.

-डॉ माधव पुराणिक

मा. डॉ. माधव पुराणिक सर. आपण ज्या व्यापक दृष्टीतून कथा पाहिली आणि जे लिहीले आहे ते पाहून मला युरेक्का युरेक्का असे ओरडावेसे वाटते आहे. आपण मांडलेले ११ मुद्दे अत्यंत गंभीर वाचकाचे लक्षण आहे. मला या कथेतून त्या मानाने फ़ारच कमी वेचता आले होते. आणि ते मी खाली लिहीत आहे.

या कथेतून मला दोन गोष्टी शिकायला मिळाल्या ज्या माझ्या आयुष्यभर कायम बरोबर राहिल्या.

एक) दिसतं, ऐकतो तेच सत्य नव्हे. सत्यामागे सत्याचे कांद्याच्या पातीसारखे बरेच पदर असतात. आणि “आत्ता खरं कळलं” असं वाटे वाटे पर्यंत पुढचं सत्य येऊन आदळतं. तेव्हा आपण जाणतो तेच सत्य असा हट्टाग्रह बाळगू नये.

दुसरं) तत्त्वज्ञान- भैरू मरणोत्तर मैफ़लीत मल्हारीला त्याच्यावर अन्याय करणाऱ्यांच्या गळयात गळे घालून खिदळताना पहातो तेव्हाचं. भैरूला त्याचं आश्चर्य वाटतं तेव्हा- मल्हारीच्या भाषेत सांगायचं तर, "हे बघ भैया, त्याचं असं आहे, " मल्हारी त्याला समजावत म्हणाला, “एखादं नाटक असतं-असतं की नाही? त्यात माणसं भांडतात, खुन-मारामाऱ्या करतात, ‘विष देतात, प्रीती करतात, द्वेष

करतात; पण नाटक संपलं की सगळं विसरून बसतात की नाही एका जागी बोलत?- तस्सा आहे बघ सगळा हा मामला! माझं नाटकातलं काम संपलं, त्याचंही संपलं; नाटकात आम्ही काय केलं याची आता रे पोटदुखी कशाला? कसं म्हणतोस बेट्या भैया?"

आपण या दोन्हींना अत्यंत वरच्या पातळीवर नेऊन शब्दबद्ध केलं. आपले मनः पुर्वक आभार.

आपली ही टिपण, आपली परवानगी असेल तर copy paste करून एका पुस्तकाचा भाग करू इच्छितो.

सुनीळ सामंत

---

हे तत्वज्ञान मला एका समांतर जागी दिसले, कट्टर, प्रसंगी हमरीतुमरी वर येणारे नेते जेंव्हा त्यांच्या कार्यकर्त्यांना गळयात गळे घालून हास्यविनोद करताना दिसतात तेंव्हा त्यांची पण परिस्थिती भैरू सारखी होत असावी …

-आनंद माने

---

१ सत्याचे पदर - दिसतणे व ऐकणे इ. - ऐंद्रिय +अंतःकरण चतुष्टय(मन, बुध्दी, प्राण, अहंकार)-४ . ही १४(१०इंद्रिये +४) तत्वे सतत बदलतात म्हणून यांना जाणवणारे सत्य सतत बदलते

२ प्रत्येकाची संवेदनशीलता सतत वेगळी असते म्हणून त्याला जाणवणारे सत्य वेगळे असते

३ सत्य हे अ)संकल्प, कल्पना, इच्छा

ब) मन (भावना) क) बुध्दी (विचार) ड) कृती

इ) परिणाम यात ६ विकार(काम, लोभ इ) मिसळून मग त्याप्रमाणे अनुभवात बदल असा क्रम व अक्रम असे पदर

४ हे स्थळ काळ यात मर्यादित (जन्म-मरण) असते

५ सत्य जाणवण्याची पातळी

अ) शारीरिक ब) मानसिक क) आत्मिक("मी आहे") ड) परम सत्य (शब्दातीत) उत्पत्ती स्थिती विलय यामागचे एक तत्व

६ जी ए त्यांना जाणवलेले सत्य कलात्मकतेने मांडतात

७ सहृदय वाचक त्याचा आस्वाद घेतात.आनंद घेतात.जीवनाकडे पाहून प्रेरणा घेतात

८ जगण्याकडे विविध प्रकारे पाहता येते (व्यक्ती करता)

अ) नियतीवाद ब) पूर्वसंचितवाद क) प्रयत्नवाद

ड) आशावाद इ) आदर्शवाद ई) स्त्रीवाद उ) समतावाद ड) स्वातंत्र्यवाद

९' अंजन ' कथेकडे या संदर्भाने पाहता येते.जी ए चा कल नियतीच्या सार्वभौमत्वाकडे वाटतो

१० प्रत्येक पात्राचे जगणे या सर्वांचे मिश्रण आहे.

११ परिणाम -असहायता, दुर्बलता, परिस्थिती शरणता, खिन्नता, क्षणभंगुर उपभोगाची स्वामित्वता, इ

१२ तुम्हाला हे सत्य(=अस्तित्व, असणे) जाणवले असावे

डॉ माधव पुराणिक

साधारण कौटुंबिक वाटणारी सुरवात करून एका वेगळ्याच विश्वात नेणाऱ्या या कथेचे अनेक पैलू दिसतात.

सामान्य भटजीचे घराणे. मारुतीची पूजा करून गुजराण करणारा मल्हारी, मारूतीच्या दागिन्याच्या चोरीचा आळ येऊन पूजा सुटल्यावर वेगवेगळ्या अंजनांच्या नादाला लागून भ्रमिष्ट होऊन एका पावसाळी रात्री घरातून निघून जातो.

कथानायक भैरू पित्याचे अंजनाचे वेड मनात बाळगून असतो. दुकान व काचेवर पारा चढवण्याचा व्यवसाय न चालल्यामुळे तसेच बायकोमुलांच्या वाह्यात दिसणाऱ्या वागणूकीने त्रस्त असतो. कथानायक भैरू गावात बारीकसारीक कामे करतो पण त्याला अफूचे व्यसन असते. या पार्श्वभूमीवर कथा पुढे सरकते.

एके संध्याकाळी भैरूला नाडगोडाची सून सातव्या महिन्यात बाळंत मुलासह खलास झाल्याचे कळल्यावर भैरू एका जुन्या अर्धवट अंजनाची बाटली घेऊन स्मशानात जातो.

इथे कथेला कलाटणी मिळते. आतापर्यंत साधारण व कौटुंबिक वाटणारी कथा एका वेगळया जगात नेते. नाडगौडाच्या सुनेच्या चितेची राख भैरू खिशातील बाटलीतल्या अपूर्ण अंजनात मिसळून आपल्या डोळयांना लावतो. इथेच त्याला दिव्य दृष्टी होऊन गावातील मृत माणसे भेटतात. त्यात त्याचा बाप मल्हारी भैरूला भैरूच्या बायको व मुलीच्या वागणुकी मागचे सत्य तसेच कारणं सांगतात. मल्हारी त्याला त्यांचे भविष्यही सांगतो.

मारूतीचे सोन्याचे तोड्याच्य चोरीमुळे मल्हारी व भैरूचे आयुष्य उध्वस्त झाले. चोराचा शोध घेण्यासाठी मल्हारीने निरनिराळया अंजनामागे आपला जीव घालवला. आता चोर कळून चोरीचे तोडे विकत घेणारा राघूअण्णा हे कळून राघूअण्णाशी मल्हारी सलगीने बोलतो याचा भैरूला संताप येतो.

इथे मला भावलेल मल्हारीचं भैरूला समजावणं!

"हे बघ भैरू, त्याचं असं आहे, एखादं नाटक असतं. त्यात माणसं भांडतात, खून-मारामारी करतात, विष देतात, प्रीती करतात, द्वेष करतात; पण नाटक संपल्यावर सगळं विसरून बसतात की नाही एका जागी बोलत?--- तस्सा आहे बघ सगळा मामला! माझं नाटकातलं काम संपलं, त्याचंही संपलं; नाटकात आम्ही काय केलं याची आता रे पोटदुखी कशाला? कसं म्हणतोस बेट्या?"

कथेचा शेवटी भैरूचा स्मशानात मृत्यु होतो.

कथेची बांधणी अत्यंत मुद्देसूद!

उपमा अलंकारांची चपखल व मुबलक उधळण आहे. कथा परिणामकारक आहे. मला खुप आवडली.

-यतीन गुळवणी

1अंजन कथा पूर्वी वाचली होती. आपण परत त्या कथेची ओळख करून दिली, याबद्दल खूप आभार 2.जीए, लहान गावातील, हातातोंडाशी गाठ करून जगणारी माणसे, सर्वार्थाने दाखवतात. उदा कसाब, शलाट, काकणे.तसे येथे भैरू पुजाऱ्याचे मध्यवर्ती स्थान आहे. 3) जीए, नंतरही जे सांगतात त्याप्रमाणे येथे व्यक्तीनिष्ठ पण भासमान अस्तित्ववाद आहे.भासमान स्वनिर्णय घेताना, नियती घडामोडी ठरवते, हे दाखवणारा नियतीवाद आहे("शेवटी हे नाटक असते"), म्रुत्यूची अटळता, व तो क्षण ठरवणारी नियती आहे.म्रुत्यूनंतर अस्तित्वाचा संभव आहे.जीएंच्या सर्व साहित्यातील संसार कथा व नियती कथा यांचे संयुग या कथेत आहे.म्हणून ही महत्त्वाची कथा वाटते. धन्यवाद.

-विलास वाघोलीकर

यतीनजी, या कथेत उपमा अलंकारांची चपखल व मुबलक उधळण आहे खरेच. कधी अतिशयोक्ती तर कधी वाक्यांची लयबद्धता हेही या कथेते मला विशेषत्वाने सापडले.

अगदी एकाच पानावर ऐश्वर्य आणि दारिद्र्याची टोकं या कथेत जीएंनी वर्णली आहेत.

१-समोर हातांच्या अगदी आवाक्यातच सोन्याच्या झगझगीत नाण्यांचा डोंगराएवढा ढीग होता, आणि सगळी नाणी वाघाच्या डोळ्यांप्रमाणे चमकत होती. पशापशाने ती नाणी उचलून खणखणीतपणे हातावरून घसरू देण्याच्या आनंदाने

भैरू धुंद झाला होता. काही वेळा त्याच ढिगामधून सकाळच्या सूर्याएवढे लालभडक माणिक पशात येत होते, सफरचंदाएवढा हिरा हाती लागे, तर ज्याच्या नुस्त्या प्रकाशानेच खडकावर हिरवळ उमटली असती, असले एखादे जातिवंत पाचू पिवळया रंगाच्या दिवाळीत चमकून जात असे.

२-आता त्या दुकानात राहिले आहे काय? नारळ संपून पाचसात दिवस झाले होते, आणि पुन्हा आणून ठेवायला खिशात दिडकी देखील नव्हती. कुंकू, बुक्का, पेपरमिट यांच्या बाटल्यांची टोपणे गंजून गेली होती. गावठी विस्किटे किडली होती, आणि कचऱ्याच्या कुंडीतले कुत्रेदेखील त्यांना तोंड लावायला तयार झाले नसते. इतर पाचसात डब्यांत कधीकाळी काय होते कुणास ठाऊक! कारण आता त्यांची झाकणे देखील उघडता येत नव्हती. पत्रावळींचा बिंडा झुरळांनी खाल्ल्यामुळे जाळीदार झाला होता, आणि असल्या हजारडोळया पत्रावळी पदरची दिडकी टिकवून घेणार तरी कोण!

जी ए एकाद्या गेय कवितेसारखे गद्य लिहितात.

सुनीळ सामंत

---

तुमचे निरीक्षण उत्तम आहे.प्रत्येक मनातले हे द्वंद्व आहे.जी ए नी कलात्मकतेने संपत्ती व विपत्ती घ्या पलिकडचा नादरूपात्मक, रंगलावण्या चा, हर्षखेदाचा(संदर्भ केशवसुत. झपूर्झा) अनुभव दिला आहे

द्वंद्व उदाहरणे १) प्रिय -अप्रिय २) सुख -दु:ख ३) जन्म -मरण ------अनेक उदाहरणे

माधव पुराणिक

शेवटचा प्रसंग आहे तो मला हैलुजनेशन (भास?) चा प्रकार वाटतो याला कारणीभूत बर्याच गोष्टी असू शकतात, गुडघ्याला झालेली जखम, झोपेचा अभाव, दारू, अंजन..

पण जी रहस्यं मल्हारीकडून भैरू ला कळतात ती शक्यतो भैरूने सबकौन्शस लेवल ला सोडवलेली असणार ती त्याला या अवस्थेत मल्हारीच्या तोंडून ऐकण्याचा भास/स्वप्न झाला असू शकतो

शेवटी झालेले रहस्य भेद ही खरेच कशावरून तेही भैरूच्या मनाचे खेळ असू शकतात, त्याचे पुरावे म्हणजे ज्या सोन्याच्या वाट्या आणि समया घेऊन भैरू पळाला त्या नारळाच्या करवंट्या आणि हाडं निघाली

ते तसेच आहे असा माझा आग्रह नाही, मृतात्मेही असू शकतील किंवा हा सगळा भैरूच्या मनाचा खेळही असू शकतो..

मला उलट दूसर्या गोष्टीची जास्त भीती वाटते..

मृतात्मे असतील तर या एका assumption वर पुढील सर्व गोष्टी मान्य होतात जसे की त्यांना सर्व भूत-भविष्य माहिती असू शकते, पण ते तसे नसेल तर मानवी मन काय काय प्रकारचे आरसे उभे करून दिसणार्या घटनांच्या कशा प्रतिमा निर्माण करेल याचा अंदाज बांधणे कठीण आहे .. हे सर्व जास्त भयावह आहे जेंव्हा सत्य आणि आभास यातील जाणीव धूसर होत जाते

-आनंद माने

खरे आहे. मानवी विचारांची गुंतागुंत ही देखिल भुतांच्या गोष्टींइतकीच गूढ असते.

या दोन्ही प्रकारचा विचार करत ही कथा वाचणे वेगवेगळे रंजन करू शकेल.

महाभारताचा बराचसा भाग हा तर्काला पटू शकत नाही, तरीही त्यातून रंजन होतेच. मला वाटते महाकाव्याचा आस्वाद घेणे व्यक्तीसापेक्ष असणार, असावे. इतकेच कशाला, एकच व्यक्ती, वेगवेगळ्या वयात, त्याच कथांचे अर्थ आणि आस्वाद, वेगवेगळे घेईल आणि त्यातून आनंद मिळवेल. श्रेष्ठ कृतींचा तो एक मानदंडच होय.

-सुनीळ सामंत

एखादी गोष्ट उघड न सांगताही सूचकपणे कशी सांगायची याचं जीए कौशल्य या कथेतही जाणवतं. भैरू अफू खातो ही गोष्ट आणि त्याचे नाकर्तेपण बायकोच्या शब्दांत- "पोटाला काय बिब्बा घालणार की तुमच्यासारखी काळी गोळी?" अशी समोर येते. इनामदारांनी पुन्हा तांदूळ कांडायला पार्वतीला घरी बोलावताना " आधीचे तांदूळ बाईंनी जाताना बरोबर नेले की" या वाक्यातून चाणाक्षाला इनामदारांची बायको घरी नाही, हा अर्थबोध होतो. आणि जाणारी पार्वती – तिचा गोलसर गोरा हात- भेंडीसारखी सुबक बोटे- नागवेलीच्या कोवळ्या पानासारखा तळवा- या वर्णनानंतर- यात काहीतरी कमी आहे असे भैरूला वाटले- असे म्हणून ती शंका गडद करणे. एखादा चित्रकार दुधी काचेच्या आड असलेल्या निर्गाचे सूचक दर्शन घडवतो, एखादा सिनेमॅटोग्राफर हलक्याशा सावलीच्या आभासाने अशुभाची चाहूल देतो, एखादा संगीतकार निवांत झोपलेल्या एकाद्या व्यक्तीवर येऊ घातलेल्या संकटाचा संकेत पार्श्वसंगीताच्या तुकड्यांतून मनात पेरतो तसे जीए एखाद्याच शब्दाच्या फटकाऱ्याने असे काही सुचवत जातात. जीएंच्या कथा वाचताना त्यातल्या या गाळलेल्या जागा वाचणे अत्यंत रंजक असते.

भैरूची हतबलता जीए शब्दाशब्दातून जाणवून देतात. बायको आणि मुलीचा चवचालपणा, सख्ख्या काकाने हक्क लुबाडल्यावर दाखवलेला संभावितपणा जीए

लिहितातच, पण दुसरीकडे वकीलाच्या भोळेपणाचा फ़ायदा उपटणारा भैरू, बायकोच्या वाकड्या पावलाकडे सोयिस्करपणे कानाडोळा करणारा भैरूही समजतो. जीए आपल्या नायकाला सद्गुणांचा पुतळा बनवत नाहीत. अजिबात नाही.

सुनीळ सामंत

भैरू(भैरव, काळभैरव) हा मारुती (अंजनीसुत, शंकराचा/ भैरवाच्या एक अवतार, अंजनच) च्या देवळातील (चौकोनी - घर, जीवाचे प्रतीक व गोलाकार - पोकळी, ईश्वरी तत्वाचे प्रतीक) पुजारी (मारूती म्हणजे स्वतःतील सूक्ष्म तत्वांचा पुजारी), दागिने म्हणजे कर्मकांड, बाह्य उपचाराचे क्षणभंगुर प्रतीक.

मल्हारीचा(भैरूचे वडिल) मुलगा (ईश्वरी तत्वापासून गूढगर्भातून जनन).

अंजनाचा शोध म्हणजे अनादी काळापासून माणसाचा चाललेला या देहातच अमृताच्या, अमृतांजन, अलौकिकाचा अनुभव घ्यायचा प्रयत्न.माणसाच्या जगातल्या अनाकलनीय (चोरीचा आळ, देहलालसा, सतत बदलणारे वाढणे) गोष्टींचा शोध.

माणूस निरंजन (देहातीत, अंतःकरण चतुष्टय- मन, बुध्दी, प्राण, अहंकार/जीव या पलिकडे गेल्यावर, अबोध जाणिवेत, फक्त ज्ञानरूप) झाल्यावर स्मशानात (गतप्राण, तांत्रिक अघोरी साधना भैरवाची, राख) डोळयात अंजन (तिसरा डोळा, भैरव)हा शोध थांबतो.

जी ए नी या कथेतून दैवतांच्या प्रतीकातून माणूस व निसर्ग शक्ती (शिवशक्ती, शिवलीला- नाटक, खेळ, भूमिका, ) यांच्या संबंधाचा वेध घ्यायचा दैदिप्यमान प्रयत्न जाणवतो.

सर्व पात्रे भैरू, पार्वती, जानकी, इ आहेत.ते जसे जमेल तसे जगतात.अपेक्षांचे ओझे नाही.वासना जशा शक्य होतील तशा रसरशीतपणे, शृंगारशोभेने पूर्ण

करतात.सामाजिक बंधने नाहीत.बुध्दी कमी तर खंत नाही. इंद्रियनिष्ठ संवेदनांत आयुष्य ओढतात. अर्थ लावायचा प्रयत्न करतात. एक दिवस नष्ट होतात.हीअस्तित्ववादाची प्रतीके . जी ए ठसठशीत दाखवितात.(तत्व " मी आहे हेच सर्वात महत्त्वाचे.मी व्यवहारिक कर्तबगारी दाखविणे कमी महत्वाचे.")

ही कथा "भैरव " तत्वाभोवती चक्राकार (शक्ती चक्र) फिरते - संथ, कंटाळवाण्या, अटळ जगण्यासारखी.

चूकभूल द्यावी घ्यावी

डॉ माधव पुराणिक

हे टिपण पुन्हा पुन्हा वाचले. त्यातल्या प्रत्येकच शब्दामागे (प्रतिकामागे) दडलेला इतिहास, धार्मिक, पौराणिक संदर्भ लावत वाचणे माझ्या बुद्धीला थोडे अवघडच गेले. या कथेत तुम्हाला existentialist philosophy चा दृष्टीकोन जाणवला आणि तो तुम्ही उलगदल्यानंतर आता मलाही जाणवायला लागला. म्हणजे ही कथा वाच्यार्थाने जेवढी खोल दिसते त्याही मागे बराच खोल काव्यार्थ यात दडलेला जाणवला.

हे खरोखरच जपून ठेवण्यासारखे आहे. धन्यवाद.

सुनीळ सामंत

ह्या कथेतील अंजन बनवण्याचे वेगवेगळे प्रकार नेहेमीच्या कल्पनांच्या पलीकडचे पण सुरस वाटतात.बदलणाऱ्या प्रतिमा त्यातील वर्णनामुळे डोळयासमोर येत जातात.

-विशाखा आपटे

योग्य.वाचकांनी प्रतिसाद दिलेत, याबद्दल धन्यवाद देतो.आपल्याला विज्ञान माहीत आहे. पण ललित कला ही लेखकाला काय सांगायचे हे कथेचा संदर्भ घेऊन पहावे लागते. काही मुद्दे मांडतो..1)भैरू रात्री स्मशानात गेला होता.2)त्याला तेथे भेटलेली सर्वजण मेलेले होते.3)ती भविष्यातील घटना सांगू शकत होती.4)जेवण मुकाट्याने जेवायचे असून खास(श्राध्दाचे)होते. 5)दत्तंभटाचा मुलगा श्राद्ध करत नसल्याने, त्याला जेवण मिळाले नाही6)भैरू चा पाय खड्ड्यात पडला, तो झाडाला धडकला, सकाळी गुराख्यांना राखेत 'आडवा'पडलेला भैरू सापडला.7)नगारा वाजल्यानंतर तो आरशात लुप्त झाला. त्यामुळे कथेत, म्रुत्यूनंतरच्या असण्याचा संभव दाखवला आहे.जीएंना जीवन' नाटक ' आहे, हे दाखवायचे आहे.ललित कला म्हणून हे समजून घ्यावे ही विनंती.

विलास वाघोलीकर

छान संवाद चालू आहे. कथेचा आस्वाद वाढतं आहे. अनेक नवे पैलू समोर येत आहेत. विचार शक्तीला चालना मिळत आहे.

मला आणखी थोडे सुचते ते असे. भैरूचा मृत माणसांशी जींएनी दाखवला आहे, तो

1 भैरूने केलेल्या नशापाना नंतरचा कल्पनाविलास

2 भैरूने डोळयांत घातलेल्या अंजनाचा खरोखरीचा परिणाम

3 भैरू काही प्रमाणात का असेना (गडघेदुखीची सूज व वेदना जाणवण्या इतपत का होईना) शुध्दीत असल्याने त्याला झालेला भास

4 भैरूशी घडलेला सत्य प्रसंग

त्या भेटी नंतर इहलोकाशी त्याचा संबंध म्हणूजे त्याच्याकडे सापडलेली हाडे आणी शेणी!

जींएच्या वैशिष्ट्याप्रमाणे त्यानी "जे काय समजायचे ते समजून घ्या" जीएंनी कोणते अंजन वापरायचे ते आपल्यावरच सोपवले आहे.

यतीन गुळवणी

अंजन•••..

जी .एं.च्या काजळ माया या कथा संग्रहातली ही कथा.काजळाशी संबधित ही कथा हा एक अनोखा योगायोग.अर्थात जी.ए.ना तो अभिप्रेत असणारच.

जी.एं.च्या कथेतला आशय हा कथेच्या नांवापासुनच प्रतित होतो.आणि कथेच्या आशयाशी इमान राखत आपल्या शब्द कळेनं ते कथेचा पट विलक्षण ताकदिनं विणतात. अंजना साठी राख मिळवण्यासाठी भैरु स्मशानात येतो. आणि त्या भासमय वातावरणात त्याचा बाप मल्हारी त्याला भेटतो तेव्हां भैरु त्याला आपण अंजनासाठी वापरलेल्या राखेत काही दम नाही असे सांगतो, त्यावर राखेच्या संबधातल्या अटींची पुर्तता नाही झाली तरी निदान त्या अंजनाने डोळेतरी स्वच्छ होतील अ शी त्याची समजूत काढतो.आणी भैरुला एक वेगळीच उमज येते.

आपली मुलगी अशी का वागली? डाॅक्टर इनामदारांच्या कड मिरच्या कांडायला जाणार्या पार्वतिच्या हाताची बोटे एवढी नितळ कशी?....मल्हारी मुळं त्याला खरं सत्य कळतं अश्राप (?) दादूभटानं गोविंदाला त्याच्या गळयात झार्याच टोक खुपसून मारलेलं असत. देवाचा सोन्याचा डाग चोरणारा मल्हारीचा सख्खा भाउच होता.आणी तो विकत घेतला राघू अण्णाने. पण याच मल्हारीला आता काहींच वाटत नाही.अंजन डोळयात घातल्यावर एक नवीच दृष्टी येते.सगळच नाटक आहे. म्हणजे अंजन मिळुनही त्याचा फारसा उपयोग नाहीच.सगळया हतबल असणार्या व्यक्तीरेखा अटळ नियतिशी बांधल्या गेल्याआहेत.त्यातुन सुटका नाही. सगळा अट्टाहास शेवटी व्यर्थच ठरतो.लेखक वाचकाला हे एक नविन भान आले.

जी.एंच्या कथेतले उपमा, उत्प्रेक्षा, अंलंकार प्रतिमा हे सगळेच कथेच्या आशयाश एकजीव झालेले असतात.

अंजन वाचुन जे विचार मनात आले ते मांडण्याचा प्रयत्न एवढेच या टिपणाचे स्वरुप···.. हे आपल्यांसारख्या मान्यवरांसमोर मांडण्याची संधी मला मिळते आहे ···धन्यवाद!

राम कुलकर्णी······..

'अंजन 'ही संसार कथा व द्रुष्टांत कथा यांच्या संयुगातील, महत्वाची कथा आहे. आपण हे ओळखून, ' अंजन ' चर्चेसाठी घेतली, व छान टिपण केले, याबद्दल धन्यवाद, व बेस्ट लक.गुड डे.

विलास वाघोलीकर

# अंधाराची पावले जी ए कुलकर्णी
# संग्रह: निळासावळा

मागेही वाचली होती सकाळपासून 3 वेळा वाचली, वाचताना कल्पनारम्य वाटतंय पण नेमका अर्थ उमगत नाहीय अजून, आता बघू या उद्याच्या चर्चेत काय काय आयाम मिळतात,

अभय कुलकर्णी

मला या कथेवर पुराणिक सर, वाघोलीकर सर, गुळवणी सर यांच्याकडून ऐकायचेच आहे. आणि त्याहीपलिकडे जाऊन किमान एका तरी इतराचे ऐकायची इच्छा आहे. हे आवाहन समजा किंवा आव्हान.

सुनीळ सामंत

अवघड आव्हान!

पूर्वीही वाचून दुर्बोध वाटली.

आता दोन वेळा वाचली.

रंग, गंध व आकार यांची उधळण, प्रपाताप्रमाणे कोसळते. परत वाचून समजण्याचा प्रयत्न करतो. वाघोलीकर सर व पुराणिक सर यांच्याकडूनच आव्हान स्वीकारले जाईल.

यतीन गुळवणी

खरंच अवघड आहे.

पण जी. एं. नीच परवानगी देऊन ठेवली आहे.

एकदा वाचा, दोनदा वाचा, तीनदा वाचा...

नाही गोष्ट समजली तर नाद सोडून द्या!

प्रत्येक गोष्ट आपल्याला समजलीच पाहीजे असं थोडंच आहे!!

प्रमोद कुलकर्णी

**अंधाराची पावले- जी ए कुलकर्णी- निळासावळा**

जीएंच्या कथा काळानुरूप विकसित होत गेल्या असा एक (अत्यंत साहजिक) सिद्धांत आहे. पण विकसित होण्यासाठी प्रयोग करण्याचे धाडस लागते, नाहीतर यशाची परिनती पुनरावृत्तीतच होण्याची शक्यता जास्त.. धाडसाची चुणूक जीएंच्या अगदी सुरुवातीच्या म्हणजे १९५५ च्या "अंधाराची पावले" या कथेत दिसते. कथा काय आहे? कथेचा सारांश जास्तीत जास्त शब्दांत सांगायचा तर खालीलप्रमाणे होईल.

--

**दिवस संपून रात्र होते.**

--

-- बस. एवढीच कथा आहे. हो. याहून एकही ओळ मी तरी लिहू शकत नाही.

ही कथा लिहून मराठीतील अग्रगण्य मासिकाला पाठवणे हेही धाडसच. आणि सत्यकथा ने ती छापणे हेही धाडसच. बरे, जीए तेव्हा एक तीशीतला नवोदित लेखक असणार. फ़ारसं नाव नसलेला. तरीही त्याची, तीही अशी कथा छापणं म्हणजे कमालच. सत्यकथा ला आणि भागवत-पटवर्धन जोडीला त्यासाठी सलाम.

या कथेवर विवेचन, विश्लेषण, आस्वादात्मक, समीक्षात्मक काय लिहावे? आणि किती? झेपणारं काम नाही.

जीएंचं साहित्य चारपाच दशकं अनियमितपणे वाचलं. पण या कथेपाशी कधीच रेंगाळलो नाही. ऑप्शनला ताकून पुढे झालो.

कथेत एकही पात्र नाही. कथेत एकही ’घटना’ नाही. रात्र होण्याची ती संथ ठाम प्रक्रिया हीच घटना. प्रकाश आणि ध्वनी हीच पात्रे.

----

पात्र नाही म्हणायला एक ’मन’ आहे. श्रांत निर्जीव पसरलेले. मन.

---

कथेत असंख्य उत्प्रेक्षा, रूपके आणि उपमानांचा वर्षाव आहे. एखादे स्वप्न पहात आहोत असा भास व्हावा असे काहीतरी अवर्णनीय विश्व साकार आणि निराकार होत असते.

---

पंडित जसराजजींचा श्याम कल्याणातला अर्थहीन उच्चार समुच्चयाचा तराना ऐकताना आपण त्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्नही करत नाही. मजा घेतो फ़क्त. वासुदेव गायतोंडेंचं एखादं रंगांच्या पटाचं abstract उलगडणंही आपण अर्थाचा मागोवा न घेतो आनंदाने फ़क्त अनुभवतो. किंवा एकाद्या समारंभात द्वाराशी काढलेली रांगोळी आणि भिंतीवर सजवलेली फ़ुलांची कलात्मक आरास पाहून अर्थ लावत बसत नाही. सुखाची अनुभूती घेतो. तद्वतच शब्दांचाही नादध्वनींचा अनुभव घ्यावा हा विचार या कथेमागे असू शकतो. याच्या अत्यंत जवळ जाणारी साहित्यिक अनुभूती म्हणजे ग्रेसांची कविता. ग्रेसांच्या कवितेतही असंख्य प्रतिमा येतात. काहींचा अर्थ लागतो. काहींचा नाही लागत. पण ती ऐकायला, वाचायला छान वाटते. बस. वर दिलेली उदाहरणे थोडी उच्चभ्रू वाटतील. तर आताच आलेल्या पुष्पा सिनेमातल्या गाण्यांचा अर्थही माहित नसताना आलेली लोकप्रियता बघू.

प्रत्येक गोष्टीला अर्थ असला तरच त्यातून आनंद मिळेल असे नाही. नुसत्या अगम्य आकृतीतही आनंद लाभतो.

जीएंची अंधाराची पावले ही कथाही अशीच वाचावी. शब्दांच्या नादांचा, वाक्यांच्या लयीचा आणि जमल्यास प्रतिमांमागच्या आशयाचा आनंद घेत.

---

कबीराचे दोहे ऐकताना अनेक प्रतिमांचा मारा असतो. पण त्यांची निरूपणं कुठेतरी सापडतात.

या कथेतील मला न उमगलेल्या प्रतिमांची यादीच बनवली आहे.

सात पिसे

काचपात्र

बिंदू-जीवनाची अंधारी खोल (गुहा?)

सर्प

कृष्णज्योती

देवीचे वण असलेली उंच गळ्याची भिंत

पाल

घुबड

द्विजिह्वांची पाने

दहा आकृती

---

रससिद्धांताचा वापर करू जाता, या कथेत नेमका कोणता रस शोधावा तेही सापडत नाही. कधी रौद्र, कधी करुण, कधी बिभत्स, कधी भयानक, तर कधी अद्भूत रसाची किमया या कथेत दिसते. एखादी शेड गडद होता होता वेगळीच शेड येते. अंततः शांत रसात सर्वाचा विलय होतो.

---

काळा रेशमी पायघोळ झगा घालणारा, हजार डोळयांचा अंधकार निःशब्द अंगाई गीतांच्या पावलांनी आत आला. आपल्या केसाळ हातांनी त्याने त्या श्रांत, विकल, असहाय मनाला हलकेच वर उचलले, आणि प्रेमळपणाने, विशाल सागराच्या एकाकी संगीताचे ठोके देणाऱ्या हृदयाशी त्यास अगदी जवळ जवळ धरले.- असा शेवट होऊन कथा शांत होते.

-सुनीळ सामंत

सहमत, जी ए ची ही कथा वाचताना असे जाणवले की जी ए हे टिपिकल कथा लेखनाच्या पल्याड अगदी पहिल्यापासूनच लिहीत असत, बऱ्याच कथा सुरू होण्या अगोदर खूप काही आंतरराष्ट्रीय स्तरावर साहित्य क्षेत्रात घडलेलं असतं जे आपल्याला माहीतही नसतं, जी ए तिथून पुढे सुरू होतात आणि त्या कथेला स्वतःचा अस्सल भारतीय, मराठी, कल्पनातीत पण पटण्यासारखा आयाम देतात, अट फक्त एकच, ते आपण शोधावं लागतं.

अंधाराची पावले वाचताना पहिल्या परिच्छेदात जे लिहिलंय तिथून आपण त्या खिडकी जवळ बसून बाहेर पाहणाऱ्या व्यक्तीच्या मनात जातो आणि समोर संध्याकाळ होत असताना त्याच्या मनात जे काही विचार येतात कल्पना येतात त्या जशाच्या तशा लिहून काढल्यात असं वाटू लागतं,

जी ए च्या कथा गझलेसारख्या असतात, पहिल्यांदा वाचून कळत नाहीत, म्हणून अनेकदा वाचायला जावं तर प्रत्येकवेळी वेगळा अर्थ गवसतो. हळूहळू जी ए ची नशा चढू लागते, बाह्य स्वरूप पाहता त्यांच्याशी वाचक फटकून राहतो पण एकदा त्याने या नशेचा आनंद घेतला की तो कायम त्यांच्या अनुभूती सोबत जगण्याची धडपड करू लागतो.

1955 मध्ये ही कथा लिहिणं, हे जसे धाडसाचे काम आहे त्याहूनही मोठे सत्यकथा ने ते छापून आणणं हे जास्त महत्वाचे मला वाटते.

अभयकुमार कुलकर्णी

१ कथेचे मुख्य सूत्रे: अ) जीवनात दुःख आहे.ब) दुःखाचे स्वरूप तर्कातीत आहे. क) जीवन अनेक(अनंत) केंद्री आहे.

२ घटना: एक माणूस दाट जंगलात सरोवराच्या काठावर घरात बसला आहे. संधीप्रकाशातून(दिवस) गडद अंधार (रात्र) होते.

३ नायक- चेतन-अर्धचेतन-अचेतन मन (+बुध्दी+ प्राण +अहंकार) आहे.अचेतन मनात संस्कार, अनुभव, आदिम सामूहिक मन universal collective consciousness इ. येतात.

४ नायिका - सर्वव्यापी, सर्वांत्मक वैश्विक शक्ती आहे(निसर्ग, प्रकृती, आदिम शक्ती). ती एकाच वेळी तीन प्रकारे असते.अ) उत्पत्ती -(उ)- स्थिती - विलय (वि). ब) जन्म -जगणे -मरण क) व्यक्त -अव्यक्त-व्यक्त ड) दिवस -रात्र -दिवस

५ मनातील घटना - नाम, रूप, कृती यांच्या जगात ५ ऐंद्रिय संवेदनांनी अतार्किक घडतात.

६ कथेत मृत्यू - विलय यांचे शिवाचे(शिवशक्तीचे) तांडव नृत्य सादर केले आहे. याकरता अ) सर्पांच्या जिभा ब) आगीच्या जिभांचे भाले क) मानेवरचे सर्प ड) रक्त स्वरांचे रूद्र गीत इ)दहा आकृत्या - शिवाचे गण, दहा दिशा, दहा इंद्रिये

शैव शास्त्रात अ) शिव हा नर्तक असून इंद्रिये, मन प्रेक्षक आहेत ब) शिवशक्ती (स्त्री) भोवती ८ शक्ती (आकृत्या, दिशा) नाच करतात असे आहे.

७) मृत्यू म्हणजे प्रत्यक्ष मरण, दुःख, वेदना, शोक, क्षुद्रतेची जाणीव इ.

८) कथेत मूळ जीवनरस आहे. तो अनेक रसांतून (शृंगार, करूण, अदभुत, भयानक इ) अदृश्यपणे आहे

९)कथेत प्रतिमांची साखळी आहे भाषेला अनन्यत्व देणारी.

१०) कथेत विश्वशक्तीचा अग्नीकडून राखेकडे प्रवास आहे तशा २० लखलखीत प्रतिमा (मानवी-अमानवी)आहेत.

११) मन पंचमहाभूतांचे बनलेले आहे.श्रांत, अचेतन मन त्या रूपात -नीरव बगळे, निपचित पडलेले कुत्रे, भकास झाडे, मूक संगीत, पाण्यावर चुणी नाही, तापलेली लाल फुले इ.आले आहे.

१२)ही फिरत्या केंद्रबिंदूंची(क्षुद्र बिंदूजीवन)कथा आहे - स्त्री, आकृत्या, फुलपाखरू, अग्नी, सर्प, घुबड, वाघळे, काळ, प्राणी, शांतता, संगीत इ.

१३) कथेत ध्वनीची रूपे जोडसंवेदना म्हणून आशयाला अनुरूप येतात -भीषण संगीताची फुले, पेटलेले संगीत, वाघळांचे बोबडे बुडबुडे इ.

१४)कथेत काळ संकल्पना प्रभावीपणे वापरलेली आहे -. मनाचा चकवे स्पष्ट केले आहेत. मन हजार डोळयांनी भूतकाळ (उन्मादक आठवणी) पाहते जो वर्तमानात अस्तित्वात नाही.

मन भविष्यकाळाचा - निळया सावळया स्वप्नांचा सुरमा घालते जो अस्तित्वात यायचा आहे. वर्तमानात मन विकल, असहाय आहे. वैश्विक शक्तीचे नियम मनाला श्रांत करून हळूहळू महाकाळाच्या आधीन करत आहेत (कथेच्या शेवटी)

१५) मुख्य सूत्राची उदाहरणे

उत्पत्ती=१, स्थिती=२, . विलय=३ ४= वैश्विक शक्ती

व्यक्त= १+२ अव्यक्त =३ हे सर्व मनातले

अ) घुबडाचा घूत्कार - सुरवातीला १+२, मध्ये नाही ३, शेवटी परत येतो१+२

ब) श्रांत मन- सुरवातीला १+२, मधे ३ शेवटी १+२ अंत ४

क) स्त्री - उन्मादक रूपात, अग्निसुंदरी १+२, नृत्य सादर करून नाहीशी ३

ड) आकृत्या - येतात१, भीषण नाचतात २, काम संपवून जातात ३

इ) काच, भिंत- आहेत१+२, थडकली, पडली=३

१६) प्रमुख प्रतिमा

अ) स्त्री -१) वैश्विक शक्ती रूपात - दोन सर्प= इडा(मन)-पिंगला(प्राण) नाड्या, तापलेल्या सोन्यासारख्या शरीराची -कुंडलिनी शक्ती

२)स्त्री मानवी रूपात- मन व १० इंद्रिये यांचे प्रतीक.मरणसमयी हे स्थूल अवयव(विशाल देहाचे खंडित अवयव) व सूक्ष्म शक्ती दाट अंधार होतात.

ब) हिरव्या कमलपत्राचे, स्त्री नाचताना, कंबर ते गुडघा असे घसरणारे वस्त्र= मूलाधार चक्रात जाणारी प्रवृत्तीची शक्ती

क)४ भिंतीतील जग= माणसाची मर्यादित क्षमता

ड) उंच गळयाची(उंच अमूर्त स्वरांची) देवीचे व्रण(दुःख) असलेली ह्जार डोळयांची भिंत भोवळली(शक्ती हीन माणसावर अनोळखी, भयाण शक्ती चा ताबा) = अचेतनावर चेतनाचा आरोप.मर्यादित जागृत जग रात्री एकाकी स्थिती तर अमर्यादित झाले

इ) चांदणे, झाड, सागर, अग्नी, ताणलेले कातडे, भाले, घुबड, वाघळे, रातकिडे, सरोवर, फेरा धरून नाचगाणी इ आदिम प्रतिमांमधून अभावरूप वैश्विक शक्ती भावरूप करायचा प्रतिभावान जी ए चार प्रलयकारी आत्मभान देणारा आदिम अनुभव आहे.

१७) समारोप- जी ए या कथेत स्थळकाळाचा, निसर्ग शक्तीचा

प्रवाही प्रतिमांमधून हादरवणारा अनुभव देतात.

१८) चूक भूल द्यावी घ्यावी.

डॉ माधव पुराणिक, ९६२३४४२२२१

या कथेतील जीएंची भाषाशैली मला त्यांच्या इतर कथांहून काहीशी वेगळी वाटली. सांजशकुन मधील काही कथांत ती आहे. काहीशी अद्भूत तर आहेच आहे. पण त्यात वास्तवतेचे निरिक्षण आणि कल्पकता यांचे बेमालूम मिश्रण आहे.

उदाहरणार्थ दुसराच पॅरा… (यातले **बोल्ड** शब्द हे वास्तव वर्णन आहे. आणि इतर भाग हा कल्पनांचा भाग आहे)

**किंचित खाली दबून उडण्याच्या बेतात असलेल्या दिवसाने** आपले पंख पसरले, त्यातून सात पिसे निसटली, व **बगळ्यांची रांग** होऊन नीरव वितळली. प्रकाशाच्या सोनकाडीने **जिवंत असलेली झाडे** भकास मृत झाली, आणि हिरवट बुरशी चढलेले सांगाडे उठून बसले. **जीवनाच्या हिरव्या ज्योती** जाऊन काळे शापित शिलालेख स्तब्ध उभे राहिले. **तलावातील पाण्यावर एकही चुणी नाही. गवताच्या तारा छेडल्या जात**; पण किनार नसलेले, भोळे, मूक संगीत साकळलेल्या रक्ताप्रमाणे सर्वत्र ठसठसत होते. तोच या साऱ्याच्या काचेवर **घुबडाच्या धारदार घूत्काराचा** ओरखडा उमटला. काचपात्र फुटले आणि त्यातून **वाघळांचे** बोबडे बुडबुडे वर वर आले, व **रातकिड्यांच्या आवाजाच्या** गुंतवळ्यात अडकू लागले.

मनात तेवत असलेल्या अनेक पणत्या पटपट विझल्या, आणि अमूर्त भीतीच्या हुरहुरीची पाल चुकचुकू लागली. बाह्य अथांग जीवनाच्या कल्लोळात गुंतले असता विसर पडलेल्या **क्षुद्र, वैयक्तिक, बिंदु-जीवनाची** अंधारी खोल उघडली, आणि सारा दिवसभर कोंडून ठेवलेली अक्राळविक्राळ श्वापदे हुंकारत बाहेर उधळली. त्याच्या उग्र रानटी दर्पाने समोरील देवीचे वण असलेली उंच गळ्याची भिंत भोवळली, आणि हजार सपाट वेड्यावाकड्या चेहऱ्यांनी वेडावू लागली.

सुनीळ सामंत

अंधाराची पावले….(निळा सावळा)

या कथे विषयी चर्चा सुरु करताना एक विधान केले गेले.1955 सालची ही कथा. ही अवघी दीड एक पानाची कथा.सत्यकथेला पाठवणे जसे धाडसाचे पण सत्यकथेने ही कथा छापणे हेही महत्वाचे.

या कथेतल्या वर्णन शैलीबद्धल बौलुच. संपादकीय दृष्टिकोनातून त्याना काय जाणवले असेल? हा विचार मनात आला . मला जे जाणवले तेमी आधी मांडतो.

कदाचित अंधाराची पावले…या कथेत पुढे प्रगल्भ होत गेलेल्या जी .एं.च्या पावलांच्या खुणा जाणवल्या असाव्यात. जी.एं.चा माणसाला समजुन घेतानाचा दृष्टिकोनही आपणाला कळु शकेल.जसा तुकारामाच्या हृदयात दुखणाइतांच्या दुख्खाला एक हक्काचा कोपरा होता तसाच जी.एं.च्या कथेत, नियतिच्या आघातान कोलमडून पडलेल्या, स्वप्ने उध्वस्त झालेल्या, जगण्याच्या द्वंद्वात पराभूत झालेल्या व्यक्तिरेखाना हक्काचा आसरा मिळणार होता.

सुखाच्या व्याख्या सारख्याच असतात पण दुख्खाला मात्र अनेक परी व पदरअसतात आणि म्हणुन ते व्यक्त करण्या साठी उच्च् कोटिची कलात्मकता लागते.आणि त्या ताकदीच्या वर्णनशैलीचा प्रत्यय "अंधाराची पावले"या कथेत येतो.हजार डोळयाचा अंधःकार मनाच्या खोल गुहेत लपलेली हिंस्र श्र्वापदे खेचुन बाहेर काढतो…आणि बळवंत मास्तर सारख्या व्यक्तीरेखेचा अनाकलनीय शेवट घडुन येतो(वीज).लसलसत्या वासनांच्या उपभोगाच्या उत्कट क्षणी मालतिच्या नितळ मुलायम उरावर स्तनांच्या खाली कोडाचा डाग दिसतो. आणि सदानंद थिजून उभारतो.(स्वप्न).....पुढच्या अनेक कथात प्रगट झालेल्या विलक्षण वर्णन शैलीची प्रसाद चिन्हे आणि …जीवनाच्या हिरव्या ज्योती जाउन स्तब्ध उभे ठाकलेले शापित काळे शिलालेख…..(व्यक्ती रेखा)...मनात तेवत असलेल्या पण त्यांचे विझत जाणे अनुभवत जगत राहणारी माणसे या सगळयाची चाहुल त्या संपादकिय दृष्टीला लागलेली असावी …..म्हणुनच ही कथा महत्वाची, तसेच चाणाक्षपणे चर्चेसाठी या कथेची तुम्ही निवड केली हेही मला भावले.

धन्यवाद!

- राम कुलकर्णी

सर्वांना नमस्कार

अंधाराची पावले या कथेच्या माझ्याबाबतीतला दुर्बोधतेचा मी सुरवातीलाच कबूल केला होता. पण मग श्री सुनीळ सरानी सुचवल्याप्रमाणे वाटले ही कथा म्हणजे

एका विवक्षित दिवशी अतिसंवेदनशील मनाला (जींएना) जाणवलेले निरनिराळे रंग, गंध, ध्वनी व आकारांचे (आकृत्यांचे) डोळस निरीक्षण करून अलंकारिक भाषेत सुंदर गुंफण! एका स्वप्नाप्रमाणे! कथेचा, त्यातील भाषेचा आस्वाद परत घेतला.

डाॅक्टर माधव पुराणिकांनी एक नवीन आयाम मांडला. या नव्या मितीच्या प्रकाशात परत कथा वाचली आणि समजून घेण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. पण प्रांजळपणे कबूल करतो की मी कमी पडतो.

यतीन गुळवणी

सर. खरे सांगायचे तर ही कथा मी आजवर चार सहा ओळींच्या पुढे वाचलीच नव्हती. यावेळी अक्षरशः परीक्षेला बसताना वाचतात तशी वाचली. मला या उपक्रमातून हा दुसरा एक फ़ायदा होतो आहे की कर्तव्य म्हणून वाचावे लागते. आणि आपोआप वाचले जाते. आणि मग आनंद मिळतो.

तुम्हा लोकांकडून मिळणारे मार्गदर्शन हा पहिला फ़ायदा. वर सांगितला तो दुसरा.

सुनीळ सामंत

# अखेरचा दिवस --जी ए कुलकर्णी
# संग्रह- हिरवे रावे

जीएंच्या कमीत कमी गुंतागुंत असलेल्या कथांपैकी ही एक आहे असे मला वाटले. ’सरळ’ म्हणजे जीए यांच्या इतर कथांच्या तुलनेत सरळ. एकच एक अर्थ निघणारी.

नाना ही यातली मुख्य व्यक्ती. आदर्शवादी, भाबडे व्यक्तिमत्व. वय लिहिलेले नाही पण त्यांचा शेवटचा समवयस्क कालच वारला. म्हणजे १९६९ च्या काळातली पासष्टी- सत्तरी. त्यांचे वडील मासिकाचे संपादक. पण नानांना काही ते चालवत आले नाही. असले आदर्शवादी लिखाण वाचण्याचे दिवस संपल्याची खंत. व्यक्तिगत आयुष्यातही ते तसे वैफ़ल्यग्रस्त. पहिली बायको बाळंतपणानंतर मुलासहच वारली. आणि दुसरी बायको पळून गेली. भाऊही वारले. बहिणही गेली. तिला सासरचा छळ होता. त्यांनाही नानांकडून काही मदत होऊ शकली नाही. आता आयुष्ता करण्यासारखे काही नाही. केवळ दिवसाला काही पाने भरून लिहिणे (जे कोणी वाचणार नाही) आणि झाडे लावणे (जी जगत, फ़ळत, फ़ुलत नाहीत). आता तर कामही करवत नाही. प्रकृती यथातथा. कधी गळून पडेल सांगता येत नाही.

अचानक त्या रात्री त्यांची पळून गेलेली बायको सावित्री येते. तिचा यार अंधारात बाहेर दबा धरून बसलेला. सावित्रीला नानांकडे फ़ंडाचे सतराशे (त्या काळचे चार सहा लाख) आल्याचे कळलेले आहे. ती नानांना नकळत दुधातून वीष देते. हे नानांना ठाऊक नाही. ते त्यांच्याजवळचे वीष त्या दुधात टाकतात. मरतात. सावित्री मित्राबरोबर आनंदाने जाते.

-सुनीळ सामंत

नमस्कार.कथेचे कथानक माहित आहे.त्यामुळे कथेच्या वैशिष्ट्यांबद्दल सांगता येईल.

1.लहान गावात, हातातोंडाशी घास मिळवून जगणारी माणसे, व त्यांचे दुर्दैव हे प्रखरपणे दाखवून, जीएंनी, एकूण अस्तित्वावर प्रकाशझोत टाकले आहेत.2.कथेतील नाना असेच धडपडत जगले.फंडाचे हजारभर रुपये मिळवून, एकटे, जगापासून तुटलेले (अस्तित्ववाद)अशा प्रकारचे जीवन नाना जगत होते.हाताला अपयश होते-पहिली बायको, मूल गेलेले;दुसरी बायको, चंचल, हावरी, होती व सोडून गेली होती-असे अपयश उराशी बाळगून, येणारा दिवस ते 'गंधगोळी 'प्रमाणे झिजवत होते.

3.नानांचे लेखन, हा कथेतील महत्त्वाचा पैलू आहे. लेखक, गायक, कलावंत हे जीवनातील अनुभव पकडताना तडफडत असतात. नंतर तो अनुभव, रसिकापर्यंत पोहचवताना ते डोंगर चढण्याचे कष्ट घेतात. त्यांमधील फारच थोडे कलावंत शिखरावर पोहचतात.इतरांची उरफोड होते.हा आजूबाजूचा अनुभव आहे. तेच जीएंनी, प्रवासी, प्रसाद, गीतपाखरू इत्यादी कथांत दाखवले आहे. त्या द्रुष्टीने, कथेतील नानांच्या लेखन प्रयत्नांकडे पाहिले पाहिजे. 5. पुरुष काय, स्त्री काय; दोघांनाही वासनेच्या सापाने वेढले आहे. जीए हे रोकडे सत्य संयमितपणे दाखवतात.

6.जीए भरतवाक्याप्रमाणे कथेत लिहितात.."आयुष्य हे कोडे असते. ते सोडवताना दमछाक होते. पण आयुष्याचे कोडे सुटत नाही. उत्तरासाठी पुढील अंक पहा, असेच म्हणत आयुष्य संपते."

जीएंनी गुन्ह्याची पार्श्वभूमी असलेल्या अनेक कथा लिहिल्या आहेत.उदाहरणार्थ, पारधी, गिधाडे, तक्षक...स्वामी. प्रतिभावंत हे, जीवनातील या

गुन्हेगारी पैलूकडे दुर्लक्ष करत नाहीत. येथे(सत्यवान -सावित्री नव्हे), नानांची सावित्री, कट करून, विष देऊन, नानांचा आयुष्याचा अंक व कोडे संपवते.

7म्रुत्यू - जीए, शब्दातित अनुभवाकडे शब्दांने बोट दाखवतात.चंद्र दाखवण्यासाठी हाताने चंद्र दाखवला, तरी रसिकाने तो हात म्हणजे चंद्र नसून, त्या दिशेने प्रवास करून चंद्रदर्शनाचा अनुभव घ्यायचा असतो (चंद्रहस्तन्याय).तसे येथील जीएंच्या शब्दांना वाचून, वाचकाने, म्रुत्यूचा शब्दातित अनुभवाकडे पहायचे असते.त्याप्रमाणे या कथेत नानांचा म्रुत्यू दाखवला आहे --".. चेहरा तापला. चेहरा तडकला.जीभ आत ओढली गेली. धुताना कपडा पिरगळावा, तसे शरीर पिरगळले.डोळे बाहेर आले.घशातून श्वास येई, पण गळ्याशी राही.आचके थांबले.. व नाना शांत झाले. ..." हे कथेच्या शेवटचे वर्णन शब्दप्रभू जीए करतात.

एकूण ही कथा, आयुष्याबद्दलची वाचकाची जाणीव जागवते, व प्रखर करते.

धन्यवाद.

विलास वाघोलीकर

वाह. यातला मुद्दा क्रमांक ३ - कथेचा हा भाग मलाही अक्षरशः सर्वांगाला टोचला होता. पण शब्दांत मांडता येत नव्हता. ्तुम्ही तो व्यापकपणे पण नेमका मांडला आहे.

मुद्दा क्र. ७- मृत्यू- हा माझ्या नजरेतून निसटला होता. लक्षात आणून दिल्याबद्दल धन्यवाद.

जीएंच्या कथांतून एक विश्वास असतो वाचकाच्या चाणाक्षबुद्धीवर. ते सगळे स्पष्ट सांगत नाहीत. फ़क्त एक तिरपा उल्लेख करतात. या कथेत तो विश्वास थोडा

कमी झाल्यासारखा वाटतो. अनेक गोष्टी जीए स्पष्ट समोर मांडतात. पुन्हा पुन्हा सांगतात. काहीसे बटबटीत शब्द वापरतात. ही कथा लिहिताना त्यांना डोळ्यांसमोर कोणीतरी वेगळा वाचक होता की काय अशी शंका येते. (ही कथा साधना साठी लिहिलेली होती)

जीवनाबद्दलचा नानांचा आत्यंतिक निराशावाद सुरुवातीच्याच काही वाक्यांत येतो. त्यातले विषण्ण, धूळ, विमनस्क, किल्लीची कटकट, हाय खाऊन, नोटा म्हणजे आयुष्याचे कपटे, कुत्रे विचारत नाही, जाळदेखिल विझून जाईल- अशा शब्दांतून ते प्रचंड निराशा जागी करतात. (जीएंच्या कथांतून निराशा इतकी झिरपते की मी जेव्हा जीएंवर एखादा चांगला प्रकल्प हाती घेऊ इच्छितो तेव्हा जीएंचे बहुतेक वाचक त्यावर निराश प्रतिक्रियाच देतात. असो. हे विषयांतर झाले.)

त्यांनी विषण्ण मनाने कागद डेस्कमध्ये ठेवले. डेस्कच्या बाजूलाच साऱ्या जुन्या पसाऱ्यात जिवंत वाटणारी एक जुनीच पण छोटी, सुबक काळी पेटी होती. त्यांनी तिच्यावरील धूळ पुसताच तिचा रंग जास्तच उजळ झाला. त्यांनी विमनस्कपणे तिचे दार उघडले. फंडाचे सतराशे रुपये आल्यावर त्यांनी त्या नोटा लोकरीच्या धाग्याने नीट बांधून एका कागदात ठेवल्या होत्या. त्याशिवाय एक लहान पांढरी बाटली, आईची नथ, याखेरीज पेटीत काही नव्हते. त्यांना पहिल्या दिवशी वाटले होते, आता हिच्यात इतके पैसे आहेत, तिला आता कुलूप लावत जावे. पण तो विचार आला तसाच गेला.

चाळीस वर्षे त्यांनी ती पेटी तशीच वापरली, पगाराचा पैसा ठेवला, सारे झाले. आता किल्लीच्या घालकाढीची कटकट नको | त्यांच्या थोरल्या भावाने आपली सारी शिल्लक तीन हजार रुपये ' युवर ओन बँकेत ' ठेवली होती. ती बँक बुडाली आणि त्याने हाय खाऊनच आत्महत्या केली ! त्या दिवशी त्याने उगाचच नानांना बोलावून घेतले होते. सकाळी त्यांनी पाहिले तो अंथरुणाजवळ ती पांढरी बाटली, व एक चिठी. "नाना, आता हेच बरे. आशीर्वाद!" नानांनी बाटली लपवून घरी आणली, व चिठी जाळून टाकली, व सारे प्रकरण गवगवा न करता मिटून टाकले. पण

तेव्हापासून त्यांचा बँकांवरचा विश्वास उडाला. "जेथे मी तेथे माझा पैसा!" ते म्हणत. या नोटाही आयुष्याचे कपटेच की, डेस्कमधील कपटे, आणि या नोटा. यांना किंमत आहे, त्यांना पाहिल्यावर लोकांच्या तोंडावर हसू दिसते. डेस्कमधल्या कागदांना कुणी कुत्रे विचारत नाही. चुलीत ते घातले तर जाळदेखील विझून जाईल ! त्यांनी नोटा खाली ठेवल्या. बाटली वरूनच पुसली.

सुनीळ सामंत

अखेरचा दिवस (निळासावळा) ही तशी अगदी सरळच गोष्ट आहे खरी. फ़क्त एक गूढ आहे. नानांनी आत्महत्येचा निर्णक कधी व का घेतला?

---

नानांनी आत्महत्या करायचा निर्णय कोणत्या क्षणी घेतला? यावर मात्र जीएंनी वाचकालाच शोध घ्यायला सोडून दिले आहे. मला त्यांचे आत्महत्येच्या नीर्णयाचे तीन क्षण दिसले.

१)जेव्हा त्यांनी समोरच्या देवळाच्या कट्टयावर बसलेल्या माणसाला सावित्री हात करते आहे हे पाहिलं. आता आपल्याला ते काहीतरी करतील याचे त्यांना भान आले. खरे तर ते हताश होते, सर्व काही संपल्याची जाणिव झालेली होती. पण त्यांना आता मात्र आपल्याकडून अजूनही काहीतरी जाणार याची जाणिव झाली. प्राण ? नाही, ती त्यांची भिती नव्हती. अब्रू? होय. त्यांना आता या अखेरच्या दिवसात आपली अब्रू जावी, आपण फ़सवले जावे असे काही नको होते. झाले एवढे पुरे, आता अजून नको. अशी भावना त्यांच्या मनात बळावली असावी.

२)त्याही आधी- सावित्री येण्यापुर्वीच, जेव्हा त्यांनी ती काळी पेटी उघडून आतली पावडर हलवून पाहिली. ते ही गोष्ट नेहमी करत नव्हते, कारण पेटीवर धूळ जमा झाली होती. याचा अर्थ आजच्या त्या विषण्णतेने, शेवटच्या मित्राच्या मृत्यूने,

अर्धा तास काम केल्यावर आलेल्या थकव्याची जाणीव झाल्यावर, अतिशय आवडते नाटक, कथा आणि कविता प्रकाशकांनी नाकारल्यावर, आपले आयुष्य आता संपले किंवा स्वतःहूनच संपवावे असे त्याना वाटले असावे.

३) त्याही आधी- जेव्हा त्यांनी भावाने आत्महत्या केल्यावर ती बाटली जपून ठेवली तेव्हाच त्यांनी आपणही आपले आयुष्य स्वतःच संपवायचे हा निर्णय घेतला असावा. नाहीतर आईची नथ, फ़ंडाचे पैसे यांच्याबरोबर त्यांनी ती बाटली अशी जपून ठेवली नसती.

सुनीळ सामंत

अखेरचे दिवस

1 नानांच्या मनाची घालमेल, आदर्शवाद विरूद्ध वास्तववाद! जीए पात्राच्या मनाच्या दुखऱ्या नसेपर्यंत इतके खोलवर पोहोचतात की साधारण भावनाशील माणूस सुध्दा व्यथित होतो.

2 कथेत अनेक वळणे आहेत पण कुठेच कृत्रिमता दिसत नाही.अत्यंत सराईतपणे कथा उलगडत जाते.

3 कथेत नाट्यमयता आहे पण ती जाणवत नाही. माहितीच्या (पार्श्वभूमीच्या) मुद्द्यांची व घटना प्रसंगांची गुंफण खुप सफाईदार आहे.

4 कथेने आपले सोज्वळ रूप खुप जपले आहे. वाव असतानादेखील कुठेच उत्तानपणा वा भडकपणा नाही. परमोच्च प्रसंग म्हणजे सावित्रीच्या गर्भारपणाचा उलगडण्याचा प्रसंग! अजिबात उल्लेख न करता वाचकाला ते समजते.

मला भावलेला परिच्छेद

नाना विषारी दूध प्यायच्या वेळचा

1 " जणु एखाद्या तिऱ्हाईताच्या हालचालींकडे पाहावे त्याप्रमाणे नाना आपल्याकडे अलिप्तपणे पाहू लागले, हे डोकें, यांत कांही तरी जळत आहे. त्याच्या मागचा भाग आता तडफदार. हा हात, त्याचा आपला काही संबंध नाही. तो दूध ढवळतो. त्यातील चमचा बशीत ठेवतो. त्याने उचललेला कप डचमळतो, कारण तो थरथरत आहे, त्याच्यांत त्राण नाही."

"त्यानी दुधाचा एक घोट घेतला व त्यांच्या तापलेल्या चेहऱ्यावर पाण्याचा शिडकावा झाल्याप्रमाणे तो तडकला. कळकून गेलेल्या ताकाच्या भांड्यावरून जोराने जिभ फिरवल्याप्रमाणे जिभ रिवरिवून आत ओढल्यासारखी झाली. शरीरातील सारे धागे एका गाठीत धरून पिळल्याप्रमाणे सारे शरीर ताणल्यासारखे झाले व ते घांपा टाकत असता डोळे बाहेरच येतात असे वाटले."

- यतीन गुळवणी

यतीनजी, धन्यवाद. जीएंच्या या संथ कथेतले नाट्य जाणवून दिल्याबद्दल. गर्भारपणा उलगडण्याचा प्रसंग समजण्यासाठी आता पुन्हा वाचला. मला ते लक्षात आले नव्हते. त्यांचा आवेग ओसरला या एका वाक्यातून त्यांना हे सुचवायचे होते ते तुम्ही स्पष्ट लिहिल्यावर कळले.आणि नंतरचे वाक्य, ’ गौतम तरी--’ असे का तोडले तेही आता कळले.

-सुनीळ सामंत

१ बौध्द दर्शनाने(इ.स.पू.५००) प्रथमच 'जीवनातील दुःख ' या सिद्धांताला निर्णायक केंद्रस्थान दिले. इतर भारतीय दर्शनांत (तत्वज्ञानांत) 'सत्य, पावित्र्य, आनंद, सौंदर्य इ.' संकल्पनांना मध्यवर्ती स्थान आहे.

२ भारतीय साहित्यात या शोकात्म भावाला फारसे महत्व नव्हते.जी ए नी जगण्याचे हेअटळरूप प्रथमच प्रभावीपणे व्यक्त केले.ही त्यांची महान कामगिरी होय. बंगाली भाषेत असे कार्य शरदचंद्र चतर्जी यांनी केले. त्यांची प्रत्येक कादंबरी शोकांत आहे.

३ दुःखाचे कारणे१) तृष्णा (भोगेच्छा) २) मन व शरीर ३) मन व ५ इंद्रिये ४)जन्म ५) स्पर्श (इंद्रिये व विषय संयोग) ६) अस्तित्वाची जाणीव ७)विकार (राग, मोह इ)८) आसक्ती ९) जरा मरण १०)...११)...१२)...(भगवान बुद्ध यांची द्वादशनिदाने)

४ जी ए यांच्या वरील या कथेत ही सर्व कारणे दिसतात.जी ए या दुःखाचा संथ, जागृत अवस्थेत, सतत अनुभव या १९ पानी कथेत देतात. पण दुःख निवारणाचे उपाय सुचवत नाहीत.

५ नेहेमीची शैली (रहस्य, अदभुतता, प्रतिमांची साखळी, काव्यमय वर्णन, गूढरम्यता इ) या कथेत पूर्ण बाजूला ठेवून ही जी ए यशस्वी झाले आहेत.यात १९ पानात ४ प्रतिमा-तेथे अडिच पानांत २५ प्रतिमा आहेत.

६ 'अंधाराची पाऊले (बीजकथा)' व 'अखेरचे दिवस ' यात खूप साम्य आढळते.जसे १) शीर्षक २) सुरवात व शेवट- श्रांत मन विकल ते श्रांत मन शेवट(मरण) ३) अपुऱ्या वासना(सर्व काळात)४) इच्छा, अपेक्षा, स्वप्नांचे शेवट(घर कोसळणे, मनासारखे काहीच न होणे) इ

७ मुख्य मनाचे वर्णन तेथे अचेतन मनाचे येथे जागृत मनाचे. पण समांतर जसे'खिन्न, झाकोळलेले, उदास, शून्य, हताश, कडवट, जड, सुस्त, दुःखी, निरूत्साही, अस्वस्थ, कासावीस, सावरलेले.

८ ही कथा नकारात्मक जाणिवेने भरलेली आहे.नानांच्या जगण्यातला निरर्थकपणा, निरूद्देश, दिशाहीनता, असहायता वृध्दत्वात अचानक निर्णायकपणे समोर येते व मनातल्या सततची निराशेचा शेवटी मनोकायिक अंत होतो.

९ 'जेथे मी तेथे माझा पैसा' हा उपहास कलात्मक आहे.

१० कथेचा नायक एक आदर्शवादी (सदाचार व नीतिमूल्ये सर्वांनी पाळण्याचा आग्रह धरणारा) पण व्यवहारात, संसारात, पैसे मिळवण्यात अपयशी आहे. येथे मन्युअल सर्व्हांटेस घ्या डॉन क्विझोटची आठवण येते.जी ए नी एक पुस्तक त्याला (सर्व्हांटेसला) अर्पण केले आहे.

११ नायक शिक्षक म्हणून सतत मूल्यशिक्षण सर्वांना शाळेत, कोणी न वाचलेल्या पुस्तकांतून, इतर बोलण्यातून देत असतो.पण कोणीही तसे वागत नाही म्हणून निराश होतो.त्याचे मन उध्वस्त होते. पैसा नाही म्हणून संसार विस्कटतो.अशा सर्व सामान्य माणसांचा प्रतिनिधी नाना जी ए नी हृदयविदारक रंगवला आहे. विस्कळीत, अपयशी, अस्ताव्यस्त, झपाटलेला, सुखहीन, शोकमग्न अशा माणसांची जगण्यातील होरपळ कुटुंबसंस्थेच्या पुरुषप्रधान पोलादी चौकटीत (विधवा बहीण, छळ झालेली सून इ) मूल्यहीन समाजात, जी ए नी ठसठशीत घटनांनी अधोरेखित केली आहे.

१२ 'टिंब, ...अक्षर.. वाक्य..कागद...थडगी' हे नानांच्या लिखाणाविषयीच्या भावना.इ वर्णन खूप कलात्मक आहे

१३ समारोप - एकंदर, हा जगण्यातील नानांचा दुःखद प्रवास खिन्नतेचा खिन्नतेत शेवट करणारा .

चूक भूल द्यावी घ्यावी

माधव पुराणिक

९६२३४४२२२१

पाश्चात्य existentialism, भारतीय हिंदू तत्त्वज्ञान, भारतीय आणि पाश्चात्य सौंदर्यशास्त्रे यांच्या जोडीने बौद्ध तत्त्वज्ञानाच्या आधारे जीएंच्या (आणि इतरही साहित्यिकांच्या) साहित्याचे रसग्रहण करण्याची कल्पना आवडली. (द्वादश निदाने

-जरामरण, जाति, भव, उपादान, तृष्णा, वेदना, स्पर्श, षडायतन, नामरूप, विज्ञान, संस्कार तथा अविद्या)

भारतीय साहित्यात या शोकात्म भावाला फारसे महत्व नव्हते हे मात्र पटले/कळले नाही. रामायण महाभारत शोकात्मच होते ना? असो, विषयांतर नको.

अंधाराची पावलेआणि अखेरचा दिवस यांची तुलना करण्याची कल्पना माझ्या मनात आली. पण त्या दोन टोकाच्या कथा म्हणून. त्यातले साम्य तुम्ही दाखवले.

जेथे मी तेथे माझा पैसा हे वाक्य आणि लगेच नंतरचा त्यांचा मृत्यू (पैसा सोबत न घेता जाणे) हे भयानकच.

खिन्नतेचा प्रवास- व्वा

-सुनीळ सामंत

नमस्कार.1.तेरा मुद्दे असलेले आपले विवेचन खूप आवडले.जीएंच्या कथांवर वेगवेगळया पैलूंतून (एन्सायक्लोपिडिक)पहावे लागते.हे त्यांच्या प्रतिभेचे तेज आहे. व मला त्या तेजाने दिपल्यासारखे वाटते...2).जाता जाता एक विचार.. जीएंचे वाचन अफाट होते.'भेट 'कथा बुध्दावर आहे. पण त्यांच्या लेखनावर, आधुनिक विचारांचे संस्कार आहेत.सुधारित अस्तित्ववाद व सुधारित नियतीवाद, घेवून ते आकाशस्थ शक्तींना प्रश्न विचारतात. बुध्द श्रेष्ठ आहेत. पण आकाशस्थ शक्तींमध्ये माणूस एकाकी, अटळ निर्णय घेतो, हे जीएंनी दाखवले.(स्वामी, आर्फियस, माकडाचे काय..इत्यादी)3. माझे विवेचन स्पष्ट करण्यासाठी माझ्या'घटिते ते नियती' या फेसबुक लेखाची लिंक देत आहे. आपल्या विवेचनाचा आदर ठेवून लिहित आहे.चू.भू.द्या.घ्या.गुड डे.विलास वाघोलीकर। लिंक https://m.facebook.com/story.php?story_fbid=330599651978112&id=100050842405764

विलास वाघोलीकर

जी ए च्या कथानायकांचे दुःखनिवारणाचे उपाय

१ जी एं सकट, प्रत्येक लेखक स्वतःचे जगणे आपल्या लेखनात ओततो(प्रतिभाविष्कार)

२ 'अखेरचे दिवस' चा नायक नानाला वडिलांचा, सतत लेखन करून सर्व स्तरांवर अपयशी(कंगाल) होण्याचा भावनिक वारसा मिळाला आहे, रिकामे, पडके घर मिळाले आहे('देवळातला रिकामा रथ ठेवायची जागा- सुंदर उपमा- सं. . भगवद्गीता - शरीराच्या रथावर मनाच्या सारथ्याचे नियंत्रण इ.)(नियती).नानाने स्वतः साधारण यश सर्व पातळयांवर मिळविले विशेषतः शारीरिक, भावनिक (वासना, प्रणय, प्रेम, नातेसंबंध) .मग पुनः पुन्हा कोसळणारे दुःखाचे आघात.

३ त्यावरचा उपाय म्हणून नाना तेच ते, त्याला येते ते (नियती) झपाटल्यासारखे करतो. लोक हसले तरी (नाटक-विधवा बहिण गाते) नानाला कृतीचे(नीतिवर प्रवचने, तीच अक्षरे गिरवणे, अतिअपुरे पैसे मिळवणे) परिणाम समजत नाहीत(मानसिक विकृती)

४ नाना सततच्या अपेक्षांच्या मध्ये ताणला जातो (इच्छा+आशा=अपेक्षा). अपेक्षा स्वतः कडून, इतरांकडून. शारीरिक भावनिक सुख, अपत्य, माफक यश इ पण त्या पूर्ण होत नाहीत.इच्छा पुढून ओढतात.आशा मागून ढकलते. मनाचा सनातन चकवा.जी ए चार नायक गरगरत आत्मघातकी कृतीकडे खेचला जातो.

५ 'अंजन' चा नायक भैरू अशीच. दुःख निवारणाचे उपाय तसाच.तेच ते वागणे.अंजन शोधणे. आत्मघातकी कृती कडे ओढला जातो.

६ 'अंधाराची पाऊले' चा नायक -अर्ध जागृत मन, असाच उपाय करणे.भूतकाळात - त्याच त्या कृतीत (वासना, प्रणय, मीलनाचे क्षणिक सुख इ.) रमते. त्याला- नाहीसे होण्याला शरण जाणे.

७ जी ए यांच्या बहुतेक नायकांच्या या कृती एका विशाल संकल्पनांच्या चौकटीत बसतात.एका टोकाला झपाटलेपण,

दुसऱ्या टोकाला पूर्ण न झालेल्या अपेक्षांचे असह्य ओझे, तिसऱ्या टोकाला सामाजिक संबंधांची निरर्थकता आणि चौथ्या टोकाला अनंत, अपार, अनाकलनीय, बदलत्या जगातील घटना.मध्यभागी नायकांच्या प्रयत्नांची असफलतेकडे जाणारी गूढ वाट

८ चूक भूल द्यावी घ्यावी.

९ सर्व प्रतिसादांबद्दल आभार.

डॉ माधव पुराणिक ९६२३४४२३२१

अखेरचा दिवस- जीए (हिरवे रावे

जीए आपल्या कथेतील मध्यवर्ती व्यक्तीरेखेला सद्‌गुणांचा पुतळा करत नाहीत. याही कथेत ते नानांना स्वतःच्याच कोर्टात उभे करतात. सावित्री त्यांच्याकडे क्षमा मागते तेव्हा ते म्हणतात खरे, की ' माणूस चुकतो', पण लगेच त्यांच्या मनात उलटसुलट विचारांचे द्वंद्व सुरू होते.

'माणूस चुकते ? माझ्या आयुष्यातील इतक्या वर्षींचे काय? रात्रीच्या रात्री जळत्या डोळयांनी घालवल्या, गुन्हेगाराप्रमाणे लोकांनी तोंडे चुकवली, त्याचे काय ? कागद बरबटणे, रद्दी भरलेले मसण हे शब्द, त्यांचे काम करायचे?

पण तू स्वतः कधीच चुकला नाहीस १ भावाने एकदा पंचवीस रुपये मागितले होते. ते दिलेस ? माझ्या घरी पाऊल टाकू नकोस असे रागाच्या भरात का होईना, तू म्हटले ना सुभद्रेला ? वडील आजारी असताना हे पुरे झाले, त्यांनी मरावे आता, त्यांची सुटका होईल आणि आमचीही; असे तू एका शेजाऱ्याजवळ म्हटले नाहीस? " हे बघ, मी विसरायला तयार आहे." ते शरमून म्हणाले, " चुकतं माणसाचं, पण

यापुढे तो जबाबदारीनं वाग, खरं सांगू ? तू कधीतरी पुन्हा यावंस असं मला फार वाटायचं.-"

पण या भावना बाहेर पडताच ते एकदम गप्प झाले.

स्वतःच्याच कोर्टात स्वतःच मुख्य व्यक्तीने उभे रहाण्याचे प्रसंग जीएंच्या कथेत नेहमीच येतात. ते सहसा कोणतीच व्यक्तीरेखा केवळ पांढरी वा केवळ काळी रेखाटत नाहीत.

पण या कथेत ते सावित्रीला मात्र संपूर्ण काळया रंगातच रेखाटतात. अगदी शेवटी, तिच्या गुन्ह्यातील भागीदाराशी तिचे वागणे आणि अविश्वास ते अत्यंत कलात्मक पद्धतीने दाखवतात. ती पैश्याची पिशवी घट्ट आवळते यातून ते दाखवतात . सावित्रीला ते पुर्णतः ऐहिक सुखांशी बांधलेली, कोणताही विधीनिषेध नसलेली, स्वार्थी, लंपट, निर्दयी व्यक्ती म्हणून रंगवतात. हे काहीसे वेगळे आहे. जीएंच्या एकंदर लेखन शैलीत न बसणारे.

-सुनीळ सामंत

---

'अखेरचा दिवस'--व्यक्ती स्वभावाने काळी किंवा पांढरी नसते.पण व्यक्तीचा स्वभाव म्हणून काही असतो.त्यात, काळया/पांढऱ्या कडे झुकलेली अशी व्यक्ती असते. तसेच एखाद्या प्रसंगात, व्यक्ती एका गुणाने तीव्रपणे वागते.येथे, सावित्री व भगवंत यांनी कट करून नानांना मारले.बाकी मुद्दे चांगले आहेत. या कथेचे पैलू शोधावे तितके कमी वाटतात. त्यामुळे वाचकांना धन्यवाद द्यावेसे वाटतात. विलास वाघोलीकर

---

माणुस नावाचा बेटा या कथेत जी.एं.नी एक विधान केले आहे.

सापाला जसे विष असते, वाघळाला जशी घाण असते तसे स्त्रीला विश्वासघातकी पणाचे अंग असते. त्यामुळे सावित्रीला त्यांनी जे दाखविले आहे त्याचे आश्चर्य वाटत नाही. जी. एं.च्या कथेतील स्त्री आई, मावशी आणि बहिण म्हणून येते त्यावेळी ती अत्यंत शुद्ध चारित्र्याची असते. पण पत्नी किंवा प्रेयसी म्हणून येते त्यावेळी ब-याचदा तिचे चारित्र्य संशयास्पद असते.

शिवाजी कुऱ्हाडे

खरं तर विश्वासघातकी पणाचे हे अंग पुरुषांनाही असते.

पण आपल्या समाजाच्या नैतिक अनैतिक कल्पनामुळे ते बोचत नाही, इतकेच!

प्रमोद कुलकर्णी

जीएं बाबत हे विधान मी अनेकदा वाचले आहे. पण पटलेले नाही. ही चर्चा तूर्तास विषयांतर नको म्हणून बाजूला ठेवू.

सुनीळ सामंत

मानवी गुणदोष हे लिंगभेद विरहीत आहेत.

दिलिप बडे

नाना ह्या नावाची व्यक्ती कोणीही(सामान्य माणूस)असू शकते कारण विशेष नामाचा उल्लेख केलेला नाही. काहीतरी मौलिक करण्याचा प्रयत्न करणं पण त्यात पुरेसे यश नं मिळणं.त्यांच्या मागे "नन्ना" चा पाढा लागलेला दाखवला आहे. सत्यवानाच्या सावित्रीने त्याचे प्राण यमापासून परत आणले आणि ती पतिव्रता स्त्री होती. येथील सावित्री एकनिष्ठ तर नाहीच.ती क्षमा ही मागते मनात विश्वासघात

करण्याचा हेतू ठेवून.शेवटी विष देऊन नवऱ्याचे प्राण घेते. यात जीवनातील विरोधाभास दाखवायचा आहे असं वाटतं.

-विशाखा आपटे

अगदी अगदी. मी आधीही म्हटले की त्यांनी या मुख्य पात्राचं नावच ठेवलंय नाना. नाना म्हणजे अनेक. नाना तऱ्हेचे उद्योग. लेखन, संपादन, प्रकाशन, कादंबरी, नाटक, कविता.आणि ना ना म्हणजे काहीच नाही. म्हणजे काय तर नाना तऱ्हेचे उद्योग करून हाती काय तर ना ना. काही नाही. शून्य.

जीए आपल्या कथेतील पात्रांची नावे ठेवताना काय विचार करत असतील याचा विचार आधी कधी केला नव्हता पण पुराणिक सरांनी अंजनमधील भैरव या नावामागील उकल दाखवून तोही एक वेगळा दृष्टीकोन वाचकांसाठी खुला केला. आता मीही प्रत्येक कथेतील पात्राचे (पात्रांची) नावे बघून त्यामागचा अर्थ लावायचा प्रयत्न करतो आहे.

-सुनीळ सामंत

मी सुध्दा जीएंच्या कथेतील पात्रांच्या नावांचा विचार केला नव्हता. कारण कथानकेच इतकी काळजाला भिडत की पुढे विचारच करवत नसत. आता डॉक्टर पुराणिक सरानी व विशाखा ताईनी पात्रांच्या नावाची समर्पकता लक्षात आणून दिली. एक विचार मनात आला. प्रत्येक शब्द विचार पूर्वक लिहीणारे जीए कथेतील पात्रांची नावेसुध्दा समर्पकच वापरणार. पुराणिक सर व विशाखाताईंना धन्यवाद!

-यतीन गुळवणी

# अनंत - जी ए कुलकर्णी -संग्रह- सांजशकुन

अनंत कथा..वाचकांच्या चर्चेसाठी..

जीए कुलकर्णी यांच्या, रक्तमुखी व अनंत या कथा, सांजशकुन पुस्तकात आहेत. या दोन्ही कथा, मिथक कथा आहेत. पण त्या वास्तवाशी जोडणाऱ्या असून त्यांना अनेक आयाम असल्याने, श्रेष्ठ कथा वाटतात.


सर्व जाणत्यांनी त्या कथेवर आपले विचार मनमोकळेपणाने मांडावेत ही विनंती आहे.

अनेक प्राचीन कथा, उदाहरणार्थ, नचिकेत, जाबाली, आरूणी, गौतम बुध्द, झेन, यांप्रमाणे जीएंच्या या कथा, अस्तित्वाचे काही मूलभूत प्रश्न मांडून उत्तरे शोधायचा प्रयत्न करतात. किंवा प्रश्नच जास्त स्पष्ट करतात. म्हणून प्रत्येक वाचकाने वेळ काढून, 'अनंत 'कथा वाचावी.नचिकेत कथेने वाचकाचे, संसार, म्रुत्यू बद्दलचे विचार स्पष्ट होतात.जीएंची ही कथा तशा दर्जाची आहे.

रक्तमुखी व अनंत या दोन्ही कथांत प्रवासी आहेत. मार्गदर्शक योगी, किंवा महंत आहे. प्रवासात चढ असलेले डोंगर आहेत. चक्रव्यूहाचे चकवे आहेत.

जीएंच्या 'रक्तमुखी' कथेत प्रामुख्याने भौतिक गरजा व म्रुत्यूचा, तर 'अनंत' कथेत स्वशोधाचा, विचार केला आहे.

भौतिक गरजा पूर्ण झाल्या, असे समजल्यानंतर, नायक प्रवासी, अनंताच्या मंदिराकडे निघाला आहे. अनंत म्हणजे ज्याला अंत नाही, असे शोधायला निघाला आहे. हा प्रवास, डोंगर चढण्याचा, खडतर आहे. येथेही महंत आहे. तो करंडा देतो व एक चिठ्ठी देतो. या चिठ्ठीची पूर्तता केली तर दुसरी, त्या चिठ्ठीची पूर्तता केली तर तिसरी चिठ्ठी मिळणार आहे.एकेक अट पूर्ण केल्यावर प्रवाशाला अस्तित्वाबद्दल ज्ञानाचा एकेक तुकडा मिळत जातो.



चित्रकार- विलास वाघोलीकर

अशा अटी पूर्ण केल्यानंतर त्याला चौथी चिठ्ठी मिळते.तसा तो पुढे जातो. व या एकमेव प्रवाशाला अनंताच्या मंदिराचे महाद्वार दिसते.पण ते बंद असते.प्रवाशाने दार उघडायला सांगितल्यावर काय होते, हे मूळ कथा वाचूनच कळेल. या सारांशामुळे आपणास अनंत कथेची रुपरेषा पुरेशी दिसेल असे वाटते.

--विलास वाघोलीकर

जीए कुलकर्णी यांच्या दोन कथा---'रक्तमुखी' व 'अनंत'..कथा दोन--अनंत.

लेखक--- व्ही एस वाघोलीकर.(फेसबुकवर पूर्वी दिलेला लेख येथे वाचकांसाठी पुन्हा देत आहे.)

या दोन्ही कथा जीए कुलकर्णी यांच्या 'सांजशकुन' पुस्तकात आहेत. या दोन्ही कथा, मिथक कथा आहेत. पण त्या वास्तवाशी जोडणाऱ्या असून त्यांना अनेक आयाम असल्याने, श्रेष्ठ कथा वाटतात.

दोन्ही कथांत प्रवासी आहेत. मार्गदर्शक योगी, किंवा महंत आहे. प्रवासात चढ असलेले डोंगर आहेत. चक्रव्यूहाचे चकवे आहेत.

अब्राहम मास्लो या कथांमध्ये डोकावून गेले होते, असे वाटते. या मानसशास्त्रज्ञांनी मानवी गरजांचा पिरॅमिड दाखवला. त्यात, तळाच्या प्राथमिक गरजांमध्ये, आहार, श्वास; शाररिक आसक्ती; नंतर शरीराचे संरक्षण(भय); व चढत चढत, वरच्या पातळीवर स्वतःचा शोध, या गरजा दाखवल्या आहेत. जीएंच्या 'रक्तमुखी' कथेत प्रामुख्याने भौतिक गरजा व म्रुत्यूचा; तर 'अनंत' कथेत स्वशोधाचा, प्रतिभासंपन्न विचार केला आहे. म्हणून या भागात 'अनंत'कथेचे विवेचन करता येईल.

भौतिक गरजा पूर्ण झाल्या, असे समजल्यास, प्रवासी अनंताच्या मंदिराकडे निघाला आहे. अनंत म्हणजे ज्याला अंत नाही, असे शोधायला निघाला आहे. हा प्रवास डोंगर चढण्याचा, खडतर आहे. येथेही महंत आहे. तो करंडा देतो व एक चिठ्ठी

देतो. या चिठ्ठीची पूर्तता केली तर दुसरी, त्या चिठ्ठीची पूर्तता केली तर तिसरी चिठ्ठी मिळणार आहे.

1)पहिल्या चिठ्ठीप्रमाणे खिडकीतून आलेल्या हाताला गरजेची वस्तू द्यायची असते. आकाशस्थ शक्तीने सजीवांना, माणसांना तयार केले. निरोगी शरीरावर नियतीने आघात होतो.तो इतरांनी समजून घेतला पाहिजे. रोग बरा झाला, तरी त्या माणसाला इतर माणसे स्वीकारत नाहीत. अनंताचा प्रवासी, रोगग्रस्त हाताला स्पर्श करतो. व त्याला दुसरी चिठ्ठी मिळते. शरीराची दुःखे पाहणे, व त्याबद्दल सहानुभुती दाखवणे, हा अनंताच्या कसोटीचा पहिला भाग असतो.

2)दुसऱ्या चिठ्ठीप्रमाणे मुखवटे असलेल्या अनेक व्यक्तींमधील, खरी व्यक्ती शोधायची असते. हा आधीच्या चिठ्ठीचा व्यत्यास वाटतो. माणूस वरवर दिखावू असतो. पण आत नियतीच्या शापाची बाधा असते, त्याच्यात आसक्ती, लोभ, अहंकार, स्वार्थ, क्रूरता असे कंगोरे असतात. म्हणून मुखवट्याला विसरून, आतील अस्तित्वाचा आदर करून, आस्तित्वाला मिळालेला शाप जो समजून घेतो, तो अनंताच्या पुढील प्रवासाला जातो.येथे प्रवासी, दूर बसलेल्या भीषण चेहऱ्याच्या व्यक्तीला ओळखतो. व त्याला दुसरी चिठ्ठी मिळते.

तो प्रवासी तेथे थांबत नाही. ज्ञान शोधण्यासाठी सुखाचा त्याग, वनवास पत्करावा लागला.हेसुद्धा या भागात दाखवले आहे.

3)तिसरी चिठ्ठी मिळण्याचा भाग, जीएंची प्रतिभा दाखवतो. सभागृहात अनेक चिपांवर सत्ये लिहिलेली असतात. त्यांमधील खरे सत्य शोधायचे असते.

इतिहासात मानवाने अनेक सत्ये शोधली. उदाहरणार्थ सत्य बोलणे, अहिंसा करणे.पण शब्दांत अडकलेल्या सत्याला मर्यादा असतात. वेगळ्या परिस्थितीत दिलेले सत्य, अपुरे पडते; किंवा सत्य जास्त वापरले तर असत्य होवून निरूपयोगी होते. म्हणून बदलत्या परिस्थितीप्रमाणात सत्याची मात्रा असावी लागते. गौतम बुद्ध

यांनी 'अत्त दीप भव', स्वतः प्रकाशित रहा, असे सांगितले. अनेक इझम दहा वर्षांत निरूपयोगी झाले आहेत. याठिकाणी जीए म्हणतात--

"...पण अक्षरांच्या या वादळात ते नेमके सूत्रतरी कसे शोधून काढायचे? काही वेळाने त्याचे मन स्थिर झाले व त्याला आत्मविश्वास वाटू लागला. त्याला वाटले, या सूत्रकारांच्या मानाने आपण क्षुद्र असू; पण आपणही जीवनाच्या सुखदुःखांचा वेध घेतला आहे, भोग घेतला आहे. त्यांची सूत्रे त्यांच्यापुरती. आपण आपले सूत्र धगधगीत अग्नीकडे पाहत डोळयांच्या शिरा जाळून घेत आपणच शोधले पाहिजे. या शिलांवरील अक्षरांप्रमाणे आपल्या मनावर डागण्या देत ते आपण कोरले पाहिजे. हे सूत्रकार म्हणजेही माणसेच होती. स्वतः हयात असता त्यांनी ही सूत्रे लिहिली. गूढ आयुष्याचा एक क्षण जरी उरलेला असला, तरी पूर्ण सत्य समजले असे म्हणणे उध्दटपणाचे आहे. त्या एका क्षणातसुध्दा मनात धरणीकंप होऊन साऱ्या पूर्वकल्पनांचा विध्वंस होऊन जाणे अगदी शक्य आहे आणि आयुष्य संपताच जे सत्य दिसले असेल, ते सूत्रांत बंदिस्त करणे केवळ अशक्य आहे. शिवाय, त्यामागील जिवंत आवाज विरल्यावर या सूत्रांना वेड्यावाकड्या रेघोट्यांखेरीज काही अर्थ आहे का?सूर्यास्तानंतर केवळ रेघोट्या ओढून त्याचे किरण स्पष्ट करता येतील का? त्याने निर्विकार डोळयांनी साऱ्या अक्षरांकडे पाहिले. इतका वेळ उन्मत्त पिशाचाप्रमाणे नाचणारी अक्षरे आता पुरलेल्या प्रेताप्रमाणे वेडीवाकडी स्तब्ध होती. त्याने सर्व भिंतींवर नजर फिरवली. अक्षरांच्या, ओळींच्या गर्दीत मध्येच एक वीतभर शिला रिती होती. तो विस्मयाने तिच्याकडे गेला व त्याने तिच्यावर हलकेच बोटे फिरवली. ती शिला पूर्णपणे अनाघ्रात होती. हे पाहून तो हसला. हेच माझे सूत्र. इतरांपैकी कोणतेही सूत्र पूर्णपणे सत्य नाही, कारण शब्दांत सापडलेले सत्य हे नेहमीच भग्न तुकड्यांच्या स्वरूपाचे असते" त्या शब्दांबरोबर ती शिला वर उचलली गेली व मागच्या पोकळीतून एक कागद त्याच्यापुढे पडला..."

4) आता त्याला दरवाज्यातून बाहेर पडून अनंताच्या मंदिराच्या बंद मोठ्या दरवाज्यापाशी जातो."कोणी आहे का विचारल्यावर उत्तर येत नाही. हेच अनंताचे मंदिर, असे दूरून सांगितले जाते.

तो करंडा उघडतो, तर तो शून्याकार असतो. पूर्णात् पूर्णम् उदच्यते। आधीच्या सभागृहात निदान कोरी चिप, साकार कोरेपणा असतो. आताचा शून्याकार निराकार आहे. हे सत्य तो इतरांना सांगू शकत नाही. कारण पायऱ्या नष्ट होतात. ज्ञान मिळाल्यावर जिवंत राहणे, हा वर नसून शाप आहे, असे येथे जीए सांगतात.

अशा प्रकारे, रक्तमुखी व अनंत कथा, प्रज्वलित दीप आहेत. त्यांच्या एकत्र वाचनाने दीप्ती तयार होते. म्हणून जीए कुलकर्णी, मराठीतील प्रतिभावंत आहेत.

विलास वाघोलीकर

--

सर्वांना नमस्कार!

विलासरावांनी एका मला नवीन प्रकाश दाखवला आहे. त्या प्रकाश झोतात परत एकदा जीएंच्या "अनंत" गुहेत शिरून सावकाश विहार करतो.

यतीन गुळवणी

--

'अनंत' कथेवरचे चित्र कथेतला प्रवास सुंदर रेखांकित करते.मला भारतातील अनेक देवळांकडचा प्रवास आठवला खासकरून गिरनारचा .

अनंत ' कथेवरचे विवेचन स्पष्ट, सुसूत्र, अर्थपूर्ण, रसभावपूर्ण, कथेचा आशय रसिकांच्या मनापर्यंत ओघवत्या शैलीत पोचवणारे झाले आहे.

- माधव पुराणिक

मी अनंत ही कथा वाचलेली नाही. पण विवेचन वाचून वाचायची उत्सुकता वाढली आहे. रेखाचित्र सुंदर झालंय.

- विशाखा आपटे

धन्यवाद.अगदी योग्य. गिरनारचे द्रुश्य समोर ठेवून चित्र काढण्याचा प्रयत्न केला होता. कथेशी संबंधित चित्रे नंतर देईन.गुड डे.

- विलास वाघोलीकर

विलासरावांचे अनंत कथेचे विवेचन मुद्देसूद व रेखाचित्र रेखीव आहे. त्यानी दाखवलेल्या प्रकाशात कथा समजून घेण्याचा प्रयत्न चालू आहे. डॉक्टर माधवराव पुराणिकांचे शास्त्रीय पृथ:करण समजून गोडी आहे. विशाखाताईंचे भाष्याबद्दल उत्सुकता आहे.

- यतीन गुळवणी

विलासजी, अनंत या उत्कृष्ट पण काहीशा दुर्बोध कथेचे सूतोचा केल्याबद्दल आपले आभार.


यतीनजींनी म्हटल्याप्रमाणे विलासजींनी खरोखर एक नवीनच प्रकाश या कथेवर टाकला आहे. याही प्रकारे (अब्रहाम मॅस्लॉ चा पिरॅमिड) ही (किंवा कोणतीही) कथा वाचता येईल असे कधी मनातच आले नव्हते. विलासजी, आपल्या बहुश्रुततेतून या प्रकारे दोन विभिन्न शास्त्रांचा मिलाप करून एक नवीनच वाट दाखवली आहे त्या मननशक्तीला सलाम. विलासजींचे आभार मानायलाच हवेत. त्यात त्यांनी चेरी ऑन द केक असे जे चित्र रेखाटले आहे तेही अप्रतिम आणि सूचक.

- सुनीळ सामंत

Seeking roots of rootless tree

हाच प्रत्येक अस्सल प्रतिभावंतांचा कलाधर्म असतो

सांजशकुन मध्ये जी एं नी या कलाधर्माला अद्भुत परिमाण दिले
 भारतीयच काय अख्ख्या जगात कोणत्याही भाषेत असे कलातत्वक पुस्तक नसणार हे मी खात्रीने सांगतो.
सांजशकुन मधील सर्वच कथा म्हणजे आत्मशोधाच्या पाऊलवाटा
परंतु त्यात रानभूल शैलीतील हवाहवासा चकवा आहे..
आणि मी जी एं चा आंधळा अनुयायी नव्हे, डोळस सहप्रवासी मानतो स्वतःला सदैव
या अर्थाने जी ए हे एकमेवाद्वितीय' अक्षर' साहित्यिक
-महेश आफळे



Hello

Pardon me for that I think I can express my interpretation better in English not Marathi.

(P.s. I am an ardent marathi reader but typing Marathi is a hazard.)

In one line, I feel Anant represents the inevitable disappointment of the man who tries to seek the truth.

Anant's canvas seems Hampi like. The temples, the pillars, the river, the rock reminds me of the ancient town of Hampi and its dravidian architecture. (Being in karnataka I wonder whether he ever visited Hampi ? If he did not then it is the most ironic contradiction as most of his allegories have the similar canvas and its just so unfair if he never got to see it in real! Alas!)

Its a beautifully crafted story which exposes the meaninglessness of human life in the most meaningful way. You could be an aware human, travel miles long for years, search for the answers, sacrifice the materialistic luxuries of life, make the greatest compromises and still end up with an infertile verdict, an absolute zero! You end up no different than a man who doesn't question or seek anything and lives a shallow hence a happy life.

But the disappearing of the stairs at the end of the story (his way back home) represents that once you decide to take this journey, search for the truth then there is no way you will look at the life same way. There is no escape from the restlessness.

I.e.Can we go back to living the same life (without questioning) after reading GAs literature? His stories touch you within. They make you think, you struggle to find the answers. But in the end its a curse to the human life that no matter how aware you are, how passionately you seek for that ultimate destination, you will always end up walking on a ‘cul de sac’.

The destiny has the ultimate power of making you feel like an eggshell at the destination of a journey you thought was the most meaningful.

Just when you think you have it all it makes you feel like a complete nincompoop! G.A. has mastered the art of highlighting such an irony of human life.

The Mahanta’s character represents the cruel face of destiny. Shows that we are just the puppets of our fate no matter how loyal your journey’s been. At first Anant shocks you and then leaves you with this uneasy feeling that suffocates you.

In my opinion Anant is an every night feeling of a thinking man. Your urge to find the answers will not allow you to go back to your shallow and superficial life though you know there’s absolutely nothing at the end.

Kasturi Mahesh (Bombay)

(Attached are a few photographs that I clicked in Hampi which reminds me of the Ananta temple.)

----

Good response. Have such reactions frequently on the stories of G A Kulkarni. Photos worth remembering.good day.




Thank you all for kind words. G.A. Who was labeled as an extreme introvert in his own time is now connecting people this way.

-कस्तुरी महेश

**Photo Credits-**

**Kasturi Mahesh**

**(Hampi)**



आपण खूप छान लिहिले आहे. धन्यवाद

- विलास वाघोलीकर
-

हाच विचार मला प्रत्येक G. A. कथेत दडलेला आहे असं वाटत. मानवी जीवनाची अपूर्णता, नियतीशरणता आणि फोलपणा हे या ना त्या प्रकारे जी ए दाखवून देतात.

फोटो खूप सुंदर काढले आहेत. काळ्या, रुपेरी भरून आलेल्या आभाळाच्या (अटळ, घेरणारी नियती) पार्श्वभुमीवर मंदिराचा (मानवी जीवन) पुरातन भग्न सांगाडा... 👌

सर्वांनीच खूप सुंदर अभ्यासपूर्ण लिहिले आहे. मला इथे एक भावनिक, वैचारिक आणि spiritual समृद्धी अनुभवायला मिळते आहे. सर्व लिहिणार्या members ना धन्यवाद! 🙏

- – विशाखा आपटे

कस्तुरीजींनी जीएंच्या कथांचा सखोल अभ्यास केलेला जाणवला. किंवा चिंतन. त्यांनी शेवटच्या पायऱ्या नाहीसे होण्याबाबत प्रतिमेचा अर्थ लावला आहे तो तर अत्यंत नेमका. म्हणजे युरेक्का मोमेंटच. मी वर लिहिले तसे जीएंच्या प्रतिमांचे अर्थ लावतालावता दमछाक होते आणि शेवटी तेवढी बौद्धिक ताकद उरतच नाही. या पायऱ्यांच्या पर्यंत पोचेतो माझी विचारशक्ती संपलेलीच होती.

हा अर्थ घेतल्यावर या कथेचाच नाही तर जीएंच्या एकूणच लेखनाचा प्रभाव इतका खोलवर का पडतो ते कळते.

सुनीळ सामंत

विलासजींनी सूतोवाच करण्यापुर्वी मी माझी वेगळी टिपणे काढली होती ती आता सादर करतो.

अनंत म्हणजे पुन्हा एक असंख्य प्रतिमांनी बहरलेली कथा. प्रतिमांचा अर्थ लावता लावता दमछाक तर होतेच पण दरवेळी दर प्रतिमेचा अर्थ वेगळा घेतला जाऊन कथेचा पटच बदलतो. कधी ही कथा Nihilist existentialism ची वाटते तर कधी भारतीय तत्त्वज्ञानातील माया आणि ब्रह्माची. (थोडेसे विषयांतर- निहिलिझ्मचा मुख्य विचारवंत नित्शे याचा गुरु शॉपेनहॉवर याने ब्रह्म, माया या संक्ल्पनांचा त्याच नावांनी मुक्तहस्ते वापर केला आहे. तो संस्कृतचा विद्वान होता)

कधी वाटते सर्वच मानवी जीवनाचा प्रवास हा शून्याकडून शून्याकडे आहे तर कधी वाटते हे केवळ एकट्या दुकट्या साठीच तसे आहे. बहुतांश जन तर मुखवट्यांचा आनंद घेत मजा करत आहेत आणि उगाचच कसला तरी (जे मिळणारच नाही अशाचा) शोध घेत आयुष्य वाया घालवण्या ऐवजी मिळाला तो क्षण आनंदात घालवत आहेत तेच योग्य आहे. आणि जीवाच्या आकांताने अज्ञाताचा शोध घेणारे थोडे जन, आणि मिळाले त्याचा आनंद घेत जगणारे असंख्य जन याहून हे जीए हे तिसरेच एक रेफ़री आहेत जे या दोघांच्या जगण्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करत आहेत की ’हे योग्य की ते’ . किंवा हे जास्त निरर्थक की ते जास्त निरर्थक?

- सुनीळ सामंत

अनंत…..(सांज शकुन)

ही कथा वाचताना एक वेगळाच प्रश्न मनात आला.

"हिरवे रावे"ची पहिली आवृत्ती….1962

]"सांज शकुन" ची पहिली आवृत्ती….1975

हिरवे रावे मधल्या कथा या जिवंत हाडामाणसांच्या कथा आहेत तर सांज शकुन मधल्या बहुतेक कथा रुपक कथाआहेत. एकदम रुपक कथेकडे ते का वळले असावेत?

का अर्थशुन्य भासे मज कलह जीवनाचा अशी मानसिक स्थिती त्यांच्या मनाची झाली असावी?

सत्य काही वेगळेच असावे, असे वाटुन ते रुपक कथे कडे वळले?...पण या सत्याच्या शोधात परतिची वाट नाही हेही पक्केपणाने ठाउक होते."आपली पडशी हा आंधळा शिष्य कशी ओळखणार?..या प्रश्नावर आंधळ्याचे हसणे हेच उत्तर असते....या शोधात पहिले पडणारे तसे खूपच सोपे असतात. महारोग्याला खरी गरज एका जिवंत माणसाच्या हाताच्या स्पर्षाची असते.मुखवट्याट्याशिवायची व्यक्ती शोधणे हेही सोपेच.कारण सर्वसामान्य माणसे मुखवटे घालुनच वावरत असतात.ँॅ

तिसरा निर्णय हा महत्वाचा.एकाच शिलेवरील सूत्र सत्य आहे..ते शोधणे....आणि तेवढेच नव्हे, तर इतरकशी अपुर्ण वअज्ञ आहेत हेही दाखवावे लागेल....म्हणजे त्यातही असुया ईर्षा आहेच....शब्दछल आलाच.....तेव्हां शब्देविण संवादु हाच मार्ग उरतो.....जो ज्ञानेश्र्वरानी सांगितला.

शब्दात सापडलेले सत्य हे नेहमीच भग्न तुकड्याच्या स्वरुपात असते.

पण हाअनुभव स्वतःपुरता झाला.जी.ए.ना हेअनुभव अतिंद्रीय पातळीवरही येत असणार.हे अनुभव वाचकांच्या पर्यंत पोहचवण्या साठी रुपक कथेचा आॉःधार घेतला.जसे संत साहित्यात दृष्टांत असतात.....'उदा..काट्याच्या अणिवर वसली तिन गावं....लेखकाला स्वतःला येणारी अनुभुती वाचकापर्यंत पोहचवताना रचनेत काहिंशी क्लिष्टता येत असणार.(जी.ए..च्या कथेसंदर्भात हाही आरोप काहींजण करतात)पण सोपे सुटसुटीत करत असताना रचनेत व्यामिश्रता येत असावी....हे

खूपच धाडसी विधान झाले…पण अंजन कथेत आयुष्यातल्या घटनांकड बघण्याची जी दृष्टी येते, ...एखाद नाटक असत ना?..तस आहे, हेमल्हारी सांगतो.पण त्याठी अंजन मिळवण्याचा तो खटाटोप…आणि ते मिळळुनही काही उपयोग नाही…..अनंत कथेचाही शेवट तसाच आहे. आणि अशा कथांच वाचन झाल्यावर जी खिन्नता येते,

ते एक आपल्या मनावर झालेल गारुड असते….ज्यातुन आपण अजुनही बाहेर पडलेलो नाही.

- राम कुलकर्णी

धन्यवाद सर. जीएंच्या सामान्य जीवनावरील कथा ते रूपक कथा हा प्रवास, त्यामागची कारणे व त्यांचा प्रतिमा, दृष्टांतांचा वापर करण्यामागची पार्श्वभूमी तुम्ही नेमकी उलगडली आहे. जी एंच्या कथांवर विचार करताना त्यांच्या अभिव्यक्तीच्या प्रगल्भ होत गेलेल्या प्रवासाचाही विचार करावा लागेल.

-सुनीळ सामंत

जीएंची शब्दकळा कशी सौंदर्यशाली आणि किती श्रीमंत होती ते याही कथेत एखादे वर्णन करताना दिसते. मग ते स्थिरचित्रण असो वा प्रसंगवर्णन.

खाली महानंदा नदीचे निळे स्वच्छ पाणी एकही चुणीशिवाय स्थिर होते, व तिच्या काठची वाळू अगदी निष्कलंक होती. एका काठाजवळच्या पाण्यात प्राचीन जलचराप्रमाणे एक काळा खडक निश्चल होता, आणि आयुष्यात एखादी कोवळी आठवण जतन केलेली असावी, त्याप्रमाणे त्याच्यावर येथून पांढऱ्या पिसाप्रमाणे दिसणारा एक बगळा होता. मठाच्या मागे कुरळी हिरवी लव असलेला पर्वताचा

उभार होता, व त्या मागे अस्पष्ट दिसणाऱ्या एका शिखरावर सोन्याचा कळस असलेले अनंताचे मंदिर होते.

त्याने मठात प्रवेश केला. एका रेशमी गादीवर मखमली आसनाला टेकून महंत शांतपणे बसले होते, व त्यांच्यामधूनच तो सुवास येत असल्याप्रमाणे फुले आणि उदबत्त्या यांच्या गंधाने हवा जडावली होती.

जीएंच्या भरजरी रेशमी भाषाशैलीचे अजून एक उदाहरण…

डावीकडे वळताच विविध फुलांनी रम्य झालेले उद्यान, व त्याला पडत असलेल्या शुभ्र स्वप्नाप्रमाणे तरल वाटणारा प्रासाद त्याला दिसला. त्या सौंदर्यामुळे तो वितळून गेल्यासारखा झाला, व त्याला क्षणभर आपल्या यात्रेचाही विसर पडला. किंचित झगमगणाऱ्या ऊष्ण सोन्याची शरीरे असलेल्या तरुण स्त्रिया पाण्यात हलणाऱ्या ज्योतींप्रमाणे दिसत तेथील तलावात जलक्रीडा करीत होत्या, व त्यांच्याकडे आसक्त नजरेने पाहत अनेक पुरुष काठावर सुखाने विसावले होते. प्रासादात तर विलासी आसनांवर अनेक स्त्री-पुरुष प्रणयलीलेत गुंगून जगाचे भान विसरून गेले होते.

आणि या साऱ्या धुंद जीवनावर मधुर संगीताच्या लहरी तशाच आसक्त स्वरांनी तरंगत राहिल्या होत्या. तो आत येताच सगळ्यांनी आपले तृप्त चेहरे त्याच्याकडे वळवले, व त्या एकत्रित सौंदर्याने तर तो दडपून गेल्याप्रमाणे झाला. …

या उलट एखादी कुरुपता, बिभत्सपण दाखवतानाही त्यांची शब्दकळा तितकीच श्रीमंत असते.

तेथे एक खडक होता व त्यातील एक लचका काढल्याप्रमाणे आत मोकळी जागा होती. त्या ठिकाणी येताच आपण एका प्राचीन गुहेमध्ये प्रवेश करत आहो असे त्याला वाटले. त्या ठिकाणचा प्रकाश मंद, जर्जर वाटत होता आणि सर्वत्र एक प्रकारचा असह्य, कुंद वास भरून राहिला होता. समोर उंच गेलेली भिंत होती आणि तिच्यात ठिकठिकाणी झरोके होते. तो आत येताच अनेक झरोक्यांतून वेडेविद्रे हात

एकदम बाहेर आले. त्यांच्यावरील मांस सुजून काळेनिळे झाले होते व अनेक हातांची बोटे झडून गेली होती. त्याचे सर्व अंग एकदम शहारल्यासारखे झाले व तो एकदम मागे सरला. त्यावेळी त्याला मागे कुणाचा तरी धक्का लागला. त्याने वळून पाहिले, तेव्हा चामड्याचा केला असल्याप्रमाणे दिसणाऱ्या चेहऱ्याचा, पाठीत अगदी वाकून गेलेला एक माणूस निर्जीव डोळ्यांनी त्याच्याकडे पाहत होता.

- सुनीळ सामंत

या कथेतून (वरील सर्व चर्चा वाचल्यानंतर) मला तर हेच उमगले की मायेत गुंतून पडलेले जिथे पोचतात, ब्रह्माचा शोध घेणारेही फ़ार दूरवर पोचतात असे होत नाही.दोघांचीही गत शून्याकडे. मृत्यूकडे. अनस्तित्वाकडे होते.

पण प्रवास? It is not destination but the journey that is joy. भले ब्रह्माचा, सत्याचा, मुळांचा शोध घेणारे आणि तत्कालिकात रमणारे, दोघेही पोहोचत असतील एकाच शून्यापाशी, पण त्यांच्या प्रवासाचा आनंद मात्र वेगवेगळा असेल. एकाला भरपूर सुख मिळाले असेल, तर दुसऱ्याला अनंत आनंद मिळालेला असतो.

- सुनीळ सामंत

मायेत गुंतलेल्याला जे सुख मिळते ते अनित्य असते, व तो सतत सुख दुःखाच्या भोवऱ्यात गटांगळ्या खात जगतो.

जो निर्गुण निरकाराच्या शोधात आयुष्य घालवतो, त्याला सुखं किंवा दुःख हे अनित्य असल्याचे समजते त्यामुळे तो समाधानी राहण्याची शक्यता असते.

- लक्ष्मीकांत देशपांडे

अनंत' - **जी ए च्या नायकांचे सत्यशोधनाचे मार्ग**

महान प्रतिभावतांची 'तीच ती तशीच ती नियती' पान १

तत्वज्ञानाची चौकट

१ तैतरीय उपनिषदात ब्रह्माचे स्वरूप ' सत्य, (नायकाची कसोटी १व २), ज्ञान (कसोटी३) आणि अनंत असे वर्णन केले आहे.

२ जी वस्तू कशापासूनही वेगळी नाही ती अनंत होय.कथे अनंत सर्वत्र आहे .स्थिर-अस्थिर स्पंदात्मक उदाहरणार्थ अ) महंताचा आवाज, नदीतील पाणी - चुणीशून्य- कंकणाकृती इ.

३जीवन सत्य(विचाररूपी) कसोटी १ व २

च (कर्तृत्वरूपी) प्रवृत्तीवादी. आहे - नायकांचे सत्यशोधनाचे प्रयत्न सत्य व शिव मोजता येतात

सुंदर (भावनारूपी) . सौंदर्य मोजता येत नाही जसे स्त्री सौंदर्याची भावना (गुण, लावण्यासह), निसर्ग सौंदर्य इ .कथेत यांचा अनुभव येतो

४ सुख व दुःख मिळून दंद्व बनते (दंद्वात्मक जगणे, कसोटी १व २) यांचा संबंध शरीर१० इंद्रिये अंतःकरण यांच्याशी आहे.आनंद(कसोटी ३ व शेवटची) या दंद्वातीत आहेव तो अनंताचा गुण आहे.नायक याच्याच शोधात आहे. कारण स्वतःच्या अनुभवातून पटलेले आहे कि सुख क्षणिक व अस्थिर आहे (कामनेचा उपभोग). आनंद स्थिर व नित्य आहे.

५ वैशेषिक तत्वज्ञानांत अनंत ही संकल्पना space म्हणून आकाश, काल, दिशा अशी आहे.या कथेत जी ए यांचा. सतत कलात्मक वापर करतात

६ जैन तत्वांनुसार कर्मबंधातून मुक्त जीवाला (देहातीत) अनंत ज्ञान, अनंत सुख इ मिळतात.नायकाला माणूस रूपात ते शक्य नाही

७ अनंत ही विश्वरूपी 'विष्णू ' देवता आहे त्याच्या शेष (सर्प)व यमुना नदी गौण देवता आहेत. कथेत हे शब्द येतात

८ नायक अ) नास्तिकवाद(चार्वाक) नाकारतो (कसोटी२)तत्व- जग हेच.सत्य.सतत सुखोपभोग घ्यावा ब) ज्ञानमार्ग नाकारतो (कसोटी ३)क) कर्मकांड नाकारतो (महंत)ड) प्रेम मार्ग, भक्ती मार्ग, योगमार्ग दिसत नाहीत

---

**'अनंत' अनेक केंद्रांवरचे(वर्तुळांतले) पात्रांचे नियतनाट्य**

१ व्यक्तीरेखा -अ) मध्यवर्ती वर्तुळ - अनंताचे मंदिर (अमूर्त)ब) 'तो' शोधक प्रवासी (मूर्त)

२) विस्तारित वर्तुळ -'अनंता'चे पारंपरिक व्यक्तरूप अ) महंत-मठाधिपती ब) आंधळा शिष्य क)अनंत मंदिराचा बंद दरवाजा

३ मानवी जगाचे वर्तुळ अ) जर्जर माणसांचे हात - जरा, मरणप्राय, शारीरिक आवकळाग्रस्त, यांचे दुःखात्मक जग (पातळी शरीर, अंतःकरण) -कसोटी १

ब) प्रणयधुरंधर, मीलनोत्सुक, कामक्रीडेतून 'अनंता'चा -अव्यक्ताचा अनुभव घेणारी युगले.'मुखवटा' ही त्यांची नियती.सुखात्मक पातळी.

अ) आणि ब) शारीरिक व अंतःकरण पातळींवर

क) सुखदुःखातीत ज्ञानाचे वर्तुळ - ऋषी, सूत्रांवर टीका लिहिणारे, ती बौध्दिक दृष्टीने सिद्ध करणारी माणसे.ही बौध्दिक आनंदाकडे - अनंताकडे -प्रज्ञेकडे झुकणारी पातळी.

४ निसर्गाचे वर्तुळ - हे आहे तसेच कायम आहे.नायक त्याच्या संवेदनशीलतेनुसार ते स्थिर- अस्थिर पाहतो उदाहरणार्थ- बगळा, पाणी, दरी, डोंगर इ.

५ अनंताचे वर्तुळ- हे सर्व ठिकाणी सर्व काळ कथेत आहे

उदाहरणार्थ - अ), महंताचा आवाज मठात व मंदिरात

ब) दोन सजीवांतील आसक्ती, वासना - पांढरा बगळा डोंगराच्या हिरव्या उभारात खडकावर निश्चल आहे (स्थिर अनंत वासना)

पांढरा बगळा उडून झाडांच्या हिरव्या उभारात विरघळतो, (अस्थिर व्यक्त वासना)

क) सर्व वर्तुळे= निळी कंकणे, तळ नसलेले शून्याकृती लाकूड,

६ सर्व वर्तुळाचा केंद्र बिंदू नायकाचा सुखदुःखातीत आनंद.नायकाला हा अनुभव 'वाक् तन मना'त घ्यायचा आहे. जी एं सकट सर्व प्रतिभावान कलाकार- प्रत्येक जण.हा शोध घेतो.'मर्यादित' शब्दात शब्दातीत व्यक्त करणे

७ कथा गूढ तत्वज्ञानाच्या रहस्यात आकंठ बुडालेली आहे

माधव पुराणिक

९६२३४४२२२१

सुनीळजी, नमस्कार. वाचक, अनंत कथेचे अनेक पैलू सांगत आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे. यानंतर आपण घेणाऱ्या चार कथांची नावे जाहीर केली, तर त्या मिळवून वाचल्या जातील.

1)आपण कथेतील भाषा शैलीबद्दल खूप छान लिहिले आहे. धन्यवाद. जीएंचे गद्य लेखन, अलौकिक आहे. त्यामुळे आठवण होते--काव्याची, इंद्रधनुष्य मधील रंगांची, वेरूळ शिल्पासारख्या भरदार नक्षीची, तानसेनाच्या स्वरांची, अरिस्टाटलच्या तर्कशास्त्र, तत्वज्ञानाची, व सत्यजीत रायच्या गतीमान चित्रपटाची. आपण या कथेतील शब्दकला प्रभावीपणे सांगितली आहे.

2-वेगळा मुद्दा. कथेत, नायकाला, पायऱ्या जावून एकटे सोडले, याचा मी विचार करतो.

3.नायक प्रयत्न करणारा आहे. तो माणसांशी बोलतो.डोंगर चढतो.पण त्याला नियतीचे महत्त्व माहित आहे. नियती मुळे, साधारण आयुष्यात जीवघेणा आजार होतो. त्यात एकाकी म्रुत्यू सूचित झाला आहे.त्यावेळी त्याला माणसाची गरज असते.

4.किंवा नियतीमुळे त्याला, सुख, ऐषाराम मिळतात. पण त्याबरोबर, हाव, लोभ, असूया, तीव्र वासनांचा मुखवटा मिळतो.

5.त्यापेक्षा त्याला अनंताच्या ज्ञानाची प्राप्ती महत्त्वाची वाटते. पण नियतीमुळे, पूर्ण ज्ञान(याचे विवेचन, आर्फियस मध्ये आहे)न मिळता ज्ञानाचे तुकडे मिळतात. नियती सांगते, आताचे ज्ञान उद्या निष्फळ होईल.सर्व तुकडे मिळूनही कोरी पाटी, हेच ज्ञान आहे, हे प्रवाशाला कळते.ज्ञानाचा अहंकार सोडावा लागला.

6.देवळासमोर शून्याकार करंडा मिळतो.ज्ञान, विश्व, (व निर्माता)निराकार, अनिर्वचनीय आहे.' नेति नेति आहे', हा अनुभव इतका असिडिक आहे, की तो अनुभव, पायऱ्या नष्ट होवून, नायक कोणालाही सांगू शकत नाही.मग नायक अटळ, एकाकी, अस्तित्ववादी होतो.

मला समजलेला अर्थ मी दाखवत आहे. धन्यवाद. गुड डे.

-विलास वाघोलीकर.

शून्यत्व एकीकडे आणि वर्तुळाची दोन्ही टोके एकत्र येऊन भासणारे पूर्णत्व यातील मूलभूत फरक मात्र तशाच्या तसा राहतो कथा वाचल्यावरही

खूप काही कळले परंतु काहीच कळले नाही असे दोन्ही अनुभव (अनुभूती)एकाच वेळी घेण्याची अवस्था होते वाचकाची

- महेश आफळे

डाँ पुराणिक व वाघोलीकर, लेख आवडले.

जी. ए. यांचे कथेस अनेक पैलू असावेत व ते व्यक्तीसापेक्ष देखील असावेत.

वेगळा पैलू निर्देशित झाला, की अचंबित होते. आत्मज्ञान झाले असा भास होतो.

नवीन द्रुष्टी प्राप्त झाली असे वाटते.

लेखन व उपक्रमास मनापासून धन्यवाद.

- मनमोहन आंबेकर

अनंत म्हणजे अनादि अनंत। आत आतला भुयारी प्रवास

एक प्रकारची कांदे सोलणच

'आत काय आहे"? ही ती प्रादिम उत्सुकता

वासनेचे मूळ भयात आहे

जी एं ची कथा म्हणजे निव्वळ हत्तीच नव्हे तर ऑक्टोपसी दृष्टांत

जी एं ना लिहिताना अभिप्रेत असलेले अर्थ कदाचित या सर्वांहूनही आणखी वेगळेच अनोखे काही असेलही

जी एं ची कथा म्हणजे खरीखुरी कविता, अनंतार्थी

- महेश आफळे

---

पुन्हा एक नवीन दिशा गंवसली.

सहसा आपण विश्व अनंत आहे असे म्हनतो तेव्हा ते बाह्य अर्थाने. किंवा अनंताचा शोध घ्यायला निघाला, अनंताच्या यात्रेला निघाला असे म्हणताना आपल्य्ला बाहेरील वाटच अभिप्रेत असते. पण आपल्या आतही अनंतच असते. आणि ते खोल खोल कांद्याच्या पातीसारखे सोलत राहिलो तरी संपतच नाही. त्याचे प्रतिक म्हणजे करंडा. वा वा वा. महेशजी तुम्हाला आणि जीएंना या अनुभूतीसाठी प्रणाम.

- सुनीळ सामंत

या कथेतील पडशी (गाठोडं?) हे मालमत्तेचं प्रतिक असावं. आधी ती त्याच्या खांद्यात रुतत असते. (मामत्तेतून उद्भवणारे दुःख) पण जेव्हा आंधला स्वयंसेवक ती पडशी नीट ठेवत नाही तेव्हा तो ती भल्त्याच कुणाला देणार या भितीने तो आशंकित होतो. (मालमत्ता वियोगाचे दुःख)


- सुनीळ सामंत


अदृश्य गाठोडे संचित


=- महेश आफळे




चित्रकार- विलास वाघोलीकर




क्षमा
आहिंसा
दया
नम्रता
शांतता
YSW
6


7

1शिखरावर अनंताचे मंदिर असलेला डोंगर, 2)रोगग्रस्ताशी हस्तांदोलन केल्यानंतर चिठ्ठी मिळते, 3)सुखमय वातावरणात यात्रिक 4)मुखवटा नसलेली व्यक्ती ओळखल्यावर चिठ्ठी मिळते5)खरे सूत्र शोधण्याचा प्रयत्न, 6)डोंगरावर यात्रिक एकाकी बसतो. पायऱ्या नष्ट झाल्या

सर्व रेखाटने- श्री विलास वाघोलीकर

सर्व छायाचित्रे- कस्तुरी महेश

विलासराव तुमचे आभार मानणे औपचारिक समजू नये. सदर चित्रकृतीतून तुमची कथानकातली समरसता दिसून येते व सर्वसामान्य वाचकाची समज वाढते. डॉक्टर पुराणिकांनी गिरनारच्या पर्वत चढणीची "अनंत" कथानकातील प्रवासाच्या प्रसंगाशी सांगड घातली होती. विलासराव सहमत होते. त्याची छायाचित्रे "अनंताच्या" मननात भर घालू शकतात. गिरनारच्या वाटचालीचे युट्युबवर VDOआहेत पण "अनंत" च्या वाटचालीच्या नजरेतून टिपलेले छायाचित्र वैशिष्ट्यपूर्ण असू शकते.

- महेश आफळे





अनंत- छायाचित्रे

डॉ. माधव पुराणिक





*मंथरमायची मोहिनी...* - महेश आफळे

मंथरमाया...मंधरमाया...काय आहे मंधरमाया?

**Shallow people demands variety;**

**But eventhough I am writing...**

**& will write the same story' throughout my life...**

या अवतरणाचे डंखमर्म मनात गोंदवून माझ्यामधील व जी.ए.मधील अनुबंध शोधण्याचा एका प्रवाश्याचा कालातीत प्रयत्न...? की एखाद्या हिरव्या नवांकुराचा संभाव्य वेलविस्तार...? मी जी.एं.चा सहोदर आहे असे म्हणण्याचा उद्धटपणा माझ्याकडून या जन्मात तरी संभवत नाही. प्रातिभबलाच्या दृष्टीने जी.एं.शी कुणाचीही तुलना करण्याचे पाप कधीच कुणीही करु नये. स्वमर्यादांची मला नको इतकी धारदार जाणीव असल्याने स्वत:चे 'स्वत्व' अबाधित ठेवूनही नि:संकोचपणे नमूद करु शकतो मी सारे...पण जी.ए.हा माझा 'विकपॉइंट' नसून 'स्ट्रांग पॉइंट' आहे हे मी नाही तर कुणी सांगावे? जी.ए.नावाचा स्वप्नपक्षी उत्तुंग आकाशात तर अद्याप तरी मी जमिनीलगत खुरडझेप घेणारा. पण. पण त्याच बरोबर हे देखील तितकेच स्पष्ट आहे की...हे असेच जर असेल..

तर.पाताळात...पाताळाखालच्या आकाशात 'घिरट्या घालणाऱ्या इतर 'टोळीबाज' पक्ष्यांचे काय? संख्येने ते आजवर कायमच बहुमतात.. समूहधाडीचा विध्वंस त्यांना चांगलाच जमतो. त्यांनाही 'तथाकथित प्रतिभेचे पंख' अस्तात म्हणे... पण ते कसे? खालीवर किंवा पुढेमागे होणारे असे नव्हे तर नुसतेच ‘पुढे पुढे करणारे पंख. अदबीने कुठेही झुकणारे... पाताळाखालच्या नभात..

कोणत्याही काळातील कोणत्याही 'जोनाथन' ला हे कधीच शोभत नाही....

तर प्रश्न स्वत्वाचा..स्वत:चा मूळ चेहरा शोधण्याचा होता... या शोधप्रक्रियेत चेहराच हरवून गेला तर?

मुखवट्याच्या जगात खोट्या भ्रामक मुखवट्याचे कंद सोलत जाताना स्वतःचा मूळ चेहरा हरवून गेल्याची खंत बाळगायची की स्वताला मूळ असा चेहराच नव्हता या सत्यदग्ध जाणिवेनुरुप 'स्व'चा विसर स्वीकारायचा या आत्मशोधाची वाट म्हणजे मंथरमाया... .की...की त्या अज्ञात जन्मदात्या मालकाने ओंजळीत टाकलेल्या मण्यांची जपमाळ ओढत त्याच त्या वाट बघत अनंताकडून अनादिकडे चाललेला प्रवास म्हणजे मंथरमाया...? दुःखाच्या अटळतेची जाणीव करून देणे म्हणजे दुःख देणे किंवा दुखरी नस दुखवणे असा समज करंटेपणाचा.

या साऱ्या प्रश्नकल्लोळात उत्तर मिळत नाही... आणि तरीही मंथरमायेची भुरळ पडते... मोहिनीवश झाल्याप्रमाणे.

नाहीतरी प्रश्नांची उत्तरे देणे हे खऱ्या कलाकृतीचे मुख्य प्रयोजन कधीही नसते. नसावे. कलाकृती फक्त असे प्रश्न आहेत' याचे दर्शन घडवू शकते... उत्तरे ज्याच्या त्याच्या मनात लपलेली असतात. रंगमायेचे हे करालचक्र ज्याने त्याने स्वत:च फिरवून स्वत:चा रंग शोधायचा असतो.

…का कुणास ठाऊक... मनात अवचित एखादे साहचर्य दत्त म्हणून उभे राहते. यावल-जामनेर रस्त्यावर धुरळा उडवत आमची जीप चाललेली ... कातरवेळेच्या सुमारास सर्वत्र संधीप्रकाश निथळत होता.. रस्ता निर्मनुष्य...सुनसान...रस्त्याच्या दुतर्फा तुरळक झाडाझुडपांचे टेकडीसदृश पहाड, अंधुक उजेडात झाडांच्या खंडित छायांची हालचाल.. सळसळ जाणवायची, रस्ता निर्जीव...जणू एखाद्या अजगराने टाकून दिलेली कात वाटावी असा मळकट.. आणि त्या विराण दृश्याकडे बघून मला जी.एं.ची 'स्वामी' आठवली, नको त्या वेळी नको ते आठवणे.. दुसरे काय? माझा लोकांतातील एकांत नेहमी विलक्षण असतोच, मी सरसरुन चहूबाजूंना बघितले...अगदी गाडी थांबवून... मला त्याक्षणी आतून... अगदी आतून वाटले...

याच. याच परिसरात जी.एं.ची 'स्वामी' कया प्रत्यक्षात घडून गेली असेल...किंवा आत्ता याक्षणी घडत असेल...किंवा न जाणों उद्या परवा कधी ना कधी ती घडणार ती इथेच..इतका सारा आयुष्यप्रवास झाल्यानंतर मला नेमक्या याच विवक्षित ठिकाणी असे का वाटावे? मला मठ.महंत, बेलाचे त्रिदल...सारे सारे आठवले...त्या जमिनीला सूज आल्याप्रमाणे दिसणाऱ्या टेकाडाकडे बघून... पण मी गाडी का थांबवली हे मी कोणालाच सांगू शकलो नाही...

*रस्त्यांवर वाकली झाडे*
*बाकले क्षितिजही घोडे*
*छायेवर संन्याशाच्या*
*कोण पसरी अपुली हाडे.*

अस्वस्थ... सैरभैर मनाने मी नसलेल्या मठाच्या खाणाखुणा तिथे कल्पनेने शोधल्या. मठपती स्वामीजींच्या छायेवर आपली हाड़े खरोखरच पसरवून यावीत की काय अशी उर्मी दाटून आली...

अगदी सारे सारे विसरुन जाण्याची…

Loss of identity म्हणजे मानलीच तर केवढी सोय आहे? हवे त्या वेळी काहीही न आठवणे आणि नको त्या वेळी सारे अगदी बारीकसारीक अर्थहीन तपशीलासह आठवणे यांतील खरी धारदार झळझळीत वेदना कोणती?

मंथरमाया म्हणजे माझी 'हॉरर-टेरर'च्या पठडीबाहेरची हृदयाची थरथर जिवंत करणारी कलाकृती आहे की तो माझा कॅलिडोस्कोप आहे...हे माझे मला नेमके ठाऊक नाही.

जी.एं.च्या भग्न...विदीर्ण... गूढस्वप्नांचे काचतुकडे... आणि ते काचतुकडे बघताना...जपून गोळा करताना माझ्या स्वप्नांचे त्यात मिसळलेले रक्तबंबाळ रंगीत काचतुकडे... हा सारा ऐवज माझ्या दृष्टीभिंगात खोदून बसवल्यानंतर मंथरमाया अवतीर्ण झाली...बोटांच्या फटीतून प्रवाहित झाली. एका कॅलिडोस्कोपमध्ये किती प्रकारची नक्षी-डिझाईन लपलेल्या असतात हे नेमके कोणी कधी सांगू शकेल

काय...? ज्या दृष्टीने दृष्टीकोनातून अधणारा बघेल त्या त्या दृष्टीने त्याला त्यात सौंदर्य जाणवेत. प्रश्न फक्त हलवण्याचा आहे...अणि इथे तर 'मंधरमाया'च हलवून सोडत प्रत्येकाला.

मंथरमायेचा नाट्यप्रयोग बघून मला अनेक मान्यवरांच्या मोलाच्या प्रतिक्रिया मिळाल्या...पण त्या साऱ्यापेक्षा एक जिवंत प्रतिक्रिया एका साध्यासुध्या रसिकाने दिली.तो म्हणाला. 'मंथरमाया.. बघताना मी माझा श्वासोच्छवास विसरुन गेलो होतो. आणि शेवटी मला काय वाटले सांगू.? आज बाहेर दिसणाऱ्या प्रत्येक वृक्षाखाली अशाच कोणा एकेका अनाम स्वामीचा वास कोंडला गेलाय... आणि त्या श्वासांवर तो वृक्ष फोफावलाय...जगतोय...'

बस्स. यापेक्षा विलक्षण प्रतिक्रिया आणखी ती कोणती असणार आहे? कलावंताला तरी

यापेक्षा वेगळे ते काय हवे असते?

लिहिणारा काय...बघणारा काय...वाचणारा काय.... प्रत्येकजण स्वत:च स्वत:च्या जीवनाचा स्वामी असेल वा नसेल... पण मृत्युचा स्वामी मात्र असतोच ना... कोणत्याही क्षणी फेकून देता येईल असे ओझे हे मुळात ओझे राहतच नाही....म्हणूनच मृत्यू.... साक्षात मृत्यूचे ओझे उचलून माझा हृदयमित्र राम 'स्वामी'ची भूमिका जगला...छे छा भूमिका 'मेला'... भूमिका तर पुष्कळजण जगतात की. पण 'राम'च्या अभिनयाने साऱ्यांनाच स्वत:चा विसर पाडला... त्याने स्वामीजी' ची भूमिका केली ती एकदाच....एकदाच....पहिल्या प्रयोगाच्या वेळी तो तापाने फणफणत होता... प्रयोगानंतर त्याला काविळीने जीवघेण्या खिंडीत गाठले... अगदी मरणासन्न अवस्थेपर्यंत पोहोचून शेवटी मात्र मृत्युवर विजय मिळवून मृत्युचा स्वामी बनला तो...आणि मी...?

मी देखील मंथरमाया फणफणत्या तापातच लिहिले.... पहिलेवहिले नाट्यलेखन आयुष्यातले.. 'मंथरमाया' म्हटले की तत्क्षणी गूढचित्रांची एक गुंडाळी ताणलेली स्प्रिंग अचानक तुटल्याप्रमाणे

उन्हात वेड्या कुणी बांधिली
कायेहूनही सुडौल छाया
मृगसलीलाच्या गुंतवळीची
कुणा उमगली मंथरमाया
कुणी ओतला गगनडोह तो
क्षितिजापार जयाच्या लहरी
उन्हात लहरी भासती जळवा
कृष्णछाया जंशी तृष्णाप्रहरी
पेच टाकूनी गहन सावळे
अदमास कुणी कुणाचे घ्यावे
माथी घेउनी उनमसमली
अपुल्या छायेवरी राखावे.

हा भुलभुलैय्या कसला आहे? अस्तित्व वादाचा...मायावादाचा की शून्यवादाचा...? मला नेहमीच वाटते.... 'मंथरमाया' मध्ये जो Timelessness अर्थात जी 'कालातीतता आहे ती अलौकिक आहे... हे कोणाच्याही आयुष्यात...कधीही घडू शकणारे नाट्य आहे... काही समीक्षकांनी कळत-नकळत तिची तुलना 'बेटिंग फॉर गोदो'शी केली....पण व्यक्तिशः मला ती अस्थायी वाटते... 'थांबणे...वाट पहाणे' हे मंथरमायेच्या अनेक सुत्रांपैकी एक सूत्र आहे इतकेच... माणसाच्या एकूणच जीवनाविषयीचे मूलभूत समग्र भाष्य आहे मंथरमायेत, हा शून्यवादाचा प्रभाव की अर्थपूर्ण निरर्थकता याची उत्तरे देण्याचे उत्तरदायित्व माझे नाहीच, मंथरमाया म्हणजे 'ब्लॅक कॉमेडी' की 'हाईट ट्रॅजिडी' याचे रबंधचर्वण करणाऱ्यांना ते लखलाभ.

नागपूरच्या सायंटिफिक हॉलमधल्या प्रयोगाला द.भिं.नी दिलखुलास दाद देत म्हटले...

उष्ण वारे वाहती नासिकात

गुलाबाला सुकविती काश्मिरात....

आधुनिक विचारसरणी आणि पारंपारिक श्रध्दा यांच्यातील अद्वैतभाव त्यांनी चपखल हेरला. व्यक्तीकेंद्रित समाजरचनेतून समाजपुरुषाचा आत्मनाशच अपरिहार्य असतो असेच तर त्यांना सुचवायचे नव्हते?

समीक्षेला 'पोस्टमार्टम' समजणारे समीक्षक वारेमाप. पण दभिंची समीक्षा ही मनाच्या पेशी मोजणारी संवेदनशील नवसृजक, कलाकृतीचे शरीर ओरबाडण्यापेक्षा तिचे मन समजून घेणारी. जन्मांच्या काती टाकत बिनाशाकडून विनाशाकडे होणारी वाटचाल करताना अस्तित्वाचा खराखुरा रंग शोधणाऱ्या प्रवाश्याची बेदना मांडण्याचा प्रयत्न मी अंशत: जी.एं.चे तालेवार शब्दधन वापरुन केला इतकेच. भ्रम आणि तदानुषंगिक भ्रमनिरास यांच्या तळाशी पहुडलेले जडमूळ वासनेचे शाश्वत मूल्य मला दिसले अन् मी ते इतरांना दाखवण्याचा कलात्मक प्रयत्न केला. काहीच काही घडत नसताना सारेच सारे घडत असते याचा प्रत्यय देताना एकांताची लोकांतसीमा अलवार पुसली गेली माझ्याकडून... तेही शोकारंभिकेला शोकांतिका समजण्याची सार्वत्रिक गल्लत होत असताना.

आणि खरे सांगू? कोणतीही कथा ही कधीच संपत नसते ही घट्ट मनोधारणा असल्यानेच की काय मला जी.एं.च्या बहुतांशी कथांकडे बघताना त्या त्या महावृक्षाच्या मुळांचा खोल विस्तार आणि लगडलेल्या फळांतील संभाव्य विजे आपसूक दृगोचर होत जातात हा माझ्या भाग्याचा आत्मसन्मानच...मंथरमायेने मलाच मोहिनीरुपात भुलविले अन् जी.एं.शी पुन:श्च नव्याने जे आत्मिक अंत:स्थ अनुबंध जुळले त्याचे मोल अन्य कशालाही नाही...

समोरचा अंधार आता विरळ होत चाललाय..दिवे पुनःश्च लखलखू लागले आहेत. प्रयोगाचा पडदा पडला आहे...मी मागच्या रांगेतील खुर्चीत तस्साच सुन बसून आहे... सारे नाट्यगृह रिते भकास झाले आहे... एकांताचा आकांत संपलाय. 'कोऽहम' चा आक्रोश जोजवणारा 'सोऽहम'चा दिलासाही आता मनावर केवळ तवंगाप्रमाणे पसरलाय...नेमके काय होतेय तेच कळत नाही अशी बेचैनीची

अवस्था...नाट्यगृहातील दिवे आता एकेक करुन पुनःश्च विझू लागलेत...आणि मी देखील सारे विसरुन गेलेलो...सारेसारे विसरुन गेलेलो., , अंधारात सुन्न बसून एकटाच. रिकामे थिएटर अवाक होऊन माझ्याकडे पहात आहे हे जाणवतानाच मला दिसतेय....

..मला उठवण्यासाठी आता उजव्या विंगेकडून अक्कडतिक्कड पावले टाकणारा सांगाडा येतोय, आपल्या रुंद मळकट दातांनी या कानापासून त्या कानापर्यंत भीषण हास्य करणारा... हाडदेव भावाकडून खराखुरा मानवी सांगाडा आणला होता प्रयोगासाठी...

नाटकात जिवंत माणसे मेल्याप्रमाणे काम करताना बघतो आपण. पण मृत सांगाडा इतका जिवंत अभिनय करु शकतो? कोणाचा बरे सांगाडा असेल तो? काय बरे नाते असेल त्याचे माझ्याशी? की.की तो देखील अशाच एखाद्या खऱ्याखुऱ्या स्वामीचा सांगाडा असेल...?

सांगाडा हसत म्हणतो...मी...मी 'नंतरचा स्वामी'...

मी बनवैराण होत अंधारात गटांगळ्या खात असतानाच इवलासा हिरवा वेल त्याच्या पर्णजिव्हांनी सांगाड्याच्या कानात कुजबुजतो...

.मी असाच वर निघालोय...

...मी असाच वर निघालोय. आता मी म्हणजेच तू आहेस......

- महेश आफळे

अनामिक म्हणजे आपण सर्वच. आपली ओळख आहे, आपल्याला सोशल रेफ़रंस आहे तोवर आपण आहोत. आपल्याला ओळखणारे किंवा आपली ओळख पटवणं शक्य असेल असे काही नाहीसे झाले की आपणही संपलो. आपली स्मरणशक्ती संपली की आपण अर्धे संपलो.

ही कथा वाचताना मला गदिमांच्या

कुणा न माहित सजा किती ते

कोठून आलो हे नच स्मरते

या ओळी आठवल्या. विशेषतः बस स्टॅंडवरच्या म्हाताऱ्याच्या बाबतीत.

बहिणीचा आग्रह, मित्राचे प्रेम, भाचीचे फुरंगतणे या साऱ्यातून ऐहिकतेचे भावुक बंधन दिसते.

- सुनीळ सामंत

'अनामिक ' कथा - दुःखद जाणिवेचा (नेहेमी प्रमाणे) करूण अंत

१ या कथेत 'अनामिक' नायक नामरूपातीत कर्माकडून -अव्यक्ताकडून जन्म घेतो (गावच्या पाळण्याचे घंटांचे आवाज नंतर नामरूप कर्मात जगतो. (मी अबक(नाम), सुंदर/असुंदर, (रूप), वागणे सफल/असफल (कर्म)). नायक प्रवासी म्हातारा नं १ शेवटी 'अनामिक' - नामरूपकर्मातीत होतो.आठवण नाहीशी झाल्याने -१५ माणसांच्या आठवणींचा धागा तुटल्याने (वयोमानानुसार, निसर्ग-नियमानुसार).त्याचा मानसिक अंत होतो व म्हातारा नं २ चा शारीरिक अंत होतो (मालक येणार नाही ' हा एकच शेवटचा आशेचा धागा तुटल्याने)

३ या कथेत चक्राकार गतीचे प्रतीक प्रभावीरीत्या वापरले आहे.जसे रात्रीनंतर दिवस, सजीवतेकडून निर्जीवतेकडे -गाड्यांच्या चाकांच्या (चक्राकार) आवाजाकडे. भूतकाळाकडून (मालकाची आठवण) भविष्यकाळाकडे (' मी येतो') दोन्ही हरवल्यावर म्हातारा नं १ व न २ यांचा वर्तमानकाळ संपतो.अंत होतो.(शेवटचे वाक्य कथा ' अनंत')

४ आशयपूर्ण शब्दकळा -गाठोडे /बोचके - जगताना बोचणारे, आठवणींची गाठ मारलेले

माळासारख्या मातीसारखे राहणे- निर्जीव अंत

अदृश्य भिंतीवर आदळणे -निर्जीवतेकडे जाणे

५ आठवण, संस्कारांचे संदर्भ कमी झाल्यावर म्हातारा नं १ चे मन विघातक शक्तींकडे झुकते जसे -विषारी आनंद, क्रूर आनंद, अघोरी समाधान .हे सर्व मृत्यूच्या जाणिवेतच नाहीसे.होते.

६ मनाचा सनातन चकवा. इच्छा(मालकाची अदृश्य सत्ता सुरक्षित करते) + आशा (प्रयत्नांना गोठविते) = अपेक्षा (भविष्यकाळ).आशा तुटते.अपेक्षा संपते.जगण्याची इच्छा संपल्याने अंत होतो.

७ नादचित्रे - ही घटना व व्यक्तीरेखांना नादमय करतात - घोगरा आवाज, अडखळणारे शब्द, मंद किणकिण, शांत डोहाप्रमाणे अंधार, नीरव अंधार, निर्जन रस्ता, विरणारा आवाज, वाजंत्री, पाखरांची फडफड, रातकिड्यांचा आवाज, वाऱ्याची वाजणारी पाऊले

८ समारोप - जी एं नी या कथेत आठवणी(स्मृती) असणाऱ्या,

बारीक सारीक तपशीलवार घटना व व्यक्ती आठविणाऱ्या मानवी. जीवाचे स्मृती नसणाऱ्या, शरीराचे नैसर्गिक धर्म जाणणाऱ्या (अर्थहीन बोलणे, वागणे, झोपणे, पाहणे, राहणे) निर्जीव, निराश अचेतन लाकडात होणारे रूपांतर अत्यंत कलात्मक रीतीने दाखविले आहे.

माधव पुराणिक, ९६२३४४२२२१

अनामिक कथा..सांजशकुन

1)मी, आस्वादक वाचकाच्या भूमिकेतून हे विवेचन करत आहे..

2)जीएंनी अनेकदा वास्तवाचे चित्रण केले आहे.तसेच जाग्रुत अवस्थेत येणाऱ्या कल्पनांवर आधारित चित्रणही केले आहे.

3)मात्र माणूस कधी कधी, अर्धजाग्रुत असतो, त

याला झोपल्यावर स्वप्ने पडतात. (किंवा माणसाच्या आठवणी अर्धवट जावूनही तो जगत असतो.)त्यावेळी त्याला चित्रे जाणवतात.माणसाला तेव्हा लगेच

जागे केले, तर तो काही सांगू शकतो. तज्ञ त्यावरुन, सुप्त मनातील विचार अंदाजाने सांगू शकतात.मला ही कथा, त्या स्वरूपातील वाटते.

4)या कथेत, बस, स्टाप, बहीण, तिचे घर;शेजारील म्हातारा, त्याचे गाठोडे, माळा, अंगारा इत्यादी वास्तविक वर्णन आहे. ते शब्दप्रभू जीएंनी केल्यामुळे खिळवून ठेवते.

5)मी कोठून आलो, गमत नसे।
जाणार कोठे, मज ठाऊक नसे।
कोण मी, हे मज कळत नसे।।

पण हे प्रश्न बहुतेक प्रत्येकाला कधी ना कधी पडतात. त्यांची उत्तरे मिळत नाहीत. पण जीए प्रश्न जास्त प्रखर करतात. आईवडिलांनी जन्म दिला. पण विश्वाच्या पोकळीत, सजीव-मानव, कसा जन्माला आला, हे कोणी सांगू शकत नाही.नंतरही माझ्या भोवतालची माणसे राहणार असतील, तर माझ्या जाण्याचे स्वरूप कळाले, असे वाटत नाही.माझी सावली राहणार काय, उद्या सूर्य उगवून उजाडणार काय, हे प्रश्न कथेत आहेत. जीए कथेत म्हणतात, "तुम्ही काय, मी काय, किती तात्पुरते आहोत."

6)या प्रश्नाला पर्यायी उत्तर म्हाताऱ्याने दिले आहे..."मालकाने(अनिर्वचनीय निर्मात्याने)मला येथे सोडले आहे. त्याचे कारण मालकाने सांगितले नाही. व जाताना मालकाने, ' मी येतो ' असे सांगितले होते.".... म्हाताऱ्याने कपाळाला अंगारा लावला. ही ईश्वरवादी उत्तराची शक्यता दिली आहे. पण नायक, "येतो "चा अर्थ, "जातो, " आहे, असे सांगून म्हाताऱ्याची श्रध्दा डळमळीत करतो, व म्हाताऱ्याचा श्वास संपतो.

7)अनामिक, मध्ये नाव असलेल्या प्रत्येकजण अंतर्भूत होतो. कथेत ' स्व'भावाचे--इगोचे प्रश्न उपस्थित केले आहेत. व कथा वाचनीय झाली आहे.

चू.भू.द्या.घ्या.धन्यवाद.
विलास वाघोलीकर

# अवशेष जी ए कुलकर्णी संग्रह- निळासावळा

अवशेष - जी ए कुलकर्णी -संग्रह- निळासावळा

अवशेष ही एक छोटी, साधी कथा आहे. त्याला व्यक्ती चित्रण म्हणता येईल. गोविंदाचार्य एक काळा, हाडकुळा लंगडा गरीब ब्राह्मण. श्राद्धाचे वगैरे बाहेर जेऊन गुजराण करणारा. दर मंगळवारी व शुक्रवारी तो रात्री कोणत्यातरी देवाचे भसाड्या आवाजात भजन गात असतो व त्या बद्दल शेजारच्या स्त्रीया त्याला शीव्या घालत असतात. कोणालाच, शाळकरी मुलानासुध्दा आवडत नसतो.

गोविंदाचार्याने लग्न करून एक साधी, काळी, ठेंगणी खेडवळ बाई घरी आणली. सुरवातीला कोरडे कुंकू लावणारी ती बाई मग केसांवर फुगे काढू लागली. बाहेर जेऊन येताना गोविंदाचार्याने तिच्यासाठी मागून आणलेल्या (वेगवेगळया दिवशी वेगवेगळया घरच्या) अन्नाचा तीला कंटाळा येऊ लागला. म्हणून मग त्याच्या दक्षिणेच्या पैशातून ती हॉटेलातून चिवडा आणून खाऊ लागली. आपल्या भजनाने बायकोचे डोके उठते म्हणून गोविंदाचार्य तीला सिनेमाला पाठवतो. त्यामुळे ती बिघडते. 'मैत्रिणे दिल्या' म्हणून तीच्याकडे नवी साडी, नव्या चपला येतात.

दरम्यान त्याना मुलगा होतो. ते मूल काळे व अशक्त असते. गोविंदाचार्याला खुप आनंद होतो. हौसेने तो मुलाला मिरवतो. एके दिवशी बाहेर जेऊन घरी आल्यावर त्याला मूल एकटेच दिसते. मग कळते की बायको कपडे घेऊन घर सोडून गेली आहे. तीला दादू गवळयाबरोबर हिंडताना पाहिल्याची माहिती कोणीतरी त्याला देते. पण गोविंदाचार्य मूलाला प्रेमाने सांभाळतो. पण मग आजारी पडून ते मरते. गोविंदाचार्य हमसून हमसून रडतो.

पुढे घरभाडे तुंबल्याने घरमालक त्याचे सामान बाहेर काढून, त्या जागी दुकान करतो. गोविंदाचार्य आता लाकडाच्या अड्ड्यात एका कोपऱ्यात रहातो. दोन तीन

दिवस जेवणाशिवाय रहातो.त्याच्या आयुष्यात आता जीव नाही व ते कसरीने खाल्ल्याप्रमाणे वाटते.पुष्कळदा तो कोणाशीच बोलत नाही. भजन गुणगुणतो पण त्यात पूर्वीचा दम नाही. कुणी बायकोची फाजील चौकशी केल्यास न चिडता, न रडता तो सांगतो. "ती पळून गेली. बाकीची माणसं घर करतात, लग्न करतात, त्याना मुलंबाळं होऊन सुख मिळतं. म्हणून मीही लग्न केलं. पण आमचं साधलं नाही! मी देवापुढे नारळ फोडला, पण तो निघाला कुजका!'

त्याच्या बोलण्यात दंश नाही. मनात विष नाही. पण तो अनेकदा गोणपाटाच्या तुकड्यावर अंग मोडून पडलेला असतो आणि त्याचे म्हातारे लूत भरलेले मन निपचित पडून त्याच्या डोळयातून बाहेर विषण्णतेने पाहते.

ही जिएंची छोटी साधी सरळ कथा. पण भाषा ओघवती आहे. शक्य तिथे अलंकारिक आहे.

उदाहरणार्थ - ऊजव्या पायावर माश्या बसू लागल्या की 'म्हशीने कातडे हलवावे' त्याप्रमाणे पाय हलवतो.

एकतारीच्या सुरात एकदा तंद्री लागली त्याच्या 'वाळलेल्या कोहळयाप्रमाणे' दिसणाऱ्या चेहऱ्यावर 'चिकट समाधान' ओसंडते. त्यावर रागाचा, 'अतृप्तेचा, जीव कुरतडणाऱ्या वासनेचा एकही ओरखडा' दिसत नाही.

एखादी 'म्हैस सावलीला पडावी त्याप्रमाणे रखरखीत भुरकी दुपार' साऱ्या गल्लीभर पसरते.

सोनाराच्या हातोड्याने 'ऊन्हाला तडे गेल्यासारखे' वाटतात.

जानव्वा शेळीला उद्देशून एक 'भरदार टोपपदराची शिवी' हासडते.

त्याच्या 'मळकट चेहऱ्यावरील कातड्याला ठिगळ लावल्याप्रमाणे दिसणारे' त्याचे हसणे पाहून प्रत्येकाला शिसारी येते.

दुपार 'पिकून पिवळी पडली' की तिथून 'मलीन कुस्करलेल्या चेहऱ्यांची' मुले शाळेतून बाहेर पडत.

गोविंदाचार्य मुलाला आवडीने लोकरीचे टोपडे घेतो. पायात 'केसुरकिड्याच्या अंगाप्रमाणे खरखरीत जांभळे' पायमोजे त्यावर घरातील एकुलता दागिना चांदीचे वाळे अडकवतो.

'बोटाने रांगोळीचे ठिपके पुसावेत' त्याप्रमाणे लंगड्या पायाने तो रस्ता पुसत पुढे होतो.

त्याच्या आयुष्यातच आता जीव नाही. ते 'कसरीने खाल्ल्याप्रमाणे' वाटते.

साध्या सरळ, गरीब, अगतीक, हतबल व अपंग माणसाची कहाणी. बायकोचे लाड परवणारा तरी तीने त्याला सोडून पळ काढल्यावर मुलाला प्रेमाने सांभाळणारा, मूलाला आणू नये असे सांगणाऱ्या घरी न जाणारा, मूल मेल्यावर हमसून रडणारा, फाजीलखोराना न चिडता, न रडता "बायको पळून गेली" असे सांगणारा गोविंदाचार्य जीएंनी सफाईदारपणे रंगवला आहे.

गोविंदाचार्याचे मन जीवंत आहे. त्याला सर्व जाणिवा होतात. तो भोळा वा वेडा नाही. पण हतबल आहे. वाट्यास आलेले आयुष्य त्याने विनातक्रार स्वीकारले आहे. त्याच्या बोलण्यात दंश नाही. मनात विष नाही.

पण त्याचे म्हातारे (भोग भोगलेले), लूत भरलेले (सजग) मन त्याच्या डोळ्यातून बाहेर विषण्णतेने पाहते. या वाक्यात गोम दिसते. सर्व सामान्य माणूसाच्या यातनांचे चित्रण जीएंच करू जाणोत.

- यतीन गुळवणी

अगदी सर्वसामान्य आयुष्य जगलेल्या गोविंदाचार्य नावाच्या माणसाच्या आयुष्याची गोष्ट घटनांमधल्या बारीक सारीक तपशीलांमुळे निराळी वाटते. अवशेष हे नाव का दिले असावे? गोविंदाचार्य च्या जीवनातून एक एक व्यक्ती आणि गोष्टी हळूहळू वजा होतं जातात. रखरखीत भुरकी(पिवळी)दुपार पसरलेल्या म्हशीसारखी आहे... म्हशीचा रंग काळा असला तरी लेखकाला जे सांगायचे आहे त्याचे नेमके

चित्र डोळ्यासमोर उभे राहते. ह्या कथेतही आचार्य नाव असलेला व्यक्ती अशा प्रकारे दिसेल, जगेल अशी कल्पना सहसा आपण करू शकणार नाही. त्यामुळे stereotypes ला तडा देणारे हे व्यक्तीचित्र आहे.

-विशाखा आपटे

कथाशिर्षकाच्या समर्पकतेबद्दल विचारचक्र डोक्यात चालू आहे. कदाचित आयुष्यात सर्व संपून गेल्यामुळे गोविंदाचार्याचे फक्त मनच "अवशेष" रूपात शिल्लक आहे असेच तर जीएंना सुचवायचे असेल? कारण ते "मन त्याच्या डोळ्यातून बाहेर विषण्णतेने पाहते".

यतीन गुळवणी

यतीनजी, आपण अतिशय योग्य शब्दांत (ना कमी ना जास्त) कथेची ओळख करून दिली. म्हटले तर यात काही घडत नाही आणि तसे म्हटले तर खुप काही घडते अशी ही कथा आहे. सिनेमात flashback असतो तसे. जीएंची पुन्हा एक कथा ज्यात स्त्री ठळक काळ्या रंगात रंगवली आहे. तुम्ही जीएंच्या भाषेचे सुंदर नमूने नमूद केले आहेत. 'म्हशीने कातडे हलवावे' त्याप्रमाणे पाय हलवतो.’ हे खासच.

भाडे थकल्यामुळे ज्या घरातून गोविंदाचार्याला बाहेर पडावे लागते त्या घरात ’तोच’ दादू गवळी यावा यातून जी एंना काय सुचवायचे असावे? आणि या कथेचे शिर्षक ’अवशेष" का असावे?

सुनीळ सामंत

खरचं दादू गवळी गोविंदाचार्याची बायकोला नादी लावून तीला पळवतो. मग गोविंदाचार्याच्या घरी विडीकाडीचे दुकान थाटून "पोरीबाळीकडे पहात अक्कडबाज मिश्यांवर हात फिरवतो". दादूच्या रूपाने एक दुष्टग्रहच गोविंदाचार्याच्या मागे लावून जीएंनी "योगायोगाची" छान सांगड घातली आहे. - यतीन गुळवणी

'अवशेष' दुबळया नायकाची नियती-

दुःखाकडून आत्मनाशाकडे

१ आधीच्या सर्व कथांप्रमाणे ('अंधाराची पाऊले' सोडून, ती पहिली बीजकथा) 'अवशेष ' या ही कथेचा नायक' देऊळ ' (धर्माचे व्यावहारिक रूप) या सनातन संकल्पनेशी जोडला गेला आहे.(१ नाव गोविंद+आचार्य, व्यवसाय - पूजा पाठ, छंद- भजन २ कथा 'अंजन' मारूतीचे देउळ इ. ३ कथा 'अनंत' सुरवात व शेवट 'अनंताचे मंदिर ' ४ कथा 'अखेरचा दिवस ' नानांचे घर -देवाचा रथ ठेवायची जागा- ५ कथा'अनामिक:स्थळ- म्हातारा नं१व२ मालकाची (अव्यक्त शक्तीची वाट पाहत आपल्या देहमंदिरात) सगळया नायकांच्या शेवट १ 'अवशेष ' नायकाच्या मनाचा अमानवी चेतन अंत २ 'अंजन' नायकाची स्मशानात राख ३ 'अनंत' नायकाला वर्तमानकाळातच जगण्याची जीवघेणी शिक्षा ४'अखेरचा दिवस ' नायकाचा दोनदा विष प्राशन करून मृत्यू. ५

कथा 'अनामिक ' म्हातारा नं१ व २ स्मृतीनाश व निराशेने अंत. जी एं नी यात उपरोधाची कमाल केली आहे. जन्मलेल्या प्रत्येकाला नियती नाचवते. मग तुम्ही बाह्य कर्मांनी कितीही प्रयत्न केला तरी.

२ 'यश अपयशावर नियतीचे संपूर्ण नियंत्रण आहे . नियतीचे आकलन बुध्दीच्या पलिकडचे आहे ' असे म्हटल्यावर जी एं चे नायक - 'अवशेष'रूपी गोविंदाचार्य आपल्या जबाबदारीतून मुक्त होतो. 'खिन्न विषण, निपचित, नासलेल्या' मनाने या दारूण अपयशाचा स्वीकार करतो.

३ (गोविंद+आचार्य) संसारसुखाची होळी, समाजाकडून हेटाळणी इ.चा धैर्याने स्वीकार करतो पण ते धैर्य हतबलतेतून, असहायतेतून येते व आत्मानाशातच संपते.

४ आधीच्या कथांतही अतिगरीब नायकांना त्यांच्या बायका सोडून जातात, अपत्ये जगत नाहीत, नायक(गोविंदाचार्य) कारण शोधायचा दुबळा अयशस्वी प्रयत्न करतात कारण नियतीला कोणतेच नियम नाहीत.

५ व्यवहारात यश समर्थाला मिळते (दादू गवळी, विडीचे चालणारे दुकान, त्यांचे पूर्ण शारीरिक बळ, कुटिलता, संसाराकरता लागणारा पैसा इ) .अधू, बेसूर, , बुध्दीहीन गोविंदाचार्याला नाही म्हणून तो खचतो हे जी एं नी कलात्मक रीतीने दाखविले आहे. दादू गवळी इ समर्थांचे वागणे हीच नीती समाज मानतो असेही सूचित केले आहे

माधव पुराणिक, ९६२३४४२२२१

पुराणिक सर, आपण अत्यंत गाळीव पद्धतीने पाचही कथांतील साम्यस्थळे दाखवून दिलित. मला वाटते या प्रकारे जीएंच्या साहित्याचा अर्क हळू हळू जाणवू लागेल. अनेकांना जी एं च्या कथांतून तोच तो पणा जाणवतो याचेही बहुधा तेच कारण असेल आणि जीए पुन्हा पुन्हा त्याच त्या थीमकडे येतात याचे कारण त्यांनी सांगूनच ठेवले आहे...

Shallow people demand variety. But I have been writing the same story throughout my life, everytime trying to cut nearer to the aching nerve- Strindberg

जीएं चा प्रेमी हा Shallow असू शकत नाही. आणि उथळ विचारांची माणसे जीएंची प्रेमी होऊ शकत नाहीत.

सुनीळ सामंत

जी एं च्या कथांची शीर्षके -

१ अंजन, अंधाराची पाऊले, अखेरचा दिवस, अनामिक, अवशेष, अनंताचे मंदिर

२ 'अ' ने सुरु होणारी.'अ' हा नकारात्मक उपसर्ग आहे

३ अंधार - प्रकाशाच्या विरूद्ध. अखेरचा दिवस- जगण्याचा शेवट. अनामिक- नाव (व्यावहारिक जाणीव) नसलेला

अंजन - मलिन, अशुद्ध, (निरंजन= शुध्द)अनंत -अंत नसलेला- माणसाला सीमित गोष्टी लक्षात राहतात.अनंताची भीती वाटते. अवशेष - पूर्ण जळून भग्न भाग राहिलेला. वेदना देणारा.

४ शीर्षके जीवनाचा ऱ्हास, नाश, विलय, याकडे जाणाऱ्या घटना, व्यक्ती, परिस्थिती इ सूचित करतात. नियतीचा अंतिम अपरिहार्य परिणाम दाखवितात जो प्रत्येकाला स्वीकारावा लागतो.

माधव पुराणिक, ९६२३४४२२२१

अवशेष.. निळासावळा----

यतिनजींनी कथानक स्वच्छ पणे सांगितले आहे.त्यांचा आभारी आहे. आता त्या कथेची लक्षात आलेली वैशिष्ट्ये मांडतो.

जीएंना वास्तव झगझगीतपणे जाणवले. त्यामुळे अशी 'फेकून दिलेली ' माणसे त्यांनी का घेतली, या तक्रारीला अर्थ नाही.

राधी, तुती, काकणे, चंद्रावळ.. अनेक कथांतून 'मांजराने बशीभर दूध चाटून स्वच्छ करावे ' त्याप्रमाणे जीएंनी दु:ख स्वच्छ केले आहे. दमछाक झाली तरी ते वाचले जाते. या कथेतला गोविंदाचार्य लंगडा आहे, भिक्षुक आहे, एकटा आहे, बायको, पोर, आयुष्यात नाहीत, भजनात मन गुंतवतो, व इतरांची झोपमोड करतो, पोरांशी बोलतो, पण त्याचे दुर्दैव समजून घ्यायला कोणाकडे वेळ आहे.म्हणून एकीकडे, अस्तित्ववादाने अटळ, एकाकी निर्णय घेवून तो (इतरांना भसाडी वाटणारी)भजने रात्री गातो.दुसरीकडे 'बायको निघून गेली'हे स्वच्छपणे सांगून नियतीची, अनिर्वचनीय लीला मान्य करतो.शरीर, मन, कुटुंब, समाज, पैसा या सर्वांमधील नियतीची लीला येथे दाखवली आहे.धन्यवाद.

- विलास वाघोलीकर

उत्तम विवेचन सर. 'मांजराने बशीभर दूध चाटून स्वच्छ करावे ' हे जीएंनी रात्रीबद्दल लिहिलेले वाक्य तुम्ही अतिसय चपखलपणे त्यांच्या साहित्याला जोडले. छान वाटले.

सुनीळ सामंत

जी एं घ्या कथांचा आस्वाद घ्यायचे स्तर

अ)१ मनोरंजन, करमणूक

२ भाषा, प्रतिमा, शैली, शब्दकळा *

३ सांसारिक/ मानसशास्त्रीय/ राजकारण इ ची पार्श्वभूमी

४ भावनिक -बौध्दिक(emotional intelligence)*

५ सत्य-असत्य विवेक

६ जीवनाचे तत्त्वज्ञान

(संदर्भ धों वि देशपांडे १, ३, ५, , ६, २, ४ माझी भर)

ब) प्रत्येक वाचक वेगवेगळया स्तरांवर आस्वाद घेतो. त्यामुळे सर्वच प्रतिसादांचे स्वागत आहे. ते सर्व काहीतरी सुचवितात, सांगतात. प्रत्येकाला जी एं ची वेगळी लय ऐकू येते(संदर्भ धों वि देशपांडे: जी एं घ्या कथा एक अन्वयार्थ)

क) मी मुख्यतः ६ जीवनाचे तत्त्वज्ञान या स्तरावरून प्रतिसाद देतो.म्हणून मला मी जो शब्द वापरतो त्याची शास्त्रीय व्याख्या करावी लागते(जसे शब्द- नियती, सत्य, अनंत, आनंद, सुख, दुःख, मन, मरण, इ)

ड) वाचकाला जी एं च्या कथांमध्ये 'दिसणे'(दृश्य) यात वाचकांचा 'स्व' येत नाही. सर्व वाचकांना हे सारखे दिसते(वस्तुस्थिती)

वाचकांचे 'जी एं च्या कथांमध्ये 'पाहणे'(द्रष्टा+दृश्य). यात वाचकांचा 'स्व'(म्हणजे विकार येतात.(परिस्थिती+ सहा विकार+ 'मी('अहंकार)- माझे मत, आकलन, कल इ. त्यामुळे विविध प्रतिसाद येतात. प्रत्येक वाचकाचा प्रयत्न

'स्वतातीत'(स्व+अतीत) होण्याचा हवा.(धों वि देशपांडे:जी ए कुलकर्णी यांच्या कथा एक अन्वयार्थ)

डॉ माधव पुराणिक, ९६२३४४२२२१

अवशेष- जी ए. कुलकर्णी- निळासावळा

सहसा लहान बाळाचे दर्शन आणि त्यामुळेच वर्णनही सुखावह असते. छान शब्दांत असते. बापाचे मुलावर पुत्रप्रेम हीसुद्धा एक सुंदर भावना. पण जी एंच्या शब्दांत कथेला अनुरूप अशी जी शब्दकळा अवतरते ती पहा.

त्या पोराला घेऊन तो (गोविंदाचार्य) सारखा पायरीवर उभा राहतो. कोणी तरी येत असलेले पाहताच, बोटाने रांगोळीचे ठिपके पुसावेत त्याप्रमाणे **लंगड्या पायाने** रस्ता पुसत तो पुढे होतो. त्या माणसाला ते पोर कौतुकाने दाखवून लाडिकपणाने विचारतो, " काकाकडे जातोस ? काका पेपरमीट देतात..."

त्या माणसाच्या चेहऱ्यावर स्पष्ट **शिसारी** दिसते. पोरही **गोठल्याप्रमाणे कवड्यासारख्या डोळ्यांनी घुम्म** पाहते. **शेणाचे पांडव** करून त्यावर दोन **बिया टचटचीत टोचतात** तसे. कोणी त्याला कधी हात लावला नाही, की त्याचे नाव विचारले नाही. दोन ठिकाणाहून तर पूजेला येताना पोराला घेऊन येऊ नका अशी सूचना आली. पुष्कळदा तो अगदी **खिन्न** होतो. त्या पोराच्या गालाला गाल लावून* **कुस्करल्या***  मनाने, समोरील लांबलचक वाळत घातलेल्या **मळक्या कापडाप्रमाणे** दिसणाऱ्या रस्त्याकडे तो पाहात बसतो. त्याचा **खरबरीत गाल** लागून काही वेळ पोर मध्येच **किंचाळते**, व पुन्हा **गोठून बसते**. “ नाही हं! नाही हं!!” म्हणत गोविंदाचार्य हसतो. आणि कुणी ओळखीचे भेटते का हे पुन्हा पाहू लागतो.

- सुनीळ सामंत

सुनीळ जी, नमस्कार.आपण जीए कथेच्या विवेचनाबरोबर, त्यांतील शब्दकळा सुंदरपणे उलगडून दाखवता, त्यामुळे कथेचे थोरपण जास्त स्पष्ट होते.आपल्या दैनंदिन वापराने शब्दाचे महत्व विरळ होते. पण जीएंसारखा शब्दकलावंत, शब्द, वाक्य, परिच्छेद व सर्व कथा अशी ठेवतो, की हिऱ्यांची रास.दगड माध्यम तेच, पण चांगला उंबरा, किंवा शिल्प, एखादा मायकेल अँजेलो करतो, त्याप्रमाणे. शब्दकला म्हणायला सोपी, पण त्यामधून रंग, आकार नाद, विचार व गती दाखवता येतात. म्हणून असा शब्दकलावंत दुर्मिळ असतो..आपण जीएंच्या शब्दांवर असेच लिहित रहावे ही विनंती.

- विलास वाघोलीकर

अवशेष या कथेबद्दल सर्वांनी सुंदर मतं मांडली, ती पटण्यासारखी आहेतच, आणखी चिंतन करायला लावणारी आहेत, ही कथा वाचताना आत्ता मला आणखी एक गोष्ट लक्षात आली ती म्हणजे या कथा संग्रहातील सगळया कथा चालू किंवा पूर्ण भूतकाळात सांगितल्या आहेत, एकमेव हीच एक कथा आहे जी साध्या वर्तमानकाळात लिहिली आहे, त्यातही गोविंदाचार्याचे लग्न होण्यापासून त्याचे मूल दगावण्यापर्यंत पूर्ण भूतकाळ वापरला आहे त्यातही गोविंदाचार्याच्या लकबी सवयी स्वभाव सगळं साध्या वर्तमानकाळात मांडलंय, पण आयुष्यातील घटना मात्र पूर्ण भूतकाळात मांडून शेवटी जी ए आपल्याला पुन्हा गोविंदाचार्या सोबत साध्या वर्तमानकाळात आणून बसवतात,

अवशेष आपण वर्तमानात जपत असतो, म्हणून तर शीर्षक आणि वापरलेली भाषा यांचं असं काही नातं असेल का?

- अभय कुलकर्णी

# अस्तिस्तोत्र जी ए कुलकर्णी संग्रह- सांजशकुन

अस्तिस्तोत्र- जी ए. कुलकर्णी- सांजशकून

आज आपण अस्तिस्तोत्र ही जीएंची कथा समजून घेण्याचा प्रयत्न करुया.

अस्तिस्तोत्र ही रूढ अर्थाने कथा नाही. समुद्रकाठावर वाळवंटातील उन्हाने एक टेकाडाएवढी मोठी कवटी उन्हाने फुटली, त्यात एक माणूस चिंतन करत बसलेला होता. उन्हामुळे त्याचीही कवटी तडकली. त्याखाली आसरा घ्यायला एक कीटक बाहेर आला. उन्हामुळे झालेल्या त्या कीटकाच्या मरणानंतर त्याच्या कवचाखाली एक मुंगी आली. मुंगीच्या मरण्याची वाट पहात एक सूक्ष्मजीव असतो. याचे वर्णन कथेत केले आहे.

[6:28 am, 24/03/2022] सुनीळ सामंत: सांजशकुन या कथा संग्रहातील ही पहिली कथा. हीच कथा पहिली का असावी? कथांचा क्रम काळानुरूप नाही. इतरही (सहसा वापरले जातात तसे) निकष या क्रमाला नाहीत. मग?

एकाद्या शास्त्रीय संगीताच्या बैठकीत जसे सुरुवातीला संथ, आलापी, नोमतोम व नंतर विलंबित ख्याल, आणि नंतर मध्यम आणि शेवटी द्रुत, ताना, तराणे, ठुमरी, भैरवी असे क्रमवार असावेत तशी या पुस्तकाची रचना आहे. हे संपूर्ण पुस्तक एक कलाकृती आहे.

[6:28 am, 24/03/2022] सुनीळ सामंत: अस्तिस्तोत्र म्हणजे अस्तित्त्वाचा महिमा (किंवा फ़ोलपणा आणि असीमितपणा यांचा संयोग) सांगणारे स्तोत्र. फ़ोल कारण ते कधी ना कधी विलयाला जाणारे असते. आणि असीमित कारण अस्तित्व कधीच संपत नाही. ते वेगवेगळ्या आकारात, स्वरुपात बदलत रहाते. समुद्रासारखे. तो ओहोटीला जातो आणि भरतीला येतो. पण संपत मात्र नाही. म्हणून

अस्तिस्तोत्रात समुद्राचे आवर्तन सतत आलेलेल असावे. स्तोत्रात जसे एक ओळ वारंवार येत रहाते पण तिचा अर्थ आणि उंची जागेनुसार बदलत रहाते तसेच या कथेते एक सूत्र आहे.

ते आहे-

समुद्र केवळ- आहे.

आवर्तनानुसार या सूत्रातील एक एक शब्द बदलत जातो.

समुद्र स्थिर आहे

समुद्र केवळ शांत आहे.

समुद्र केवळ स्तब्ध आहे.

समुद्र केवळ निर्मम आहे.

समुद्र केवळ निरीक्षक आहे.

समुद्र केवळ आहे.

या मधल्या काळात घटना घडतात. काही निर्माण होते काही लयाला जाते.

- सुनीळ सामंत

मी कोकणी. आयुष्याचा बराच काळ, आयुष्यातले सुखाचे दिवस आणि आनंदाचे अनेक क्षण समुद्रावरच घालवले. समुद्र हा माझा सर्वाधिक आनंदाचा साथीदार आणि प्रतिक. पण जीएंनी मात्र समुद्राचे आणि काठाचे जे वर्णन केले आहे तो एक वेगळाच अनुभव. कधीही न जाणवलेला.

त्या **झळझळीत** उन्हाच्या **वणव्यात** सारे काही एकदा संपूर्णपणे **जळून निर्जीव** होऊन पडल्यासारखे वाटते. एका बाजूला समुद्राचा एक **वेडावाकडा**

तुकडा क्षितिजापर्यंत पसरला आहे खरा, पण त्या अनासक्त पाण्यावर हालचालीची सुरकुती नाही. पाणी मृत होऊन त्याचा सांगाडा थंडीवाऱ्यात बेवारशी पडावा, त्याप्रमाणे तो मळकट विस्तार दिसतो. त्याच्या किनाऱ्यावर काही ठिकाणी कोरड्या क्षारांचे खडक दिसतात, पण त्यांच्या भयाण उभारावर सावलीचा थेंब क्षणभरदेखील जगू शकत नाही. वाऱ्याच्या कसरीमुळे त्यांच्यात अनेक ठिकाणी विक्षिप्त, कुरूप आकृती निर्माण झाल्या आहेत. त्यांतील काही रूपे मानवांच्या प्रमाणे दिसतात. परंतु मानवांनी पाहू नये ते पाहिल्यामुळे ते शापित झाले आहेत, अशी ती चित्रे वाटतात. काही ठिकाणी टेकड्यांची प्रतिबिंबे पाण्यात दिसतात. समुद्र ती धारण करतो. पण ती रांगोळीचे अलंकार आहेत की कोडाचे डाग आहेत, याचा त्याला कसलाच विकार जाणवत नाही.

- सुनीळ सामंत

अस्तिस्तोत्र कथा..लेखक जीए कुलकर्णी..

विवेचनाचे लेखक.. व्हीएस वाघोलीकर

--------------------

1.माननीय सुनीळजी यांनी, ' अस्तिस्त्रोत्र ' कथेचे विवेचन केले आहे. त्याबद्दल त्यांचे आभार मानतो.

2.'अस्तिस्त्रोत्र' अद्वितीय कथा आहे. कवितेपेक्षा, स्तोत्र हे जास्त प्रभावी असते. उदाहरणार्थ, रामरक्षा स्तोत्र. ते नादस्वरूप आहे, पाठांतर करता येते, त्यामध्ये अनेक पैलू आहेत. जीए सुचवतात, अस्तिस्त्रोत्र' हे माझ्या कथांचे सार आहे. त्याकडे अनेक पैलूंतून पहावे.

भाग 1--

3.कथेत म्रुत समुद्राचा उल्लेख आहे. समुद्र स्तब्ध आहे. त्याच्या किनाऱ्यावर गवतही नाही. तो पडद्यासारखा स्थिर आहे. या समुद्राला भरती-ओहटी नाही. त्यावरून, याकथेत, जार्डन प्रदेशातील म्रुत समुद्राचा संदर्भ आहे(या म्रुत समुद्राबद्दल जास्त माहिती शेवटी दिली आहे.)

4.हा म्रुत समुद्र, निर्मम आहे. त्यावर सूर्य तळपतो.पाण्याचे बाष्पीभवन होत असते. पाण्याची भर पडत नसते. बाजूची वाळू खरखरीत, तप्त असते. त्यामुळे एक गवतही नसते. त्याचे अस्तित्व अनंत काळ तटस्थ असते.

5..पण कथेत बदल होतो, जाणीव असलेला एक व्रुध्द, तेथे येतो...(खूप पूर्वी तेथे डायनोसर येवून, मेलेला असतो)उन्हाच्या झळया पडत असतात.व्रुध्द सावलीसाठी कवटीत आसरा घेतो.कवटीला वीतभर दात आहेत, त्यामुळे ती डायनोसरची कवटी असावी. जाणीव असलेला व्रुध्द याप्रमाणे, अचानक अवतीर्ण होतो..व "व्रुध्द एकाग्र चित्ताने जीवन व विश्व, यांतील रहस्यावर चिंतन करू लागतो . "

याप्रमाणे माणूस अवतीर्ण झाला, व त्याला विश्वाची ' जाणीव 'झाली.

पण निर्मम निसर्गात व्रुध्दाची कवटी, किड्याचे कवच, मुंगीचा मेंदू टिकत नाही. त्या ' जीवनांबद्दल' कथेत लेखकाला प्रेम आहे. पण निसर्ग (विश्व)निर्मम आहे.

भाग2--अस्तित्ववाद--

6.कथेत, विश्व, त्यात येणारे-- सजीव --, अस्तित्व व जाणीव यांचा संदर्भ आहे.

भोवती गरागर फिरणारे विश्व कसे झाले--माहीत नाही

त्यात सजीवाचे अस्तित्व कसे निर्माण झाले---माहीत नाही.

त्यात जाणीव असलेला(चिंतन करणारा, व्रुध्द)माणूस कसा झाला---माहीत नाही.

7.तोपर्यंत जीवनाचे प्रमेय तर चालू आहे. मग जे माहीत नाही, ती प्रमेयाची --पूर्वप्रतिज्ञा -स्वीकारावी लागते. ती अस्तित्ववादाची पूर्वप्रतिज्ञा म्हणजे, "मी अस्तित्वात आहे, व त्याची मला जाणीव आहे" त्यामुळे. प्रमेय होते की, मला(म्रुत्यूपर्यंत) अस्तित्व चालू ठेवले पाहिजे. हेच मूलभूत मूल्य आहे.

8.त्यामुळे उपसूत्रे निघतात--अस्तित्व राखण्यासाठी मला दरक्षणी निर्णय घेतले पाहिजेत.अंतिमतः प्रत्येक निर्णय मला, एकाकी, अटळपणे, "अनिर्णय हाही निर्णय असतो", हे लक्षात घेऊन, निर्णय घेतला पाहिजे. त्यामुळे प्रत्येक निर्णयाला मीच जबाबदार आहे... ही अस्तित्ववादी उपसूत्रे आहेत.

9.निर्ममपणे गरगर फिरणाऱ्या आकाशस्थ शक्ती कशा आल्या. त्यामध्ये--माणूस, किडा, मुंगी--हे सजीव अस्तित्व, जाणीव असलेला माणूस हे सर्व कसे आले, हे माहित नाही.हे अस्तित्व काळाच्या छोट्या तुकड्यात आहे.पण काळ, व इतर विश्व मात्र अनंत आहे. अशा प्रकारे ही कथा, अस्तित्ववादाच्या संदर्भात आहे, हा पैलू लक्षात घ्यावा लागेल.

भाग3--

10.अस्तित्ववाद व नियतीवाद--

कथेसंबंथी हे खालील विचार लक्षात घेणे आवश्यक आहेत, म्हणून खालील विचार आपल्या परवानगीने मांडत आहे.

11.जीएंचा *'सुधारित अस्तित्ववाद, व सुधारित नियतीवाद, यांचे संयुग ' *समजून घेण्यासाठी क्रुपया खालील मुद्दे लक्षात घ्यावे, ही विनंती.

12.अस्तित्ववादाप्रमाणे, माणूस--सजीव --दरक्षणी एकाकी, अटळ निर्णय घेत पुढे जातो व मरतो.पण निर्णय * अंतिमतः*त्याचा स्वतःचा, किती असतो, असा प्रश्न जीएंनी अनेक कथांत विचारला आहे. विदूषक, रक्तमुखी, बाधा इत्यादी कथांत हा प्रश्न विचारला आहे.

विदूषक मध्ये चंचला म्हणते, " धनुष्यातून शर सोडणे, एवढेच आपल्या हाती असते. पण एकदा त्याचा प्रवास सुरू झाला की, त्याच्या लक्ष्यापर्यंत त्याला पोहचवण्याचे सामर्थ्य मात्र आपल्याला लाभले नाही. त्यातही नियतीच्या अद्रुश्य उच्छश्वासांनी, त्याचा गतीमार्गही अनेकदा दुष्ट होऊन जातो ही तर जीवनाची एक प्रतिज्ञाच आहे.आणि एकदा जीवनात पदार्पण केल्यानंतर, त्याबद्दल विलाप करण्यात अर्थ नाही..."

13.म्हणून जीए म्हणतात--माणूस निर्णय घेतो, पण तो (आधी असलेल्या आकाशस्थ शक्तींच्या) नियतीने दिलेल्या चौकटीतला निर्णय असतो. पण माणसाला वाटते, की त्याला इच्छास्वातंत्र्य आहे.ही नियतीची चौकट कधी त्याला मेल्यावरही कळत नाही... विदूषक मध्ये विजयराजाचा तलवारीने म्रुत्यू होतो.तरी त्याला त्याचे खरे कारण कळत नाही.

14.आकाशस्ध, निर्मम, अविरत, अनाकलनीय, अनिर्वचनीय शक्ती आपल्याभोवती व आपल्यातही आहेत. तिला आपण 'नियती 'नाव दिले आहे. म्हणून, "म्रुत समुद्र अमर आहे."हे वाक्य विचारणीय आहे. अत्यंत कठीण (रिजिड)नियतीवादात इच्छास्वातंत्र्य नाही. येथे आहे. म्हणून हा सुधारित नियतीवाद आहे .या दोघांचे संयुग म्हणजे, "जीएंचा नियतीवाद " म्हणता येईल.

15.यावरून जीए कुलकर्णी या प्रतिभावंत कथाकारांची अस्तिस्तोत्र कथा अद्वितीय आहे.प्रत्येक स्तोत्राशेवटी प्रार्थना असते. त्याप्रमाणे प्रार्थना करतो की, या कथेच्या वाचनाने साक्षेपी वाचकांची जाणीव, सफळ-संपूर्ण होईल. धन्यवाद.

=≠======≠========

**टीप 1--म्रुत समुद्र-डेड सी-हा जार्डन प्रदेशात आहे. तो 50 किमी लांब, 15 किमी रूंद व 307 मीटर खोल आहे. त्या समुद्राला जार्डन नदीचे कमी कमी पाणी मिळते. आजूबाजूला वाळवंट आहे. समुद्राच्या पाण्याची वाफ होते. त्यामुळे इतर समुद्रांच्या तुलनेत, यामध्ये आठपट क्षार आहेत. त्यामुळे काही प्रयत्न न करता, माणूस या पाण्यावर तरंगू शकतो. पण खोल बुडी मारली, तर ते माणसाला धोकादायक आहे. जार्डन नदीतून काही मासे, समुद्रात आले तरी ते मरतात. खोल पाण्यात संशोधन चालू आहे

**टीप2 'जीए कुलकर्णी यांच्या कथांचा बोधस्वर', हा व्हीएस वाघोलीकर यांचा लेख पूर्वी फेसबुकवर दिला होता. त्याची लिंक देत आहे..

- विलास वाघोलीकर

विलासजी, दंडवत.

माझं ज्या वाक्याकडे लक्ष गेलं नव्हतं, ते – मृत समुद्र अमर आहे- हे वदतोव्याघात वाकय आपण नेमकं हेरलं आणि वेधलं. या कथेत जॉर्डनचा मृत समुद्र असावा या आपल्या(साधार) गृहितकाने या कथेचा रागरंगच बदलून गेला आहे. (माझ्या नजरेसमोर कोकणातला समुद्रच होता) शिवाय डायनोसॉर ((हेही साधार गृहितक) आणि निर्मम निसर्ग यांच्या आधाराने ही कथा आता उकलली. अन्यथा ’हे काय लिहून ठेवले आहे’ असे कोणाला वाटू शकेल. आपण बोलल्याप्रमाणे ही काही आपली आवडती कथा नाही. तरीही तुम्ही ज्याप्रकारे ही उलगडून सांगितली त्यासाठी दंडवत.

तुम्ही सुधारित अस्तित्ववाद आणि सुधारित नियतीवाद असे शब्द वापरले आहेत. 'सुधारिय' नियतीवाद हा नियतीवादाहून वेगळा कसा हे सांगितले आहे. पण 'सुधारित' अस्तित्ववाद समजला नाही. अस्तित्ववादाच्या कांट, नित्शे, सार्त्रे, कामू यांच्या प्रत्येकाच्या व्याख्या वेगवेगळयाच (आणि अनेकदा विरोधीही) होत्या. तेव्हा जीएंचा अस्तित्ववाद वेगळा असू शकेल पण सुधारित कसा असा मला प्रश्न पडतो. (याचे उत्तर पर्सनली दिले तरी चालेल, चर्चा वेगळया दिशेने जाऊ नये यासाठी).

हे स्तोत्र कसे याची आपली जाण आपण सर्वांना सांगितली याबद्दल आपले आभार मानावेत तेवढे थोडेच.

- सुनीळ सामंत

खूप धन्यवाद. मी लिहिलेले आपणांस आवडले, याचा निश्चित आनंद होतो. ही अलक्षित कथा आहे, पण मला पूर्वीपासून आवडली आहे. अस्तित्ववाद व नियतीवाद... मोठा विषय निश्चित बोलू.

- विलास वाघोलीकर

'अस्तिस्तोत्र'-किंचित सकारात्मकतेचा आश्वासक सूर

टिपण- डॉ माधव पुराणिक

१ गटचर्चेतली ही सातवी कथा.शीर्षक 'अ' ने सुरु होणारे.पण यावेळेस किंचित सकारात्मक (अस्ति)मंगलतेची छटा (स्तोत्र)

२ कथेतले द्वंद्वात्मक नाटय मला खूप आवडले- क्षुद्र सजीव (अजस्त्र प्राणी, माणूस, किटक) व विराट निर्जीव समुद्र काळाच्या व निसर्गाच्या रंगभूमीवर अनादी अनंत तोच खेळ खेळत असलेले.

३ या नाट्याचे पार्श्व संगीत ही मूक, अनाहत स्पंदनात्मक -समुद्र मृत, भरती -ओहोटीचा नाद नाही- वारा जणू समुद्राचा आत्मा.(प्रथमच जी एं नी भारतीय

दर्शनांतला 'आत्मा 'शब्द वापरृला!) हे संगीत मला ऐकू आले. जो वृध्द प्रवासी एकाग्र चित्ताने चिंतन (योगप्रक्रियेतले ध्यान नव्हे) करत होता -तो ही ऐकत असावा

४ जी एं च्या काही कथानायकांसारखा हा पण अप्राप्य शोधत होता पण असफल झाला. त्याच्या डोळयांतील तेज त्याचे थोडे यश दाखविते.

५ ही कथा विश्वातल्या पहिल्या सजीव सूक्ष्मजीवाच्या उत्पत्ती कडे नाट्यमयतेने जाते.अजस्त्र प्राणी ते माणूस ते कीटक ते मुंगी ते पहिला जीव . त्याआधी काहीही नाही.जन्माबरोबर जीवन सुरू झाले.एकेका कवटीत अस्तित्व संपले. ते निर्जीव झाले.केवळ समुद्र रुपी अव्यक्त शक्ती झाले.. मृत्यू नंतर त्यांचे काहीही उरले नाही (अस्तितावादी -

एक्झिसटेन्शेलिस्टिक सिध्दांत)

६ वृध्द प्रवासी कवटीपण 'पूर्णाकार'शोधतो.

७ समुद्राला चिंतन नाही कारण तोच 'केवळ' समुद्र आहे - अव्यक्त वैश्विक शक्ती आहे.शुध्द, एकटा, स्वच्छ आहे.त्यानेच स्वतः अस्ति स्तोत्र म्हणायला सुरुवात केली.तो सगुण साकार झाला- शांत, निर्मम, . स्तब्ध झाला. दुसरा, वेगळा, स्वतंत्र, अन्य जीव अस्तित्वात आला. प्रत्येक जीवाला त्याने जन्ममरणाचा नियम घालून दिला.मग निरीक्षक होउन पाहू लागला-पाहतोय- पाहणार आहे.हा अनुभव मला चित्तवेधक वाटला.चिंतनाची सांगता झाली कारण त्याला काहीच व्हायचे नव्हते. तो तोच होता.असतो.असणे हेच जगण्याचे प्रयोजन.त्याच्या नियंत्रणाचे सूत्र नाही. समुद्र वा कोणतीही बाह्य शक्तीचा अधिकार नाही (अस्तितावादी सिध्दांत)

८ केवळ समुद्राच्या- विराट विश्वाच्या समोर या असहाय जीवनात काहीही शाश्वत नाही.सारे क्षणिक आहे.ज्याचे सत्य त्याच्यापुरते.वृध्द माणसाचे सत्य त्यांच्या पुरते.(अस्तितावादी सिध्दांत).ही भीषण जाणीव मला होती होती.

९ ही कथा म्हणजे अभावांची, काहीही नसण्याची साखळी आहे. सजीव हळूहळू पण अटळपणे नाहीसे होतात.निर्जीवता पसरत जाते . निर्जीव साकार निराकार

होतात.सजीव अस्ति स्तोत्र गात नियत वेळी असणे होतात.आशेचे धागे तुटत जातात असे विलक्षण वाटत राहते.

१० शेवटी पाणी पण अनासक्त होते. ज्या तोंडाने जीवनभर अर्थपूर्ण बोलायचा प्रयत्न करतो त्यातले दंत्यवर्ण जणू मृत्यूच्या लिपीतील दोन अर्थहीन ओळी होतात. हे मृत्यूचे दर्शन हादरवते.

११ शीर्षक - सु+अस्ति= स्वस्ति= चांगलें आहे पण जी एं ना चांगलें -वाईट ही संकल्पना मान्य नसावी .मग फक्त अस्ति - असणे. म्हणजे आहार, निद्रा, भय (नसण्याचे, मृत्यूचे) व प्रजनन या पातळीवर. जीव असणे. नंतर सामाजिक संबंध, संस्कार, नीती, आदर्श, सद्गुण या दुय्यम कल्पना येतात (अस्तितावादी सिध्दांत) 'अस्तिस्तोत्र'-वरूण देवता (इ स पूर्व १००००) ते' केवळ समुद्र' (इ स १९७२)- एक संकल्पना -

टिपण- डॉ माधव पुराणिक

१२ ऋग्वेदात मित्रावरूण (सूर्य व आकाश) अशी विश्वनियंत्रण करणारी, सर्व घटनांचे नियमन करणारी अदृश्य शक्ती (तत्व, देवता) मानली जाई.

वृ=आच्छादणे, वेढणे. जलास वेड्याला,

वरूण म्हणजे रात्रीच्या वेळचे आकाश. वरूण 'माया'या रसमय शक्तीने असे नियंत्रण करतो. ही 'माया' विश्वाच्या प्रत्येक वस्तूत (मसजीव व निर्जीव, माणूस, प्राणी, कीटक इ) आहे. वरूण वृध्द आहै व तो सूर्याच्या सहस्त्र डोळयांनी मानवाला पाहतो. माणसांच्या कृत्याचे निरीक्षणं करतो.

कथेतील वर्णन -' जळत्या सूर्यप्रकाशाचे कार्य अविरत चालू होते. झळझळीत उष्णता शरीरावर उतरली.कीटकाचे कवच तप्त झाले. तापून झळाळणाऱ्या समुद्राचा आत्मा झळझळीत उन्हाचा वणवा'इ

१३ महाभारतात वरूण हा जलाचा स्वामी जलातच निवास करतो.जलातच प्रथम एकपेशीय जीव अस्तित्वात आला. जी एं चे :कवटीत नाश'प्रक्रियेचे वर्णन

१४ मग वरूण देवतेचे महत्व कमी झाले.व केवळ समुद्र वरची सत्ता एवढेच राहिले.हाच कथेतला केवळ समुद्र= विश्व व्यापून टाकणारी गूढ, अदृश्य, अजिंक्यशक्ती .

१५ वरुणाला 'अस्तिभातिप्रिय' मानत.'अस्ति'= तिन्ही काळांत अखंड, अज, अमर. 'भाति'= ते ज्ञानमय व स्वसंवेद्य आहे

' प्रिय'= ते केवळ आनंदमय आहे

जी एं केवळ 'अस्ति ' मानतात म्हणून तो केवळ समुद्र आहे (अस्तितावाद)

१६ समुद्राचा अनुभव

अ) काही वेळ सुंदर, रोमांचकारी, इ

आ) नंतर भयानक, भयचकित करणारा

इ) चिंतन केल्यास -शांत, निर्मम, स्तब्ध

ई) महान प्रतिभावतांची अभिव्यक्ती जी एं चे 'अस्तिस्तोत्र'

माधव पुराणिक

पुराणिक सर, तुम्ही या कथेला ‘सकारात्मक आणि आश्वासक’ म्हणून संपूर्ण वेगळा आयाम दिला. मला तर ही आत्यंतिक निराशावादी (मोठा प्राणी मरतो, माणूसही मरतो, कीटकही मरतो, आणि मुंगीच्या मरणाची वाट पहात जंतू उभा असतो) वाटली. यातले शापित, कोडाचे डाग, मळकट विस्तार असे निराशावादी शब्दही मनाला खचवतात. अगदी आकाशालाही जीए कवटीसारख्या आकाराची म्हणून मृत घोषित करतात.

पण तुम्ही यात एक सकारात्मक आशावादी महानाट्य पाहिले, एक रंगमंच पाहिला. सुरुवातीला तुमचे हे विवेचन समजायला व पचायला जड गेले खरे, पण त्यातले अस्ति या शब्दाचे तुम्ही दाखवून दिलेले वैदिक संदर्भ आणि मुळातच अस्ति, आस्तिक, अस् या शब्दांतून निर्माण होणारा जीवनावरचा विश्वास आठवला. व्यक्तिगत जीवनाचा अंत मृत्यूत आहे पण सामूहिक जीवन अनंत आहे, जीवन असीम आहे. अस्ति निरंरतर आहे. म्हणून हे अस्तिस्तोत्र. अस्ति, असण्याचा महिमा सांगणारे स्तोत्र.

खरेच, जी ए महान प्रतिभावान.

- सुनीळ सामंत

एकूणच काय तर इतर अनेक कथांप्रमाणे जीएंच्या 'अस्तिस्त्तोत्र' या कथेला अनेक पापुद्रे आहेत. मला एक दोनच आवरणे सोलता आली. पण त्यातच इतका गुंतून गेलो की पुढची वाट हरवली. मला गवसलेले विचार मोती एकत्र करून मी शब्दात मांडण्याचा प्रयत्न करत आहे.

- यतीन गुळवणी

"अस्तिस्तोत्र" च्या संदर्भात

1 कथानकात सांगाड्यांचा व कवट्यांचा उल्लेख आल्यामुळे,

2 'जीवो जीवस्य जीवनम' हे मनावर बिंबल्यामुळे (तसेच मांजर उंदराला मारून खाल्लेले पाहिल्यामुळे व मोठे मासे छोट्या माशाना गीळतात हे ऐकल्यामुळे

3 पारशी समाजात मृत झाल्यावर माणसाचे कलेवर पक्षांना खाण्यासाठी ठेवतात अशी माहिती असल्यामुळे

मी अस्तिचा चुकीचा संबंध हाडाशी लावला खालीलप्रमाणे कथानक समजलो.

कथेत अजस्र प्राण्यांच्या भल्यामोठ्या कवटीत मानवी जीव जगतो, ती मोठी कवटी तडकताच मानव मृत होतो. मानवाच्या कवटीत अंगठ्याएवढा कवच असलेला (खेकडा?) कीटक विसावा घेतो. मानवी कवटी तडकताच तो कीटक मरतो व पुढे एक मुंगी कीटकात शिरून विसावते. आणखी एक सूक्ष्म जीव मुंगीच्या मरणाची वाट पहातोय.

हे चक्र चालू असताना मृत, अमर, समुद्र शांत, स्तब्ध, निर्मम, निर्विकार निरीक्षक आहे. हे सर्व घडते ते 'उन्हात तावून निघालेल्या, कवटीप्रमाणे वाटणाऱ्या स्वच्छ चकचकीत आकाशाखाली!'

फक्त दुसरी सूक्ष्म व क्षीण हालचाल म्हणजे 'कोरड्या क्षारांच्या खडकावर (ज्यांच्या भयाण उभारांवर सावलीचा थेंब क्षणभरदेखील जगू शकत नाही) वाऱ्याच्या कसरीमुळे विक्षिप्त कुरूप आकृत्या निर्माण होतात (ज्या पाहू नये ते पाहिल्यामुळे शापित मानवाप्रमाणे वाटतात).

त्यांची पाण्यातील प्रतिबिंबे ('रांगोळीचे अलंकार' की 'कोडाचे डाग') हा विकार न जाणवू देता समुद्र निर्विकारपणे धारण करतो.

विलासराव व डाॅक्टर माधवराव पुराणिक यांच्यासारख्या जाणकारांकडून गैरसमज दूर होऊन कथा व्यवस्थित समजता आली. या चित्रकथेचा संबंध जाॅर्डन व इस्रायल मधील सागरी तळ्याशी आहे. आंतरजालमधून जास्त माहिती मिळाली. जीएंनी क्षाराच्या खडकाचा उल्लेख केला आहे त्याला अनुसरून एका मसीहाच्या पत्नीच्या नावे मानवाकृती खडक प्रसिद्ध स्थळ आहे. आता हे सर्व आंतरजालमुळे कळते.

पन्नास साठ वर्षांपूर्वी अशा ठिकाणाची माहिती मिळवून वाळवंटी वर्णनासहित समुद्र चित्ररूप निर्माण करून त्याची अस्तित्वाशी सांगड घालून कथा गुंफणे यावरून जीएंचे वाचन, मनन, चिंतन व प्रतिभा किती अलौकिक होते याची कल्पना येऊन

मी नतमस्तक होतो. प्रत्यक्ष त्याजागी न जाता असे चित्र उभे केले आहे, तर पाश्चात्य लेखकांप्रमाणे जीए फिरले असते तर?

- यतीन गुळवणी

अस्तिस्तोत्र

चिरंतन विश्वातल्या जिवाच्या अस्तित्वाचे स्तोत्र !

समुद्र निरंतर आहे स्तब्ध आहे त्याच्या मृत असण्यात त्याचे अमरत्व आहे म्हणजे आयुष्य !! अनादी अनंत काळापासून अपरिहार्यतेने चालत आलेले आहे.

ऊर्जा अक्षय्यतेच्या नियमानुसार ते कधीच संपत नाही व नवे निर्माण होत नाही ते आहे तिथेच आहे फक्त एका रूपातून दुसऱ्या रुपात बदलत जात आहे. त्याला जन्माचा स्फोट नाही मरणाचे विसर्जन नाही. पण तरीही त्यात जीवन आहे, साखळी आहे, सुरुवात करण्याची क्षमता आहे त्यामुळे अंत करण्याची अपरिहार्यता आहे. या विश्वाच्या अस्तित्वाचे हे अनादिकालापासून चालत आलेले स्तोत्र आहे.

- अभयकुमार कुलकर्णी.

# अहम
# जी ए कुलकर्णी
# संग्रह- सांजशकुन

**अहम - जी ए. कुलकर्णी- सांजशकून**

सांजशकुन या कथासंग्रहाच्या सुरुवातील अस्तिस्तोत्र या कथेत निश्चल जलाचा मृत समुद्र आहे. याच कथासंग्रहाचा शेवट अहम या कथेने केला आहे ज्यात एक छोटासा जलप्रवाह एक महाप्रपात म्हणून झेपावतो आहे. अस्तिस्तोत्र या कथेमधे एक माणूस समुद्रकिनाऱ्यावर येतो आणि उन्हाने तडकून मृत्यू पावतो. अहम मधे एक बैरागी जलौघाला सामोरा येतो आणि वाहून जातो. पंचमहाभूतांशी मनुष्याचा सुरू असलेला निरंतर प्रेम आणि संघर्षाचा व्यवहार जी ए कलात्मकरितीने दाखवत आहेत का?

अहम ही एका बैराग्याची कथा आहे. जग पालथे घालून वणवण करत बैरागी या दहा पंधरा झोपड्यांच्या गावात आला. या गावाचे वैशिष्ट्य म्हणजे गावाशेजारी अव्याहत झेपावत असलेला जलप्रपात. (जीएंना गोकाक चा धबधबा आठवला असेल?) बैरागी या महाप्रपाताचे मूळ शोधायला वर जाणार असतो. एक रात्र गावात काढतो. आणि त्याच रात्री त्याची कुतुहल शमवण्याबरोबरच (ज्ञानयोग?) इतिहासावर आपला ठसा उमटवण्याची ऊर्मी (कर्मयोग) जागृत होते. इतिहासावर ठसा उमटवण्यासाठी काय करावे याचा शोध घेताना त्याला वाटते की असे काही करावे जे पिढ्यांना लक्षात राहील आणि निसर्गावर उमटून राहील. त्याने आपल्या हाती असलेल्या मोजक्या साधनांचा (कुदळ आणि दोर) वापर करून आणि

परिस्थितीने उपलब्ध करून दिलेली संधी वापरून (पडलेला वृक्षाचा बुंधा) इतिहासाला वळण लावण्याचा (जलप्रवाह वळवण्याचा) प्रयत्न केला. काही क्षणांपुरता का होईना हजारो वर्षे निरंतर कोसळणारा तो जलप्रवाह त्याने थांबवला. गावकरी दचकले असतील (वृत्तपत्रीय मथळा बनण्याची ऊर्मी) आणि रान थरारले असेल (महाशक्तींनी नोंद घेण्याची ऊर्मी) या जाणीवांनी त्याचा ऊर भरून आला. अर्थात पाणी, निसर्ग काही अशा दुबळ्या प्रयत्नांना थारा देणार नव्हते. ते दुप्पट जोमाने उसळले. आणि बैराग्याला बुडवून वाहून घेऊन गेले. तो बैरागी त्याच प्रपातातला एक बिंदू झाला.

- सुनीळ सामंत

' अहम् 'कथा.(सांजशकुन).विवेचक व्हीएस वाघोलीकर

---------

1.सुनीळ सामंतजींनी कथानक, व वैशिष्ट्ये सांगितली आहेत. त्याबद्दल आभारी आहे. मला जाणवलेली वैशिष्ट्ये येथे सांगतो.

2.कथेत, तुलनेने सर्वसाधारण घटना आहेत. पण मनोविकार स्पष्ट दाखवले आहेत.उदाहरणार्थ, चंद्रावळ, गुंतवळसारख्या कथांप्रमाणे साध्या घटना घडतात, पण शेवटी कन्व्हासवर मोठे चित्र उभे रहाते.

3.कथेतील, बैरागी हा, हिमालय ते कन्याकुमारी फिरून आला आहे. पण त्याला' अहम् 'सापडला नाही .आता तो प्रपाताच्या दुसऱ्या बाजूला येतो.तेथे छोटी जमात रहात असते.

4.जीएंनी दुर्गम ठिकाणी राहणाऱ्या जमातींचे वर्णन अनेक कथांत केले आहे. उदाहरणार्थ, स्वप्न, कांचनम्रुग, कळसूत्र.. येथे, प्रपाताच्या जवळ राहणाऱ्या वाडीतील जमातीचे वर्णन येते. त्यामधील, रूढी, समारंभ, पाहुणचार इत्यादी बारकाईने दाख़वले आहेत.

5.बैरागी येण्यापूर्वी तेथे मुशाफिर आला होता.व म्हाताऱ्याची मुलगी पळून गेली होती. कदाचित त्यामुळे स्त्रिया बाहेर येत नाहीत .पण ते बैराग्याला रात्रीसाठी झोपडी देतात.

6.जमातीत म्हाताऱ्याला महत्त्व आहे. पण तो अंध आहे.' प्रवासी 'कथेत, अंध शिकारी शब्दवेधाने शिकार करतो.येथेही म्हाताऱ्याला प्रपाताच्या आवाजातही, इतर आवाज कळतात. यावरून जीएंनी आवाजाचे महत्त्व दाखवले आहे.

7.कथेत म्रुत्यू अनेकदा येतो. उदाहरणार्थ, म्हाताऱ्याची मुलगी कड्यावरून उडी मारते.बैराग्याला सांगतात की लाल मढेफळ खावू नकोस. म्हातारा मरतो.शेवटी बैरागी पाण्याबरोबर दरीत पडतो.

8."मी आहे .मला विचार करता येतो.म्हणून मी निसर्गापेक्षा श्रेष्ठ आहे" हा स्वर बैराग्याचा, पर्यायाने माणसाचा आहे. बैराग्याभोवती त्याचा द्रुष्टीने, निसर्ग मर्यादित आहे.छोटी नदी, जंगल, खोल कडा आहे. त्याला निसर्ग आवाक्यात वाटतो.म्हणून तो कुदळीने खणून, बांध घालून, प्रवाह अडवतो...विजय म्हणजे काहीतरी संपून जाण्याचा क्षण असतो.जीए सांगतात.. जीवनाची लहान नदी वहात असते.जन्मणे, जगणे, मरणे.मधल्या काळात फक्त आणखी बुडबुडा करण्याचा प्रयत्न करतो.

9.येथपर्यंत तो, पूर्ण अस्तित्ववादी निर्णय घेतो.---मी अस्तित्वात आहे. मला जाणीव आहे..(उपविधाने--)मी एकाकी, अटळ निर्णय, दरक्षणी घेतो.व त्या निर्णयाला मी जबाबदार आहे.

10.पण निसर्ग म्हणजे नियती, अनाकलनीय, अनिर्वचनीय आहे.कथेत, रात्री पाऊस पडल्यावर सकाळी पाण्याचा जोरदार लोंढा येतो.त्याची झोपडी, पकडलेले मढेफळाचे झाड वाहून जाते.बैरागी, कड्यावरून खाली, ठिणगीसारखा पडतो.

11.म्हणजे, अस्तित्ववादाप्रमाणे घेतलेला, ' स्वतंत्र 'निर्णय, हा नियतीच्या चौकटीत असतो. रक्तमुखी कथेत म्हटल्याप्रमाणे, "प्रत्येकजण परिघात बंदिस्त असतो.तुम्ही माणसे जावून जावून कुठे जाणार."

म्हणून, जीए कुलकर्णी या प्रतिभावंतांची कथा, साध्या साध्या घटनांतून साक्षेपी वाचकाला मोठी जाणीव करून देते.धन्यवाद.,

- विलास वाघोलीकर

वाह सर. तुमचे विवेचन वाचून मजा आली. तुम्ही कथा अतिशय सूक्ष्मपणे वाचता. त्यातल्या काही ठळक गोष्टी तर मलाही जाणवल्या होत्या. पण ध्वनी. हो. जीएंनी या कथेत ध्वनींचे विविध पोत मांडले आहेत, तो एक वेगळाच विषय आहे.

मध निथळण्यासाठी टांगून ठेवलेल्या पोळयातून पडणाऱ्या थ्हेंबासारखा आवाज असलेली त्याची मुलगी जेव्हा परत येते तेव्हा तिचा आवाज मारलेले जनावर कोरडे होण्यासाठी टांगून ठेवले असता ठिबकणाऱ्या रक्तासारखा झालेला होता. मी त्या विविध आवाजांना मनातल्या मनात ऐकण्याचा प्रयत्न केला. पण नाही जमले. तो आवाज थेंबांचा नव्हताच. तो आवाज त्या शब्दांचा होता. फ़िरत्या सहाणेला सुरी धरावी तसा आवाज, पोर तोंडात चूळ भरून रंग पहाण्यासाठी फ़र्रदिशी सोदते तो आवाज, हे कसले आवाज, या तर मनःस्थिती, व्यक्तीविशेष.

जी ए जर कविता करत असते तर त्या कशा असत्या ते यातून जाणवले.

-सुनीळ सामंत

1)मला विचार करता येतो म्हणुन मी निसर्गापेक्शा श्रेष्ठ आहे.येथे निसर्ग मर्यादीत आहे अस म्हणण्या ऐवजी, निसर्ग अथांग आहे.त्याच्या पाठपुरावा करण्याचे काम मानवी मनाचे आहे.आणि मनाची क्षमता निसर्गाचे गुढ ऊकलण्याच्या बाबतीत तोकडी आहे.असे म्हणावे वाटते.2)विजय म्हणजे काहीतरी संपणे.3)जिवनाची लहान नदी वाहती असते.जन्म-जिवन-मुत्यृ.मधल्या जिवन प्रवाहात बालपण-तरूणपण-म्हातारपण असे भोगाचे विविध टप्पे मात्र येतात. "नोकरी लग्न-नाती-प्रतिष्ठा असे असंख्य बुडबुडे तयार होत असतात

4) प्रत्येकजण परिघात बंदिस्त असतो.हा कोट 100%सही.आवडला.चुकभुल द्यावी.

- दिलीप बडे

जीएंनी अहम या कथेतून कमाल कलात्मकतेने मानवी अहम, त्याचे यःकश्चितपण आणि तरीही त्याच्यापुरती त्याची महानता यांचे कलात्मक दर्श्न घडवले आहे. यांच्याचबरोबरच निसर्ग आणि इतिहासाच्या महाप्रवासाचा अहम यांचेही एक भव्य दर्शन घडवले आहे. एकाच कथेत दोन अहमच्या संघर्षाच्या कथा आहेत. मानवी अहम पराभूत होत नाही, जरी मानव अंतिमतः या महाशक्तींसमोर पराभूत होतोच. कारण या महाशक्ती मृत असल्या तरी अमर आहेत. आणि मानव जिवंत असला तरी मरण अटळ आहे. आनंदमधला राजेश खन्ना म्हणतो तसे “मौत तो एक पल है. उसके पहले मैं ये जो हजारो लाखों पल जीनेवाला हूं …” मानवी जीवनाचे हे यश, ही महत्ता, ही जीजिविषा आणि ही विजिगीषु वृत्तीतील पूर्तता जी ए या कथेतील बैरागी आणि जलप्रपाताच्या संघर्षातून दाखवून देतात. ही वाचताना

मला “The Old Man And The Sea” ची आठवण झाली. निसर्गाशी तोच संघर्ष, मानवांना आपली शक्ती दाखवून देण्याचा तोच असोशी अहम भाव, तीच जीजिविषा, तेच परम समाधान.

- सुनीळ सामंत

अहम या कथेतील जी एंच्या शब्दशक्तीची झलक. जीएंची शब्दकळा दृष्टांतकथांतून सर्वाधिक फुललेली दिसते. इस्किलारमधे तिचा सर्वोच्च बिंदू आहे असे मला वाटते. आणि त्यापुर्वीची पायरी सांजशकुनमधे आहे. संथ वाटणारा जलाशय कोंडला गेल्यावर कसा रौद्र बनतो त्याचे वर्णन तर अप्रतिम आहे.

*नदीच्या वरच्या बाजूला प्रचंड आवाज झाला व त्याने चमकून तिकडे पाहिले. नकळत तो एकदम उभा राहिला व आतील सर्व वेदना विसरून त्याचे शरीर बधिर झाले. पाण्यात नाचून ते फेसाळत अनेक हत्ती सोंडा उंचावून पाण्याचा डोहच स्वतःबरोबर खेचत आणत असल्याप्रमाणे पुरुषभर उंचीची पाण्याची भिंत वेगाने इकडे येत होती. पाहता पाहता ती जवळ आली. मुळे सैल झालेली दोनचार झाडे अलगदपणे आडवी झाली. तिच्या दडपणाने खोपट्याची एक बाजू खचली आणि ती आदळताच बांधाचे झाड आडवे तिडवे होऊन बांधाचे दगड विसकटले. मग लाट थोडी शांत झाली व पदरापदराने सरकत पुढे सावकाश पसरली. पण तिला स्थिर व्हायला वेळच मिळाला नाही. मागून आलेला प्रवाह जास्तच त्वेषाने व आत्मविश्वासाने आला. ढकलून पाण्यात आणून टाकायला त्याला तासतासभर वेळ लागलेले गोलसर खडक त्या प्रवाहाच्या स्पर्शाने घुंगुरटी उडवल्याप्रमाणे उधळले. गडगडत ते कड्याच्या काठाकडे धावले आणि संतप्त पाण्याच्या द्वेषामधून काळ्या ठिणग्या उडाल्याप्रमाणे काठावरून सरळ पुढे चार हात फेकले जाऊन दरीत नाहीसे झाले.*

*काल कड्याची रेषा स्वच्छ पाण्यात जरीकाडीने रेखीव, कोवळी दिसत होती. आता ती एकदम लाल लांबलचक झाली, आणि थोड्या वेळाने तर तिला विस्तृत असा अर्धचंद्राकार आला. तिच्यावरून फेसाळून वाहणारे पाणी वावभर पुढे ताठरपणे जाऊन मग अनेक सोंडींनी दरीत ओतू लागले व त्याच्या गर्जनेने दरी हादरल्यासारखी होऊन त्याचा आवाज येथपर्यंत येऊन घुमू लागला.*

- सुनीळ सामंत

अहम्…., (सांज शकुन)

जी.एं, च्या कथा विश्वाची समस्या ही तर कलेची समस्या नाहीच.कला यादृष्टिने ते परीपूर्ण आहेच.ती जीवनाची समस्या आहे. जीवनातल्या दुःख मयतेची, शोकात्मकतेची, विलगतेची जाणीव असलेला धागा त्यांच्या कलाकृतीशी जोडलेला असतो..तोच धागा पकडुन एका विविक्षित दिशेने त्यांच्या कथेचा प्रवास चालू असतो.

या विश्वरचनेपासुन आपण विलग झाल्याची भावना.त्या बैराग्याच्या आयुष्यात घडली, एका स्त्री मुळेच.पण तरीही आपण कोणतरी आहोत ही अहम पणाची भावना त्याला जगण्याशी जखडुन ठेवतेच.हिमालयातील चंद्रचूड शिखरा समोर तो वाकला, पण त्याक्षणी देखील पावले उमटावीत तर असल्या शिखरावर, हा अहंकार त्याला स्पर्शुन गेला.

उध्वस्ततेच्या काठावरही तोल सावरत जगण्याचा प्रयत्न करणार्या माणसाची कथा म्हणजे"अहम"ची कथा.

जी.एं.च्या कथेतली प्रत्येक व्यक्ती कुठल्यान कुठल्या योजनेचा भाग होण्याची धडपड करीत असते. त्यात त्याला स्वतःची हतबलताही जाणवते.पण त्या हतबल क्षणीच त्याला एखादी वाट, त्या क्षणाच्या बडखोरीत सापडते.

.....तो अट्टाहासाने अखंडपणाने वाहणार्या पाण्याच्या प्रवाहाला अडवण्याचा प्रयत्न करतो.......धबधब्याचा अविरत घुमारा थांबतो. तेपाहुन तो हर्षभरीत होतो.

आपले सारे आयुष्य म्हणजे हा क्षण.पण तेथुन तो खाली पाहतो.ज्याच्या मनात आपली आठवण रहावी असे त्याला वाटत असते, त्याला लाल चादरीची झोळी करुन तेथे आणलेले असते.....आधिच्या वाटसरुने मात्र, क्षुद्र जनावर तर्हेने केळीच्या पानासारख्या मुलीत आपले बीज रुजवून आपली आठवण ठेवलेली असते......नंतर सुरू झालेल्या प्रपाताच्या झंझावातात बैराग्याच्या विजयाचा क्षण देखील वाहुन जातो...तीही ठिणगी पाण्याच्या अहम् हुंकाराने थरथरत असलेल्या दरीत नाहिशी होते.

-राम कुलकर्णी

त्यंत नेमक्या शब्दांतले विवेचन. योग्य मुद्द्यांकडे लक्ष वेधले आहे. ***उध्वस्ततेच्या काठावरही तोल सावरत जगण्याचा प्रयत्न करणार्या माणसाची कथा म्हणजे"अहम"ची कथा*.** हे आवडले. मानवी अट्टाहासाचे निश्चित आयाम तुम्ही हेरले आहेत. यातल्या प्रत्येक व्यक्तीरेखेकडे आपले लक्ष गेले हेही विशेष. सहसा बैरागी सोडून इतर व्यक्तीरेखा नजरेत येत नाहीत. पण जीए विनाकारण कोणतीच व्यक्तीरेखा, ओळ किंवा शब्द लिहीत नाहीत हे ही खरेच.

-सुनीळ सामंत

छान विवेचन, आवडले.प्रपात थांबवून आपली आठवण ठेवण्याचा, ' अहम् 'सिध्द करण्याचा त्याचा प्रयत्न असतो.प्रपात थांबण्याचा विजय, नंतरच्या झंझावातात वाहून जातो..ही नेमके अर्थवाही शब्द आहेत. धन्यवाद.विलास वाघोलीकर

- विलास वाघोलीकर

अहम्' - काळ्या नियतीला प्रयत्नांची शुभ्र किनार

टिपण : डॉ माधव पुराणिक (स्तर ६ :कथेतील तत्त्वज्ञान)

१ शीर्षक: 'अ' पासून सुरू होणारे सकारात्मक 'अहम्'.

जगणे म्हणजे दोन अहम् मधला प्रवास.पहिला'अहम्' म्हणजे जीवरूपी शक्ती. ही जगात आहार, भय, निद्रा, वासना, शोक, मोह, जन्म, मरण या उर्मींनी व्यक्त होते.

दुसरा अहम् म्हणजे निसर्ग निर्विकार, अढळ, शाश्वत भव्य शक्ती.बैराग्याचा प्रवास या दोन टोकांत चाललेला आहे. तो दोन्ही अहमना थांबवू शकला नाही

मनातले असीम आदिम स्त्री आकर्षण-- 'ती(पूर्वप्रेयसी) अकस्मात दिसताच धावू लागलेला प्रवाह त्यांच्या आवाक्याबाहेरचा ठरला.'शेवटी शरीर, १० इंद्रिये व मनाचा अहम् लाटांनी असीम केला.

२ सोहम् = स: +अहम्= तो ईश्वर मीच.जी ए ईश्वर इ. मानत नाहीत म्हणून अहम्. अहम् = निःश्वास.= अस्तित्व. श्वास संपले की अस्तित्व संपले

४ पहिली कथा शीर्षक =अस्ति+ शेवटची कथा शीर्षक= अहम् अहम् (नियती) अस्ति.अहम् व अस्ति या दोन टोकाच्या मध्ये जी एं च्या कथाविश्वात नियती पात्रांना नाचवते.

३ अहम् म्हणजे अहंकार.त्यामुळे 'मी सर्वश्रेष्ठ कर्ता व भोक्ता' अशा भ्रामक कल्पनांच्या गुंतवळीत माणूस जगतो. जसे " माझ्या इच्छेमुळे नदीचे जीवन येथेच. संपेल"."मी निवड केली -, मी घडविले".

४ अहम् म्हणजे अस्मिता -बैरागी असण्याच्या बंधनात अडकला आहे.जसे"इतकी बंधने तोडल्यावर अचानक आणखी एक बंधन (पिशवी) आपल्यावर पडले"

५ बैराग्याने 'किमयाक्षण' अनुभवण्याचे सातत्याने, लढाऊ बाण्याने, त्यांच्या अनुभव निष्ठांशी प्रामाणिक राहून* केलेले प्रयत्न मला आवडले.*जसे" बीज रूजवून खूण ठेवण्याचा मुडदार प्रयत्न करणारा वाटसरु त्याला आवडला नाही " पण " तेजस्वी काळ्या डौळ्यांची धुंद प्रवाहासारखी स्त्री त्याला मिळाली नाही "

६ संदर्भ:अ) धबधबा मानवी प्रयत्नांनी थांबविणे: १९६९ मध्ये धबधबा मानवी प्रयत्नांनी काही महिने थांबवला गेला

ब) गोमुख म्हणजे गंगेचा हिमालयातील उगम.

७ जी ए त्यांच्या अनुभवातून स्वीकारलैल्या स्व:दुखार्जित जीवननिष्ठांशी प्रामाणिक आहेत. सर्व जगण्याचा, प्रयत्नांचा शेवट महानैराश्यात होतो.काळया रंगात होतो..जीवन म्हणजे कमी काळा रंग .मरण म्हणजे जास्त काळा रंग.

८ जी एं माणसाच्या जगण्यावर व जगातील घटनांवर फक्त नियती या वैश्विक शक्तीचा प्रभाव मानतात.ही संकल्पना त्यांनी ग्रीक तत्वज्ञानातून घेतली आहे. भारतीय तत्त्वज्ञानात ही संकल्पना नाही.दैव ही संकल्पना आहे. नियती ही कार्यकारणभाव नसलेली चंचल, लहरी, कुरूप, वाईट, अपयशी अंधारी शक्ती आहे. ही जी एं च्या सर्व नायकांना उलटसुलट, वेडेवाकडे वाचवते.:" राक्षसी तळव्याने आघात केल्याप्रमाणे बैराग्यावर आदळते."

८ जी एं फक्त अंतःकरण (मन, बुध्दी, अहंकार, प्राण) = अहम् मानतात.त्यापलिकडे कोणत्याही शक्ती वर विश्वास ठेवत नाहीत(नियती व थोडी भुताखेतांची सोडून) जगातील धर्मसंस्थापक, महापुरुष, संत, इ. चे अनुभव, त्यांनी सुचविलेले मार्ग संपूर्ण नाकारतात. म्हणून त्यांचे नायक स्वतः घ्या अनुभवांवरून अंतिम रहस्य शोधायचा दुबळा, आत्मघातकी, विनाशकारी, अवास्तव प्रयत्न करतात व मरणक्षणांतच परम शांती अनुभवतात व शांत होतात (बैरागी)""या ठिकाणी भुते तरी दिसण्याची भीती नव्हती.'

९ सर्व नायक विकारवश आहेत. बैरागी ठायी ठायी हे दाखवितो. पण त्यांना निर्विकार, शाश्वत व्हायचे आहे.. वेडात दौडले वीर सात" पण क्षणात केला मृत्यू ने घात असे ८ कथानायकांकडे पाहून वाटते पण कथा भावते.

१० बैरागी झोळी(संन्यासाचे प्रतीक) व पिशवी(संसाराचे प्रतीक), उबदार घर सोडून (अनासक्ती) व तेजस्वी.स्त्री(आसक्ती) अशा परस्परविरोधी गोष्टी सांभाळत जातो झपाटल्यागत.. शेवटी नियतिच्या गूढ प्रवाहात नाहीसा होतो.

११ समारोप - कथा अतिशय प्रभावी, प्रत्ययकारी आहै.शब्दार्थांच्या नादमय, रहस्यमय रौद्र व करूण रसमय प्रवाहात खिळवून ठेवणारी आहे. धुंद, किमयाक्षणाचा अनुभव येऊ शकतो

- माधव पुराणिक

पुराणिक सर, तुमचे विवेचन वाचून काहीसे अंधुक जाणवत असलेले अगदी स्पष्ट झाले. सांजशकुन पुस्तकातील कथांच्या क्रम आणि रचनेमागे काहीतरी गूढ आहे. त्या केवळ निर्मितीक्रमाने नाहीत, लांबीनुसार नाहीत, दर्जानुसार किंवा आकर्षकते नुसारही नाहीत. हा विचार मनात आला होता. पण नेमके काय ते समजत नव्हते.

**अहम् व अस्ति या दोन टोकाच्या मध्ये जी एं च्या कथाविश्वात नियती पात्रांना नाचवते.** या तुमच्या वाक्याने एकदम स्पष्टता आली. आता सर्व कथांची मांदणी नीट करता येईल.

अहम्‍ म्हणजेच अहंकार हे नक्की का? कोणी अध्यात्मवादी यावर प्रकाश टाकेल?

अहंकाराची तुमची ख्व्याख्या अगदी सुस्पष्ट आहे. मी सर्वश्रेष्ठ कर्ता व भोक्ता

अहम् म्हणजे अस्मिता? हेही नक्की का?

तुम्ही कथेतली काही महत्त्वाची वाक्ये अधोरेखित केल्यामुले त्यांच्याकडे लक्ष वेधले गेले. जसे- इतकी बंधने तोडल्यावर अचानक आणखी एक बंधन (पिशवी) आपल्यावर पडले- हो की.!

तुम्ही नियतीवादाबद्दल केलेले - हा ग्रीक तत्त्वज्ञानाचा भाग, भारतीय नव्हे- हेही कोणी तपासले तर आनंद होईल.

-सुनीळ सामंत

स्पष्टीकरण: माधव पुराणिक
प्रश्न
१ अहम् म्हणजेच अहंकार हे नक्की का? कोणी अध्यात्मवादी यावर प्रकाश टाकेल?
२अहम् म्हणजे अस्मिता? हेही नक्की का?
३तुम्ही नियतीवादाबद्दल केलेले - हा ग्रीक तत्त्वज्ञानाचा भाग, भारतीय नव्हे- हेही कोणी तपासले तर आनंद होईल.
उत्तर
३ नियती : संदर्भ - जी एं च्या कथा :एक अन्वयार्थ: धोंडोपंत वि देशपांडे पान ९, १०
२ अहम्=अस्मिता: संदर्भ: पातंजल योग सूत्र ३ आणि ६ (साधनपाद)
१ अहम्= अहंकार, संदर्भ:सांख्य तत्वज्ञान तत्व२, एकूण २५ तत्वे, सांख्य कारिका २२
४ तो केवळ साक्षी होता : संदर्भ सांख्य कारिका १९
- माधव पुराणिक

पुराणिक सर आणि कुलकर्णी सरांनी टाकलेल्या प्रकाशाच्या झोतात पुन्हा एकदा कथा वाचली. हे कथेचे पुन्हा पुन्हा बारकाईने वाचणे (अनंत कथेतल्या करंड्यासारखे) सदोदित काहीतरी नवनवीन दाखवते. तीच कथा. पण नवीन प्रकाशात वेगळीच दिसते. Granular meaning स्पष्ट होत जातात. जीएंनी त्या त्या ठिकाणी तोच शब्द का वापरला याचे ज्ञान होते.

बैराग्याच्या विजयौन्मादाचा क्षण जीएंनी किती सुंदर टिपला आहे. एक एक मोतीहिऱ्यासारखा शब्द वेचून तो क्षण त्यांनी सजवला आहे.

*पुढे सरकत त्याने दरीत पाहिले. दोनचार ओहोळ कड्याच्या काठावरून पांढऱ्या गतीने उतरत होते हे खरे, पण खाली खडकातील एका कंगोऱ्यावर आदळून त्यांच्या ठिकऱ्या उडत होत्या व वाऱ्यामुळे त्या खाली न पडता इतस्ततः उधळल्या जात होत्या. दरीचा खालचा भाग एकदम शांत वाटत होता.*

*धबधब्याचा अविरत घुमारा थांबला होता.*

*प्रथम त्यावर त्याचा विश्वास बसला नाही. पण ते खरोखरच घडले आहे हे उमगताच त्याचे सगळे रक्त पेटल्यासारखे झाले व अंग मोहरून गेले. तो सरकत मागे आला व सुरक्षित जागी येताच उभे राहून त्याने दोन्ही हात हवेत फेकले व उकळत असल्याप्रमाणे तो मोठ्याने हसला. आपले सारे आयुष्य म्हणजे हा क्षण! मी बुडबुड्याप्रमाणे येऊन फुटून गेलो नाही. काय करायचे याची मी अगदी स्वच्छ डोळ्यांनी निवड केली आणि त्याप्रमाणे घडवून दाखवले. बस्स, हा खरा जन्माचा क्षण ! आता खालच्या वस्तीतील माणसे जेथल्या तेथे खाडकन थांबतील, आता समोर परके कुणी नाही हे पाहून त्यांच्या बायकादेखील झोपड्यांबाहेर येतील व भयभीत होऊन एकमेकींकडे पाहत राहतील. कुणास ठाऊक, म्हातारादेखील एकदम शुद्धीवर येईल व नंतर कधी तरी तो कुणाला तरी सांगेल तो दिवस मला चांगला आठवतो, कारण मी एकदम शुद्धीवर आलो...' आता माणसे येतील-जातील, मी देखील निघून जाईन. धबधबा नंतर पुन्हा वैभवाने वाहू लागेलही. पण ही आठवण मात्र सदैव त्याच्या गळ्यात राहील आणि त्या वेळी त्याचा गळा दाटून येईल.*

*बैरागी हसू लागला. हर्षाने त्याचे अंग थरथरू लागले व आवेशाने एकदम ओरडावे असे त्याला वाटू लागले. इतर वेळी एखादा दाणा तोंडात टाकावा त्याप्रमाणे त्या भयानक घुमाऱ्याने आपला आवाज गिळून टाकला असता. पण आता मात्र त्याने आपला आवाज ऐकून घेऊन निमूटपणे राहिले पाहिजे. निळी*

*दरीदेखील हा चमत्कार विस्मयाने पाहून नंतर आठवत राहील, आणि कुणास ठाऊक, कदाचित ती त्याच्या गर्वक्षणी त्याला हिणवेलही.*

*पण तो आवेशाने ओरडला नाही.*

या कथेत ज्सा ध्वनींचा खेळ आहे तसाच रंगांचाही आहे. पाणि कधी पांढरे, कधी निळे, कधी रौद्र लाल तर कधी काळ्या ठिणग्या. काळ्या पाठीच्या हत्तीसारखे.

- सुनीळ सामंत

विषय: जी एं च्या पात्रांचे बोलणे- चालणे -वागणे

कथांचा आकार- रूपककथा - तत्वकथा

संदर्भ: गटचर्चेतल्या आठ कथा

टिपण- माधव पुराणिक

१ धों वि देशपांडे (समीक्षक) यांचे मत

"जी एं ची पात्रे क्वचितच बोलतात आणि वागतात.कधीकधी ते आपले जीवनही जगत नाहीत. त्यांना कोणत्या तरी अदृश्य सूत्रधाराच्या इच्छेनुसार बोलावे लागते, जगावे लागते. कथेत ती पात्रे जिवंत दिसतात हीच जी एं ची किमया होय. जी एं च्या तत्वज्ञानात जीवनाला सर्वांगस्पर्श करण्याची ताकद आहे. म्हणून त्यांच्या कथा मानवाला न राहता तत्वकथा होतात मग मानवाला महत्त्व राहत नाही..महत्व येते ते तत्वज्ञानाला.आणि मग कथेला आकार येतो तो रूपककथेचा."

२ माझे मत: आठही कथेतील पात्रांना वरील निरीक्षण लागू पडते.सध्याचा संदर्भ: अहम् कथानायक बैरागी

अ)२० पानी कथेत बैरागी म्हातारा व गर्दीतल्या दोन माणसांशी एकूण १०वाक्ये बोलतो.त्यातली बहुतेक प्रश्नार्थक असतात.बाकी तो स्वगत बोलतो.

ब) बैरागीच्या आतापर्यंतच्या (सामाजिक) वागण्याचे तुरळक संदर्भ येतात जसे ऊबदार घर, असफल प्रेमातली ती, गंगोत्री अडवण्याचा प्रयत्न इ

क) जगणे - अचानक झपाटलेला बैरागी 'किमयाक्षण' अनुभवायला बाहेर पडतो.

ड) बैरागी जणू जी एं च्या अस्तितावादाचा प्रतिनिधी बनून नियतीच्या तालावर नाचत निराशेचे सूर आळवत मृत्यूच्या, मनाला शांत करण्याऱ्या नादात विरून जातो.

इ) बैरागी अहम् म्हणजे स्वतः चे मत, आकलनच बरोबर मानतो. तो सामाजिक संबंध म्हणजे कुटुंबसंस्था, दांपत्यप्रेम, मैत्री, शिक्षण, ज्ञान मिळविणे, स्वतः घडणे व इतरांना घडविणे, इतरांच्या (प्रेयसी. वाटसरू इ.) स्वातंत्र्याचा आदर करणे, समाजमान्य थोर लोकांचे अनुभव इ. गोष्टी दुय्यम मानतो.त्यामुळे त्यांचे प्रयत्न अपुरे, दुबळे, एकाकी, असफल ठरतात.

ई) समाजाकडून अपेक्षा - पण कोणीही एकटा जगू शकत नाही.बैरागी पण धबधबा क्षणभर थांबविल्या वर आदिवासी साधे जीवन जगणाऱ्या (असणाऱ्या) माणसांकडून 'आठवणीतल्या अमरत्वाची' अपेक्षा ठेवतो.

३ समारोप - या रूपककथांतून जगण्याचे मूलभूत प्रश्न समर्थपणे, समर्पकपणे, सुंदर कलात्मक अभिव्यक्तीने वाचकांपर्यंत पोहोचवणे यात जी इ संपूर्ण यशस्वी झाले आहेत.पण रुपककथेतील तत्वज्ञान, उत्तरे, मात्र त्या प्रमाणात वाचकांपर्यंत पोचली नाहीत असे वाटते. कारण निराशेचा व दुःखाला पण आशा व सुखाचे अस्तित्व मानावे लागते. 'बीज रोवणाऱ्या वासनेला' पण उत्कट, उत्फुल्ल प्रेम मानावे लागते.प्रत्येक अहम् ला समाजात, कुटुंबात, गावात, राहताना दुसऱ्याचा अहम् मानावा लागतो.

- माधव पुराणिक

अहम या कथेच्या आधाराने व नियतीवादाच्या सूत्रानुसार तुम्ही जीएंच्या आतापर्यंत चर्चिलेल्या आठही कथांचा एकत्र आढावा घेतला. अहम ही जीएंच्या अनेकविध वैशिष्ट्यांना दाखवणारी प्रातिनिधिक कथा आहे.

(खाली लिहिलेले बरोबर आहे का हे कृपया जाणकारांनी सांगावे.)

सांजशकुन हा जीएंच्या हयातीत प्रसिद्ध झालेला शेवटून दुसरा कथासंग्रह. (रमलखुणा आणि सांजशकुन दोन्हीही १९७५. ओंजळधारा १९८०). म्हणजे जीएंचे विचार आणि शैली यांचे परिपक्व झाल्याचा काळ हा सांजशकुन मधे आहे. आधी म्हटले तसे यातील कथांची मांडणीही अत्यंत विचारपूर्वक केलेली आहे. अहम ही कथा शेवटी (समारोपाला) ठेवून अहम या कथेचे कळसाचे शीर्षस्थान जीएंनी दाखवून दिले आहे असे मला वाटते. त्या दृष्टीने जीएंच्या प्रातिनिधिक कथांमधे अहमला वरचे स्थान असावे.

बैरागी अहम् म्हणजे स्वतः चे मत, आकलनच बरोबर मानतो. तो सामाजिक संबंध म्हणजे कुटुंबसंस्था, दांपत्यप्रेम, मैत्री, शिक्षण, ज्ञान मिळविणे, स्वतः घडणे व इतरांना घडविणे, इतरांच्या (प्रेयसी. वाटसरू इ.) स्वातंत्र्याचा आदर करणे, समाजमान्य थोर लोकांचे अनुभव इ. गोष्टी दुय्यम मानतो.त्यामुळे त्यांचे प्रयत्न अपुरे, दुबळे, एकाकी, असफल ठरतात. हे फ़ारच महत्वाचे सार तुम्ही काढले आहे. हा बैरागी म्हणजे जीएंचे आत्मभान असे गृहित धरावे का? प्रत्येक साहित्यिकाचे एक विशिष्ट (अर्थात प्रवाहीही) आत्मभान असते. तसे जीएंचे हे आत्मभान आहे का?

-सुनीळ सामंत

अहम विषयी अगदी संक्षिप्त लिहायचे तर कोहम आणि सोहम च्या आदिम द्वंदाकडे न वळता अहम म्हणजे आपल्यातील क्षुद्रत्वाची टोकदार जाणीव(जी जी ए नेहमीच करून देत असतात)असे मला वाटते

एकीकडे

जसे की यश म्हणजे "अमर्याद मानवी सामर्थ्याला त्याच्या तृप्त मुर्खपणाने घातलेली मर्यादा "

दुसरीकडे अहम म्हणजे अहंकार नव्हे, प्रत्येकाचा स्व भाव किंवा स्व वृत्ती, काहीतरी वेगळे भव्य साध्य करून काळाच्या पटलावर आपली मुद्रा उमटविण्याचा "आणखी एक"क्षुद्र प्रयत्न काहीजण आपल्या परीने करत असतात

जी एं च्या अहम कथेतील प्रपात म्हणजे कालप्रवाह आहे असे मानून चला आणि कथा त्या अंगाने वाचा मग अर्थप्रक्रिया बदलत जाईल

- महेश आफळे

'अहम्' कथेमधील बैराग्याला न समजलेली **निसर्गाची विलक्षण रमलकुंडली**

१ घटनाक्रम अ)धबधबा थांबला:बैराग्याचा निसर्गावर विजयाचा जन्माचा क्षण.३० आदिवासींच्या मनात राहणारा

ब) त्याच क्षणी तो म्हाताऱ्याच्या मृत्यू पाहतो.बैराग्याला जाणवते कि म्हातारा 'केवळ साक्षी 'होता- बैराग्यासारखा 'कर्तुत्व, भोक्तृत्व, सार्वभौम स्वातंत्र्य ' असणारा नव्हता. बैराग्याच्या तुलनेत ते दोन वाटसरु(सर्व समाज) कमी शहाणा होता

क)मग बैराग्याला महान विजयानंतर ही क्षणभंगुरता जाणवते (मरण).तोही 'केवळ साक्षी 'भावना अनुभवतो- भूक, भीती, निर्जीव निसर्गाची धास्ती ('अरे.एकातरी पाखराने ओरडावे' रे)

ड) बैरागी विजयाचा शापित असाअर्थ लावतो१) निसर्गावर विजय = मरणाचा क्षण २) जयाचा कण= रितेपणाची भावना ३)पराभव= निष्फळता ४)विजय= शरीराच्या कणाकणाला आलेला अनुभव.

येथे बैरागी स्वतः चीच साक्ष काढतो.

२ त्याला प्रश्न पडतो "निसर्गाची विलक्षण रमलकुंडली काय आहे? माझे उत्तर-

रमल हा शब्द अरबी आहे. यात फासे टाकून जे दान पडेल त्याचा विचार करून प्रश्नाचे उत्तर सांगितले जाते

बैराग्याची रमलकुंडली- यात माणसाचे 'जन्म मरण ' या काळातील क्षणभंगुर प्रश्न येतात. जन्म काळी कुंडलीत ग्रहांची स्थाने निश्चित करून खालील १२ गोष्टींबद्दल उत्तर सांगतात

" धन, मृत्यू, पत्नी, शत्रू, पुत्र, इ"

बैरागी पराकाष्ठेचे दुःखाची शक्ती मनात घेऊन "किमया क्षण म्हणजे काय?' हा प्रश्न सोडविण्यासाठी फासा घेऊन आयुष्याचे दान फेकतो.पण शरीर व मन मर्यादित असल्याने दान मर्यादित पडते.ते अमर्यादित, अफाट, अनंत निसर्गावर विजयाचा आनंद देत नाही.

फाशावर१ संन्यास २ प्रेम ३ प्रतिभेचा आविष्कार ४ भक्ती ५ योगसाधना ६ निष्काम कर्म असे काही ही उत्तर आले तरी ते मर्यादित च असणार

निसर्गाची विलक्षण रमलकुंडली- ही नियती वा वैश्विक शक्ती लिहीते. त्यात क्षणभंगुर जीवनाच्या प्रश्नाचे उत्तर नसते. त्या १२ स्थानांत प्रत्येक स्थानी अनंतासारखे उत्तर असते.

हे सत्य बैराग्याला जाणवते. तो जागृत अवस्थेतून(कार्यकारण भाव) स्वप्न (मन अवास्तव अवस्थेत) व शेवटी सुषुप्ती(गाढ झोप) अवस्थेत जातो (मनाचे सर्व विकार सूक्ष्म अवस्थेत ठेउन) पण ही काळझोप ठरते. बैराग्याचा स्थलकालातीत अनंत शक्तीच्या प्रवाहातील एक शांत, बिंदू म्हणून अंधारात कडेलोट होतो- हातात मृत्यूचे लाल (निष्) फळ घेऊन

- माधव पुराणिक

# आसरा जी ए कुलकर्णी संग्रह- सांजशकुन

आसरा - जी ए. कुलकर्णी- सांजशकुन

आसरा ही जीएंच्या बहुतांश कथांहून वेगळी, ओ हेन्री, चेकॉव्ह किंवा रविंद्रनाथ टागोरांच्या वळणाची ही कथा वाटली. (मला वाटली, इतरांचे मत जाणून घ्यायचे आहे)

कोणी एक गरजू माणूस गावातील आपले घर, जमीन व पत्नी व मुले यांना सोडून पोटासाठी दुसऱ्या गावी जातो. पण कितीतरी वणवण फ़िरल्यावरही त्याला कुठेच आसरा मिळत नाही. अखेर तो निराश होऊन एका कड्यावरून आत्महत्येसाठी झेप घेतो.

तो तिथून जात असताना व्हीलचेअरला खिळलेली एका वाड्याची एकाकी मालकीण त्याला पहाते. ती मुकी असते. त्यामुळे त्याच्या विनंतीला ती काही उत्तर देऊ शकत नाही. त्याला थांबवून, त्याने आपल्या घरात रहावे व आपले कुटुंब इथे आणावे अशी तिची मनोमन इच्छा असते. पण ती बोलू शकत नाही, हलू शकत नाही. तिची तळमळ जीएंनी आत्यंतिक करुणामय शब्दांत रेखाटली आहे.

दोन निराश व्यक्ती जर एकत्र आल्या तर त्यांचे भले होऊ शकले असते. पण तसे होऊ शकले नाही. नियतीचे हे क्रूर रुप जीएंनी या कथेत दाखवले आहे.

- सुनीळ सामंत

छान, थोडक्यात कथानक सांगितले आहे.आपला आभारी आहे.

आसरा कथा--

कुटुंब, शहर, चौक, रस्ते, संध्याकाळ, रात्रीचे चांदणे... सर्व वर्णन, शब्दप्रभू, जी एंनी, 'आसरा' कथेत समर्थपणे केले आहे . कथेत, जणू सिनेमाप्रमाणे आपण बरोबर चालत जातो. त्यामुळे कथा वाचनीय झाली आहे. प्रवाशाला स्वतःसाठी, कुटुंबासाठी आसऱ्याची गरज असते . शहरातील मुक्या, अपंग स्त्रीलाही, मोठ्या एकाकी घरात, आसऱ्याची गरज असते. पण जगात आसरा मागीतला, तर तो मिळतो असे नाही. जगाचे स्वतःचे नियम असतात.काही जमातींत तर वेगळा माणूस आला तर पहिल्यांदा त्याला विषारी बाणाने मारले जाते.

वेगळा मुद्दा मांडतो.बऱ्याचदा, एखादा आसरा मागतो, पण त्या आर्थिक, सामाजिक व्यवस्थेत आसऱ्याची किंमत देता येत नाहीत.इमारती मोकळ्या राहतात.व माणूस विकल होतो. जावे तेथे वेगळीच तऱ्हा असते.... कथेतील दोघांनाही आसरा मिळत नाही व अंधारात बुडावे लागते . माणसाला पिळ पाडणारे अनुभव, जगात मिळतात. ही कथा, अशा माणसांची, अनुभवांची होते . धन्यवाद.

विवेचक- विलास वाघोलीकर

--

विलास सर- तुम्ही खरेच या कथेतील एक वेगळाच मुद्दा- (बऱ्याचदा, एखादा आसरा मागतो, पण त्या आर्थिक, सामाजिक व्यवस्थेत आसऱ्याची किंमत देता येत नाहीत.इमारती मोकळ्या राहतात.व माणूस विकल होतो. जावे तेथे वेगळीच तऱ्हा असते.... कथेतील दोघांनाही आसरा मिळत नाही व अंधारात बुडावे लागते) - चर्चेत आणल्याबद्दल आभार. खरेच, सर्व काही पैशाने विकत घेता येत नाही. आणि विकलता ही जितकी गरीबाला असते तितकीच पण वेगळ्या तऱ्हेची श्रीमंतालाही भोगावी लागते.

या कथेला "आसरा" हे शिर्षक देण्यामागे हाच विचार असावा.

- सुनीळ सामंत

जीएंच्या भाषा शैलीचा या कथेतील नमूना म्हणजे लहान गावातून थोड्या मोठ्या गावात आल्यावर कथानयकाला जे मनात आले, जे दिसले त्याचे वर्णन.

*तो पलीकडे उतरला त्या वेळी समोरील गावामागे सूर्य मावळत होता, व त्याचा साम्य सोनेरी प्रकाश विस्तीर्ण तलावाला उजळून गातातील रेखीव रस्त्यांवर पसरला होता. गावात मध्यभागी एक मोटा चौक होता. त्याच्या चारही बाजूंनी लालभडक मोहोरांचे वृक्ष होते, आणि त्या लाल फुलांना सूर्यप्रकाशात सोन्याचे व्हावे की सच्चे रक्तलाल राहावे याचा संभ्रम झालेला दिसत होता.*

*चौकाच्या एका बाजूस वृक्षांमागे प्रचंड तटासारख्या भिंतींचा एक बाडा होता. व त्याला काचेची तावदाने असलेली एकच खिडकी होती. ती खिडकी व वाड्याचा विशाल, अवजड, लाल रंगाचा दरवाजा दोन्ही बंद होती. परन्तु रस्त्यावर मात्र उत्साहाने हातवारे करत बोलत जाणाऱ्या स्त्रीपुरषांची आकर्षक रहदारी होती. ते सुखी स्त्रीपुरुष आणि चौकात स्वच्छंद बागडणारी मुले यांच्याकडे पाहताच घरच्या आठवणींनी त्याचे मन दुखावले. पण लौकरच आपली बायको देखील या रस्त्याने अशीच सुखात फिरेल, आपली मुले या मुलांत हिंडून आनंदाने खेळत राहतील, या चित्राने त्याच्यात पुन्हा सुखाची ऊब निर्माण झाली. फुललेल्या मनानेच त्याने उतरणीचा उरलेला भाग पावलांमागे टाकला व तो गावात आला.*

- सुनीळ सामंत

आसरा- जी एंच्या या कथेतील त्या अपंग स्त्रीच्या तळमळण्याला जीएंनी ज्या शब्दांत शब्दबद्ध केले त्याला तोड नाही.

*तो तसा बाधा झाल्याप्रमाणे निघाला, हे वाड्यातील खिडकीपाशी चिरंतन बसून असलेल्या स्त्रीने पाहिले, तेव्हाच तिच्या चेहऱ्यावर विलक्षण*

*हालचाल दिसू लागली होती, व तिची बोटे जागच्या जागी थरथरू लागली होती. त्या बोटांत आपला अस्वर शब्द उमटविण्याची तिची जीवघेणी धडपड सुरू झाली होती. तिची बोटे मूकपणे म्हणत होती..."तू ये, आणि एकाकी वाड्यात खुशाल राहा, मला सोबत नाही, शेजार नाही, मी अशी चिरंतन एकाकी आहे आणि मला कोणाचा तरी आसरा पाहिजे. माझ्या भोवती तुझ्या मुलांची पावले आनंदाने नाचू देत, तुझी बायको माझ्या समीप बसून माझ्याशी सदैव बोलू दे. या माझ्या निःशब्द वाड्यात तुमचे आयुष्य मुक्तपणे नांदू देत !"*

*परंतु तिची बोटे तेथून हलली नाहीत की ओठांना स्वर फुटला नाही, कारण ती मूक असून पूर्णपणे अपंग होती. तो आवेगाने कड्याकडे जात असता सारा प्राण ताणून तिने त्याला इशारा करण्याचा प्रयत्न केला, परंतु तिचे अती दुर्बल शरीर निर्विकारपणे निश्चल राहिले.*

-सुनीळ सामंत

'आसरा' (१९६८): जीवनाची हास्यास्पदता, कारूण्य यांची निसर्गाच्या अलिप्ततेबरोबर होणारी मूक जुगलबंदी :

विवेचक :डॉ माधव पुराणिक

१ श्री नामकाकांचे मत 'ही कथा चेकोव्ह इ. यांच्याशी ची आठवण करून देते.' मी या मताशी सहमत आहे.

२ 'sorrow'(1885) या चेकाव्हच्या एका सर्वोत्कृष्ट कलेबद्दल पामिन लिहितो " या कथेत एकाच वेळी जीवनाची हास्यास्पदता व त्यातील कारूण्य यांचे मनाला दर्शन घडते.माणसाच्या आयुष्यातही या गोष्टीचे असेच मिश्रण असते.(संदर्भ:कवडसे पकडणारा कलावंत (चेकाव्ह आणि त्याची कथा - विजय पाडळकर, पान २५) मला 'आसरा' कथा अशीच वाटली.

३ मृत्यू चे वरदान - 'आसरा 'हे शीर्षक 'अ' घ्या स्वरावलीतले आहे. सकारात्मक आहे.पण आसरा नाकारल्याने शेवट नेहेमी प्रमाणे नकारात्मक आहे. जी एं नी आश्रय शब्द वापरलेला नाही कारण आश्रय घेणारा नंतर यशस्वी प्रयत्नांनी स्वावलंबी होऊ शकतो .जी एं चा नायक आधीच नक्की करतो"तात्पुरता निवास हीच आयुष्याची अटळ स्थिती आहे"

मृत्यूचा 'आसरा' नेहेमीच प्रत्येकाचे स्वागत करतो कारण समाजविन्मुख जी एं ची पात्रे आपल्या दुःखाचे कारण सामाजिक बंधने, नीतिनियम, इ.आहेत असे कधीच मान्य नाहीत.स्वत:लाच कारणीभूत समजतात. 'झपाटल्यासारखे, बाधा झाल्यासारखे ' अंतिम, अपेशी निर्णय घेतात. मृत्युमुळे जीवनाच्या असह्य दुःखातून सुटका होते.(" त्याला बायका मुलांची आठवण असह्य झाली. आवेग असह्य झाला.तो हुंदके देऊन रडू लागला) तो आत्मसन्मान विरहित जीवन जगत होता. समाजव्यवस्थेचा बळी होता (आपली अन्नदात्री जमीन त्याने परक्याच्या हातात टाकली होती) .त्याचा आयुष्याचा अर्थ भीषण होता - लाचार, दयनीय, शारीरिक काबाडकष्ट करूनही निवाऱ्याची गरज पूर्ण करण्यात अपयशी, समाजातील नियमांच्या दडपणाखाली जगणारा, स्वतला दोषी ठरवत अपराधगंडात गरगरणारा.मग मृत्यू शांतिदूत वाटणारच.

४ जीवनातली हास्यास्पदता - अ) ' आम्हाला उपरे नकोत अशा पाट्या दिसू लागल्या.ब)मंजुळ संगीताचे स्वर तो येताच थांबले क) रस्त्यावर कुत्रेही दिसले नाही ड, ) एक ही घराचे दार वा खिडकी उघडी नव्हती

५ जीवनातील कारूण्य -अ) तो हातवारे करत घरांना मी म्हणाला" मला कोणीतरी आसरा द्या........ आम्हाला जगू द्या '(येथे 'नटसम्राट'- वि वा शिरवाडकर, नायकांचे स्वगत यांची आठवण झाली)

ब) मूक आणि पूर्णपणे अपंग स्त्री ची बोटे म्हणत होती" तू ये'

क) चिरडून गेलेल्या मनाने तिने डोके टेकले. ड) मध्यरात्री पर्यंत त्याला एक शब्द बोलायला मिळाला नाही. इत्यादी

६ निसर्गाची अलिप्तता -अ) मावळतीचा सौम्य सोनेरी प्रकाश ब)हिरव्या रंगाचा वणवा क) शुभ्र प्रवाहासारखे वाहणारे चांदणे ड) रानातली गूढ शीळ इत्यादी या शोकात्म भावापासून अलिप्त होते.

७ शब्द 'बाधा झाल्याप्रमाणे ', 'झपाटल्याप्रमाणे' - भुतांची शक्ती (थोडीशी) जी एं ना मान्य असावी.प्रत्येक कथेत असे शब्द येतात.जी एं पाप - पुण्य मानत नाहीत. पण या कथेत पुण्याई शब्द आला आहे

८ समारोप एक भावपूर्ण कथा- जीवनाच्या हास्यास्पद कारूण्याला निसर्गदत्त मृत्यूच्या शांततेत तरलपणे मिटवणारी

माधव पुराणिक

आसरा-निवारा हि मानवी मुलभुत गरजे पैकी एक महत्वाची गरज.नायकाकडे निवारा नाही पण कुटुंब आहे.निरोगी शरिर आहे.स्रिकडे आसरा आहे पण कुटुंब नाही.ती मुकी-अशक्त आहे.ती त्याला आसरा द्यायला तयार आहे पण ति मुकी, अशक्त असल्याने तिला बोलता आलेल नाही.जिवनात काहीतरी मिळाल्यासारख वाटत आणि खुपशा ऊणिवाही असतात.हे दंद्व जि.ए.नी छान मांडल आहे.६)निसर्गाची अलीप्तता लिहीली आहे.मानवी भावना माणुस निसर्गाला जोडतो.तो जेंव्हा आनंदी असतो.तेंव्हा त्याला निसर्गही सुंदरच भासतो.या ऊलटही अवस्था असते. दोंघांची वेदना-कारूण्य यांना हास्यास्पद न मानता दुःखद म्हटल पाहिजे

- दिलीप बडे

दिलीप यांचे मत

६)निसर्गाची अलीप्तता लिहीली आहे.मानवी भावना माणुस निसर्गाला जोडतो.तो जेंव्हा आनंदी असतो.तेंव्हा त्याला निसर्गही सुंदरच भासतो.या ऊलटही अवस्था असते. दोंघांची वेदना-कारूण्य यांना हास्यास्पद न मानता दुःखद म्हटल पाहिजे
माधव पुराणिक यांचे उत्तर
हास्यास्पद हे गावातल्या लोकांच्या नीतीनियमांच्या प्रतिक्रियेला म्हटले आहे.व्यक्ती व समाज एकाच घटनेला परस्पर विरोधी पध्दतीने व्यक्त होतात. तो निवाऱ्याचा याचक व ती मानवी सहवासाची वाट पाहणारी अपंग स्त्री यांच्या वेदना दुःखदच आहेत.
जीवन नेहेमीचअनेक स्तरांवर प्रवाहित होते.

दिलीप यांचे मत
आसरा-निवारा हि मानवी मुलभुत गरजे पैकी एक महत्वाची गरज.नायकाकडे निवारा नाही पण कुटुंब आहे.निरोगी शरिर आहे.स्रिकडे आसरा आहे पण कुटुंब नाही.ती मुकी-अशक्त आहे.ती त्याला आसरा द्यायला तयार आहे पण ति मुकी, अशक्त असल्याने तिला बोलता आलेल नाही.जिवनात काहीतरी मिळाल्यासारख वाटत आणि खुपशा ऊणिवाही असतात.हे दंद्व जि.ए.नी छान मांडल आहे
माधव पुराणिक यांचे मत
तुमचे मत संपूर्ण बरोबर आहे.
पण प्रत्येक व्यक्तीला जीवनात जे मिळाले आहे ते टिकविण्यासाठी स्वतःला समाजात मिसळून घडावे लागते व इतरांनाही घडवावे लागते. हे खूपच कठिण असते.
जी एं नी हे अपुरे पणाचे वास्तव गडद रंगांनी वाचकांपर्यंत समर्पक रीतीने पोचविले आहे.
माधव पुराणिक

आसरा

जी ए कुलकर्णी यांच्या कथालेखनातला महत्वाचा भाग म्हणजे लेखक म्हणून आपल्या कथेत ते लुडबुड करत नाहीत.कथेत लेखक बोलता कामा नये, वाचक, समाज, प्रतिभा, आणि स्वतःची प्रतिमा या अशा गोष्टीत जी ए स्वतःला न अडकवता लेखन करतात, म्हणजे जी ए च्या कथा स्वयंभू असतात त्यांना लेखकाच्या मताची, भावनेची किनार नसते, कथेचे प्रारब्ध कथेला जिकडे घेऊन जाईल तिकडे जी ए त्या कथेला जाऊ देतात,

या निमित्तानेच परवा जी ए नी अनंत अंतरकर आणि नंतर आनंद अंतरकरांना लिहिलेल्या पत्रांचा संग्रह' एक धारवाडी कहाणी ' वाचल्यानन्तर जी ए यांची कथालेखनामागची भूमिका काय असावी याचा अंदाज येतो. अर्थात हा माझाच अंदाज आहे. असं दिसतं, की जी ए सुचलंय म्हणून लिहिलंय असं कधीच करत नसत. दिसतंय म्हणून सुद्धा नाही किंबहुना जाणवतंय म्हणूनही नाही, त्याच्या पलीकडे काही गवसतंय असं वाटलं तर ते लेखन प्रवास सुरु करत, त्यात मनाचे, विचारांचे, प्रत्यक्ष अप्रत्यक्ष भावनाचे अनेक पैलू प्रामाणिकपणे चितारत असत त्यातून काही मिळाले तर ते प्रेक्षकांचे आणि अपयश आले तर ते स्वतःचे अशी त्यांची कथालेखनाची पद्धत, या भूमिकेतून लिहिणे म्हणजे आत्मघातच पण ते passion होतं म्हणून लिहायचे.

आता आसरा कथेबद्दल मला जे वाटलं ते सांगतो.

आसरा या शब्दात आस ही आहे आणि आश्रयाची अभिलाषा ही आहे.आणि जोवर आसऱ्याची न संपणारी आस आहे तोवर आसरा न मिळता नुसती वणवण आहे. यात, आहे त्या स्थितीतुन विकासाच्या दिशेने करावं लागणारं विस्थापन ही काळाची अपरिहार्यता आहे. कोणत्याच जीवाला यातून सुटका नाही. हे जसे वैश्विक

सत्य तसे आणखी एक वैश्विक सत्य आहे, अन ते म्हणजे आपल्या समूहात नवीन घटकाचा समावेश सहजासहजी ना होऊ द्यायची सजीवांची स्वाभाविक वृत्ती!!!

गल्लीतल्या कुत्र्यांच्या बाबतीत सुद्धा हे लागू होतं, ते शाळेत कॉलेज मध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या, ज्येष्ठ नागरिकांच्या कट्ट्यावर, नव्हे मोठं मोठ्या तथाकथित बुद्धिवंतांच्याबाबतीत सुद्धा हेच सत्य आहे, नवा घटक सामावून घेताना रॅगिंग होतेच, म्हणजे जीवनाची अपरिहार्यता, अगतिकता त्याच्या प्रवाहासोबत अपरिहार्य आहे, त्यात त्याला ओलांडून सामावून घेऊ पाहणारे घटक जरी असले तरी ते त्या महिलेप्रमाणे अशक्त अपंग आणि हतबल आहेत; ज्यांना खूप वाटतं की आपल्या कथेचा शेवट असा व्हावा . पण हे असं वाटणं म्हणजे सुद्धा कथेच्या अपरिहार्यतेवर अन्याय करण्यासारखं नाहीय का???

थोडंसं वेगळं उदाहरण द्यायचा प्रयत्न करतो.

रोजच्या ठराविक वेळेला ठराविक आवडीच्या ठिकाणी जर आपण नित्य नेमाने जात असू, आणि एखाद्या ठराविक काळानंतर अचानक आपण तिकडे जायचं नाही असं ठरवलं तरी ते वळण आल्यावर पावलं तिकडं वळतातच कारण त्या रस्त्यासोबत त्या ठिकाणासोबत आपलं आतड्याचं नातं तयार झालेलं असतं, अन म्हणून त्याच वळणानं जाणं स्वाभाविक जरी वाटत असलं तरी नियती म्हणून अपरिहार्यतेला जसं मारक ठरतं तसं लेखक म्हणून सुद्धा कथेच्या प्रारब्धाला ते बाधक ठरु नये इतका प्रांजळ आणि प्रामाणिक कुठेही स्वतःच्या, वाचकांच्या, पात्रांच्या प्रभावामुळे संपूर्ण कथेवर अन्याय होणार नाही इतक्या स्वच्छपणे जी ए व्यक्त होतात. आणि जीवनात प्रत्यक्षात कुठं सोनेरी पहाट उगवते हो??? हे सगळे मनाचेच खेळ ना!!! जीवन इतकं कठोर आहे म्हणून आपण केलेले मनाचे खेळच.त्यात आपण इतके रममाण होतो की खऱ्या आयुष्याचा विसर पडून त्याची आठवण ही नको वाटते, त्या आयुष्यासमोर आपल्या सगळ्यांची अवस्था त्या खिडकीत बसलेल्या असहाय महिलेसारखीच की!

पण तरीही या सगळ्याला आसरा आहे तो या सगळ्या मोहातून स्वच्छ पणे बाहेर पडण्याचा.

पण मग म्हणजे मृत्यू का??

तर नाही!!

मृत्यु आपण सरसकट नकरात्मकतेकचे प्रतीक मानतो, पण इथं मात्र तसा काहीच उल्लेख नाही, 'त्याने निबिड होत असलेल्या भीषण अंधारात उडी घेतली.' असा उल्लेख आहे, म्हणजे आयुष्यातल्या आस म्हणजे इच्छा आकांक्षा सांभाळण्याच्या जपण्याच्या मोहात तो वणवण भटकला पण प्रत्येकाने आपापल्या इच्छा आकांक्षाचे कंपू तयार केले आहेत त्यात आगंतुकाला प्रवेश नाही!! मग जो देऊ इच्छितो त्याचा आवाज त्याच्या पर्यंत पोचू शकत नाही मग यातून बाहेर कसे पडायचे तर या आसऱ्यासाठी असलेल्या आशेच्या चक्रातून पुढे सरकत उंच कड्यावर जाताच पुढच्या काळोखात स्वतःला सोडून द्यावे, ती आस संपली की आपण निवांत!!!मग मिळतो तोच खरा आसरा

पण यातही हाच एकमेव मार्ग आहे असा आवेश नाही.

-अभयकुमार कुलकर्णी

१)मला वाटते, आसराचा समारोप पूर्ण झाला नाही.कथा विचारणीय आहे, यात शंका नाही.पण एक विचार यतो की गावाबाहेर कुटुंब ठेवलेला नायक, अंधारात उडी का घेतो.यावर चिंतन करणारे, कोणी सांगेल का.२)इस्किलार कादंबरी, महाकाव्य आहे.विचार करून लिहायला अनेकांना वेळ लागेल..तरी या कथेला. भरपूर वेळ द्यावा ह

धन्यवाद.

-विलास वाघोलीकर

सांज शकुन कथा संग्रहातील अनेक कथा आपण चर्चे साठी घेतल्या आहेत. पण जी ए चे कथा संग्रहावर अनेकांनी भाष्य करताना जी ए नी या कथा लिहिताना सगळ्या कथा मधील विश्व हे कल्पनेतील आणि त्याचा वास्तव जीवनात अशक्य आशा आघटितावर आधारित असल्याची टीका केली होती आणि गुढतेच्या आती हव्यासाने वास्तवात आशक्य आश्या घटनांवर आधारित काल्पनिक कथांचा पोकळ डोलारा उभा केल्याचे भाष्य केले होते.

जी ए नी आपल्या एका पत्रात यावर तपशीलवार स्पष्टीकरण दिले होते.

त्यात त्यांनी म्हटले होते बरेच दा आपण आणेकदा रात्रीच्या उत्तरार्धात आधर्वत झोपेत विचित्र स्वप्न पाहतो कधी एकच बाजूला दोन सूर्य उगवताना दिसतात . आपण एखाद्या जुनाट वाड्यात जातो आन अचानक सर्व बाजूचे दरवाजे खिडक्या गायब होतात आणि बाहेर पडायला रस्ताच sapdat नाही . अशाच आणेक स्वप्नांना मी कथेत शब्दबध्द केले आहे . या कथा अगदीच कल्पित आहेत हे म्हण ने खरे नाही .

मला त्यांचे हे स्पष्टीकरण पटले कारण आशि अनेक स्वप्ने मला आजुन ही पडतात. मला कळते आपण स्वप्नात आहोत पण स्वप्न पुढे सरकत राहत आणि अतर्क्य घटना घडत राहतात.

पण या कथा मधून त्यांनी गूढ पण मानवी स्वभावाचे खूपच सुंदर चित्रण केले आहे आणि नियातीपुढे सगळेच कसे हतबल होत जाते हे त्यांच्या प्रत्येक कथांचे अपरिहार्य लक्षण खूपच वेगाने अंगावर येत जाते.

मला असे वाटते त्यांच्या पारवा, हिरवे रावे, निळा सावळा यातील कथा चा वेगळा ग्रुप आणि सांज शकुन, काजळ माया मधील काल्पनिक विश्वातील कथा या तील साम्य आणि वेगळेपण यावर ही जाणकारांनी भाष्य करावे.

-विश्वेश्वर नांदेडकर

जी ए नी असे कबूल केले असलेले पत्र कोणत्या संग्रहात आहे हे कळले तर वाचता येईल. हे महत्वाचे आहे. त्यांच्या इतर लेखन पद्धतीला छेद देणारे आहे, पण तरी पटण्यासारखे आहे.

तथापि आपण नमूद केलेल्या सुरुवातीच्या भागात म्हटल्याप्रमाणे 'जी ए नी या कथा लिहिताना सगळ्या कथा मधील विश्व हे कल्पनेतील आणि त्याचा वास्तव जीवनात अशक्य आशा आघटितावर आधारित असल्याची टीका केली होती आणि गुढतेच्या आती हव्यासाने वास्तवात आशक्य आश्या घटनांवर आधारित काल्पनिक कथांचा पोकळ डोलारा उभा केल्याचे भाष्य केले होते.'

असे नमूद केले आहे. परंतु असे विधान धाडसाचे ठरेल, आजवर केलेल्या चर्चेच्याविपरीत ठरेल, असे कुणी म्हटल्याचे माझ्या तरी वाचनात आले नाही, पण जरी कुणी म्हटले असेल तर त्यावर चर्चा व्हायला हवी. स-उदाहरणते मांडायला हवे.

- अभयकुमार कुलकर्णी

माझ्याकडे सध्या त्यांच्या पत्रांचा संग्रह असलेले पाडळकर नी संपादित केलेले खंड नाहीत मी अमेरिकेत आहे . पण मी नक्की वाचले आहे . कोणाकडे हे खंड असतील तर त्यांना थोड्याशा महेनातिने हा संदर्भ सापडू शकेल

पण ही पत्रे वाचल्यास आपणास त्यांच्या अनेक कथा कशा जन्मास आल्या आणि त्या कथांचा नेमका आर्थ कसा घ्याल या विषयीच्या त्यांच्या स्वतः क्या मताना लक्षात घेतल्या शिवाय आपले मत पुरेसे योग्य राहणार नाही असे माझे मत आहे. या पत्रांमधून त्यांचे स्वतः चे अंतरंग त्यांनी मनापासून उलगडले आहेत . जिज्ञासूंनी आणि या ग्रुप क्या ज्या सदस्यांनी ती पत्रे वाचली नाहीत ती आधी वाचणे आवश्यक आहे

-विश्वेश्वर नांदेडकर

Aasra.

Aasra feels like a series of paintings to me.. the description of the humans, the lanes, the village, the night.. everything has a character to it. As I can see the social perspective of the story has already been explored by the other participants thoroughly so I will not repeat that here.

This story is like an opera. A miserable opera. The series of unending miserable events that makes the man kill himself at the end and its not just the death of one. Its the death of the hope (the old lady) Life is not just about the right people at the right place at the right time. I would say its mostly about the fortune. And no matter how hopeful you are, no matter how hard you struggle to get there, in the end you have to be FORTUNATE ENOUGH. GA keeps on highlighting how incapacitated we are in the arms of destiny in his stories..

The story leaves you with many 'What ifs..' the everlasting impact of the story haunts me still.

I am attaching a link of my reading of the same story. I am incapable of expressing a few things verbally so i have tried expressing it by choosing these paintings as a part of narration. The use of Opera vocals at the end of the reading might help you relate to it a little bit.. (I always wondered how GA liked the opera? Did he ever listen to it?)

Kasturi mahesh (Bombay)

# इस्किलार जी ए कुलकर्णी संग्रह- रमलखुणा

इस्किलार

जीए प्रेमीनी ही दिर्घ कथा वाचून भोगलेली असणारच! पुनरूक्तीबद्दल माफी मागून मी समजू शकल्याप्रमाणे सांगतो.

अर्शिया देशाच्या अर्शिपाॅलिस या भरभराटीला आलेल्या नगरीत देशाच्या अधिपतीला एली नावाची मुलगी असते. या नंतर राजाला मुलगा होतो. तोच या कथेचा नायक! मुलाला जन्म देतानाच त्याच्या आईला आपल्या प्राणाचे मोल द्यावे लागते. महिन्यानंतर बारशादिवशी या शोकांतिकेची सुरुवात होते. मुलाची कुंडली पाहून राजज्योतिषी तोंड झाकून निघून जातो. रमलशास्त्राचा अभ्यास असलेला राजा स्वत: कुंडली मांडतो. त्याला उत्तर मिळते 'हे मूल आपल्या बहिणीची हत्या करील व बापाच्या हत्येला कारणीभूत होईल'.

मन दगडाचे करून राजा मूलाच्या डाव्या हातावरील राजचिन्ह डाग देऊन मिटवतो. 'स्वत:चे रक्त पिण्यासाठी जन्मलेले हे मूल आहे' अशी चिठ्ठी सोन्याच्या नाण्यांच्या पिशवीसह त्या मूलाला एका बंदराच्या भिंतीवर ठेवतो, जिथे विदेशातील खलाशी, प्रवाशी यांचा राबता असतो.

एक व्यापारी त्या मूलाला लाओनियाला आणतो. पण मग त्या व्यापाऱ्याचा ऱ्हास होतो व तो व्यापारी तळतळटाने म्हणतो की 'तुझे स्वत:चे रक्त पिण्यासाठी जन्म झालेला असल्याचे भविष्य खोटे नाही' व हाकलून लावतो. पुढे मूलाचा देश, नाती बदलतात. एक वृद्धा कनवाळूपणाने त्याला आसरा देते. पण मग तीचे घर जाते, तीच्या पतीचा वध होतो व ती अपंग होते. त्याच्या तोंडावर थुंकून त्याला इतरांना सुखी करण्यासाठी तरी समुद्रात उडी घ्यावी असे सुचवते.आपल्यामुळे काही भिषण होणार असेल तर इतर माणसे होरपळू नयेत म्हणून

मग नायक कोणाच्याही आश्रयाशिवाय रहायची शपथ घेतो व त्याची भ्रमंती चालू होते. पण त्याला आपल्या जन्माबरोबर आपल्यासाठीच जन्माला आलेले एकमेव आपले असे ते भीषण पातक कोणते हे जाणून घेण्याची आस लागते.

या पार्श्वभूमीवर एका संध्याकाळी सुर्यास्तापूर्वी एक प्रहर कथानक पुढे सरकते. तीन वर्षांनी सातव्या महिन्यातील पौर्णिमेस सूर्य मावळण्यापूर्वी एका डोंगरावरील मंदिरात भविष्य जाणून घेण्यासाठी जातो. तेथे त्याला 'सेरिपी इस्कहार एली' असे तीनच शब्दांचे अगम्य मिळते. सूर्यास्तानंतर नायक मंदिरात राहीला असता तर जीवंत रहाणार नव्हता. भरतीच्या पाण्याने वाट बंद होताहोता नायक परततो. तेथे त्याला एक धीवर भेटतो, (जो त्याचा जन्मदाता असतो). नायकाच्या डाव्या मनगटावरील डाग पाहून पीता त्याला ओळखतो व नायकाला (ओळख न दाखवता?) त्याच्याबरोबर रात्रभर राहू देण्याचा आग्रह करतो. नायकाने परत मंदिरात न जाण्याबद्दल बजावतो. दुसऱ्या दिवशी सकाळी नायकाला गलबतात बसवून देण्याबाबत आग्रही विनवणी करतो. पण नायक तुटकपणे नकार देऊन नगरात शिरतो.

नगरात फिरताना नायकाला फुटकळ विक्रेते, एक गारूडी कट्यार विकणारा याकीर भेटतात. याकीरकडून त्याला 'सेरिपी' म्हणजे कट्यार हे कळते.

पुढे मदिरागृहात बापकमाईचा उपभोगणारा क्रिसस, एक कवी, एक तत्वज्ञ, एक मानवी गुलामांचा व्यापारी भेटतात. क्रिसस कडून नायकाला 'इस्कहार' म्हणजे रत्न असे कळते. मद्य न पीता, न पाजता व भूक मेल्यामुळे काही न खाता नायक सर्वांचा निरोप घेऊन बाहेर पडतो.

मदिरागृहाबाहेर नायकाचे गुलामांच्या व्यापाऱ्याशी बोलाचाली होतात. तो नायकाला गुलामांच्या तांड्याबरोबर रहाण्याचे काम स्वीकारण्याचे सुचवतो. त्यापुढे नायकाला रस्त्यात अर्नास नावाचा मद्यधुंद पोरसवदा भेटतो व त्याच्याकडून 'एली'

म्हणजे वसंतऋतू असे कळते. अर्नासला घराजवळ सोडत असतानाच सैनिकांच्या लवाजम्यासह एक मेणा येतो. मेण्यातील अल्थीयानामक ललना असते, जिच्या सौंदर्याची तारीफ मदिरागृहात क्रिसस व इतरांकडून नायकाने ऐकलेली असते.

अल्थीया एक पत्र देते व मंदिरात पोहोचवण्यास सांगते.

नायकाला सेरिपी इस्कहार एली म्हणजे कट्यार, लाल रत्न आणि वसंत ऋतू कळूनसुध्दा काहीच अर्थबोध होत नाही.

नायक पत्र घेऊन मंदिराकडे जातो पण तेथला सैनिक प्रमुख नायकालाच पत्र सेविकेला देण्यासाठी मंदिरात पाठवतो. गाभाऱ्याजवळ सेविका व तीची वृद्ध दासी असतात. वृद्ध दासी नायकालाच पत्र वाचून दाखवण्यास सांगते. नायक वाचतो. अल्थीयाने सेविकेच्या मायाळू कृत्याची आठवण ठेवलेलो असते. त्या दोघींसह अनेक युद्धबंदी उपाशीपोटी अत्याचार सहन करत असताना सेविका (जी वस्तुत: राजकन्या असते) एका वृद्ध सैनिकाने तीला काहीतरी खायला आणून दिलेले अन्न भुकेलेलया अल्थीयाला देते. सम्राटांची विनवणी करून अल्थीयाने सेविकेची मुक्त करण्याची परवानगी मिळवली आहे. दूसरे दिवशी सकाळी सुर्योदयाला गलबत सेविकेला पाहिजे त्याठिकाणी सुखरूप पोहोचवेल. सोबत राजवैभवाच्या निशाणीचे लाल रत्न नेता येईल. जीवंत असल्यास पित्यास व भावासही जीवदान.

नायकाने पत्र वाचून खाली टाकले व जाण्यास वळताना त्याची नजर सेविकेच्या गळयातील लाल रत्नावर पडून त्याच्या मनात रत्नाची लालसा निर्माण झाली.

त्याने पुढे होऊन रत्न पकडून हिसका दिला. सेविकेच्या तोंडातून किंकाळी येताच भितीने नायकाने तीचा आवाज थांबवण्यासाठी कट्यारीचे सेविकेच्या गळयावर धरले. इतक्यात वृद्ध दासीने चवरीच्या चांदीच्या दांड्याने नायकाच्या खांद्यावर प्रहार केल्याने नायकाचा हात वेदनेने झटकला गेला आणि कट्यारीचे पाते सहजपणे सेविकेच्या गळयात उतरले. रक्ताची धार उसळून सेविका खाली पडून

निश्र्चल झाली. थोड्याच वेळात धीवर तेथे पोहोचतो. नायक अपघाती वधाबद्दल सांगून प्रायश्चित्त मागत असताना धीवर आपण वीर्लबाने आल्याबद्दल खंतावून 'दैवी' कट असल्याचे सत्य सांगतो.

पश्चातापदग्ध नायक निदान पुढचे अर्धे भविष्य ('पित्याच्या वधास कारणीभूत')सत्यात उतरू न देण्यासाठी आत्महत्येच्या इराद्याने

पायऱ्या चढून सज्जावर जातो. ते लक्षात येतेच "थांब, ऐक" म्हणत

धीवर त्याला अडवण्यासाठी त्याचे वस्त्र पकडतो. वस्त्र सोडवताना नायकाने दिलेल्या हिसक्याने धीवराचा तोल जाऊन तो खाली कोसळून गतप्राण होतो.

जीएंच्या या दिर्घ कथेत तत्वज्ञान ठासून भरलेले आहे. जवळपास प्रत्येक पात्र आपापली भूमिका पटते.

अगदी सुरवातीच्या तांडेलापासून. तो म्हणतो मला समजलेली एक गोष्ट म्हणजे 'तू कितीही धडपड कर, आपण पोहोचायच्या वेळीच तेथे पोहोचतो'.

धीवर त्याच्या जाळयात सापडलेल्या काटेरी व विषारी 'विणकर' माशाबद्दल सांगतो. 'आता बघ, मी कोठला, हा मासा कोठला! हे जाळे कोठले! पण तीघेही असे एकत्र आलो. त्या माशाचे अंडे निर्माण झाले, जाळयाचा धागा उत्पन्न झाला, , , छट, त्यापूर्वी कितीतरी वर्षे, म्हणजे मी जन्मलो त्याच वेळी या घटनेचा प्रवास सुरू झाला. त्याच्याही पूर्वी म्हण--- पहिला माणूस, पहिला मासा मासा निर्माण झाला त्या अनादिकाळी हा क्षण जन्मला. मग अनंत काळ गेला, प्रचंड उलथापालथी झाल्या, परंतु त्या विविध धाग्यांना आपल्या नेमलेल्या गाठीचा विसर पडला नाही, आणि आज ठरलेल्या क्षणी, ठरलेल्या जागी मी, हे जाळे व हा मासा एकत्र आलो. आपल्याला विणून झालेले वस्त्र दिसते इतकेच, पण त्यामागे सतत चालू असलेली, गुंतागुंतीची सूक्ष्म वीण मात्र कधी समजत नाही'.

पुढे

' काही वेळा भूतकालच इतका अवजड होतो की त्यात सुदैवाने अज्ञात असलेल्या भविष्यकाळाचे ओझे कोणाला का हवे असते कोणास ठाऊक!'

गारूड्याचा प्रश्न ' देह कोणत्या मातीचा हे सांगता येते, पण तो कोणत्या मातीत जाणार हे कोण सांगणार?'

'भविष्य समजावून घेऊन तू करणार काय? अरे, ते तुझ्या पावलावर पाऊल टाकत तुझ्यामागोमाग येतच असते, आणि योग्य क्षण आला की मानगुटीत दात रूतवते. त्यापासून सुटकाच नाही! मग त्याला सामोरे जाऊन मुद्दाम डिवचण्यात काय अर्थ आहे?'

सूर्य का उगवतो; मी कोठून आलो? असल्या गोष्टींबाबत विचार करीत कुढत बसलेले एक तरी माकड तू कधी पाहिले आहेस? माकडाचे एक राहू दे. मनुष्याखेरीज एक तरी प्राणी आहे का की ज्याने तत्वज्ञान सांगितले आहे, धर्मस्थापना केली आहे? याचे एकच कारण आहे--- तर त्या त्या प्राण्यांना आपला धर्म, आपले तत्वज्ञान मिळालेच आहे व माणूस तेवढा अंधारात धडपडत आहे'.

तलवारी, कट्यार विकणारा याकीर म्हणतो 'हाताला भनगट असले की तलवारीला क्षितिज नाही'. तलवार विजयी झाली तर सारे सद्गुण बटिकांच्या घोळक्याप्रमाणे मागे लागून येतात'. प्रत्येक मनुष्य स्वत:च एक धर्मसंस्थापक असतो. तोच संस्थापक आणि तोच अनुयायी, आणि पहिली निष्ठा स्वत:च्या धर्माशी असते'.

मद्यागारात क्रिससचे वक्तव्य 'मी स्वत:विषयी काय बोलणार? म्हणजे विनय आड येतो असे नव्हे. एक सद्गुण म्हणून विनयाला मी काडीचेही महत्त्व देत नाही. बहुतेक माणसांच्या बाबतीत विनय म्हणजे स्वत:च्या वैगुण्यांची प्रामाणिक, खरीखुरी कबुलीच असते, तर इतर अगदी थोड्या लोकांच्या बाबतीत ते एक ढोंग, एक नाटक असते. मी बापाची, बापाच्या बापाने मीळवलेली संपत्ती मोठ्या आनंदाने उपभोगत आहे. कारण संपत्ती ही अशा भोगासाठीच असते. मग ती आपणच श्रमाने मिळवलेली असली पाहिजे, असा माझा संकुचित आग्रह नाही. संपत्तीने मी इतरांचे

श्रम विकत घेतो, या तक्रारीलाही अर्थ नाही, कारण त्यासाठीच मुळी संपत्ती जन्माला येते. ज्या समाजात ऐषाआरामाविषयी आसक्ती असलेला, रिकामा वेळ असलेला वर्ग अस्तित्वात नाही, त्या समाजात कधी कला वाढत नाहीत. चोवीस तास शेतात हाडे झिजवत असलेल्या लोकांत शेकडो वर्षे लागणारी मंदिरे किंवा तीसचाळीस वर्षे लागणारे पुतळे काय घडणार, कपाळ! श्रमाविषयी तर मला घृणाच आहे. माणसाचे श्रम कमी करत करत शून्यावर आणणे ही खरी संस्कृती. हातपाय काही राबण्यासाठी नाहीत. पाय नृत्याकरीता आहेत, तर हात इतर कलांकरीता आहेत, अलिंगनासाठी आहेत. अगदी नाइलाज म्हणूनच फार तर कष्ट करावेत, पण त्या वेळी शरमेची जाणीव असावी. श्रमाचे कसले आले कौतुक? खरूज आहे म्हणून खाजवणे फार तर, पण खरजेला अलंकार समजणे पूर्ण भाबडेपणाचे आहे. काहीतरी क्षुद्र घटना आपण घडवण्यापेक्षा मोठ्या घटना घडत असलेल्या पाहाणे, हे मला जास्त आनंदाचे आहे. थोडक्यात म्हणजे, मी गवतात पडून ढग न्याहाळणारा माणूस आहे.

द्राक्षधर्म असा एकच एक धर्म आहे की ज्याच्या संस्थापकाला अनुयायी मिळवण्यासाठी चमत्कार करून दाखवावे लागले नाहीत, की शब्दांच्या अवडंबराचे तत्वज्ञान निर्माण करावे लागले नाही.

- यतीन गुळवणी

Considering that we have already discussed Aham and now discussing Iskilar, theres one thing which I find extremely interesting and that is the insanity of the traveller in Aham and the dead brother of the snake charmer in Iskilar! धबधब्याचा प्रवाह थांबवणे आणि विषारी साप हातात धरणे.. even the mention of these things will give you goosebumps for that you know the verdict of both the

actions is death! There couldn’t be any other outcome of these actions but the characters are haunted by the self sovereignty. They are demented, passionate, might look quite unreasonable to the sane person but they represent the people who live forever in a second. They are aware that their greed / avidity to take the control of their own destiny is eventually going to kill them but they do it, for the sake of that one second! Such passion.. such thoughtful madness.. the thrill.. how come a person like GA who lived such a minimalistic, harmless, peaceful life in a small town like Dharwad dreamt of such madness? What made it appear such craze in his imagination? I am simply awestruck..

- Kasturi Mahesh

इस्किलार

या कथेत तत्वज्ञानाची पखरण पानापानागणिक आहे. उदाहरणार्थ

गुलामांचा व्यापारी माणसांच्या खरेदी-विक्री करून पोट जाळण्यात कमीपणा न वाटण्याच्या संदर्भात म्हणतो 'मेंढ्या, घोडे, उंट यांचा व्यापार करण्यात शरम नाही, तर माणसांचा व्यापार करण्यात कसली शरम आली आहे? हे प्राणी अगदी क्षुद्र आहेत, माणूस तेवढा उच्च आहे म्हणून? घोडा माणसाप्रमाणे कृतघ्न नाही.उंट वादळात मालकाला एकटा टाकत नाही. स्वत:ची स्त्री देऊन त्या जनावरांपैकी कोणी मोठेपणा मिरवत नाही. माणूस जेवढा खालच्या पातळीवर उतरू शकतो तेवढे उतरणारे जनावर नाही. शिवाय एखाद्याला हातपाय आहेत, तो पोट भरतो, तो प्रजा निर्माण करतो, केवळ एवढ्यामुळेच का तो तुझ्या बरोबरोचा ठरतो?

धर्मसंस्थापक काहीही खुळचट बोलला तरी ते शब्द गळ्यात अडकवून हजारो गुलाम होतात, हजारो वर्षे गुलाम रहातात आणि विशेष म्हणजे ही गुलामगिरी जेवढी प्राचीन, तेवढा तिचा अभिमान! जन्माला आलेल्या देशातला पोषाख करायच्या गुलामगिरीतून सुटायला फार धैर्य दाखवावे लागते! काही गुलामांना तांड्यातांड्याने निरनिराळ्या देशांत विकले जातात. बाकीचे आपल्या घरात राहूनच गुलाम म्हणून मरतात.

काही तत्वज्ञान तर आजही लागू पडते. जसे की

माणूस गुलाम असतो तो मुख्यत्वेकरून आपल्या मनात! ते कोणत्यातरी प्रमुखामागून आंधळेपणाने जाते, मठात रहाते, किंवा कोणत्यातरी नव्या प्रेषितामागे मेंढरासारखे हिंडते. आपण स्वतंत्र, स्वत: म्हणून जगण्याचे ओझे सगळ्यांनाच पेलत नाही. ही गोष्ट धर्मालादेखील फायद्याचीच आहे. जेथे प्रश्न विचारण्याची, स्वतंत्रपणे वागण्याची पूर्ण मुभा आहे, असे किती धर्म आजपर्यंत जगात टिकले आहेत? आपण गुलाम आहोत अशी कठोर जाणीव पूर्णपणे स्वीकारणारा माणूस स्वतंत्र होतो.

एकूण या कथेत जवळपास प्रत्येक पात्रच तत्वज्ञान सांगून आपापल्या भूमिकेचे समर्थन करते.

होडी इकडून तिकडे व तिकडून इकडे का फिरवतो हे न समजून फिरवणारा व ठरलेल्या (की ठरवलेल्या) वेळेसच पोहोचणारा तांडेल,

पोट भरण्यासाठी माकडउड्या मारणारा, कोणत्या मातीतला हे जाणणारा पण कोणत्या मातीत जाणार हे माहीत नसलेला व पावलापुढे पाउल जोडत गेले की जग ओलांडता येते पण जेथे पावले थबकतात तेथेच बैठक मारणारा भटक्या गारूडी,

बापकमाईवर सुख उपभोगण्यात न संकोचणारा क्रिसस,

माणसांच्या खरेदी-विक्रीचे समर्थन करणारा गुलामांचा व्यापारी,

तलवारी करण्यापेक्षा तोडीच्या वाऱ्याबरोबर तलवारबाजीत मरण्याची वा मारण्याची मनिषा असलेला कट्यार विक्रेता याकीर,

काव्य गायनात रंगणारा, मद्यपी, पण लेखन न करण्यास बजावणारा अर्नास,

आपला मादक, सुंदर देह जाणीवपूर्वक वापरून सैनिकापासून सम्राटाच्या मर्जी पोहोचलेली अल्थिया

हे सारेच तर्कशुद्ध पध्दतीने आपापले विचार मांडतात. ही सर्व पात्रे सुखी वाटतात.

अस्वस्थ आहेत

धीवर

जो कधीकाळी एका राज्याचा अधिपती होता, व आता पोट भरण्यासाठी मासेमारी करतो. रोज मंदिरात फुले ठेवण्याच्या निमित्ताने जाऊन पोटच्या मुलीच्या दूरून दर्शन घेण्याचा प्रयत्न करतो.

कथानायक

ज्याला आपले भिषण भविष्य जाणून घेण्याची आस आहे.

एली एलीथिया

रामविलास भोगून दैवदुर्विलासाने वाट्याला आलेल्या यातनांमुळे मन तडकून भ्रमिष्ट झाली आहे.

जीएंच्या या कथेत काव्य, नाट्य आहे. नवरस आहेत. थोडाफार हलका (मद्यागारात) विनोद आहे. अत्यंत तर्कशुद्ध पध्दतीने जीएंनी हे कथानक रचले आहे. त्यामागे जीएंचे खुप परिश्रम दिसतात. त्यांच्या या कलाकृतीपुढे मी फक्त दिग्मूढ होऊ शकतो.

सेरिपी, इस्कहार, एली या व इतर मराठीबाह्य शब्दांबद्दल कुतुहल आहे. जाणकारांकडून माहिती मिळणायाची खात्री वाटते.

शेवटी काय तर अटळ नियतीवाद! अल् मख्तूब मख्तूब

इस्किलारचे पारायण करताना जीएंची 'गुलाम' कथासुध्दा डोळ्यांसमोर येते.

- यतीन गुळवणी

I always feel G.A’s writing has a strong influence of western literature on it! He loves to or takes pride in creating magical realism, for example. He weaves a complex web of descriptions. The characters don’t really have a personality but everything seems so intricate that one gets pulled into the web.

- Varsha Halabe

इस्किलार – जी ए कुलकर्णी रमलखुणा

इस्किलार ही कथा एखाद्या महाकाव्यासारखी आहे. आकाराने नव्हे; वृत्तीने. महाभारत सहसा कोणी मूळ वाचत नाही. (हे दुर्दैव आहे. मराठीत केवळ ईसाहित्यकडे हे मूळ १०००० पानी महाभारत आहे). महाभारताची कथा अतिशय सुंदर तऱ्हेने गुंफलेली आहे यात वाद नाही. पण महाभारताचा आत्मा म्हणजे कथा नव्हे. ते तर शरीर. या कथेच्या आडून आणि या कथेच्या ओघात महाकवी व्यासांनी अनेक उलट सुलट तत्वे सांगितली आहेत. महाभारतात सुमारे शंभर चर्चा आहेत. आणि त्या चर्चांमधे दोन्ही पक्ष तोडीस तोड असे वाद घालतात. शंका काढतात. अगदी पितामह भीष्मांच्या उपदेशावर युधिष्ठीर उलट विधानं करतो (शरपंजरी आख्यान- भीष्मपर्व), श्रीकृष्णाशी बलराम वाद घालतो आणि जिंकतो. अर्जूनही श्रीकृष्णाला आडवेतिडवे, अडचणीत आणणारे प्रश्न विचारतो. अशा सुमारे शंभर चर्चांपैकी आपल्याला एकच माहित आहे ती म्हणजे भगवद्गीता. महाभारत हे खरे तर एकमेकांविरुद्ध तत्त्वे असलेल्या व्यक्तींची कथा आहे. इस्किलार हा तसाच प्रकार

आहे. त्यात धीवरापासून, गारुड्यापर्यंत आणि सेरेपी तलवारी घडवणाऱ्या लोहारापासून ते गुलामांचा व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यापर्यंत अनेकजण अनेक उलटसुलट तत्त्वे सांगतात. आणि गंमत म्हणजे ती दोन्हीही बाजूंनी तितकीच अस्सल असतात. या कथेतून मी अशा विधानांचा, ज्यांना वैश्विक दृढसत्ये म्हणता येईल, एक संग्रह केला आहे. आपण सर्वजण त्यात भर घालावी ही विनंती.

१) तू कितीही धडपड कर, आपण पोहोचायच्च्या वेळीच तिथे पोहोचतो- तांडेल

२) हे सारे कशासाठी हे मला कधीच समजले नाही. मी होडीवालाच का झालो, एखादा कलिंगडवाला किंवा पखालवाला का झालो नाही?- तांडेल

३) आयुष्यात रुतलेली विषारी मुळी असल्या मार्गांनी कधी शांत करता येत नाही. ती उपटून काढताना काळजाचा केवढा भाग तोडून टाकावा लागेल… -प्रवासी

४) माणूस जेव्हा आपले भविष्य जाणण्याची इच्छा व्यक्त करतो तेव्हा त्याला अनलंकृत रुद्र भविष्य नको असते, वर्तमानाविषयी त्याची आसक्ती किंचितही कमी होणार नाही असे आटोपशीर, धूसर चित्र पाहिजे असते.- सेविका

५) अंधारात चारी बाजूंनी सदैव अमूर्त साप वावरत आहेत या भितीने पिंजून जाण्यापेक्षा आपला कोणता भीषण साप आहे हे जास्त सुखाचे आहे- प्रवासी

६) पडेन, पण पडून रहाणार नाही- भग्न राजमुद्रा

७) असेच मरण्यासाठी तो भटकत या ठिकाणी आला- प्रवासी (अरिबा शिक्षा ऐकून)

८) मी कोठला! हा मासा कोठला! हे जाळे कोठले! पण तिघेही असे एकत्र आलो. त्या माशाचे अंडे उत्पन्न झाले, जाळ्याचा धागा निर्माण झाला… छट्, त्याही पुर्वी कितीतरी वर्षे जेव्हा मी जन्माला आलो, त्याच वेळी या घटनेचा प्रवास सुरू झाला. किंवा त्याहीपुर्वी… -धीवर

९) काही वेळा भुतकाळच इतका अवजड होतो, कि त्यात सुदैवाने अज्ञात असलेल्या भविष्यकाळाचे ओझे कोणाला का हवे असते कोणास ठाऊक! – धीवर

१०) जगात सर्वात मोठा आकडा स्त्रीच्या पायांचा. त्यात अडकून पडलेला पुरूष कधीच बाहेर पडत नाही. - गारुडी

११) परमेश्वर तुला उद्या ज्ञान देवो.- गारुडी

१२) देह कोनत्या मातीचा ते सांगता येते, पण तो कोणत्या मातीत जाणार ते कोण सांगणार?- गारुडी

१३) या वहाण्या एका चांगल्या बायकोसारख्य असतात, ऊबदार, टिकाऊ, बिननखऱ्याच्या आणि विशेष म्हणजे सतत कुरकुर न करणाऱ्या.- प्रवासी

१४) ते सारे करावेच लागते- गारुडी

१५) भविष्य जाणून घेऊन तू काय करणार? अरे ते तुझ्या पावलावर पाऊल टाकून मागे मागे येतच असते, आणि योग्य क्षण आला की मानगुटीत दात रुतवते. मग तू हिमालयाच्या शिखरावर जा की समुद्राच्या तळाशी जा.- गारुडी

१६) आपल्याला कोणते साप झेपतील हे मी पूर्णपणे ओळखले आहे- गारुडी

१७) सुर्य का उगवतो? त्या मंदिरासारखे मंदिर मला का बांधता येत नाही? असले प्रश्न विचारून कुढत बसलेले एक तरी माकड पाहिले आहेस?- गारुडी

१८) पावलापुढे पाऊल जोडत गेले की सारे जग ओलांडता येते- गारुडी

१९) तेवढ्याच क्षणी, त्याच क्षणी, मीचे मीपण अस्तित्वात असते. मला स्वतःला तर काहीतरी घडते आहे, यापेक्षा, आपण स्वतःहून काही मुद्दाम घडवत आहोत ही जाणीव फ़ार मोलाची वाटते.- प्रवासी

२०) प्रत्येक झाड स्वभावाने वाढते, तसे प्रत्येक माणूस आपल्याच मार्गाने जातो.- गारुडी

२१) बहुतेकांचा जन्म खडा आवाजी असतो. काहींचा मृत्यूक्षणही ढोल वाजवीत जातो.

२२) जेथे मूठ संपते, तेथेच खरी तलवार सुरू होते. - प्रवासी

२३) तलवार जास्त शुद्ध होत जात त्याची निखळ, केवळ धार उरावी. - याकीर

२४) स्त्रीची किंमत तिच्या मिठीवरून आणि तलवारीची किंमत तिच्या मुठीवरून करू नकोस.- याकीर

२५) नाण्यांची किंमत कोणाला? ज्यांच्याजवळ तितकी नाणी नाहीत त्यांना. - याकीर

२६) तसल्या सुगंधी आठवणी आयुष्यावरून सहजासहजी उतरवता येतात का?- प्रवासी

२७) असला क्षण इतका एकाकी असतो, कि तिथे आता मलादेखिल कसलेच स्थान नाही- प्रवाशाची प्रेयसी

२८) असल्या गोष्टींनीच ज्याची आठवण राहू शकते ते आठवण ठेवण्याच्या लायकीचे नसतेच.- प्रेयसी

२९) कस पहाण्यासाठी दगड पुढे यावा त्याप्रमाणे आयुष्यात असा एक क्षण रोखठोक उभा रहातो. अशा वेळी निर्णय कोण घेत असते? आणि तो कशाच्या आधारे निर्णय घेतो?- प्रवासी

३०) हातात तलवार आणि खाली परीच्या दातासारखा शुभ्र अरबी घोडा, यासारखे दुसरे आयुष्य नाही. - याकीर

३१) हाताला मनगट असले की तलवारीला क्षितिज नाही - याकीर

३२) तसले (देश, धर्म) वेड असते ते माणसाच्या मनात, तलवारीच्या नाही. आणि युद्धे जिंकली जातात ती तलवारीने, मनाने नाही. तलवारीला कसली आली आहे सदसद्विवेकबुद्धी? निव्वळ सज्जन सद्गुणी आहे म्हणून यशस्वी झालेला एकतरी दिग्विजयी तू मला दाखवू शकतोस? - याकीर

३३) हत्ती ढकलून उंदीर चिरडण्याला मी युद्ध म्हणत नाही. समोरासमोर आपल्या तोलाचा प्रतिस्पर्धी असावा. त्याला मारण्याची तुला जेवढी संधी आहे तेवढीच तुला मारण्याची संधी त्याला असली पाहिजे. मुख्य म्हणजे त्यात एकाचा मृत्यू अटळ असला पाहिजे. मृत्यू परिक्षक असल्याखेरिज लढणे म्हणजे जनानखान्यातील गुलामांनी एकमेकांशी केलेले आचरट चाळेच.

३४) संग्रामही अशा दिलदारपणे करावा की आपली तलवार त्याच्या गळयात रुतलेली असतानाही अगदी कडव्या दुष्मनानेसुद्धा म्हणावे, “अरे हा माझा वैरी जर माझा दोस्त असतातर माझ्या भाग्याचा हेवा स्वर्गालाही वाटला असता. पण त्याच्या खालोखाल भाग्य मला मिळाले आहे. माझ्या वाट्याला आसा नेकीचा वैरी मिळाला”- याकीर

३५) प्रत्येक मनुष्य स्वतःच एक धर्मसंस्थापक असतो. तोच संस्थापक आणि तोच अनुयायी. आणि पहिली निष्ठा या स्वतःच्या धर्माशी असते.

३६) कोणाचे मास काय, रक्त काय, कधीच वर जात नाही. ते खाली जमिनीकडेच जाते. ते कसे खाली ताकायचे एवढेच फ़ार तर आपल्याला ठरवता येते.- याकीर

३७) स्वतः प्रेम केलेल्या वस्तूचा स्वतःच नाश करण्याचा प्रसंग कधी येऊ नये; पण अनेकदा खरे प्रेम दाखवण्याचा एकच मार्ग उरतो आपल्यापुढे!

३८) मेंदू असलेला माणूस तत्त्वज्ञ बनेलच कशाला? जगात बनण्यासारख्या आणि करण्यासारख्या इतर अनेक गोष्टी आहेत की! - कवि

३९) बहुतेक माणसांच्या बाबतीत विनय म्हणजे स्वतःच्या वैगुण्यांची प्रामाणिक, खरीखुरी कबुलीच असते, तर इतर काही थोड्या लोकांच्या बाबतीत ते एक ढोंग एक नाटक असते.- क्रिसस

४०) ज्या समाजात ऐषारामाविषयी आसक्ती असलेला वर्ग अस्तित्त्वात नाही, त्या समाजात कधी कला वाढत नाही. चोविस तास शेतात राबत असलेल्या

लोकांत शेकडो वर्षे लागणारी मंदिरे किंवा तीस चाळीस वर्षे लागणारे पुतळे काय घडणार?- क्रिसस

४१) तुझे मत काय असे विचारताच असे लगेच आपले मत सांगायला पुढे सरसावायचे नसते- क्रिसस

४२) माणसाचे श्रम कमी कमी करत शून्यावर आणणे ही खरी संस्कृती- क्रिसस

४३) श्रमाचे कसले आले आहे कौतुक! खरूज आहे म्हणून खाजवावे हवे तर, पण खरजेला अलंकार समजणे पूर्णपणे भाबडेपणाचे आहे. -क्रिसस

४४) काहीतरी क्षुद्र घटना आपण घडवण्यापेक्षा मोठ्या घटना घडत असलेल्या पहाणे हे मला जास्त आनंदाचे आहे- क्रिसस

४५) माणूस स्वतःविषयी ऐकवू लागला की शेवटी आपणच एकटा श्रोता होण्याची पाळी येते.- क्रिसस

४६) द्राक्षधर्म हा असा एकच एक धर्म आहे की ज्याच्या संस्थापकाला अनुयायी मिळवण्यासाठी चमत्कार करून दाखवावे लागले नाहीत, की शब्दांच्या अवडंबराचे तत्त्वज्ञान निर्माण करावे लागले नाही.

४७) निव्वळ हवामानाचा विचार केला तर तसा ठीक आहे स्वर्ग! पण संगतसोबत या दृष्टीने दुसरी जागा जास्त मसालेदार वाटते- तत्त्वज्ञ

४८) ज्याला स्वतःचीच संगत इतकी आवडते त्याला कशाला अडवा- क्रिसस

४९) प्रश्न काय! कोणीही मूर्ख माणूस विचारू शकतो. – गुलामांचा व्यापारी

५०) माणूस जेवढ्या खालच्या पातळीवर उतरू शकतो, तेवढ्या खाली उतरणारा एक तरी प्राणी तुला माहित आहे?- गुलामांचा व्यापारी

५१) एखाद्याला हातपाय आहेत, तो पोट भरतो, तो प्रजा निर्माण करतो, केवळ एवढ्यामुळेच का तो तुझ्या बरोबरीचा ठरतो? – गुलामांचा व्यापारी

५२) काही माणसे खास तुझ्या बरोबरीची नाहीत, आणि लक्षात ठेव, तू स्वतः काही माणसांच्या बरोबरीचा नाहीस. – गुलामांचा व्यापारी

५३) धर्मसंस्थापक काहीही खुळचट बोलला तरी ते शब्द गळ्यात अडकवून तुम्ही हजारोंनी गुलाम होता, हजारो वर्षे गुलाम रहाता, आणि विशेष म्हणजे ही गुलामगिरी जेवढी प्राचीन तेवढा तुम्हाला अभिमान अधिक वाटतो. – गुलामांचा व्यापारी

५४) जबाबदारी आणि कर्तव्ये यापासून मुक्त असलेली अनिर्बंध सत्ता अत्यंत उन्मादकारी असते. – व्यापारी

५५) स्वातंत्र्याचे प्रेम माणसात भूक तहाने इतके उपजत नसते. – गुलामांचा व्यापारी

५६) स्वातंत्र्यप्रेम ही एक मुद्दाम निर्माण केलेली जाणीव आहे, आणि ती सतत जागी ठेवण्याचा प्रयत्न केला नाही तर ती सहज मरून जाते. – गुलामांचा व्यापारी

५७) माणूस गुलाम असतो तो मुख्यत्वेकरून आपल्या मनात. – गुलामांचा व्यापारी

५८) प्रत्येक धर्मावर अशी पाटीच लावलेली असते- 'आपले वृषण इथेच फ़ोडून घ्या. तुम्हाला शांती मिळेल' – गुलामांचा व्यापारी

५९) आपण एकेका शब्दाचे गुलामच राहतो. पण शब्दांसारखी मायावी पिशाच्चे दुसरी नसतील. तेव्हा जर प्रथम कोणती गोष्ट करायचे आपण धैर्य दाखवले पाहिजे तर एकामागोमाग कासवे उलटी करीत गेल्याप्रमाणे शब्द पालथे करीत जायला शिकले पाहिजे, म्हणजे त्यांचे फिकट दुबळे भाग देखील आपणाला दिसतील. प्रत्येक शब्दातच त्याचे विरुद्ध, विरूप दर्शन देखील कोठेतरी दडलेले असते. आणि तू शब्दाचे एकच रूप ध्यानात घेऊन त्याच्यावर विसंबलास की भलत्याच वेळी बरोबर विरुद्ध असे रूप दाखवून तो तुला फशी पाडेल. दीर्घकाल मनात द्वेष बाळगून सूड मिळवून विजय हस्तगत करावा, तर तो क्षण रिकाम्या करवंटीसारखा ठरून जय हाच पराजय ठरतो. मंगल प्रेमाच्या

परिपूर्तीत क्षणिक वासनांच्या क्षणिक समाधानाचा लगदा हाताला चिकटतो. आपणाला अंतिम ज्ञान झाले असा हर्ष होतो, तो क्षण तर केवळ पूर्ण आत्मवंचनेचा तरी असतो किंवा आपल्या लहानशा आवाक्यात जास्तीत जास्त काय आले याची अखेर कबुली असते. स्वातंत्र्याची आपल्या मनाप्रमाणे व्याख्या करून माणूस त्याविषयी बडबडतो, त्या वेळी तो कुंभारकिड्याच्या त्या लहान घरट्यात गुलाम होऊन राहतो;

- संग्राहक- सुनीळ सामंत

असंख्य वेळा इस्किलार वाचली. प्रत्येक वेळी काही नवीन, काही चमकदार या कथेत दिसते आणि मन चकाचौंध होऊन जाते. कधी गारुड्याच्या गप्पांत तर कधी मद्यागारातील चेष्टामस्करीत आनंद मिळतो, आणि ज्ञानाचे कणही. गुलामांच्या व्यापाऱ्याने मांडलेली सत्ये तर निर्विवाद वाटतात. असतीलच. कधी अल्थीयाचे सौंदर्य वाचताना मनाला सुखानुभूती येते तर कधी अल्थिया आणि राजकन्येसह पराभूत देशातील स्त्रियांवर झालेले अत्याचार वाचून भोवळही येते. जीए केवळ लेखक नाहीत. ते शब्दांचे जादूगार आहेत. चित्रकार आहेत. सिनेमॅटोग्राफर आहेत. ते महाल बनवणारे आर्किटेक्टही आहेत आणि त्यांनीच म्हटल्याप्रमाणे स्वतःच्या धर्माचे धर्मसंस्थापकही आहेत. या एका कथेतून त्यांनी जे अवकाश निर्माण केले आहे त्याला तोड नाही. आपण या अवकाशात विहरावे. बस्स.

- सुनीळ सामंत

जीए शब्दप्रभूच. त्यांच्या अनेक कथांतून स्त्रीसौंदर्याचे जिवंत वर्णन आलेले आहे. पण इस्किलारमधील अल्थिया हा परमबिंदू आहे. अल्थियाचे वर्णन करताना सारी सब्दकळा पणाला लावली आहे असे वाटते.

मेण्याच्या आत दोन कोपऱ्यांत मेणबत्त्या स्फटिकांच्या सुबक नळयांत शांतपणे तेवत होत्या. निळ्या मखमली गादीवर ती रेशमी धाग्याच्या सहज वळणाने.

मागील त्याच रंगाच्या लोडाला टेकून रेलली होती. तिने एक कोपर लालभडक गिरदीवर टेकले होते. ते जेथे रुतले होते तेथे काळ्या लालसर रंगाचा लहान डोह झाला होता व त्यातून तिचा गोरा हात कोवळ्या विषारी कंदाच्या देठाप्रमाणे वर आला होता.

कोणत्याही वस्त्रात तिच्या प्रत्यंगांच्या रेषा डौलदारपणे दिसल्याच असत्या, पण आता तिने घातलेल्या झिरझिरीत वस्त्रात, हस्तीदंतावर लालसर प्रकाश पडावा त्याप्रमाणे वाटणारी तिची कांती देखील स्पष्ट होती. ती किंचित हलली तेव्हा प्रकाशाची रेषा तिच्या पैजणांवरील रत्नांवरून सरकत झटदिशी वर चढली, अंगावरील रेशमी वस्त्रांवरून पुढे जात मेखलेवरील रत्नांत एकदम उजळली, आणि तिच्या वक्षःस्थलावरील विविधरंगी रत्नहारावर लालसेने किंचित रेंगाळून तिच्या कर्णभूषणांवर स्थिरावली. त्यांना नाजूक साखळीने जोडलेले, लहान द्राक्षांएवढे टपोरे मोती होते. ते मानेच्या साध्या हालचालीनेही सतत डुलत होते- आला क्षण, गेला क्षण. पण या स्त्रीच्या सान्निध्यात मात्र आला क्षण : मोत्याचा, गेला क्षण मोत्याचा !

त्याला वाटले, या स्त्रीमुळे दगडी पुतळ्याला देखील अभिलाषा वाटेल. शब्दांत विणलेले स्त्रीचे सौंदर्य बहुधा ती स्त्री प्रत्यक्ष पाहिल्यावर टिकत नाही. पण येथे मात्र निराळीच निराशा आहे. या सौंदर्यापुढे नेहमीचे शब्द मळक्या किड्यांप्रमाणे वाटतात. जर शब्द विजेचे असतील आणि जर त्यांना आपल्या वासाने सारी रात्रच वासकसज्जा करणाऱ्या रातराणीचा मदिर गंध असेल, तरच या सौंदर्याचे वर्णन करता येईल.

-सुनीळ सामंत

१.जीएंची 'इस्किलार' कथा, म्हणजे एक कादंबरी व महाकाव्य आहे.कथेत अनेक स्वतंत्र विचार आहेत.तसेच ग्रीकमधील ओडेपिस काव्य व इतर पार्श्वभूमी आहे.मीना प्रभूंच्या, गीतांजली प्रवास वर्णनात खूप माहिती आहे. माझ्या विवेचनात, ग्रीक उच्चारांचे बदल होवू शकतात. तसेच येथे थोडक्यात आढावा घेतला आहे .काही वैशिष्टये थोडक्यात देत आहे.

2 नायक आपला जन्मजात, डागाने कळालेला शाप काय आहे हे आयुष्यभर शोधत असतो .त्यासाठी तो अस्तित्व, पणाला लावतो. एककी रहातो. स्वतंत्र निर्णय घेत जातो. येथे अस्तित्ववाद दिसतो. पण भोवती समुद्र - नियती सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत असते .तिच्या चौकटीत त्याचे व इतरांच्या भविष्याबद्दल निर्णय होत असतात. 'रक्तमुखी' कथेप्रमाणे, प्रथम रमलशब्द कळत नाहीत .नंतर प्रसंगातून रमल शब्द कळाले तरी, त्यांचे स्पष्टीकरण कळत नाही.प्रत्यक्ष प्रसंग नियती ठरवते, घटना होतात व रमलशब्दांचा अर्थ कळतो, तेव्हा सारे संपते. ओराकल खरे होते.

३.ग्रीक कथेतील ओराकलमध्ये जीएंनी थोडा बदल करून, ' तू बहिणीला मारशील- बापाला मारशील' असा योग्य बदल केला आहे. कथा मध्ययुगीन आहे त्यामुळे काही भाषा ओबडधोबड योग्य रीतीने वापरली आहे.

४.हे महाकाव्यासारखे असल्याने, शांत, करूण, क्रुरता, वीर, शृंगार विनोद इत्यादी रसपूर्ण झाले आहे.

५कथेला ग्रीक, पर्शिया(इराण) अफगाण, समरकंद, चीन व हिंद इत्यादींचे संदर्भ येतात. ग्रीसमध्ये अक्रेपोलीस, थीब्ज, लाओस, ओराकल, ग्रीस -पर्शिया लढाई, विनाश हे संदर्भ ऐतिहासिक आहेत. वाचकांनी ते संदर्भ घ्यावेत ही विनंती.

६. प्रत्येक पात्र एकेक धडा सांगत जाते .कथेत विश्वकोषात्मक ज्ञान आहे .मासे, साप, रमले, कोडी, तलवारींचे प्रकार, मद्यालय, परदेशी भाषेतील काव्य शब्द, गुलामगिरी प्रकार, छळ, इत्यादी ज्ञान विलक्षण आहे.

७. प्रत्येक पात्र - एक धडा देत जावून कथेची साखळी पूर्ण करतात .धीवर - राजा भविष्याबद्दल दृष्टीकोण सांगतो .मद्यालयात स्कहारचा (रत्न) अर्थ कळतो. याकिरकडून सेरिपीचा अर्थ व सेरिपी म्हणजे कट्यार मिळते .गारुड्याकडून भविष्याचा वेगळा दृष्टीकोण कळतो. अर्नासकडून एली- वसंत काळ, हा अर्थ कळतो . एक विलक्षण जीवन, युद्ध व सत्ता यांचे वास्तवीक स्वरूप, अल्थिया दाखवते .जगात, न्याय शांतता, कणभर असतात .हिंसा, अन्याय डोंगरभर असतात, हे रोकडे सत्य - जगभर सर्वकाळात - आहे, हे कळते .

८.अल्थियाचे पत्र - विलक्षण इतिहास सांगते .रमलशब्दांचा अर्थ कळाला तरी घटना विलक्षण गतीने होवून, ओराकल - नियती - श्रेष्ठ ठरते.

९.अंध कुबडा पेल्यात रक्त, दारू जहर, घाम अनिश्चितपणे भरत जातो व ते पेले प्रत्येकाला मिळतात .हे नियतीवादाचे सत्य अनेक प्रकारे सांगीतले आहे . सुरुवातीला व शेवटी समुद्र आहे. "समुद्राला आपण समुद्र का झालो हे कळत नाही, विश्वाला आपण अस्तित्वात का आलो हे कळत नाही" हे बोधवाक्य, शब्दप्रभू जी ए अत्यंत धारदारपणे सांगतात.

१०. प्रतिभावंत जीएंनी मराठी साहित्याला दिलेली ही देणगी येथे थोडक्यात सांगितली आहे.

धन्यवाद

- विलास वाघोलीकर

या कथे संदर्भातले काही व्हिडिओ- आभार- दिलिप बडे

https://youtu.be/KzE-e2M_njk



'अथीना पार्थेनॉस' किंवा 'अथीना पोलिस'

' इस्किलार ' कथा- विवेचन क्रमांक2. विवेचक-विलास वाघोलीकर

याआधी या महाकथेचे थोडक्यात विवेचन केले होते . वाचक, ओडोपिस या ग्रीक नाटकाचा शोध घेवून या कथेचा जास्त आस्वाद घेतील . मी जे इतरत्र वाचले आहे. ते शेअर करण्यासाठी हे विवेचन करत आहे .ग्रीक उच्चार वेगळे असू शकतात, हे क्रुपया समजून घ्यावे .

2 इस्किलार कथेत अनेक प्राचीन देशांचे, शहरांचे, संदर्भ आहेत . ते खाली समजून घेवू -

I . ग्रीस - ग्रीसचे खूप संदर्भ आहेत . ओडिपस हा नायक, बहुतेक सोफिलिसने लिहिलेल्या नाटकात होता . तो संदर्भ आहे. त्यामध्ये थीब्जच्या राजाला मुलाबद्दल शापवाणीचे ओराकल मिळते. तो राणीला तान्ह्या मुलाला मारायला सांगतो . पण राणी त्या मुलाला धनगराकडे देते . धनगर त्याच्या पायाला सळी टोचवतो . त्यामुळे त्याचा पाय सुजून 'सुजलेल्या पायाचा 'म्हणून ओडोपिस असे नाव ठेवतात . मुलाला कॉरिन्थच्या निपुत्रिक राजाला देतात . मोठेपणी त्याला अनौरस म्हटल्यावर राग येवून, तो, लाओसला येतो . तेथे वाद होवून वडीलांना मारतो . राणी-आईशी लग्न केल्यावर, रोगाची साथ शहरावर पडते . दुसऱ्या ओराकल मध्ये सर्व कळाल्यावर राणी आत्मघात करते, व ओडोपीस स्वतःला अंध करून भटकत फिरतो . कथेत, अर्शिपोलीस साम्राज्य गेले . असे म्हटले आहे. तो, ऱ्होडस बेटावरील अक्रोपोलिस शहराचा संदर्भ आहे . इ.स.पू. 480 मध्ये पर्शियाने आक्रमण करून या शहराचा, अथिना देवळाचा विनाश केला . ग्रीकांनी 30 वर्षानंतर पुन्हा जय मिळवून ते देउळ बांधले . हे देवूळ दगडावर दगड ठेवून बांधले . दोन दगडात . o o 1 मिलिमिटरचा फरक असे . त्यामुळे ते बांधकाम टिकावू होई .

2 पर्शिया - ग्रीसचा पराभव पर्शियाने केला व कथा पर्शियाच्या राजधानीत घडते .पर्शियाचे घोडे, तलवारी प्रसिद्ध होते . तंबूतला जुगार, दारू, नृत्य हेसुद्धा संदर्भ आहेत . याकिरचे दुकान, तलवारी, युद्ध हेसुद्धा संदर्भ, अफगाण - इराणशी जोडतात

3 . कथेत ' हिंदचा उल्लेख समृद्धीचा देश, म्हणून येतो .पर्शियाचे राज्य हिंदपर्यंत होते . गारूडी हिंदमधून आलो, असा उल्लेख करतो. गारूडी म्हणतो, तुझ्या चढावांवरून तू हिंदमधून आलेला दिसतोस . त्यावर नायक म्हणतो - मी त्या चढावा हिंदमधून घेतल्या आहेत. तो तांबडा दगड खरेच हिंदमधला आहे. तेथे तसे दगड नदीकाठी कोसभर आहेत . हिंदचे लोक, स्कहारला इस्किहार म्हणतात . इत्यादी उल्लेखावरून कथेचा हिंदशी संबंध आहे . हिंद खूप समृद्ध आहे, असे उल्लेख अनेकदा येतात .

जाता जाता महत्वाची वाक्ये--न्यायाला न्यायाने उत्तर मिळते अशा भाकडकथांवर माझा विश्वास नाही. देवता ही कबूतर व तलवार घेतलेली आहे. त्यावरून शांतता टिकविण्यासाठी युद्धाची तयारी ठेवावी लागते हा संदेश मिळतो.

धन्यवाद.

- विलास वाघोलीकर

अतिशय महत्त्वाचे विवेचन. जीएंच्या कथा मुख्यतः वैश्विक असतात. त्यांना स्थळांचे संदर्भ फ़ारसे नसतात आणि असले तरीही तसे महत्वाचे नसतात. ही कथा कुठेही गडू शकते आणि कधीही, म्हणजे सार्वकालिकच.

पण तुम्ही दिलेले संदर्भ वाचून कथेच्या वाचनाची रंगत मात्र वाढली.

ही कथा ज्या देशात घडते तिथली वाईन व द्राक्षे प्रसिद्ध आहेत असा उल्लेख कथेत आहे. त्यामुले मला ते तुर्कस्थानचे इस्तंबूल शहर वाटले होते. समुद्र, बेटासारखे शहर इत्यादी. पण फ़ार विचार कधी केला नव्हता.

- सुनीळ सामंत

“अल्थिया.....” ~ आला क्षण मोत्याचा, गेला क्षण मोत्याचा ! ...जी.ए.जादू

वर्षानुवर्षे मराठी कथाप्रेमींनी जी.ए.कुलकर्णी यांच्या संदर्भात ज्या चर्चा केल्या, वाचल्या, लिहिल्या त्यात प्रामुख्याने (अर्थात साहजिकच) त्यांच्या अनेक

कथांवर त्या बेतलेल्या असणे स्वाभाविक होय. पण आज त्यांच्या लेखणीतून उतरलेल्या एका स्त्री-पात्राच्या संदर्भात हा लेख लिहिण्याचे माझ्या मनी आले आहे. सन १९७५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या जी.ए.कुलकर्णी यांच्या "रमलखुणा" या कथासंग्रहात दोन दीर्घकथांचा समावेश असून पहिली "प्रवासी" १९७१ च्या सत्यकथा दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली होती तर दुसरी "इस्किलार" मौज वार्षिक १९७३ मध्ये प्रसिद्ध झाली होती. दोन्हीही जी.ए.कुलकर्णी यांच्या समर्थ आविष्काराच्या साक्षीदार असून मराठी कथासाहित्याच्या परंपरेतील मैलाचा दगड ठरतील अशाच राहिल्या आहेत आणि राहतीलही इतकी त्यांची थोरवी आहे. "इस्किलार" कथेवर वेळोवेळी अनेकांकडून समीक्षात्मक असेल वा लेखकांविषयी मनी असलेल्या आदरापोटी असेल, ठिकठिकाणी लिखाण आले आहे. कथेची मांडणी एखाद्या ग्रीक वा इजिप्शिअन वा अरेबियन मातीत हे सारे घडले असावे अशी धाटणीने केली असून त्यावर जी.ए. यांच्या थक्क करून टाकणाऱ्या शब्दसामर्थ्याची विलक्षण अशी छाप आहे. कथेच्या सुरुवातीलाच समुद्रकिनाऱ्यावर जाळे घेऊन काम करत असलेला एक धीवर आणि शेजारी आरामासाठी वाळूत पसरलेला कथेचा नायक (ज्याला कथेत कोणतेही नाव दिले गेलेले नाही...) यांच्यातील सहज घडत आलेल्या संवादात "इलिनोआ, अर्शिया, सिथीया, लाओनिया, अर्शिपॉलिस" या राज्यांची नावे येतात म्हणजे ग्रीक/रोमन अशा परंपरीतील साम्राज्याचे हे घटक असू शकतील शिवाय अर्शिपॉलिस साम्राज्याच्या सरहद्दी हिंदपर्यंत पोचल्या होत्या असेही संवादादरम्यान नायक धीवरला सांगतो. थोडक्यात यातील कथानक अशाच ग्रीक पार्श्वभूमी असलेल्या प्रदेशातील आहे हे समजून त्या पात्रांसोबत आपल्याला प्रवास करावा लागतो....जो विलक्षण अद्भूत आणि कपाळी माझ्या काय लिहिले आहे याचा अविरत शोध घेणाऱ्या एका तरुणाच्या तडफ़डीचा आहे..... बाकी काही नाही तर त्याच्याकडे आहे नियतीने त्यालाच दिलेला एक शाप... "माझा हातून अतिभीषण पाप घडणार आहे म्हणून मला टाकून देण्यात आले एवढेच मला माझ्या नंतरच्या आयुष्यात समजले." असे

तो म्हणत राहतो. याचा नेमका असा सविस्तर अर्थ शोधण्याचा त्याचा यातनामय ठरणारा प्रवास सुरू झालेला आहे. सातव्या महिन्यातील पौर्णिमेदिवशी समुद्रकिनाऱ्या जवळ असलेल्या एका टेकडीवर असलेल्या राज्यमंदिरातील सेविका लोकांना भविष्य सांगते असा समज पसरलेला असतो आणि त्यावर विश्वास ठेवून कथानायक तिकडे आलेला आहे. मंदिरात तो येतो आणि तिथे केवळ एक दासी आणि ती सेविका या दोनच व्यक्ती पाहून याला विस्मय होतो. त्याला वाटत होते की भविष्य जाणून घेणाऱ्यांची बरीच गर्दी असेल. पण आता त्याच्याकडे जास्त वेळ नसल्याने चटदिशी आपली व्यथा तो दासीला सांगतो. दासी कर्तव्यदक्षतेने त्याचे म्हणणे त्या सेविकेपर्यंत पोचविते. त्यावर ते एकून ती सेविका त्याला देते त्याचे भविष्य म्हणून तीन शब्द "सेरिपी-इस्कहार-एली". हे शब्द जगातल्या कुठल्या भाषेत असतील वा नसतील. पण त्याला हे मिळाले आहेत बेटावरील एका मंदिरेतील भविष्य सांगणाऱ्या सेविकेकडून....त्याचा अर्थ काय ? हे तिने नाही सांगितलेले मात्र आता त्या शब्दांचा अर्थ स्वतःच शोधून काढून "मला एकच आस होती. मी जन्माला येताना केवळ माझ्यासाठीच जन्माला आलेले एकमेव माझे, असे ते भीषण पातक कोणते ? ते जाणून घेण्याची फ़क्त एकच आस..."

जी.ए. कुलकर्णी यांच्या जवळपास साऱ्याच कथा मुख्यत्वेकरून नायकप्रधान असून स्त्री पात्र कथेत येते ते पत्नी, बहीण, सून, सखी, मावशी, शेजारी, नोकरी करणारी, आजारी, वेडी अशा छोट्या म्हटल्या जाणाऱ्या भूमिकेत. रुक्मिणी, काशी, कमळी, कावेरी, गौरी, राणी, सावित्री, गुल्शी, भिंगरी, भिवरी, वासंती, राधी, चंद्रावळ या त्यांच्या काही स्त्री पात्रांची नावे जी आपल्याला १९५९ च्या त्यांच्या प्रथम कथासंग्रह "निळासावळा" ते १९७७ मध्ये आलेल्या "पिंगळावेळ" या शेवटच्या कथासंग्रहातील कथामधून भेटतात. अजूनही अनेक आहेत पण प्रामुख्याने ही सर्वसामान्य नावांसह आलेली पात्रे. रुपक किंवा प्रतिमा किंवा दृष्टांत कथाप्रवास जेव्हा त्यानी सुरू केला. उदा. "प्रवासी, विदूषक, रत्न, गुलाम, ठिपका, बळी, काली, रक्तमुखी, यात्रिक....आणि अर्थातच इस्किलार" त्यावेळी त्या अनुषंगाने स्त्री पात्रांची

नावेही कथानकाशी मेळ घेणारी ठेवली गेली.....चंचला, ध्रुवशीला...काही ठिकाणी तर केवळ "ती" इतपतच उल्लेख आल्याचे दिसते. याच इस्किलारमधील नायकाची प्रेयसी, तिचा अखेरचा निरोप घेण्यासाठी बागेत बोलावून घेऊन हा मुलूख सोडून जाण्याचा निर्णय सांगतो तेव्हा "ती" संतापली नाही की चिरडून गेल्याप्रमाणे ती हुंदकेही देऊ लागली नाही. ती त्याला एक अंगठी देत आणि इतकेच म्हणते, "ही अंगठी मी तुला आठवणीसाठी देत नाही. असल्या गोष्टीनीच ज्याची आठवण राहू शकते ते आठवण ठेवण्याच्या किमतीचे नसतेच. ही तुझ्याजवळ असली की तू कधीतरी इकडे परत येशील असे मला वाटते इतकेच. मी आता जाते...." मागे एकदाही न पाहता ती निघून गेली. तिने एकदाही, देठ वळवून कमळ इकडे फ़िरावे त्याप्रमाणे हात उंचावून बोटे हलविली नव्हती. अशी "ती". मंदिरातील ती सेविका (जी मूळची अर्शियाची राजकन्या"एलिथिया" आहे....आता गुलामीत) जिने त्याला थरथरत त्याचे भविष्य सांगितले आहे....जे त्याला अजिबात समजलेले नाही पण

मंदिरातून बाहेर पडल्यावर शोधण्याचा तो प्रयत्न करत आहे त्या गावात इकडेतिकडे भटकत माहिती एकत्र करत रात्रभर फ़िरत आहे.....मग त्यानंतर थोड्याच वेळात तुषारांचा हलकाच शिडकावा व्हावा त्याप्रमाणे बासरीचा मधुर ध्वनी येऊ लागला आणि त्यात मधूनमधून हलवलेल्या घुंगुरघोसांचा आवाज मिसळू लागला. त्यामुळी एखादी युवती पैंजणाचा नाद करीत बासरीचा स्वरच होऊन चालली आहे, असा त्याला भास होत होता. थोड्याच वेळात त्याला झगझगीत सोन्याच्या कोरीव कामाने जडावलेला मेणा दिसू लागला. वाहकांनी खाली चमकती निळी वस्त्रे नेसली असून, डोक्याला रक्तासारख्या लाल रंगाचा कपडा गुंडाळला होता. मेणा त्याच्यासमोर येताच वाहकांना इशारा मिळाला आणि ते त्यांच्यातील प्राणच एकदम शोषला गेल्याप्रमाणे त्याच क्षणी थांबले व शिलाकृतीप्रमाणे ताठ, स्तब्ध झाले. बासऱ्या-घुंगरांचे नाद देखील विरले. मेण्याच्या बाजूचा तलम रेशमी पडदा थोडा बाजूला झाला व आतून कोणीतरी त्याला म्हटले, "अरे, तू इकडे ये."

इथे जी.ए.कुलकर्णी “इस्किलार” मधील एक प्रमुख पात्र सादर करतात.... "अल्थिया !" तिचे दैवी सौंदर्य वर्णन वाचताना असे वाटते की जणू आपण रोमन आणि इजिप्शिअन साम्राज्याची रुपवती क्लिओपात्रा किंवा ट्रॉयची सुंदरी हेलेन यांच्या संदर्भातील मोहकता वाचत आहोत. जी.ए. यानी अल्थियाच्या जादूमय सौंदर्याचे जे बहारदार वर्णन केले आहे ते वाचताना जाणवते की त्यांच्या समस्त कथांमध्ये असे भारावून टाकणारे वर्णन कोणत्याच स्त्री पात्रासाठी त्यानी केलेले नाही...अल्थिया एकमेव ! म्हणूनच त्यांच्या कथाविश्वातील एक ठळक नाव. हा नायक मेण्याजवळ गेला आहे आणि रेशमी तलम पडदा बाजूला करतो. मेण्याच्या आत दोन कोपऱ्यात मेणबत्त्या स्फ़टिकांच्या सुबक नळयांत शांतपणे तेवत होत्या. निळया मखमली गादीवर ती रेशमी धाग्याच्या सहज वळणाने मागील त्याच रंगाच्या लोडाला टेकून रेलली होती. तिचे एक कोपर लालभडक गिरदीवर टेकले होते. ते जेथे रुतले होते तेथे काळया लालसर रंगाचा लहान डोह झाला होता व त्यातून तिचा गोरा हात कोवळया विषारी कंदाच्या देठाप्रमाणे वर आला होता. कोणत्याही वस्त्रात तिच्या प्रत्यंगांच्या रेषा डौलदारपणे दिसल्यात असत्या, पण आता तिने घातलेल्या झिरझिरत वस्त्रात, हस्तीदंतावर लालसर प्रकाश पडावा त्याप्रमाणे वाटणारी तिची कांतीदेखील स्पष्ट होती. ती किंचित हलली तेव्हा प्रकाशाची रेषा तिच्या पैंजणावरील रत्नांवरून सरकत झटदिशी वर चढली, अंगावरीले रेशमी वस्त्रांवरून पुढे जात मेखलेवरील रत्नांत एकदम उजळली आणि तिच्या वक्ष:स्थलावरील विविधरंगी रत्नहारावर लालसेने किंचित रेंगाळून तिच्या कर्णभूषणांवर स्थिरावली.....आला क्षण, गेला क्षण. पण या स्त्रीच्या सान्निध्यात मात्र आला क्षण मोत्याचा, गेला क्षण मोत्याचा ! (या ठिकाणी मला तिच्या असीम सौंदर्याबद्दल जी.ए.कुलकर्णी यांची लेखणी किती प्रभावाने कागदावर फ़िरत असेल याचे पूर्ण उल्लेख देण्याचा मोह होतोय, पण मी ते मुद्दाम करत नाही; कारण ज्या वाचकांनी इस्किलार ही कथा वाचलेली नाही त्यानी निदान या अल्थियासाठी का होईना ही कथा प्रत्यक्ष “रमलखुणा” हाती घेऊन तो सौंदर्यवाचन आनंद घ्यावा...).

या स्त्रीमुळे दगडी पुतळ्यालादेखील अभिलाषा वाटेल. शब्दांत विणलेले स्त्रीचे सौंदर्य बहुधा ती स्त्री प्रत्यक्ष पाहिल्यावर टिकत नाही. पण येथे मात्र निराळीच निराशा आहे. या सौंदर्यापुढे नेहमीचे शब्द मळक्या किड्यांप्रमाणे वाटतात. जर शब्द विजेचे असतील आणि जर त्यांना आपल्या वासाने सारी रात्रच वासकसज्ज करणाऱ्या रातराणीचा मदिर गंध असेल, तरच त्यांना हे शरीर सजवता येईल. इस्किलार नायकाचा सारा देह लालसेने भरला. राहिली ती वासना. भूतभविष्याची जाणीव नसलेली, केवल शारीर, झगझगीत नग्न वासना. वासनेच्या सेरिपीचे डोळे दिपवणारे उत्सुक पाते.

देखण्या अल्थियाला अनुभवाने समस्त पुरुषजातीचे हे अतिपरिचित भाव माहीत असल्यामुळे ती फ़क्त हसते आणि नितळ पापण्यांच्या उघडझापेखाली तिच्या डोळ्यांत हा आता आपला झाला या जाणीवेने त्याला जणू हक्काने, बेदरकारपणे एक काम सांगते, "माझे एक काम कर. हे पत्र वर मंदिरात पोचवायचे आहे. ते तू घेऊन जा." ~ इथून एक वेगळे कथानक सुरू होते...जे कथानायकाचे नसून एका राजकन्येचे आहे....जी आता गुलामीत वर मंदिरात राहून सेविकेचे काम करीत आहे....जिथे हे घडत आहे त्याच्या सम्राटाने अर्शिया या राज्याचा युद्धात पराभव करून राजाला पळवून लावले आहे तर राजकन्येला कैदी करून आपल्या राज्याच्या मंदिरात आणून ठेवले आहे. अर्शियातील अनेक तरुणींना स्वतंत्ररीत्या कैदी म्हणून राज्यात आणले गेले आहे. त्यातील ही एक रुपवती अल्थिया. ती अर्शियाच्या राजकन्येची मैत्रीण पण आता युद्धातील पराजितापैकी एक असल्यामुळे विजेत्याची कैदी आणि गुलामही. विजयोत्सव चालू असताना यांची सार्वत्रिक हेटाळणी चालू होती आणि इकडूनतिकडे फ़रफ़टत जात होत्या. अजूनही अल्थियाच्या मनातून त्या प्रसंगाची शरम तिच्या अंगातून जात नाही असे ती म्हणते..... हे आणि अनेक गोष्टी विस्ताराने तिने त्या पत्रात लिहिल्या आहेत. नायक वाचून दाखवित आहे आणि त्या वाचनातूनच त्याला हेही विस्मयकारक समजते की आपल्या समोर असलेली ही सेविका मंदिरात कैदी म्हणून आहे, इतकेच नव्हे तर अर्शियाची राजकुमारी आहे.

वास्तविक अल्थियाचे हे पत्र म्हणजेच जवळपास सहा पानी असून त्याला एका स्वतंत्र कथेचा बाज आहे. वाचताना तो युद्धाचा आणि पराभवाचा तसेच त्यानंतरच्या हलाखीचा आलेख दाखवितोच शिवाय नंतर ईश्वरी देणगी लाभलेल्या त्याच सौंदर्याचा आणि शरीराचा बेपर्वाईने मुक्त वापर करून अल्थियाने सम्राटाकडून राजकन्येच्या मुक्तीचे वचन मिळविलेले असते. उद्यापासून....एक गलबत येईल आणि ते एलिथिया (राजकुमारी) ला जिथे जायचे असेल तिथे घेऊन जाईल.

पुढे ? सारे काही त्याप्रमाणे होते का ? सेरिपी इस्कहार एली चा अर्थ नायकाला उलगडतो का ? एलिथिया आणि अल्थिया यांचे काय होते शिवाय नायकाच्या भाळी असलेले भविष्य कितपत सत्य होते....? या साऱ्या प्रश्नांची उत्तरे “इस्किलार” या दीर्घकथेत मिळतील. हा लेख केवळ अल्थियासाठी असल्यामुळे पूर्ण कथेचे परीक्षण इथे केलेले नसले तरीही ही कथा अत्यंत आवश्यक वाचन ही बाब मनी ठेवून वाचकांनी वाचावी.... ज्यानी वाचली आहे तेही या म्हणण्याला पाठिंबा देतील.

अशोक पाटील

जीएंची अल्थिया...

जीएंची इतर स्त्रीपात्रे आणि अल्थिया यांच्यात मला एक अतिशय महत्त्वाचा फरक जाणवला. आणि तो म्हणजे जीएंची बहुतेक स्त्री पात्रे ही प्रथम पुरुषांच्या हातातील बाहुले असतात आणि मग नियतीच्या. जीएंची बहुतेक सर्वच पात्रे ही नियतीच्या हातातील खेळणी असतातच. पण अल्थिया मात्र या सर्वांहून अगदी वेगळी. तिने तिची चोख वाट निवडली आहे. तिची मंदिरातील मैत्रीण एली प्रमाणे विटंबना झाल्यावर ती भ्रमिष्ट झालेली नाही. तर तिने आपल्या सौंदर्याच्या जोरावर पुरुषांना जाळ्यात ओढले आहे. इतकेच नव्हे तर त्या राज्याच्या सम्राटालादेखिल ती खिशात बाळगून आहे. आजवर पुरुषांकडून झालेल्या विटंबनेचा ती हरक्षण बदला घेते आहे. म्हणूनच ती रस्त्यावरच्या कुणाही पुरुषाला खुण करून बोलवू

शकते. आपले शुल्लक काम करायला भाग पाडू शकते. आणि त्याचा तिला अभिमानही वाटतो. आपल्या सौंदर्याबद्दल तिला आत्मविश्वास आहे. आपल्या शरीराकडे पाहिल्यावर आपण सांगितलेले काम पुरुष टाळू शकत नाही हे तिला माहित आहे आणि हा उंदरा मांजराचा खेळ खेळण्यात तिला धन्यता वाटते.

अशा तऱ्हेची इतरांशी खेळ खेळणारी पात्रे जीएंच्या कथेत काहीवेळा भेटतात. पुरुषमधील प्राध्यापक निकम हे इतरांशी खेळतच असतात. पारधी कथेतील वकील दादासाहेब हे इतरांशी खेळतच असतात. पण ही सारी पुरुष पात्रे. अल्थिया रंगवून जीएंनी या कथेत वेगळी वाट धरली आहे. अल्थिया पुरुषांचे शोषण करणारी आहे. अर्थात एलीच्या बाबतीतील तिच्या साऱ्याच मागण्या मान्य होत नाहीत. माझ्यासमोर आता पुस्तक नाही. पण मला वाटते राज्य परत देण्यास सम्राट तयार होत नाहीत. ही अल्थियाची मर्यादा आहे. पण तरीही ही स्त्री आपल्यामर्यादेत का होईना सर्व पुरुषांना नाचवते आहे. हे जीएंच्या अल्थियाचे वेगळेपण आहे.

ही कठोर स्त्री रंगवतानाच तिच्या स्त्रीसुलभ भावना उलगडून दाखवणे हा खास जीए टच. अल्थिया कोण हा प्रश्न नायकाने विचारल्यावर ती संतापते. “तुला अल्थिया माहित नाही?” असे ती विचारते. आपल्यासारख्या सौंदर्यवतीला न ओळखणारा या राज्यात कुणी असु शकतो यावर तीचा विश्वासच बसत नाही. दुसरे म्हणजे तिचे अलौकिक सौंदर्य हे तिचे प्रमुख हत्यार असते आणि त्याचा वापर केल्यावर तिला हवे ते भाव नायकाच्या नजरेत दिसतात. एक क्षण वाटते कथानायक तिला बधणार नाही. पण या गहिऱ्या “जहरा” समोर तो सपशेल मान टाकतो. जीएंच्या कथेत पात्रांची सूत्रे नियतीच्या हाती असली तरी जीएंची ही नायिका पुरुषांची सूत्रे आपल्या हाती ठेवून आहे आणि हेच तिचे वेगळेपण आहे असे मला वाटते.

अतुल ठाकुर

# एका देवाचा मृत्यू-- संग्रह- सांजशकुन

एका देवाचा मृत्यू- जी ए कुलकर्णी- सांजशकुन

जीएंच्या कथांतून नियतीवाद ठळकपणे उभा रहात असल्याच्या काळातील ही कथा. १९६५ साली लिहीलेल्या या कथेचा क्रम जीएंनी सांजशकुनमधे शेवटाजवळ लावला आहे. सांजशकुनची रचना अस्तित्ववादापासून (अस्तिस्तोत्र) सुधारित नियतीवादापर्यंत(अहम) अशी जीएं नी केली आहे. अहमच्या चर्चेत पुराणिक सरांनी ते नेमके मांडले आहे. एका देवाचा मृत्यू ही कथा सुधारित नियतीवादाचे सूत्र नेमके मांडते. इस्किलार मधे तेच सूत्र अगदी शिलालेख कोरल्यासारखे स्पष्ट केले आहे.

एका आईचा तरुण मुलगा आपल्या वडलांसारखाच युद्धावर जायला निघाला. तेव्हा आईने देवतेला गाऱ्हाणे घातले. देवतेने तिला वर दिला की ’त्याला रणांगणावर मृत्यू येणार नाही, शत्रूकडून त्याला भय नाही, कोणत्याही तलवारीने तो मरणार नाही.” खरे तर त्या आईने त्याला संगीत शिल्पकला, काव्य आदींमधे असे रमवले होते की तो युद्धावर जाणारच नाही असे तिला वाटे. पण एके दिवशी तो गेलाच. वर्षे गेली आणि एके दिवशी तो युद्ध जिंकून आला. आईने अत्यंत आनंदाने त्याचे स्वागत केले. देवतेला ठरलेला प्रसाद बळी दिला आणि त्या प्रसादाचा वाटा आपल्या मुलाला भरवताना त्याला ठसका लागला व तो निष्प्राण झाला.

आई देवतेकडे रागारागे गेली. तेव्हा देवतेने सांगितले की तिने जसे सांगितले तसेच झाले आहे. ’त्याला रणांगणावर मृत्यू आला नाही, शत्रूकडून त्याला मृत्यू मिळाला नाही, कोणत्याही तलवारीने तो मेला नाही.”. आईने शोकाकुल होऊन देवतेवर फ़सवल्याचा आरोप केला. तेव्हा सेविका म्हणाली, जे नियतीत असेल तेच होते. त्याचा मृत्यू असाच होता. तू मागणे मागितले नसते तरीही तो युद्धात मरणारच नव्हता. नियती पुढे कोणतीच देवता काही करू शकत नाही.

हे गुपित सांगून देवतेचे देवत्व नाहीसे होते व देवळाचे पावित्र्य भंग पावते.

जी एंची ही कथा त्यांच्या नियतीवादाच्या अलौकिक दृष्टांतकथांपैकी सर्वोत्कृष्ट कथा मानली जाते.

- सुनीळ सामंत

- जी ए कुलकर्णी- एका देवाचा मृत्यू - सांजशकुन पुस्तक

- विवेचक - विलास वाघोलीकर

- I) - जी एं च्या कथांची शिर्षके वैशिष्ट्यपूर्ण आहेत. उदा . भेट, निरोप, अनंत, स्वामी ...... या कथेचे शिर्षक, लक्षवेधक, थोडे चक्रावणारे वाटेल . देव अमर आहे, ही सर्वसाधारण श्रद्धा आहे . मग देवाचा मृत्यू बद्दल काय सांगितले असेल, ही वाचकाला उत्सुकता वाटते व तो कथा वाचू लागतो .

- २) इस्किलारप्रमाणे या कथेला प्राचीन ग्रीक पार्श्वभूमी आहे. देवतांचे देवूळ आहे . देवळात ओराकल सांगणारी सेविका आहे . ग्रीस व पूर्वेकडील (पर्शिया - इराण) देशाचे आक्रमण आहे . पिढ्यानुपिढ्यांची युद्धे आहेत . तेव्हा सामान्य माणसेही देवमूर्तीपुढे ओराकल मागत . वृद्धा मुलाला असे संगीत शिकवते की, तो चौकात अतिकोमल गीते गर्दीपुढे म्हणत असे . तिने अशी शिल्पकला शिकवली की, पाषाणातील लपलेले शिल्प जिवंत होवून प्रकट होई.

3) पण परचक्र आले . मातृभूमीच्या रक्षणासाठी तो सैन्यात जाण्याची तयारी करू लागला . वृद्धेला एकुलत्या मुलाची काळजी वाटून ती ओराकल विचारते . हिरण्यकश्यूपाच्या कथेप्रमाणे ओराकल हे "नेति नेति" स्वरूपात येते-

- "तो युद्धात मरणार नाही . तो शत्रूकडून मरणार नाही . हे त्याचे शेवटचे युद्ध असेल . . ." व सेविका गप्प होते . आईला हे रमलशब्द पुरेसे वाटतात . पण त्यामागचा नियतीचा अर्थ तिला कळत नाही .

- युद्ध संपून मुलगा घरी येतो . आणि त्याला झोपेतून उठवून आई प्रसाद देत असताना, त्याला जीवघेणा ठसका लागून तो मरतो .

4)यानंतर वृद्धा व देवीच्यावतीने सेविका, यांचे संभाषण झाले, ते मूळातून वाचले पाहिजे . त्यातून तर मानवी जीवनाची क्षणभंगुरता भावनेने प्रतित होते . देवता म्हणते, "माते माणसाला अमर करण्याचे सामर्थ्य माणसात नाही, देवातही नाही व नियतीतही नाही. फक्त तो मृत्यूक्षण नियती ठरवते व ते देवाला माहित असते . नियतीला विरोध करण्याची वेळ आली तर देव याचकासमोर उभा रहात नाही .मी हे रहस्य सांगितले.त्यामुळे देव स्वतः मध्ये विलय होईल.व हे देऊळ भग्न होईल."

5)माणसाला जे इच्छा स्वातंत्र्य असते, त्यामुळे नायक युद्धाला जावू शकतो. पण हे इच्छास्वातंत्र्य देवाच्या रमलशब्दांत बद्ध असते, व नियती ठरवते त्या परिस्थितीच्या चौकटीत असते . नियती अनाकलनीय व अनिर्वचनीय असते .

भारतीय दर्शनातही, विष्णु, गणेश देवता आहेत. पण त्यांच्याहीपेक्षा श्रेष्ठ, अनिर्वचनीय परब्रम्ह आहे. माणसाच्या अपुऱ्या कल्पनेत, परब्रम्हाचे वर्णन करायचे झाले तर, परब्रह्म, "असे नाही . असेही नाही", म्हणजे "नेति नेति "असे सांगावे लागते.

6)- जे अज्ञेयवादी आहेत त्यांनीही विचार करावा. समुद्रकिनाऱ्यावरच्या वाळूकणाएवढे माणसाचे अस्तित्व व शक्ती आहे . मिळवलेले विज्ञान बहुमोल आहे .पण ज्ञात विश्वापलिकडचे, अज्ञात विश्व व अज्ञात शक्ती, मानवजातीला कळतील, हा निव्वळ गर्व आहे . विश्व व सजीव अनिर्वचनीय आहे, हे नम्रपणे समजून घेतले पाहिजे . जी ए कुलकर्णी शब्दप्रभू आहेत . प्रतिभावंत शब्दकलाकार आहेत . त्यांनी या श्रेष्ठ कथेतून हे सर्व सांगीतले आहे . त्यामुळे मराठीतील ही श्रेष्ठ कथा आहे .

धन्यवाद .---

- विलास वाघोलीकर

खुप सुंदर आणि दिशादर्शक विवेचन आहे.

जीएंच्या प्रत्येक शब्दाचे व्यवस्थित वाचन करावे लागते तसे याही कथेत आहे.

कथेचे शिर्षक ’देवाचा मृत्यू’ नाही तर एका देवाचा मृत्यू असे आहे याही मागे खुप खोल अर्थ आहे.

हे युद्ध ’त्याचे’ शेवटचे युद्ध ठरेल असे देवता म्हणते.

प्रत्येक शब्द, काळाचे भान देणारे अनेक संकेत व्यवस्थित वाचावे लागतात.

- सुनीळ सामंत

नियती अनाकलनीय आणि निर्वचन आहे हेच खरे!

पैल पाखरे या जी. एं च्या अनुवादीत पुस्तकात O. Henry यांच्या Roads to destiny या कथेचा अनुवाद आहे.

कथेचं नांव आहे ' अदृष्ठाच्या वाटा '.

त्यातील डेव्हीड देखील अनेक मार्ग चोखळून पाहतो.

पण शेवटी नियती समोर हतबल होतो.

प्रवासात डावीकडील, उजवीकडील, सरळ सर्व मार्ग चालून पाहतो.

पण प्रत्येक ठिकाणी मृत्यू त्याला गाठतोच.

त्याचा पिस्तूलाने!

आणि त्याचा मार्गाने!!

- प्रमोद कुलकर्णी

नियती नि य त आहे. असा नियतीवाद ग्रीक तत्त्वज्ञानातून जीएंच्या साहित्यात आला असे मध्यंतरी या ग्रुपवर चर्चेला आले होते. सुरुवातीला हे पटले नाही. कारण ज्योतिषशास्त्राचा मूलाधारच मुळी नियतीवाद आहे. आणि ज्योतिषशास्त्र तर भारतात भृगूसंहितेपासून हजारो वर्षं आहे.

पण अधिक शोध घेता ज्योतिषशास्त्र मूळ बाबिलोनियन संस्कृतीत सापडते. त्यानंतर ग्रीस, इजिप्त, बगदाद, ाणि भारतात ते पसरले.

दोन्हीही महाकाव्यांत नियतीवाद आहे. रामायणात श्रावणबाळाच्या मात्यापित्यांनी दशरथाला दिलेला शाप (त्याला पुत्र नसतानाही तो पुत्रशोकाने मरेल असा), किंवा कंसाला त्याचे मरण सख्ख्या बहिणीच्या आठव्या अपत्यापासून आहे, या घटनांतून त्याकाळी नियतीवाद भारतात अस्तित्वात होता आणि भारतियांच्या रक्तपेशींत तो भिनलेला आहे.

पण जीएं इतक्या परिणामकारकतेने आणि कलात्मकतेने मराठी साहित्यात तो कोणी मांडलेला मला माहित नाही.

असो. विषयांतर झाले. पुन्हा एका देवाचा मृत्यू कडे वळूया.

या कथेतील भाषासौंदर्याचा नमूना खाली देत आहे.

- सुनीळ सामंत

एका देवाचा मृत्यू-

या कथेतील दोन वर्णने अत्यंत अप्रतिम उतरली आहेत. जीएंचा प्रत्येकच सब्द वातावरण निर्मितीचा कळस असतो. या कथेतही त्यांची दोन वर्णने मला विशेष आवडली.

१-तरुण युद्धावर जायला निघतो तेव्हाचे-

या युद्धात एकदा शत्रूचा नाश झाला की माझ्या हयातीत तरी युद्धाचा प्रसंग येणार नाही, " तो आत्मविश्वासाने म्हणाला. खांद्यापर्यंत पोचणारी, वर गरुडाचे चिन्ह असलेली ढाल त्याने उचलली व कवचाचा धातुकठोर आवाज करत तो निघून गेला. त्याच्या शिरस्त्राणावर फणा काढल्याप्रमाणे दिसणारा लाल पिसांचा तुरा उन्हात अग्निजिव्हेप्रमाणे दिसला व दूर जात जात टेकडीच्या टोकावर आभाळाच्या निळ्यात मिसळून गेला.

२- तरुण युद्धावरून परततो तेव्हाचे- युद्धातील संहाराचे वर्णन.

मग एक दिवस सैनिकांचे रथ जयघोष करीत पूर्वेकडून परतले व नगरात शिरले. अखेर युद्ध संपले होते. त्यांनी शत्रूचा संपूर्ण नाश केला होता. बर्फाची शिखरे असलेल्या पर्वताच्या उतरणीवर त्यांनी एकही घर उभे ठेवले नव्हते. त्या ठिकाणी पुन्हा वस्ती व्हायला नको म्हणून त्यांनी सारे वृक्ष जाळून टाकले व शेतात मिठाचे थर पसरले. ज्या उतरणीवर, दरीत, आभाळाला भिडलेल्या गोपुरांचे प्रासाद होते, त्या ठिकाणी त्यांनी सरड्याला उन्हात विश्रांती घ्यायला दगडावर उभा दगड ठेवला नाही. आणि दीपमालेप्रमाणे पूर्वी वाटणारा, बर्फाची शिखरे असलेला पर्वत आता त्या ठिकाणी स्मशानस्तंभाप्रमाणे वाटू लागला!

जीए वैभवाचे वर्णन जितक्या भव्यपणे करतात तितकेच दारिद्र्याचेही काळिज पिळवटून टाकणारे करतात. जीवनाचे व सौंदर्याचे वर्णन करताना त्यांची लेखणी जितकी सुंदर असते तेतकीच ती संहाराचे आणि मृत्यूचे वर्णन भेदकपणे करते. सलाम या महालेखकाला.

सुनीळ सामंत

# ऑर्फियस जी ए कुलकर्णी संग्रह- पिंगळावेळ

**ऑर्फियस**

कथा सर्वांनी आस्वादलेलीच असेल पण मला उमजलेला गोषवारा सांगतो.

ऑर्फियस व यूरिडिसी या प्रेमी युगूलाची ही कथा. त्या दोघांचे एकमेकांवर निस्सीम, निर्व्याज प्रेम असते. युरिडिसीनंतर ऑर्फियसच्या आयुष्यातील दुसरा आनंद म्हणजे त्याचे तंतुवाद्य वादनासहीतचे संगीत! त्यात तो निष्णात असतो.त्या दोघांच्या प्रेमाला दृष्ट लागल्याप्रमाणे सर्पदंशाने यूरिडिसीचा मृत्यू होतो. ऑर्फियसच्या तंतूवाद्य वादनाने यूरिडिसी निर्जीवच राहीली. ती विदेह स्वरूपात प्लूटोच्या कृष्णलोकात गेली असावी या समजुतीने ऑर्फियस प्लूटोकडे तिच्या प्राणाची याचना करण्यासाठी जाण्याचे ठरवून काळ्या विवरात तंतुवाद्य घेऊन उतरतो.

तेथील पहारेकरी सर्विरस एक भयानक प्राणी असतो पण ऑर्फियसच्या संगीताने तो शांत होतो. ऑर्फियस प्लूटोच्या अंधाऱ्या साम्राज्यात प्रवेश करताच आतील अनेक अतृप्त आत्मे घोंगावत येऊन सुटकेसाठी त्याच्यामागे लागतात. त्यानांही ऑर्फियस संगीत ऐकवून तात्पुरते शांत करतो. पण मनात शल्य 'दु:खाचा नाश करण्याचे सामर्थ्य नसल्यामुळे आपण तात्पुरती विस्मृती निर्माण केली.'

आतील सभागृहात देव व देवता आसनस्थ असतात.

ऑर्फियसच्या आगंतुक तेथे येण्याने रागावलेल्या देवतेला देव त्याच्या असामान्य संगीत गुणाबद्दल सांगतो. त्यावर देवता त्याला संगीत ऐकण्याची इच्छा व्यक्त करते. ऑर्फियसच्या गीतातील निसर्गवर्णनाने पूर्वायुष्यातील आठवणीसह आताच्या पाताळात अविनाशी अंधाराची देवतेला जाणीव होते.

ऑर्फियस यूरिडिसीला परत करा अथवा स्वःताला पाताळात राहू द्याव अशी इच्छा व्यक्त करतो. देव त्याला समजावताना सांगतात. 'देवांनासुध्दा नियतीचे नियम चुकले नाहीत. मृत्यूनं स्पर्श केल्यानंतरच येथे जीव स्वीकारले जातात. ज्याप्रमाणे तुला किंवा यूरिडिसीला अमर करण्याचं मला सामर्थ्य नाही, त्याचप्रमाणं नियतीनं तुझ्यासाठी राखून ठेवलेल्या क्षणाआधी तुला मृत्यू देण्याचंही मला सामर्थ्य नाही.'

देवतेच्या रदबदलीमुळे 'मागे वळून न पहाण्याच्या' अटीवर देव यूरिडिसीला परत पाठवण्याची 'अपवादात्मक ' परवानगी देतो.

अत्यानंदाने परतीची वाट वर चढत असता ऑर्फियस व यूरिडिसीचे संभाषण होते. त्यात त्याला कळून चुकते की ही पूर्वीची यूरिडिसी राहीली नाही. ती हाडामासात मृत्यू भोगलेली वेगळी यूरिडिसी आहे. पूर्ण विचारांती तो निर्णय घेऊन मागे वळून पहातो. 'हाडे चिंबणारी' आर्त कींकाळी देऊन यूरिडिसी नाहीशी होते.

ऑर्फियस परत देवांकडे येतो. 'उताविळपणे त्याने मागे वळून पाहीले अशा (गैर) समजूतीने क्रोधित झालेल्या देवीला समजावतो की आपली अट मागे वळून न पहाण्याची होती न बोलण्याची नव्हती. त्याचे संभाषण झाल्यावर विचारपूर्वक ऑर्फियसने मागे वळून पहाण्याचा निर्णय घेतला.'

त्यावर 'यूरिडिसीला परत यातनास्थळी पाठवण्यासाठी मुद्दाम मागे वळून पाहीले व पूर्वी कधी न घडलेली गोष्ट घडवण्यास भरीस टाकल्याबद्दल ' देवी जास्त क्रोधित होते.

यावर ऑर्फियस खुलासा करतो.

'यूरिडिसीमध्ये मृत्यू विषासारखा भिनल्यामुळे तिच्या सहवासात एक सांगाडा सतत आपली सावली आमच्यावर टाकत राहील्याप्रमाणे वाटेल. आमच्यात एक दरी निर्माण झाल्याने आंधळेपणाने नव्हे तर जाणीवपूर्वक मी मागे वळून पाहून यूदिडिसीला गमावले असून त्याबद्दल प्रायश्चित्त स्वीकारायला मी परत आलो आहे.

या वेळेस देव ऑर्फियसला युरिडिसी प्राप्त करून द्यायला तयार होतो पण फक्त सहा महिन्यांसाठी कारण

1 एकटा राहीला तर ऑर्फियस क्षणिक सुखात रमेल.

2 युरिडिसीसह त्याला आयुष्यच्या क्षणभंगुरतेची जाण राहील

3 त्यामुळे त्याची सौंदर्यासक्ती जास्त उत्कट होईल

4 प्रत्येक सुंदर वस्तू नष्ट होणार हे जाणवताच त्या वस्तूचा उपभोग जास्त उत्कटपणे व हावरेपणाने घेता येईल.

मानवी जीवनात सौंदर्यासक्ती व संततीप्रेम या भावना प्रबळ व सुखकारक आहेत. या भावनाशिवाय आयुष्य 'मळक्या चिंधीसारखे होईल. सौंदर्यासक्ती व संततीप्रेम या भावनांचा उगम क्षणभंगुरतेच्या जाणिवतेच आहे.

तेव्हा आपण देऊ केलेल्या देणगीचा स्वीकार कर.

ऑर्फियसला कृतज्ञ वाटू लागत असतानाच युरिडिसी प्रकटते. ऑर्फियस तीला परत पाताळात पाठवल्याबद्दल माफी मागून सहा महिनेतरी सूर्यप्रकाशात घालवायला मिळत असल्याने 'समजूतदार डोळयांनी' एकत्र रहायची इच्छा दाखवतो.

आता यावेळी युरिडिसी ऑर्फियस बरोबर येण्याला नकार देते. 'अर्धे वर्ष तर अर्धे वर्ष! अखेर सुख म्हणजे अटळ तडजोडच असते' असे समजावत ऑर्फियस युरिडिसीला नकाराचा फेरविचार करण्यास सांगतो.

पहिल्याखेपेला ऑर्फियस बरोबर परतताना स्वःताच्याच सुखासाठी हावरी झालेली युरिडिसी आता डोळस विचार मांडले.

1 पूर्वीच भाबडं, नीरसं सुख आता कदापि मिळणार नाही.

2 मी मृत्यूचा अनुभव घेतला आहे.

3 तू प्रीय व्यक्तीचा अनुभव घेतला आहेस.

4 एकदा या कठोर दिव्यातून गेल्यावर पूर्वीची धुंद स्वप्नं सांधता येत नाहीत.

5 आता परत येऊन जीव जडवून आसक्त होऊन आणखी आकडे खोचण्याच्या वेदना स्वीकारणे होईल.

6 एकदा सारे सोडून इकडे येताना माझा जीव तडफडला.

7 तसे आणखी भर टाकत मृत्यू करणे असह्य आहे.

8 आपल्या पुन्हा एकत्र आलो तर काय होईल?

8 A फार थोड्याना लाभणारे दोघांच्या मृत्यूचा एकच क्षण असणारे भाग्य आपल्याला नाही.

8 B तुझ्याआधी मी इकडे आले तर असह्य दुःखाने तू पुन्हा होरपळशील

8 C तू माझ्याआधी इकडे आलास तर तो मृत्यूआधीचा मृत्यू मला स्वीकारणे असह्य होईल.

9 थोड्या अनिश्चित सुखासाठी अनंत दुःखात का गुरफटावे?

10 तू इकडे कधीतरी येशील पण मला मात्र तुझ्याकडे येणं अशक्य आहे कारण मला मृत्यूच्या अनुभवाची (न विसरता येणारी, न भरून येणारी) जखम झाली आहे.

शेवटी युरिडिसी सांगते 'तु येथून जाण्याआधीच मी अन्यत्र जाईन. कारण तु परत जात असलेला मला पहावणार नाही. पण ज्यावेळी तुला इकडे यावंच लागेल त्या वेळी तु येत असलेला पाहण्यासाठी मी या अंधारात तुझी सतत वाट पाहीन.'

यूरिडिसी गेल्यावर विषण्ण मनाने ऑर्फियस प्रकाशाच्या टिंबाकडे वर परत जाण्यास निघाला.

ते दोघे गेल्यावर देवता म्हणते. 'माणूस म्हणजे डोळयांच्या उफराट्या बाहुल्यांचा प्राणी! एवढ्या आसक्तीने यूरिडिसी पहिल्यांदा प्रकाशाकडे धावली, पण अर्धे वर्ष रहाण्याची संधी मिळाली असता तीने लाथाडले. एकदा ऑर्फियसने

सुखाकडे पाठ फिरवली, दुसऱ्या खेपेला सुखाने याच्याकडे पाठ फिरवली. दोनदा संधी मिळूनही रिताच राहिलेला हा माणूस बुध्दीहिन किंवा दुर्दैवी असला पाहिजे.'

देववाणी

"त्यानी आपल्या मर्यादा ओळखल्या आहेत. यालाच कदाचित ज्ञान म्हणता येईल. वाट्याला अमर्याद दुःख, पण ते सहन करण्याची मर्यादित शक्ती; अपार आकांक्षा, पण त्या साध्य करण्यासाठी क्षीण सामर्थ्य; सावल्यांच्या जगात त्यातल्या त्यात कमी चंचल अशा सावल्यांचा आधार घेत जीवन जगण्याचा कपाळी आलेला शाप; अमृतबीज पेरूनही हाती विषफळच पडण्याची बाधा--असा हा मानव!"

पुढे देवाची मखलाशी

'आपणाला या कशाचाच ताप नाही. माणसांचं कोणतंच अग्निदिव्य आपणाला कधी भोगावं लागत नाही. म्हणून त्यांच्या बाबतीत योग्य अयोग्य ठरवण्याचा आपल्याला (आपण निव्वळ देव आहोत म्हणून) अधिकार नाही.'

अलंकारिक भाषा, तर्कशुद्ध, मुद्देसूद मांडणी, मानव व देव यांच्यातील परस्परविरोधी विचार, आपापली भूमिका विषद करताना निसर्गातील उदाहरणासहित तत्वज्ञान ही मला उमजलेली जीएंच्या कथेतील काही वैशिष्ट्ये.

भरजरी अलंकारिक भाषेबरोबर वादातीत तत्वज्ञान हे मला भावले. काव्याची बेजोड पेरणी जसे की

1 सर्विरसला शांत करताना

अंधाराच्या कडेला लाल पाण्याची भरतीची लाट आली
मग संथ होऊन क्षितिजावर सोनेरी पसरली
गोल शिडांचे एक जहाज त्यावर प्रवास लागले करू
त्याचा प्रवास निळ्या सागरात लागला विस्तारू

सायंकाळी पुन्हा येताच ओहोटी लाल लाल

सोन्या-रत्नानी ओझावलेले जहाज

स्वप्नप्रवास संपवून क्षितिजाखाली निघून गेले

त्याची स्मृती डोळयांत साठवून दिपस्तंभ मात्र रात्रभर तपस्व्याप्रमाणे खडकावर ध्यानस्थ राहिला

2 देवतेला संगीताची चुणूक दाखवताना ऑर्फियस म्हणतो

टेकडीवर पसरला मखमली हिरवा उतार

त्यावर निळसर वाकलेल्या आभाळाखाली

विविध रंगांच्या फुलांचा उत्सव दिसला

त्यांच्यावरून सरकताना रंगीत गंधाच्या स्पर्शाने वारा धुंद झाला व स्वभाव विसरून तेथेच रेंगाळला

त्यावेळी हातांतील काकणांचा आवाज करीत एक सौंदर्यवती आली आणि निर्भर आनंदाने तिने ओंजळभर फुले उचलली.

घटनाबाहुलता, योगायोग, चातुर्य अशा गुणांनी परिपूर्ण कथेत 'मृत्यूनंतरच्या काळाचा वेध घेतला आहे.

एका मुद्द्यावर माझा गोंधळ झाला आहे.

पहिल्या वेळी यूरिडिसीला सदेह स्वरूपात प्रकाशात पाठवताना काळाचे बंधन नसते. मात्र दुसऱ्यावेळेस सहा महिन्यांसाठी पाठवणायाची तयारी देवाने का दाखवली. माझ्यामते यात तीन स्पष्ट झाल्या

1 ऑर्फियसचा मागे वळून पाहून प्रीय यूरिडिसीला (ती पूर्वीची न रोहील्यामुळे) नरकात परत पाठवण्याची निर्णयकठोरता स्पष्ट होते.

2 दुसऱ्याखेपेस यूरिडिसीची परत न जाण्याची निर्णयकठोरता स्पष्ट होते.

3 'सौंदर्यासक्ती व क्षणभंगूरता यातून निर्माण होणारी प्रबळ व सुखकारक अशी प्रजननाची ओढ' हे देवेचे तत्वज्ञान अधोरेखित होते.

पण हेच पहिल्याखेपेस पटवून यूरिडिसीला (सहा महिन्यांसाठी) पाठवता आले असते. पण मग दोनदा हा प्रकार ऑर्फियस व यूरिडिसी याना नकाराची संधी देण्यासाठी योजला असावा का?

तज्ज्ञांच्या मताची आशा आहे.

सर्व जीएंच्या चाहत्याना नम्र अभिवादन!

- यतीन गुळवणी

ऑर्फियस- जी ए- पिंगळावेळ

ऑर्फियस ही कथा इतकी गुंतागुंतीची आहे की त्याचे सूतोवाच कसे काय असेल हा मला प्रश्नच पडला होता. ही कथा जितकी सुंदर आहे तितकीच गूढ आहे. जेव्हा प्रथम वाचली तेव्हा तर मूळ कथा माहितच नव्हती. त्यामुळे अजूनच गोंधळ उडाला.

यतीनजींनी अत्यंत सुंदर रितीने हे शिवधनुष्य पेलले याबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन. त्यांनी जमेल तितकी ही कथा सुलभपणे मांडली आहे पण शेवटी त्यांनीही आपल्या मनाचा गोंधळ व्यक्त केला आहे आणि तो कोण सोडवेल याची मीही उत्सुकतेने वाट पहातो आहे.

मुळात ही कथा वाचताना त्यातले शब्द सौंदर्य इतके लोभस आहे की त्या मोहक वातावरणात कथेकडे काहीसे दुर्लक्षच होते. उदा. संगीताबद्दल इतके सुंदर आजवर कोणीच लिहिले नसेल. तिथेच मन गुरफ़टून रहाते. पुढची कथा दिसतच नाही.

त्याने संथपणे तंतूंच्या उभ्या रेषांना गोंजारायला सुरुवात केली. त्या घन अंधारात स्वरांच्या लहरीबरोबर नितळ सूर्यप्रकाश दिसू लागला. तोच सूर्यप्रकाश उकलून त्याच्या रंगछटा वाद्यातून निर्माण होऊ लागल्याप्रमाणे गीत प्रकट होऊ

लागले. अंधाराच्या कडेला प्रथम लाल पाण्याची भरतीची लाट आली व ती संथ होऊन क्षितिजावर सोनेरी पसरली. मग गोल शिडांचे एक जहाज त्यावर प्रवास करू लागले. हळूहळू त्याचा प्रवास महान निळ्या सागरात विस्तारू लागला आणि सायंकाळी पुन्हा लाल ओहोटी येताच सोने-रत्ने यांनी ओझावून गेलेले जहाज आपला स्वप्नप्रवास संपवून क्षितिजाखाली निघून गेले आणि त्याची स्मृती डोळ्यांत ठेवून दीपस्तंभ मात्र रात्रभर एखाद्या तपस्व्याप्रमाणे खडकावर ध्यानस्थ राहिला... पाहतापाहता समोरील सहा सूर्य मावळल्यासारखे झाले. कुत्र्याची शेपटी असलेला सर्प अंग मागे ओढत वेटोळ्यावेटोळ्यांनी स्वस्थ झाला

- सुनीळ सामंत

कथेसंबंधातील व्हिडिओंच्या लिंक्स - आभार- श्री दिलिप बडे

https://youtu.be/3zkdPiPUTiw

https://youtu.be/3NB0LOUPGJY

## जी.ए.कुलकर्णी यांची 'ऑर्फीयस कथा '

## लेखक - व्ही.एस वाघोलीकर

जी . ए . कुलकर्णी यांच्या पिंगळावेळ पुस्तकातील, ' ऑर्फियस ' या कथेत, म्रुत्यु, कला, ज्ञान, पूर्ण ज्ञान, मानवाची नियती, इत्यादींचे कलात्मक पैलू दाखवले आहेत . मृत्यूबद्दल या कथेत जास्तीत जास्त विचार केला आहे . मृत्यूबद्दल जीएंच्या, काली, स्वामी, एका देवाचा मृत्यू, निरोप (पारवा)इत्यादी कथा आहेत . ऑर्फियसमध्ये जीएंचे, विशेषतः म्रुत्युबद्दलचे, प्रतिभाशाली शब्द आहेत.

भाग एक- कथेचा सारांश - सोबतच्या प्रिय व्यक्तीचा मृत्यू झाल्यावर, त्या सोबतच्या व्यक्तीला काय अनुभव मिळतो . व नंतरही, प्रतिभेने विचार करून,

सोबतच्या व्यक्तीला व मृत प्रिय व्यक्तीला, काय अनुभव येतात, हे या कथेत व्यक्त केले आहे . यासाठी ग्रीक मिथककथेचा आधार घेवून प्रतिभेने इमला बांधला आहे . युरिडीसी ही ऑर्फियसची प्रिया, त्याच्यासोबत टेकडीवर असते . पण तिचा अचानक सर्पदंशाने म्रुत्यू होतो. तेव्हा संगीत कलावंत असलेला ऑर्फियस, कलेची आराधना करतो . पण संगीतानंतरही युरिडीसीचे मृत शरीर तसेच राहते.

आता काय करायचे असा ऑर्फियसला प्रश्न पडतो . मग युरिडिसीला म्रुत्युलोकातून आणण्यासाठी धाडसी ऑर्फियस, तिकडे देवाच्या मृत्यूलोकात, जाण्याचे ठरवतो . ऑर्फियसच्या संगीताने, रक्षक सर्बिरस, गुंग होवून शांत होतो. त्याला ओलांडून, तो देव देवतेसमोर उभा राहतो . व देवतेच्या सांगण्यावरून तेथे वाद्यसंगीत पेश करतो. मग देवतेच्या आग्रहावरून देव त्याला वर देतो, की युरिडिसी त्याच्या मागोमाग येईल, पण सूर्यप्रकाशात जाण्याआधी त्याने मागे वळून पाहता कामा नये .

ऑर्फियसच्या मागे युरिडीसी जाते व त्यांचा संवाद होतो. पण शेवटच्या घडीला, काही विचाराने, ऑर्फियस मागे वळून पाहतो. युरिडीसी किंकाळी फोडून परत देवाकडे जाते.ऑर्फियसला पश्चाताप वाटतो . तो परत देवदेवतेसमोर येवून उभा रहातो . देवता त्याचा धिक्कार करते .पण ऑर्फियसने क्षमा मागीतल्यावर, देव दुसरा वर व निर्णय देतो . देव युरिडीसीला बोलावून सांगतो, " वर्षातून सहा महिने युरिडीसी प्रुथ्वीवर सूर्य प्रकाशात राहील . मग मृत होवून, सहा महिने इकडे मृत्यू लोकात येईल. असे चक्र चालू राहील."

ऑर्फियसला हा निर्णय मान्य होतो . पण यावेळी युरिडीसीच या वरदानाला नकार देते, तेव्हा पुन्हा त्यांचा संवाद होतो . ऑर्फियसचा नाईलाज होतो ..तो परत प्रुथ्वीवर येतो. नंतर तिकडे देवदेवतेचा संवाद होतो. तेच जीएंचे या कथेचे भरतवाक्य आहे . तो परिच्छेद वाचकांनी मुळातून वाचावा असा आहे.प्रिय व्यक्तीचा मृत्यू होताना, व नंतर प्रतिभेने व्यक्त केलेले मृत्यूनंतरचे प्रसंग, या कथेत आहेत . या सर्वांचे साक्षीदार, ऑर्फियस व युरिडीसी आहेत, असे दाखवूनच जीएंना हे शक्य झाले आहे.

पुढे काय घडते ? देवदेवतेच्या संवादानंतर जी एंची कथा संपते . पण कथेत आधी एका प्रसंगात देवता म्हणते की, " ऑर्फियस, तू पृथ्वीवर एकटा गेल्यावर, युरिडीसीसाठी तकमळत राहशील. " असे सांगून पुढील घटना सूचित केली आहे .

कथेचा सारांश येथे दिला आहे. पण वाचकांनी मूळ पूर्ण कथा पूर्वी वाचली असेल, किंवा आता वाचावी ही विनंती आहे.

भाग दोन- कथेबद्दल विवेचन - कथेत चार पात्रे आहेत . तसेच नियतीही उपस्थित आहे. ऑर्फियस , युरिडीसी, देव, देवता, या चार पात्रांमार्फत मृत्यूच्या गुंतागुंतीचे ज्ञान, प्रत्येकाच्या क्षमतेप्रमाणे व त्या त्या परिस्थितीप्रमाणे मिळते . प्रसंगांप्रमाणे मृत्यूचे ज्ञान खालील प्रमाणे बदलत जाते--

ए)प्रुथ्वीवर युरिडीसीचा म्रुत्यु होतो. ऑर्फियसच्या इतर वेळच्या अलौकिक संगीत कलेनेही त्यावर परिणाम होत नाही. हा ऑर्फियसच्या द्रुष्टीने प्रिय व्यक्तीच्या म्रुत्यूचा पहिला अनुभव आहे, की जीवन व म्रुत्यु हे परस्परविरोधी आहेत.

दुसऱ्या पैलूने विचार केला, तर शरीराच्या आतल्या हालचालीही संपतात, मनही संपते, म्रुत्यु होतो. याउलट जीवन असते, अशी ही वास्तव समज आहे.

बी) देव प्रथम, युरिडीसीला परत देण्यास नकार देतो. जीवन व म्रुत्यु हे परस्परविरोधी आहेत, ही भूमिका येथे पुन्हा व्यक्त होते.

दुसऱ्या पैलूने विचार केला तर, स्म्रुती, काळाची जाणीव, लिथी नदीच्या किनारी टाकल्यावर देवाच्या राज्यात जीव येतो.जीवन त्याविरुद्ध आहे, असा हा म्रुत्यूबद्दल समज आहे.

सी) नंतर संगीत ऐकल्यावर, व देवतेने सांगितल्यावर, देव ऑर्फियसला पहिला वर देतो. त्यावेळी, युरिडीसी, स्मृतीसह मागे येत असते. व त्यांचा संवाद होतो.ऑर्फियसच्या बोलण्यावरुन, त्याचा समज दिसतो की, वरामुळे जीवन मिळाल्यावर, देव म्रुत्यूचा अनुभव बाहेर काढू शकतो.म्हणून ऑफियस, पहिला वर लगेच स्वीकारतो.

दुसऱ्या पैलूने विचार केला तर, स्म्रुती, काळाची जाणीव, देवाने परत दिली की, जीवाचा जीवनाकडे प्रवास सुरू होतो, असा ऑफियसचा अपुऱ्या ज्ञानाचा समज होतो.

डी)पण मागे येणारी युरिडीसी संवादात जे बोलते, त्यावरून ऑर्फियसला आता कळते की, हा वर देवाने दिल्यानंतरही, देवालाही, झालेल्या म्रुत्यूचा अनुभव, युरिडीसीतून बाहेर काढता येत नाही. यापुढे सूर्यप्रकाशात वावरतानाही ती म्रुत्यूचा तीव्र विचार सतत ठेवेन. पण ऑर्फियसला स्वतःला मात्र, म्रुत्यु दूर डोंगरावर आहे, व तेथे जाईपर्यंत दोघांनाही जीवन एकाच भावनेने सहजपणे जगता येईल, असे मनापासून वाटत असते. ही त्याची समज तो संवादात व्यक्त करतो.

दुसऱ्या पैलूने विचार केला तर, हालचाल करणारे शरीर, मन, स्म्रुती आली की पूर्वीचे जीवन आले. म्रुत्यूचा अनुभव देवाने काढला, असे ऑर्फियसला यावेळी वाटते, पण युरिडीसीबद्दल तसे नसते.

इ)त्याच संवादातून, युरिडीसीचा समज स्पष्ट होतो की, म्रुत्यु एकदा घेतल्याचा अनुभव, सतत जमिनीवर पाय ठेवून शरीर वर घेऊन चालण्यासारखा आहे. म्रुत्यूचा अनुभव तीव्रतेने जवळ राहील. पण शरीर सर्व संवेदनांचे सुख घेत राहील. त्यावेळी ही मतभिन्नता स्पष्ट होते.

एफ)या मतभिन्नतेतून ऑर्फियस, थोड्या स्वार्थीपणाने, आनंदी जीवनाकडे, व सोबतच्या व्यक्तीच्या प्रेमाकडे पाहतो. ऑर्फियस थोर असला, तरी त्याच्यात मानवी स्वार्थ आहे. देवाच्या अटीत सवलत आहे, या बदल झालेल्या भावनेतून ऑर्फियस मागे वळून पाहतो.

जी)देवतेला हा वेडेपणा वाटतो, व ती, तू प्रुथ्वीवर तळमळशील असे त्याला सांगते.

दुसऱ्या पैलूने विचार केला, तर, या वरानंतरही, एकदा घेतलेला म्रुत्यूचा अनुभव काळजात ठेवून, प्रुथ्वीवर, फार आनंदाने नसले तरी, सहवासाने जगले

पाहिजे असे देवतेला वाटते. युरिडीसीने म्रुत्यूबद्द्ल बोलले तरी, ऑर्फियसनेही ते सहवासासाठी सहन करत जगले पाहिजे, असा येथे देवतेचा विचार आहे.

एच)ऑर्फियस परत आल्यावर देव दुसरा, वर व निर्णय देतो. तो युरिडीसीला बोलावून सांगतो की, वर्षातून सहा महिने ती सूर्यप्रकाशात राहील व सहा महिने, म्रुत होवून देवाकडे म्रुत्यूलोकात येईल. असे चक्र चालू राहील.

हा वर देताना देवाचा निर्णय असतो की, जीवनाची क्षणभंगुरता सतत लक्षात घेऊन, दोघेही जीवनाचा अनुभव घेतील. त्यामुळे ऑर्फियसच्या अनुभव- विश्वात बदल होईल. हा वर ऑर्फियस स्वीकारतो.

येथे ऑर्फियस, म्रुत्यूच्या उघडझापीचा अनुभव कसा असेल, याचा विचार करतो. येथे म्रुत्यूला कशिदा काढलेल्या वस्त्राची उपमा दिली आहे.

आय्)पण म्रुत्यूची वेदना, अनंत, काळजात आकडा खोचणारी, सर्व शरीरभरची, असते. आता, देवाचा वर म्हणूनही, मी पुन्हा पुन्हा तो अनुभव कसा घ्यायचा, हे युरिडीसी स्वज्ञानाने विचारते.

म्हणून युरिडीसी हा दुसरा वर नाकारते.व ऑर्फियस म्रुत झाल्यावर भेटेल अशी आशा ठेवते.

म्रुत्यूनंतर स्मृती रहात नाही, त्यामुळे ते कशिदा काढलेले जीवनवस्त्र आगीत जळते, असा उपमेचा पुढील भाग दिला आहे.

जे)तसेच युरिडीसी सांगते की, ऑर्फियस, तू प्रिय व्यक्तीच्या म्रुत्यूचा अनुभव घेतला आहेस. व तो घेतलेला अनुभव, ऑर्फियसमधून देवही बाहेर काढू शकत नाही. तेव्हा विरहातही तू सहजपणे रहावेस, हे योग्य होईल.

प्रिय व्यक्तीच्या म्रुत्यूमध्ये सोबतच्या व्यक्तीला विरहाचा अनुभव मिळतो, हा दुसऱ्या द्रुष्टीने म्रुत्यूचा पैलू दाखवला आहे.

के)ग्रीक मिथक कथेत, म्रुत्यूनंतर लिथी नदीच्या किनारी स्मृती टाकाव्या लागतात. पण, नियतीच्या प्रभुत्वाखाली, देवाला, कर्तुम्, अकर्तुम्, अन्यथा कर्तुम्,

सामर्थ्य आहे. म्हणून देव, युरिडीसीला परत पाठवण्याचा वर देवू शकतो. त्या वरातच युरिडीसीला स्म्रुती येण्याची व संवाद करण्याची शक्ती अंतर्भूत आहे. ऑर्फियस, व युरिडीसी हे दोघे, प्रसंगांचे साक्षीदार राहून विचार मांडू शकतात. म्हणून हे कलावंताचे स्वातंत्र्य योग्य आहे.

2)जीएंनी मूळ ग्रीक कथेचा आधार घेतला आहे. म्हणून ही जीएंची कथा, कल्पित उत्तरार्ध- अपोक्रिफा-apocrypha- आहे. पण जीएंच्या कथेत, शब्द व अर्थ, प्रखर व तर्काचे आहेत. म्हणून ही कथा जास्त संपन्न झाली आहे.

3)मूळ ग्रीक कथेचे अनेक उपप्रकार लिहिले गेले आहेत. उदाहरणार्थ, एका उपप्रकारात, ऑर्फियस प्रेमाच्या उतावळेपणाने मागे वळून पाहतो.दुसऱ्यात, युरिडीसीबरोबर सेवक असतो, इत्यादी. जीएंच्या कथेत सर्व पात्रे दिव्यत्वाची आहेत. तसेच, सिसिफस इत्यादी इतर कथांचा संदर्भ देऊन, कथेची उंची व व्यापकता वाढवले आहेत.

4)कला----कथेत कलेचे महत्त्व अनेक पैलूंनी खालीलप्रमाणे दाखवले आहे.--ए)कलेचे, विशेषतः संगीत कलेचे महत्व दाखवताना, ऑर्फियसच्या वाद्यसंगीताने प्रुथ्वीवर झाडे हलतात, भयंकर सर्विरस रक्षक गुंग होतो, देवताही भावूक होते, असे प्रसंग दाखवले आहेत.

बी)पण, "माझ्या संगीताने म्रुत युरिडीसी जिवंत झाली नाही. मीही कोणाच्यातरी हातचे, (म्हणजे नियतीच्या हातचे, ) तंतुवाद्य आहे. म्हणून मी नम्र आहे, " असे तो म्हणतो. म्हणजे ही मर्यादा त्याला माहीत असते .

सी)त्यावर देव सांगतो की, दिव्य कलेची देणगी, नियती देत असते.त्यामुळे कलावंतही नियतीच्या नियमांच्या विरोधात जावून काही करू शकत नाही. पण कला व संततीप्रेम, हे माणसाला नियतीचे वरदान असून, त्यामुळे माणूस उंचावला जातो. ही भाषणे नाहीत, तर कलेचा अनुभव आहे. ते मूळातून वाचण्यासारखे आहे.

5)जीएंचा अस्तित्ववाद व पूर्ण ज्ञान---ए)अस्तित्ववादाप्रमाणे, माणसाला अटळ, एकाकी निर्णय घ्यावा लागतो. ऑर्फियसला मागे वळून पाहण्याचा निर्णय घ्यावा लागला. म्हणून, ऑर्फियसला-व मानवाला- अटळ, एकाकी निर्णय का घ्यावा लागतो, व मग तसे असेल तर पूर्ण ज्ञान का मिळू नये, असे आतड्याचे प्रश्न पडतात.

बी)अटळ एकाकी निर्णय घेण्याबद्दल, पहिल्या वरानंतर, देवाच्या क्रुतीतून स्पष्टता येते. तेव्हा निर्णय घेतला पाहिजे, ही कठोर अट नसून, माणसाला विचार करण्याची सवलत असते. मर्यादित ज्ञानाच्या आधारे, अनेक पर्यायांचा विचार करायला लागतो. मात्र नियतीच्या छायेखाली, व मर्यादित ज्ञानाच्या आधारे, माणूस हे निर्णयाचे स्वातंत्र्य वापरत असतो.मागे वळून पाहताना ऑर्फियसला हा पैलू जाणवतो. याला, सुधारित अस्तित्ववाद म्हणता येईल.

सी)दुसरा वर देताना, देव पूर्ण ज्ञानाची समज सांगतो. पूर्ण ज्ञान माणसाला मिळू शकत नाही.

..कारण, माणसाला काळाच्या तुकड्याचे थोडे आयुष्य मिळते. त्या तुकड्यात, तो ज्ञानाचे कण मिळवतो.

..देवाला जास्त ज्ञान मिळते. कारण त्याला काळाचे बंधन नाही. पण तरीही ते ज्ञान कण पूर्ण नसतात.

..माणूस काय, देव काय, विश्वव्यापी प्रक्रियेतील अणुरेणू आहेत. हेच नियतीचे ज्ञान आहे. त्यामुळे पूर्ण ज्ञान किंवा ज्ञान, हे, कोणीही दाखवावे असे झाडावरचे फळ नसून प्रक्रिया आहे. सर्वाहून नियती बलवत्तर आहे. त्यामुळे देवही ही सर्व प्रक्रिया माणसाला देवू शकत नाही. काळाच्या तुकड्यात मिळालेल्या ज्ञानकणांच्या साहाय्याने माणसाला एकाकी निर्णय घ्यावे लागतात."देव जर अगम्य असेल, तर तो स्वतःलाही अगम्य आहे" असे कथेत म्हटले आहे. येथे जीएंचा ज्ञानासंबंधी कलानुभव प्रकट होतो.

6)जीएंचा नियतीवाद-- सर्व कथेत, देवाच्याही वर, नियती एक छाया म्हणून वावरत असते. ती, मानवाला, त्याच्या जन्म, म्रुत्यूला, व म्हणून जीवनाला, व्यापून टाकणारी आहे. ती देवालाही बंधनकारक आहे. म्हणून देव युरिडीसीला अमर करु शकत नाही. हे पैलू कथेच्या प्रसंगांतून अशा प्रकारे दाखवले आहेत.--

ए) ऑर्फियस व देवाच्या पहिल्या भेटीत, देव सांगतो, नियतीच्या कठोर नियमांतून आम्ही देवदेखील मुक्त नाही. युरिडीसीला मी अमर करू शकत नाही. त्याप्रमाणे नियतीने तुझ्यासाठी राखून ठेवलेल्या क्षणाआधी, तुला म्रुत्यू देण्याचेही मला सामर्थ्य नाही.

बी)दुसऱ्या वेळी वर देताना देव म्हणतो, "तू काय, मी काय, एका विश्वव्यापी प्रक्रियेतील अणुरेणू आहोत. ही ज्ञानाची पहिली पायरी आहे.

सी)याप्रमाणे, माणसाला व देवालाही नियती अनाकलनीय आहे.

डी)यावर विचार केल्यावर असे वाटते की, नियती अनाकलनीय आहे. म्हणजे नियतीच्या क्रुतीचा क्षण व स्थळ अनाकलनीय आहेत.

म्हणजे, ---- माणसाच्या द्रुष्टीने, ---- तो क्षण व ते स्थळ अटळ आहेत."कोणीतरी" हे करते, असे मानले, तर त्याच्यापर्यंत पोहचता येईल.त्यामुळे ही अटळता पटणार नाही. पण नियतीच्या अनाकलनीयतेचा, माणसाशी निगडीत अर्थ घेतला, तर माणसाला उपलब्ध ज्ञानाच्या आधारे निर्णय घ्यावा लागतो. तो सुधारित अस्तित्ववाद होईल. असा निर्णय घेताना, नियतीचा क्षण व स्थळ, ---- माणसाच्या द्रुष्टीने ---- अनाकलनीय आहेत. म्हणून तो निर्णय अटळ आहे. या दोन्ही विचारांचे संयुग, म्हणजे 'जीएंचा नियतीवाद', म्हणता येईल.

7)कथेचा शेवटचा, भरतवाक्यांचा परिच्छेद, जीएंची प्रतिभा दाखवतो.


देवता म्हणते, " माणूस म्हणजे एकंदरीने डोळयांच्या बाहुल्या उलट्या असलेला प्राणी आहे, हेच खरे!" त्यावर देव म्हणतो, "अम्रुतबीज पेरूनही हाती विषफळ पडण्याची बाधा, असा हा मानव!"

म्हणून, ऑर्फियस कथा म्हणजे अनेक पैलूंचा हिरा आहे. त्यामुळे ही कथा वाचकांनी मूळातून वाचावी, असे वाटते.

--------------------------------------------

युरिडिसीला सर्प चावतो . व ती मृत होते

- सुप्रसिद्ध चित्रकार श्री विलास वाघोलीकर



ऑफियस मृत्यू लोकात देव देवतांपुढे तंतूवाद्य वाजवतो . व वसंत काळाचे चित्र उभे रहाते

सुप्रसिद्ध चित्रकार श्री विलास वाघोलीकर



देवाच्या पहिल्या वराप्रमाणे - ऑफियस मागे युरिडिसी जाते . शेवटी ऑर्फियस मागे वळून पहातो

सुप्रसिद्ध चित्रकार श्री विलास वाघोलीकर




ऑर्फियसला प्रश्न पडतो . तो मागे वळून युरिडिसीकडे पहातो - क्लोज अप

सुप्रसिद्ध चित्रकार श्री विलास वाघोलीकर



विश्वाच्या पार्श्वभूमीवर मानवी जीवन - पाळणा ते म्हातारपणाचा वॉकर - कल्पनाचित्र

सुप्रसिद्ध चित्रकार श्री विलास वाघोलीकर



# ऑर्फीयस

मी दहावीला असताना म्हणजे साधारण 1993 सालच्या दहावी अभ्यासक्रमात इंग्रजी विषयात 'पॉवर ऑफ म्युजिक' नावाचा धडा होता. ग्रीक लोककथा असलेला हा धडा .ज्यात ऑर्फीयस आणि युरिडीसी चं प्रेम, त्यांचं संगीतावरील आणि जगण्यावरील प्रेम, तिच्या मृत्यूनंतर ऑर्फीयस अद्भुतसंगीत कौशल्याच्या जोरावर मृत्यू लोकांवर विजय मिळवून युरिडीसीला परत आणण्यात यशस्वी होतो परंतु शेवटच्या क्षणी ऑर्फीयस चुकून मागे पाहतो आणि युरिडीसी परत जाते अशी विरह कथा किंवा असफल प्रेमकथा आहे.जीएंना ग्रीक कथा आणि पाश्चिमात्य साहित्य नेमकं खुणावतं. पण ते केवळ भाषांतरासाठी अनुवादासाठी नाही तर त्याच्याही पुढे कितीतरी मैल जाऊन जी ए जीवनाचं निर्मळ तत्वज्ञान मांडतात.जिथे ही लोककथा संपते तिथून जी ए सुरू होतात.

मला वाटतं मृत्यू ला यापेक्षा सकारात्मक दृष्ट्या पाहणं शक्यच नाही, या अगोदर ही चर्चिल्या गेलेल्या आसरा कथेत माझा दृष्टिकोन मांडताना सुद्धा तो सकारात्मक आहे असाच येतो. या जन्माची मुळात उलटीच गोम आहे. जे जवळ आहे ते सगळं खोटं आहे.पण आपण त्याला कवटाळून बसलोय.जे कायम सोबत करणारं आहे त्याला आपण घाबरतोय, किंबहुना त्याला आपल्याला स्वीकारायचंच नाही. पण ते साक्षात समोर उभं ठाकणारच आहे.अन ते टाळण्यासाठी आपली वणवण आहे धडपड आहे.असो

मृत्यू पाहिलेला माणूस.

आपल्या आयुष्याची अजून एक गंमत सांगतो, सिनेमाचा शेवट माहीत असेल तर सिनेमाची मजा जाते.परीक्षेचा निकाल परीक्षा देण्या आधीच माहीत झाला तर परीक्षा देण्याची एक्साईटमेंटसंपून जाते.तसंच आपला मृत्यू कधी आहे कसा आहे हे आपल्याला कळलं तर जगण्याची मजा निघून जाते.हे खरंय ना?

अजिबात नाही! असं जी ए म्हणतात. उलट आपण कधी न कधी मरणारच आहोत हे नक्की आहे तर मग जे काही जगणं आहे ते आनंदानं जगा !!पण हे शक्य आहे का?? माहीत नाही पण असण्याची शक्यता दाट आहे. त्यासाठी काय करावं लागेल तर षड्रिपु च्या सहा तोंडी अजगराला शांत करावं लागेल.तरच जीवनापल्याडच्या अंधारात प्रकाश दिसेल.तिथं जाऊनही तुमची ईच्छा जिवंत राहिलीच तर ती परत तुमच्या मागे फरफटत येईल युरिडीसी सारखी, आशा बनून, मग तुम्हाला मनाचा निग्रह करून तिला परत पाठवावे लागेल.इतर सारे विसरून एकाच वस्तूकडे ध्यान देणारा माणूस डोळे असून आंधळाच ठरतो आपण सगळे काय करतो बघा!!आपलं ध्यान फक्त जगण्याकडे श्वास मोजत, खरं जगणं आहे का त्यात??

आता खरं जगणं कसं तर आहे त्या परिस्थितीला स्वीकारून.

मृत्यू मग तो स्वतःचा असो की आपल्या प्रिय व्यक्तीचा आपल्याला स्वीकारता आला पाहिजे. जे क्षण ज्या वेळी आलेत ते त्याच वेळेचे साक्षीदार असतात, ते तेव्हाच उपभोगायचे, तृप्तीनं आणि अलगद सोडून द्यायचे. त्याचा पाठपुरावा करत राहाल तर दमाल, ते विसावू द्यायचे त्या गवताच्या पात्यावर बसलेल्या लाल ठिपक्यांच्या काळया फुलपाखरासारखे(पृष्ठ क्र.८) शांतपणे मृत्यू अटळ आहे ही कल्पना असते, जेव्हा आपल्या प्रिय व्यक्तीचा मृत्यू आपण अनुभवतो तेव्हा ती जाणीव बनते

किती मोठं तत्वज्ञान जीए सहज सांगून जातात!! आपल्या प्रत्येकाच्या घरात, आपली प्रिय व्यक्ती आपल्याला सोडून गेली तेव्हा सगळं जीवन निरर्थक वाटलं होतंच, आपण तो मृत्यू किती सहज स्वीकारला यावर त्यानंतरच्या आपल्या आयुष्यात आपल्या जाणिवा किती समृद्ध होत गेल्या हे अवलंबून राहिलं आहे, तो मृत्यू आपल्याला अचानक प्रौढ बनवून जातो, नवा दृष्टीकोन देऊन जातो, त्यानंतर आपलं मन साध्या गोष्टीत रमत नाही.युरिडीसी सारखंच.

हे सगळं जरी आपण बोलत असू तरी ही कथा जी ए च्या शब्द संपत्ती साठी सामर्थ्यासाठी पुन्हा पुन्हा वाचावी. सगळंच इथं नाहीच मांडता येणार.

पण तरीही अंतिम चरण माहीत असेल तर पहिली चरणे गात आनंदात अंतिम चरणाला सामोरं जाणं, त्यासाठी स्वतःला तयार करणं हे अंतिम ज्ञान आहे असं जी ए म्हणतात.

अभयकुमार कुलकर्णी

यतीन यांनी युरीडीसी ला दोनदा परत पाठवण्याची गरज का भासली असावी या बाबत संभ्रम व्यक्त केला आहे .

पण मला लक्षात आलेली एक गोष्ट आशि आहे की, जी ए त्यांच्या कथेतील प्रत्येक पात्र एकच परिस्थिती असताना कोणत्या प्रकारे विचार करत आसेल याचा नेहमी विचार करतात. ते जेव्हा एका पात्राचे विचार सांगत आसतात त्याच वेळी त्या परिस्थितीत काय विचार करत आसेल याचे ही विचार त्यांच्या डोक्यात आसतात . ऑर्फियस एखादी गोष्ट करतो त्यावेळी युरी डीसी तिच्या बाजूने काय विचार करत आसेल याचे पण त्यांना आकर्षण आसते . त्यामुळे या कथेत त्यांनी आतिषय उत्तम प्रकारे देव देवता आणि मुख्य दोन पात्रे एकच घटनेचा आप आपल्या बाजूने कसा विचार करत आहेत आणि ते सगळे आप आपल्या ठिकाणी कसे योग्य आहेत हे जी ए आत्यंत प्रभावी पणे आपल्याला सांगतात.

जी ए क्या अनेक कथा वाचताना मला हे जाणवते की ते आपल्या कथेतील प्रत्येक पत्राचा बारकाईने विचार करतात.

दीपस्तंभ ही कथा त्याचे उत्तम उदाहरण आहे . वाचकांच्या मनात जसा विचार येतो की दुसऱ्या पायर्यांनी नायक गेला असता तर काय झाले आसते, जी ए ना पण

तेच वाट ते त्यांनी दीपस्तंभ २ कथा लिहून वाचकांची आणि त्यांची स्वतः ची जिज्ञासा पूर्ण केली .

प्रदक्षिणा ही कथा छापून आल्यावर आणेकानी त्यांचं अभिनंदन केले . पण त्यांनी एक पत्रात वेगळाच विचार मांडला . त्यांचे म्हण ने होते प्रदक्षिणा कथेत बाबासाहेबांची पण एक बाजू असणार होती मी ती कथेत मांडली नाही पण वाचकांनी त्या दृष्टीने विचार केला असता तर मला जास्त आनंद झाला आसता.

- विश्वेश्वर नांदेडकर

विश्वेश्वरजी, आपण जीएंच्या कथा वाचण्याचा एक वेगळाच कोन दिलात त्याबद्दल आभार.

प्रदक्षिणा, अंधाराची पावले, कैरी, राधी अशा काही कथा सोडल्या तर जीएंच्या कथांमधे सहसा कोणीही व्यक्ती व्हिलन च्या स्वरुपात नसते. हिरोही नसते. नियती, परिस्थिती, अस्तित्त्वाची धडपड, उत्सुकता, हेच हिरो आणि व्हिलन.

पण या चार कथांच्या वाचनाच्या वेळी मात्र अत्यंत क्रूर हिडीस माणसे आपल्याला भेटतात. (अजूनही असतील एक दोन कथा). तुम्ही आता जो दृष्टीकोन दिला त्यातून पुन्हा एकदा या कथा वाचेन. मनापासून आभार.

---

ऑर्फ़ियस कथेतील हे दोन भाग मला अजूनही उलगडलेले नाहीत. पुन्हा वाचतो आहे.

-सुनीळ सामंत

श्री नांदेडकरानी मांडलेला विचार 'एकाच परिस्थितीत अनेक पात्रे कसकशा दृष्टिकोनांतून विचार करू शकतील या बाबतीत जीए फार काळजीपूर्वक असतात' या कल्पनेचा प्रत्यय आता जाणवतो. ही नवी जाणीव करून दिल्याबद्दल आभार.

पण अजून ' देवाला यूरिडिसीला दोनदा परत पाठवण्याची गरज' का भासली हा संभ्रम दूर झाला नाही.

पहिल्यांदा पाठवताना किती 'अमूक काळासाठी' असा उल्लेख नसल्याने कायम (म्हणजे परत मृत्यू येईपर्यंत) असा अर्थ अभिप्रेत होतो.

दुसऱ्यांदा पाठवताना मात्र 'सहा महिन्यांसाठी' या कालमर्यादेमुळे असा एक प्रश्न उपस्थित होतो की जो देव प्रथम कालमर्यादेशिवाय पाठवण्यास तयार असतो तो मग कालमर्यादा का घालतो?

दुसऱ्यांदा पाठवण्याची देणगी देऊ करताना मांडलेली भूमिका पहिल्याखेपेसच मांडून यूरिडिसीला पाठवता आले नसते का?

बराच विचार करता मी केलेला विचार पटतो. तो म्हणजे

1 पहिल्याखेपेस युरिडिसीला पाताळात परतवण्याचा ऑर्फियसचा कठोर निर्णय अधोरेखित करण्यासाठी ही योजना असावी.

2 दुसऱ्या वेळेस यूरिडिसीचा प्रकाशात येण्यास नाकारायचा कठोर निर्णय दाखवण्यासाठीची ही योजना असावी.

3 शिवाय दुसऱ्यांदा यूरिडिसीला परत पाठविण्याची देणगी देऊ करताना देवाला ' जीवनाची क्षणभंगुरता', 'सौंदर्यासक्ती' आणि या दोन्हींतून उगम पावणारी 'प्रबळ व सुखकारक प्रजननाची इच्छा' याविषयावरचे तत्वज्ञान प्रकट करण्याच्यासाठी ही योजना असावी.

सरतेशेवटी आणखी एक उपप्रश्न!

दुसऱ्याखेपेच्या देवाच्या देणगीमध्ये

'सहा महिने प्रकाशात व सहा महिने पाताळात' असे एकदाच

की

आळीपाळीने अनेकदा?

प्रश्न बालीश वाटला ना? पण उपस्थित करण्याच्या धाडसामागे प्रांजलपणाने कथा समजून घेण्याचा प्रयत्न आहे.

मला सहासहा महिने एकदाच असे वाटते पण मग यूरिडिसी "---आणखी आकडे खोचत ---'अनेक मृत्यू' सहन करत रहाण्याचे आता माझ्यात त्राण नाही" असे का म्हणते? (पान 15)

जीएंना नेमके काय सुचवायचे असेल?

अनेक संतती? (प्रजननवाढ?)

- यतीन गुळवणी

अत्यंत सुंदर विवेचन. ऑर्फ़ियस ही कथा तात्विक गुंतागुंतीची आहे. ' **तुम्ही जी ठेवली ती अट नव्हती तर सवलत होती**" " आणि " **हे भयानक स्वातंत्र्य तू मला का दिलंस**?" या ऑर्फ़ियस च्या उद्गारांतून वरदान, अट, स्वातंत्र्य आणि सवलत या चारही शब्दांचे उलटे सुलटे अर्थ समोर येतात. (इस्किलारमधे "प्रथम कोणती गोष्ट करायचे आपण धैर्य दाखवले पाहिजे तर एकामागोमाग कासवे उलटी करीत गेल्याप्रमाणे शब्द पालथे करीत जायला शिकले पाहिजे, म्हणजे त्यांचे फिकट दुबळे भाग देखील आपणाला दिसतील. प्रत्येक शब्दातच त्याचे विरुद्ध, विरूप दर्शन देखील कोठेतरी दडलेले असते. आणि तू शब्दाचे एकच रूप ध्यानात घेऊन त्याच्यावर विसंबलास की भलत्याच वेळी बरोबर विरुद्ध असे रूप दाखवून तो तुला फशी पाडेल. " असे जे वाक्य आहे त्याचा अर्थ इथे कळतो.

-सुनीळ सामंत

ग्रीक ऑफियस कथेवर हे, वेगळे रूपांतर, अपोक्रिफा-apocrypha- आहे. त्यामुळे जी एं नी किमान पण आवश्यक कला स्वातंत्र्य घेतले आहे. कथेसमोर प्रश्न

आहे - मृत्यूनंतरचे अस्तित्व दाखवून मृत्यूचे असंख्य पैलू स्पष्ट करणे . मृत्यूनंतर कल्पनेने अनेक permutations- पर्याय उभे राहतात - उदाहरणार्थ -

1) मृत्यू नंतर युरिडिसी अचेतन राहते . ऑर्फियस शोक करतो . नंतरचे जीवन तो त्या शोकात किंवा कालांतराने शोक विसरून कसेतरी जगत रहातो. वास्तवात आपल्या समोर सामान्यतः असे घडते .

2) पर्याय -ऑफियस जिवंत असताना यमलोकात जातो . व युरिडिसीचे प्राण मागतो. येथे भारतीय नचिकेत कथेची आठवण येते .

3) देव म्हणतो . असे प्रत्येक माणूस प्रिय व्यक्तीला मागायला आला व मी त्याचे प्राण देवू लागलो तर मृत्यू ही हरघडीची गोष्ट होईल व माझ्या मृत्यू राज्याला काय अर्थ राहील ? म्हणजे मृत्यू हरघडी बदलणारी घटना होईल - हे देव दाखवून देतो .

4) महत्वाचे . पण देवता रदबदली करते व अपवाद करायला सांगते . नियती सर्वश्रेष्ठ आहे - तिने युरिडिसीचा मृत्यूक्षण ठरवला व अंमलात आणला . देवाला ते प्राण स्वीकारायचे व ताब्यात ठेवायचे काम आहे. पण कलास्वातंत्र्य म्हणून देवाला या प्रसंगापुर ती कर्तुम् अकर्तुम्, अन्यथा अकर्तृम्, शक्ती दिली आहे. त्याशिवाय गोष्ट पुढे जाणे शक्य नाही .

5) म्हणून देव पहिला वर देतो . बाहेर जाईपर्यंत ऑफियसने मागे वळून पाहू नये . तसे केल्यास युरिडिसी परत येईल . त्यावेळी युरिडिसीला, प्राण, स्मृती, संभाषणशक्ती दिली आहे . पण अट ठेवल्याने, तसेच मृत्यूची स्मृती तशीच असल्याने, ती पूर्वीची युरिडिसी नाही . मूळ ग्रीक कथेतही ही अट असते . कथेत जी ए, संभाषण दाखवून या अटीला वेगळा आयाम देतात . व युरिडिसी व ऑफियस यांचे भिन्न जीवन दृष्टीकोन स्पष्ट करतात .

- 6) महत्वाचे -दुसऱ्या एका ग्रीक Persephone - पर्सेफोन कथेत . सहा महिने पृथ्वीवर व सहा माहिने मृत्यूलोकात रहाण्याची कथा आहे . जीए त्या ही

कथेचा येथे उपयोग करतात . व हा पर्याय देव ऑर्फियस समोर ठेवतो . यातही सहा महिन्यांनंतर परत मृत्यूलोकात जायचे असल्याने उघडझाप होते . यातही मृत्यू लादण्याचा नियतीचा अंतिम अधिकार अबाधित रहातो . देव यातही अट घालून त्याचे देवत्व स्पष्ट करतो .

- वाचक फक्त पर्याय १ मान्य करु शकतो. क्र 2 पासूनचे सर्व पर्याय नाकारण्याचे स्वातंत्र्य आहे . पण मग वाचकाला, कल्पनाशक्तीने व प्रतिभेने, जीएंनी जीवन मृत्यूबदलचे सांगितलेले विचार कळणार नाहीत . कलात्मक स्वातंत्र देवून अशी कलाकृती होवू शकते . उदाहरणार्थ, भारतीय दर्शनात नचिकेतच्या कथेतून, आत्मा या श्रध्देचे स्वरूप दाखवले आहे . माझ्या दृष्टीने ही कथा ग्रीक पुराणकथांवर आधारित आहे . त्यामुळे दिलेले कथानक स्वीकारून जीवन - मृत्यू खेळाचा विचार करावा व कथेचा आस्वाद घ्यावा . धन्यवाद .

विलास वाघोलीकर

जी ए अनेक कथात वाचकांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण करून कथा संपवतात . ऑर्फियस आशीच कथा आहे . प्रश्नच निर्माण करायचे तर खरोखरीच नायक नायिका पृथ्वी वर येवून सहा महिन्याचे आयुष्य जगले आसते तर काय, किंवा त्याने मागे वळून पाहिले नसते तर, एकदा मृत होवून पुन्हा आयुष्य मिळाल्यावर नेमके सकारात्मक विचार युरिडी सी घेवून जगली आसती तर, असे अनेक कर तर उरतात. म्हणून लेखकाने मांडलेले विचार आणि कथेचे सूत्र या ठराविक साच्याताच आपले विचार आपण मांडले पाहिजेत. कथा प्रत्येक वेळी अनेक प्रकारे विकसित करता येते आणि प्रत्येकाने असे स्वातंत्र्य घेतले तर ती चर्चा कधीच न संपणारी ठरू शकते .

म्हणून मला वाटते, की कथेचे रसग्रहण करताना जर तर आसे न करता कथा आहे तशीच विचारार्थ घेणे योग्य राहील

- विश्वेश्वर नांदेडकर

विश्वेश्वर-मला वाटते जि.ए.कथा लिहीतांना वाचकांना गृहित धरत नसावेत.वाचकांना कथा आवडते हे त्यांच्या लेखनाचे अकल्पित फळ म्हणावे.

- दिलिप बडे

अगदी बरोबर !

जी.ए. काळाच्या खुप पुढचे लेखक होते.

तो आला .....ती आली ... प्रेम जमले ....थोडा विरह ....आणि शेवटी सुखाने हजारो वर्षे राज्य केले ....असल्या वाचकाभिमुख कथा जी.ए.नी लिहल्या नाहीत.

त्यांच्या कथा किंवा novelette या एक झगझगीत अनुभवांच्या पुंजक्यांचे विश्व असते.

ते आपल्या developemental psychology चे नियम पाळून अनुभवायची असते...., जी.एं, च्या कथा आपण अक्षरशः जगतो !

- वैभव कुलकर्णी

ऑर्फियसच्या शेवटी दोन वाक्यं आहेत.

-त्याच्या बाबतीत योग्यायोग्यता ठरवण्याचा आपल्याला काय अधिकार आहे?

-एखाद्या भीषण श्वापदाच्या डोळ्यांसमोरून काजवे उडत गेल्याने त्याला क्षणभर प्रकाशटिंबे दिसून नाहीशी व्हावीत, त्या प्रमाणे ते शब्द अंधारात तरंगले.

जीएंच्या या कथेचे सार मला या दोन वाक्यांत दिसले.

या कथेत घडले काय? सुरुवात जिथून झाली तोच शेवट. ऑर्फियस आणि युरिडिसीचा विरह.

या कथेत तरीही जे काही घडले ते एखाद्या भीषण श्वापदाच्या डोळयांसमोरून काजवे उडत गेल्याने त्याला क्षणभर प्रकाशटिंबे दिसून नाहीशी व्हावीत, त्या प्रमाणे ते शब्द, आले आणि अंतर्धान पावले. प्रत्यक्ष सारे होते तसेच राहिले.


या कथेच्या वाचनाने मला काय मिळाले? काहीकाळ मला न्याधीशाच्या स्थानावर बसून चारही जणांच्या निर्णयांवर विचार करायची आणि त्यांची योग्यायोग्यता ठरवण्याची संधी मिळाली. पण आपल्याला काय अधिकार? आपण त्या जागी असतो तर आपण काय केले असते? नाही सांगता येत.


जीएंच्या कथा वाचताना एक वेगळा आनंद मिळतो. सुदैवाने या कथांवर चर्चा करताना तो आनंद वाढतो. समोरच्याचे कधी कधी न पटणारे विधानही जीएंच्या पद्धतीने विचार करायला गेल्यावर म्हणता येते – आपल्याला त्या विधानाची योग्यायोग्यता ठरवण्याचा काय अधिकार?

- सुनीळ सामंत

जीए कुलकर्णी यांचे धारवाड येथील घर




Samsung Triple Camera
Shot with my Galaxy A50




जीवन इतके अनंतरुप आहे की अगदी संपूर्णपणे माझ्यासारखेच आयुष्य असलेला माणूस पूर्वी कधी झाला नाही व पुन्हा कधी होणार नाही. त्या दृष्टीने प्रत्येक सामान्य माणूस देखील अद्वितीय असतो. मी गेल्यानंतर एक अव्दितीय भावविश्व पूर्णपणे विरुन जाणार आहे



**जी. ए. कुलकर्णी** हे मराठी साहित्यातले रत्नच. त्यांची प्रत्येक कथा पैलूदार असे. या प्रत्येक पैलूचे नेमके आकलन होणे हे कोणा एका वाचकाला दुरपास्तच.

२०२२-२३ हे जी. ए. यांचे शताब्दी वर्ष होते! या वर्षाचे औचित्य साधून जाणत्या जी.ए.प्रेमी वाचकांनी एक उपक्रम हाती घेतला. आभासी पद्धतीने एकत्रित येऊन त्यांनी जी. ए. यांच्या ९४ कथांवर विविधांगाने चर्चा केल्या, अनेक मते, दृष्टीकोन मांडले. संकलित केले. ही संकलने सात खंडांत उपलब्ध आहेत. जी.ए. यांच्या कथावाचनाचा आनंद घेतांना या चर्चा जी.ए.प्रेमी तसेच अभ्यासक-समीक्षकांना निश्चितच उपयुक्त ठरतील. हा मौल्यवान ठेवा आपल्याकडे नक्कीच हवा!